# प्रकरण तीन

# लघुपाटबंधारे विभाग

**3.310 मौजे साखरे येथील के.टी. बंधारा दुरुस्ती करणे, तालुका मुरबाड.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,06,148/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) हे पूर्ण काम विहीत वेळेत पूर्ण केले, नसल्याने संपूर्ण कामावर 10 टक्के (रुपये 14,06,148/- x 10 टक्के) रुपये 1,40,614/- दंड आकारणी करून त्यानुसार वसुली करणे आवश्यक होते. परंतु, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 149 अन्वये ठेकेदारास या कामावर फक्त 1 टक्के दंड आकारून कामास मुदतवाढ दिल्याचे दिसून येते. तरी उर्वरित 9 टक्के दंडाची रक्कम रुपये 1,26,552/- ची वसुली होणे आवश्यक आहे.

2) या कामाचे देयकातून रुपये 71,648/- इतकी रक्कम स्वामित्वधनापोटी कपात केल्याचे दिसून आले आहे. या रकमेचा भरणा संबंधित लेखाशीर्षाखाली केल्याचे अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

3) या कामाच्या बाब क्रमांक 7 मध्ये मंजूर प्राकलनापेक्षा रुपये 20,780/- इतक्या रक्कमेचे जादा काम कार्यान्वित केल्याचे दिसून येते. सबब या बाबीमध्ये सुध्दा मूळ मंजूर प्राकलनानुसार काम केल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र पंचायत समिती व जिल्हा परिषद लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 118 नुसार मूळ अंदाजपत्रकात महत्वाचे घटनात्मक बदल आवश्यक असल्यास मूळ मंजूरी प्राधिकाऱ्याची परवानगी / आदेश घेणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका नियम 261 नुसार अंदाजातील अपेक्षीत वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येवू नये. मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे, असे मानता येणार नाही. निविदेच्या शेड्युल बी-1 निविदा कलम 38 (2) नुसार अंदाजपत्रकांपेक्षा एखाद्या बाबीवर 25 टक्के इतकी तफावत किंवा त्या बाबीवर रुपये 5,000/- इतका बाबानिहाय प्राकलनापेक्षा जादा खर्च मान्य केला आहे. त्यामुळे नमूद ज्यादाची 15,780/- रक्कम वसूल करून अनुपालन अहवाल सादर करावा.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 87 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये खडी, मुरूम, सिमेंट, स्टील इत्यादी साहित्याचे शासकीय प्रयोगशाळा चाचणी अहवाल साहित्य वापरापूर्वी प्राप्त करून घेणे व त्या नंतर बांधकामात साहित्याचा वापर करणे अपेक्षित आहे. याप्रमाणे या प्रकरणी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. खुलासा करावा.

6) बांधकामाचे देयक मंजूर करताना बांधकामात वापरलेल्या साहित्याचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी प्रयोगशाळा चाचणी अहवाल योग्य असल्याबाबत शासकीय गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत चाचणी करून त्याची प्रत देयकासोबत जोडून नंतर प्रदान करणे आवश्यक आहे. नस्तीसोबत दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई व प्रादेशिक प्रयोगशाळा, तुर्भे यांचे चाचणी अहवाल दिसून येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक जीआर/34/सा-4/5999, दिनांक 08/01/2007 अन्वये बांधकामात सिमेंटचा वापर करण्यापूर्वी सिमेंट योग्य असल्याबाबतची तपासणी शासकीय प्रयोगशाळेतून करून घेण्याची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. खुलासा करावा.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/ प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेत नोंदी घेतल्यानंतर दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेत बाबनिहाय दिनांकित स्वाक्षरीच्या नोंदी नसल्याने तसेच मंजूर दैनंदिनी उपलब्ध न झाल्यामुळे मोजमाप पुस्तिकेतील नोंदी जागेवर घेऊन कामाची गुणवत्ता व दर्जा राखण्यासंबंधी योग्य सनियंत्रण

केले किंवा कसे याची खात्री होत नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेत काम केव्हा सुरू करणेत आले? याबाबतच्या नोंदी नाहीत.

8) 0 ते 100 हेक्टर सिंचनक्षमता असलेल्या योजनांसाठी जोपर्यंत सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्यात येणार नाही, तोपर्यंत वित्तीय तरतूद करण्यात येवू नये, असे निर्देश ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक नागरी-2011/प्रक्र192/जल1, दिनांक 02/02/2012 मध्ये दिले आहेत. तसेच योजनांसाठी सहकारी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याशिवाय कार्यारंभ आदेश देऊ नयेत, असे निर्देशित केले आहे. याप्रकरणी, अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

9) या प्रकल्पातून सिंचनासाठी पुरविलेल्या पाण्यापासून पाटबंधारे विभागाने ठरवून दिलेल्या पाणीपट्टीनुसार संबंधित लाभधारकाकडून किती वसुली करण्यात आली? याचा उल्लेख दुरूस्ती प्रस्तावामध्ये कुठेही दिसून आला नाही. कारण, मुख्यत: देखभाल दुरूस्तीचा खर्च हा पाणीपट्टी वसुलीतून भागवावा, असे उपरोक्त शासन निर्णयात नमूद केले आहे.

10) प्रशासकीय व तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे या प्रकल्पाच्या परिसरात भाजीपाला, दुध, फळे इत्यादी बाबींपासून प्रतिवर्ष मिळणाऱ्या उत्पन्न प्राप्तीबद्दलचा फलनिष्पत्ती अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.

**3.311 मौजे हाजीमलंगवाडी येथील बंधारा दुरुस्ती करणे, तालुका अंबरनाथ.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,73,509/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) हे काम विहीत वेळेत पूर्ण केले, नसल्याने संपूर्ण कामावर 10 टक्के रुपये 37,350/- दंड आकारणी करून त्यानुसार वसुली करणे आवश्यक होते. परंतु, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 149 अन्वये ठेकेदारास या कामावर फक्त 1 टक्का दंड आकारून कामास मुदतवाढ दिल्याचे दिसून येते. तरी उर्वरित 9 टक्के दंडाची रक्कम रुपये 33,616/- ची वसुली होणे आवश्यक आहे.

2) गौण खानिजासाठीचे स्वामित्व धनाची वसुली ही सुधारित दरानुसार वाळूसाठी रुपये 800/- प्रति ब्रास आणि खडी, मुरूम इत्यादीसाठी रुपये 400/- प्रति ब्रास या दराने वसूली करणे आवश्यक आहे. तरी रुपये 8,399/- ची वसुली करावी.

3) या कामाचे देयकातून रूपये 8,399/- इतकी रक्कम स्वामित्वधनापोटी कपात केल्याचे दिसून आले आहे. या रकमेचा भरणा संबंधित लेखाशीर्षाखाली केल्याचे अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र बांधकाम नियमावली 296(ब) नुसार फेब्रुवारी व मार्च महिन्यामध्ये कामाचे कार्यादेश देवू नयेत, असे निर्देश आहेत. तथापि, कार्यादेश दिल्याचे दिसून आले.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 87 व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-सिमेंट/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये खडी, मुरूम, सिमेंट, स्टील इत्यादी साहित्याचे शासकीय प्रयोगशाळा चाचणी अहवाल साहित्य वापरापूर्वी प्राप्त करून घेणे व त्यानंतर बांधकामात साहित्याचा वापर करणे अपेक्षित आहे. याप्रमाणे या प्रकरणी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

6) बांधकामाचे देयक मंजूर करताना बांधकामात वापरलेल्या साहित्याचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी प्रयोगशाळा चाचणी अहवाल योग्य असल्याबाबत शासकीय गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत चाचणी करून त्याची प्रत देयकासोबत जोडून नंतर प्रदान करणे आवश्यक आहे. नस्तीसोबत दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई व प्रादेशिक प्रयोगशाळा, तुर्भे यांचे चाचणी अहवाल दिसून येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक जीआर/34/सा-4/5999, दिनांक 08/01/2007 अन्वये बांधकामात सिमेंटचा वापर करण्यापूर्वी सिमेंट योग्य असल्याबाबतची तपासणी शासकीय प्रयोगशाळेतून करून घेण्याची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्रक्र44/ 33, दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेत नोंदी घेतल्यानंतर दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेत बाबनिहाय दिनांकित स्वाक्षरीच्या नोंदी नसल्याने तसेच मंजूर दैनंदिनी उपलब्ध न झाल्यामुळे मोजमाप पुस्तिकेतील नोंदी जागेवर घेऊन कामाची गुणवत्ता व दर्जा राखण्यासंबंधी योग्य सनियंत्रण केले किंवा कसे? याची खात्री होत नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेत काम केव्हा सुरू करणेत आले? याबाबतच्या नोंदी नाहीत.

8) या कामाचा ओरीएंटल इंश्योरंस कंपनी लि. यांचेकडे दिनांक 27/07/2015 रोजी विमा काढलेला आहे. प्रत्यक्षात हे काम दिनांक 25/03/2015 रोजी संपलेले आहे. विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविवी-2903/ सहविमा/जिप/संकीर्ण/अभियांत्रिकी/एम-2, दिनांक 27/06/2003 नुसार काम सुरु करण्यापूर्वी त्याचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तरी काम संपल्यानंतर विमा काढण्याबाबत खुलासा सादर करावा.

**3.312 आंबेळे येथे पक्का बंधारा बांधणे, तालुका मुरबाड.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 19,99,342/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) हे काम विहीत वेळेत पूर्ण केले नसल्याने संपूर्ण कामावर 10 टक्के रुपये 1,99,934/- दंड आकारणी करून त्यानुसार वसुली करणे आवश्यक होते. परंतु, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 149 अन्वये ठेकेदारास या कामावर दंड माफ करून कामास मुदतवाढ दिल्याचे दिसून येते. तरी दंडाची रक्कम रुपये 1,99,934/- ची वसुली करून अनुपालन सादर करावे.

2) या कामाचे देयकातून रुपये 76,209/- इतकी रक्कम स्वामित्वधनापोटी कपात केल्याचे दिसून आले आहे. या रकमेचा भरणा संबंधित लेखाशीर्षाखाली केल्याचे अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

3) सदरच्या कामाचे अंदाजपत्रक हे 2009-2010 च्या दरसुचीवर आधारीत आहे. प्रत्यक्षात काम हे 2015-2016 या वर्षात झाले आहे. मागील 5-6 वर्षामध्ये दरसूचीमधील किंमतीत निश्चितच मोठा फरक पडलेला आहे. सदरचा खर्च त्या वेळेच्या तांत्रिक मान्यतेच्या खर्चात बसविण्याच्या उद्देशाने प्रत्यक्ष प्रत्येक बाबींवरील मोजमापे कमी करण्यात आले आहे, असे दिसून येते. बाब क्रमांक 1 - Cleaning and removing grass,bushes इत्यादी त्या कामाच्या जागेचे क्षेत्रफळ दर्शविते, जे प्रत्यक्षात जागेवर जाऊन मोजणे अपेक्षित आहे. अंदाजपत्रकामध्ये 900 sqmt दाखविलेले काम प्रत्यक्षात 850 sqmt करण्यात आले, यावरून बांधकामाचे क्षेत्र कमी करून खर्च बसविण्यात आल्याचे दिसून येते.

4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2008/प्र.क्र.85, दिनांक 11/06/2004 नुसार कामाचे अंदाजपत्रक काळजीपूर्वक व वस्तुनिष्ठ परिस्थितीवर तयार करणे आवश्यक आहे. कार्यान्वित केलेल्या कामनिहाय बाबीचे अवलोकन केले असता, अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ परिस्थितीवर व काळजीपूर्वक तयार केल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 87 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये खडी, मुरूम, सिमेंट, स्टील इत्यादी साहित्याचे शासकीय प्रयोगशाळा चाचणी अहवाल साहित्य वापरापुर्वी प्राप्त करून घेणे व त्यानंतर बांधकामात साहित्याचा वापर करणे अपेक्षित आहे. याप्रमाणे या प्रकरणी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. खुलासा करावा.

6) बांधकामाचे देयक मंजूर करताना बांधकामात वापरलेल्या साहित्याचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी प्रयोगशाळा चाचणी अहवाल योग्य असल्याबाबत शासकीय गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत चाचणी करून त्याची प्रत देयकासोबत जोडून नंतर प्रदान करणे आवश्यक आहे. नस्तीसोबत दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई व प्रादेशिक प्रयोगशाळा, तुर्भे यांचे चाचणी अहवाल दिसून येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाचे, शासन परिपत्रक क्रमांक जीआर/34/सा-4/5999, दिनांक 08/01/2007 अन्वये बांधकामात सिमेंटचा वापर करण्यापूर्वी सिमेंट

योग्य असल्याबाबतची तपासणी शासकीय प्रयोगशाळेतून करून घेण्याची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. खुलासा करावा.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्रक्र44/ 33, दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेत नोंदी घेतल्यानंतर दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेत बाबनिहाय दिनांकित स्वाक्षरीच्या नोंदी नसल्याने तसेच मंजूर दैनंदिनी उपलब्ध न झाल्यामुळे मोजमाप पुस्तिकेतील नोंदी जागेवर घेऊन कामाची गुणवत्ता व दर्जा राखण्यासंबंधी योग्य सनियंत्रण केले किंवा कसे? याची खात्री होत नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेत काम केव्हा सुरू करणेत आले? याबाबतच्या नोंदी नाहीत.

8) 0 ते 100 हेक्टर सिंचनक्षमता असलेल्या योजनांसाठी जोपर्यंत सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्यात येणार नाही, तोपर्यंत वित्तीय तरतूद करण्यात येऊ नये, असे निर्देश ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक नागरी-2011/प्रक्र192/जल1, दिनांक 02/02/2012 मध्ये दिले आहेत. तसेच योजनांसाठी सहकारी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याशिवाय कार्यारंभ आदेश देऊ नयेत, असे निर्देशित केले आहे. याप्रकरणी, अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

9) सदर योजनेची सिंचन क्षमता 8 हेक्टर आहे. प्रशासकीय व तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे या प्रकल्पापासून 8 हेक्टरच्या परिसरात उत्पन्न भाजीपाला, दुध, फळे इत्यादी बाबींपासून प्रतिवर्ष मिळणाऱ्या उत्पन्न प्राप्तीबद्दलचा फलनिष्पत्ती अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.

**3.313 उमरोली शिंदाची वाडी, वळण बंधारा, तालुका मुरबाड.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,93,128/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ज्या कंत्राटदाराला सदर काम देण्यात आले आहे, त्या कंत्राटदाराचे बांधकाम विभाग नोंदणी प्रमाणपत्रावर नोंदणीची मुदत दिनांक 22/05/2010 ते दिनांक 21/05/2015 अशी दिसत असून त्यावर खाडाखोड करून दिनांक 22/05/2012 ते दिनांक 21/05/2017 अशी हाताने केलेली दिसून येते. म्हणजेच निविदा प्रक्रियेच्या कालावधीत कंत्राटदाराकडे वैध नोंदणी प्रमाणपत्र नसतांना सदर निविदाधारकाला नियमबाह्य मदत करून कंत्राट देण्यासाठी हे केल्याचे दिसून येते आहे.

2) या कामाचे देयकातून रक्कम रुपये 33,907/- इतकी रक्कम स्वामित्वधनापोटी कपात केल्याचे दिसून आले आहे. या रकमेचा भरणा संबंधित लेखाशीर्षाखाली केल्याचे अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

3) निविदेची बोली अंदाजपत्रकीय दराच्या 0.36 टक्के कमी म्हणजे रुपये 11,66,581/- असल्यामुळे देयक याच रक्कमेचे सादर करणे आवश्यक आहे. परंतु, प्रत्यक्षात देयक रुपये 11,93,128/- म्हणजे रुपये 26,547/- अधिक रक्कमेचे खर्ची घातलेले आहे. त्यामुळे सदर रक्कमेची वसुली करावी.

4) या कामाच्या इतर बाबीवर रक्कमेची बचत करून मूळ प्राकलनानुसार काम कार्यान्वित केल्याचे दिसून येत नाही. तसेच या कामाच्या बाब क्रमांक 6 मध्ये मंजूर प्राकलनापेक्षा रुपये 40,695/- इतक्या रक्कमेचे जादा काम कार्यान्वित केल्याचे दिसून येते. सबब या बाबीमध्ये सुध्दा मूळ मंजूर प्राकलनानुसार काम केल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र पंचायत समिती व जिल्हा परिषद लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 118 नुसार मूळ अंदाजपत्रकात महत्वाचे घटनात्मक बदल आवश्यक असल्यास मूळ मंजूरी प्राधिकाऱ्याची परवानगी / आदेश घेणे आवश्यक आहे. वरील बाबीचे अवलोकन करता या प्रकरणी अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. परिणामी, मंजूर तांत्रिक प्राकलनापेक्षा बाबनिहाय कमी जादा खर्च केल्याचे दिसून आले आहे.

5) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका नियम 261 नुसार अंदाजातील अपेक्षीत वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येवू नये. मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल, तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे, असे मानता येणार नाही निविदेच्या शेड्युल बी-1 निविदा कलम 38 (2) नुसार अंदाजपत्रकांपेक्षा एखाद्या बाबीवर 25 टक्के

इतकी तफावत किंवा त्या बाबीवर रुपये 5,000/- इतका बाबनिहाय प्राकलनापेक्षा जादा खर्च मान्य केला आहे. त्यामुळे नमूद जादाची रुपये रक्कम 35,695/- वसूल करावी.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 87 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये खडी, मुरूम, सिमेंट, स्टील इत्यादी साहित्याचे शासकीय प्रयोगशाळा चाचणी अहवाल साहित्य वापरापूर्वी प्राप्त करून घेणे व त्यानंतर बांधकामात साहित्याचा वापर करणे अपेक्षित आहे. याप्रमाणे या प्रकरणी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

7) बांधकामाचे देयक मंजूर करताना बांधकामात वापरलेल्या साहित्याचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी प्रयोगशाळा चाचणी अहवाल योग्य असल्याबाबत शासकीय गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत चाचणी करून त्याची प्रत देयकासोबत जोडून नंतर प्रदान करणे आवश्यक आहे. नस्तीसोबत दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई व प्रादेशिक प्रयोगशाळा, तुर्भे यांचे चाचणी अहवाल दिसून येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक जीआर/34/सा-4/5999, दिनांक 08/01/2007 अन्वये बांधकामात सिमेंटचा वापर करण्यापूर्वी सिमेंट योग्य असल्याबाबतची तपासणी शासकीय प्रयोगशाळेतून करून घेण्याची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. खुलासा करावा.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/ प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेत नोंदी घेतल्यानंतर दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168(1)अ नुसार सर्व दृश्य बाबींची अंतिम मोजमापे उप अभियंत्याने तपासणे आवश्यक आहे. तसेच पायासारख्या वरून न दिसणाऱ्या बाबी योग्य वेळी प्रमाणित कराव्यात, असे नियमात विहीत केले आहे. मोजमाप पुस्तिकेतील नोंदी जागेवर घेऊन कामाची गुणवत्ता व दर्जा राखण्यासंबंधी योग्य सनियंत्रण केले किंवा कसे, याची खात्री होण्यासाठी सदर कामाची मापन पुस्तिका लेखापरीक्षाणाअंतर्गत तपासणे आवश्यक असते. परंतु, सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर न केल्यामुळे अशी खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

9) 0 ते 100 हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या योजनांसाठी जोपर्यंत सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्यात येणार नाही, तोपर्यंत वित्तीय तरतूद करण्यात येऊ नये, असे निर्देश ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक नागरी-2011/प्रक्र192/जल1, दिनांक 02/02/2012 मध्ये दिले आहेत. तसेच योजनांसाठी सहकारी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याशिवाय कार्यारंभ आदेश देऊ नये, असे निर्देशित केले आहे. याप्रकरणी, अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. तसेच नवीन बंधारा असल्यामुळे किती लाभक्षेत्र सिंचनाखाली येईल, तसेच त्यापासून होणाऱ्या इतर उत्पन्नातील वाढ इत्यादी याबाबतचा Benefit Ratio अहवाल तयार करण्यात आलेला नाही.

10) या कामाचा ओरीएंटल इंश्योरंस कंपनी लि. यांचेकडे विमा काढलेला आहे. सदर विमा दिनांक 16/02/2016 रोजी काढलेला आहे. प्रत्यक्षात हे काम दिनांक 06/02/2016 रोजी संपलेले आहे. विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविवी-2903/सहविमा/जिप/संकीर्ण/अभियांत्रिकी/एम-2, दिनांक 27/06/2003 नुसार काम सुरु करण्यापूर्वी त्याचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तरी काम संपल्यानंतर विमा काढण्याबाबत खुलासा सादर करावा.

**3.314 जिल्हा परिषद, पालघर यांचे मालकीचे पाझर तलाव मत्स्यव्यावसाय करणेसाठी ठेक्याने न दिलेबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** लघुपाटबंधारे विभाग सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात जिल्हा परिषद विभागाचे मालकीचे पाझर तलावाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेच्या मालकीचे किती पाझर तलाव आहेत? याबाबत तलावाच्या नोंदी असलेली व मत्स्यव्यवसायासाठी मक्त्याने दिलेल्या तलावाची माहिती असलेली नोंदवही अर्धसमास पत्र क्रमांक 02 दिनांक 17/09/2016 ने मागणी करूनही लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे याबाबत जिल्हा परिषदेच्या मालकीच्या मत्स्य व्यवसायासाठी ठेक्याने दिलेल्या किती तलावाची मुदत संपली आहे. याची पडताळणी करता आली

नाही. तरी ज्या मत्स्य व्यवसायासाठी ठेक्याने दिलेल्या तलावाची मुदत संपली आहे. पण, विभागाने नवीन ठेका दिला नाही. त्यामुळे झालेल्या नुकसानीची चालू बाजारभावाप्रमाणे परिगणना करून रक्कम वसूल करावी.

2) मौजे मायखोप तालुका पालघर या तलावाचा मत्स्य व्यवसायासाठीचा ठेका दिनांक 31/05/2014 संपत असताना लेखापरीक्षण कालावधीपर्यंत ठेका निश्चितीची कार्यवाही केली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

3) मौजे शिरगाव तालुका वसई, जि.पालघर पाझर तलाव बोली लिलावासाठी दिनांक 30/10/2015 रोजी श्री. भाऊराव मनु पाटील, मु.शिरगाव हे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांचे दालनात उपस्थित राहून सन 2015-2020 या 5 वर्षासाठी लिलावाअंती रक्कम रुपये 90,000/- ला मक्ता निश्चित केलेला असताना सदर मक्तेदारास मक्ता देण्यात आला नाही. परिणामी, झालेल्या नुकसानीबाबत जबाबदारी निश्चित करावी.

4) जिल्हा परिषद मालकीच्या ज्या तलावाच्या मक्त्याची मुदत संपलेली आहे, त्या तलावाच्या मक्ता निश्चितीबाबत महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यावसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि 1213/ प्र.क्र 48/ पदुम 13, दिनांक 22/10/2013 नुसार कार्यवाही करून पूर्तता अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावी.

### 3.315 मूल्यवर्धित कराची रक्कम वसूल न केले बाबत .

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

लघु पाटबंधारे विभाग सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी विभागाने कामाच्या देयकातून महाराष्ट्र शासन, राजपत्र विक्रीकर आयुक्त, मुंबई यांची अधिसूचना दिनांक 04/04/2012 नुसार मूल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडून 02 टक्के प्रमाणे मूल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा व मूल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून 05 टक्के प्रमाणे वसूल करण्यात यावा. तथापि, सदरील मक्तेदार नोंदणीकृत असलेबाबत नोंदणी प्रमाणपत्र नस्तीत उपलब्ध झाले नाही. त्यामुळे मक्तेदार नोंदणीकृत असल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. तरी कंत्राटदार नोंदणीकृत असलेबाबत प्रमाणपत्र उपलब्ध करावे. अन्यथा, 05 टक्के प्रमाणे रक्कम रूपये 3,96,874/- कपात करून पूर्तता करावी.

### 3.316 मौजे आंबिस्टे जांभळ्याचा पाडा येथे सिमेंट बंधारा बांधणे ता.वाडा

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदर कामावर रक्कम रुपये 12,88,415/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाच्या अंदाजपत्रकात वाहतुकीसाठी जादा दर आकारण्यात आले आहेत. याबाबत अंदाजपत्रकासोबत Lead Statement जोडले नाही. त्यामुळे आकारण्यात आलेल्या जादा दराबाबत पडताळणी करता आली नाही.

2) बाब क्रमांक 11 मधील 80.55 cmt Dry Stone masnory ची गौण खनिजाची रक्कम 80.55 cmt X70.67 = 5,692/- देयकातून वसूल करण्यात आली नाही व शासन खाती भरणा करण्यात आली नाही. तरी गौण खनिजाची रक्कम रुपये 5,692/- वसूल करावी.

3) कार्यारंभ आदेश क्रमांक पाजिप/ लपावि/ निविदा/ 07/ 2015-2016, दिनांक 06/08/2015 कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांचे कार्यारंभ आदेशातील अटी व शर्तीनुसार मक्तेदाराने काम सुरु करण्यापूर्वी व काम झाल्यानंतर केलेल्या कामाचे छायाचित्रणे घेणे आवश्यक असताना कामापूर्वीचे व काम झाल्यानंतरचे छायाचित्रणे घेतली नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, नियम पुस्तिका 1984 मधील परिशिष्ट क्रमांक 12 नियम 10 नुसार निविदेतील प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही झाली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 अन्वये प्रत्येक कामाचा करारनामा नमुना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदवून मक्तेदाराला दिलेल्या रक्कमेच्या नोंदी नोंदवहीत करणे आवश्यक असताना नमुना नंबर 48 ठेऊन कराराच्या नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

6) Government of India Finance Ministry Department of Revenue Central Board of Direct Taxes F.No. 275/192/2014-IT(B) CIRCULAR NO : 17/2014 Dated 10/12/2014 नुसार आयकर रक्कमेवर 02 टक्के शिक्षण कर व 01 टक्के उच्च शिक्षण कर कपात करणे आवश्यक असताना देयकातून आयकर रक्कम रुपये 25,768/- वर शिक्षण कर व उच्च शिक्षण कर कपात करण्यात आला नाही. तरी कमी आयकर कपात रक्कम रुपये 773/- कपात करून पूर्तता करावी.

7) महाराष्ट्र शासन, उद्योग, व ऊर्जा विभागाचे शासन निर्णय क्रमांक बीसीए- 2009/सीआर-108/लेबर 7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकराची 01 टक्का रक्कम काम सुरु करण्यापूर्वी भरणा करणे आवश्यक असताना कामगार विम्याची रक्कम कामाच्या अंतिम देयकातून कपात करण्यात आली आहे.

**3.317 पळसंब गावठण वळवणी बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर बाबत रक्कम रूपये 8,27,329/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गौण खनिज वाहतुक परवाने नंबर 22852 ते 22870 असे असून सदरची खडी एस. आय. नाईक रा. गुडवळे तालुका चंदगड येथून घेतलेली असून प्रत्येक परवान्यावर 2 ब्रास असे स्पष्ट नमुद असताना खाडाखोड करून प्रत्येक परवान्यावर 4 ब्रास खडी असे लिहीले असल्याने वाहतुक परवान्याची सत्यता पडताळता येत नाही. परिणामी स्वामित्व् धनाची रक्क्म रूपये 16,551/- संबधीतांकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्र क्रमांक जि.प.209/प्र.क्र.180/15/ दिनांक 04/07/2009 अन्वये कामाच्या ठिकाणी कामाचा संपूर्ण माहितीचा फलक लावलेला कार्यनस्तीतील कागदपत्रातील आढळून आलेला नाही.

3) कार्यनस्तीत 14 ब्रास वाळू खरेदीचे 7 वाहतुक परवाने आहेत. सदरची वाळू ही श्री.हरीष गावकर यांनी विकत घेतलेली आहे. सदरच्या कामाचे मक्तेदार श्री.पेंडकर आहेत. त्यामुळे वाळूच्या परवान्याच्या सत्य्तेबाबत खात्री करता येत नाही. परिणामी, सदरच्या गौण खनिजाची रक्कम रूपये 3,035/- संबधीत पोटमक्तेदार यांचेकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

**3.318 शिरवंडे ब्राम्हणदेव बंधारा बांधणे तालुका मालवण.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 23,39,571/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची मुदत दिनांक 15/12/2015 पर्यंत आहे. मात्र कामाची मुदत वाढ घेण्यासाठी मक्तेदाराने दिनांक 30/03/2016 रोजी कामास मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे व दिनांक 30/03/2016 चेच आदेशाने दिनांक 31/03/2016 पर्यंतची मुदत वाढ मंजुर करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

2) नमुना नंबर 65 वरुन काम दिनांक 15/02/2016 रोजी पुर्ण झाले आहे. मग, दिनांक 30/03/2016 रोजी मुदत वाढ अर्ज देऊन दिनांक 31/03/2016 पर्यंत मुदतवाढ घेण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

3) एकूण 22 ब्रासचे रॉयल्टी पासेसवर गौण खनिजाचे नांव नमूद नाही. केवळ 2 ब्रास असा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे सदर पासेस मान्य करता येत नाहीत. रॉयल्टी रक्क्म रूपये 4,376/- वसूल करणे आवश्यक आहे.

4) गौण खनिज वाहतुक परवाना (रॉयल्टी पासेस) हे जिल्हा कोल्हापूर तालुका चंदगड येथील S. I. Naik यांचे आहेत. मात्र, लीड स्टेटमेंट मध्ये मेटलसाठी हिवाळे तालुका मालवण येथे खडी उपलब्ध् असलेचे दिसते. या विसंगतीबाबत समर्पक अनुपालन सादर करावे.

5) कामाचे नस्तीसोबत लीड स्टेटमेंट व सर्टफिकेशन आहे. मात्र लीड डायग्राम ठेवलेली नाही.

6) अंदाजपत्रकातील व मुल्यांकनातील बाब क्रमांक 16 अन्वये कामाच्या ठिकाणी कामाचा नामफलक लावणेवर रूपये 4,872.25/- खर्च करण्यात आलेला आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाच्या नामफलकाच्या फोटोमध्ये फ्लेक्स प्रिंट करुन अँगल फ्रेम वर चिकटवल्याचे दिसते. त्यामुळे सदर बाबीवर खर्च केलेली रक्क्म रूपये 4,872.25/- अंतिम अमान्य आहे.

**3.319 मौजे निरवडे बाईतवाडी बंधारा दुरुस्ती करणे तालुका सावंतवाडी.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत रक्कम रूपये 7,91,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामावर वापरलेल्या खडी व वाळूचे टेस्ट रिपोर्ट लेखापरिक्षणास आढळून आले नाहीत.

2) Recovery Statement of material नुसार रक्कम रूपये 19,239/- रॉयल्टी वसुल करणे आवश्यक आहे. मात्र, रॉयल्टी पास जोडले आहेत, असे नमूद करुन रॉयल्टी Nil केलेली आहे. मात्र, प्रत्यक्ष तपासणीअंती गौण खनिज वाहतुक परवाना क्रमांक 10491, 10492, 10493 व 10494 दिनांक 01/06/2015, 02/06/2015, 03/06/2015, 04/06/2015 अनुक्रमे हे कार्यारंभ आदेश देण्यापूर्वीची खरेदी आहे. त्यामुळे ते मान्य करता येत नाही. एकूण ब्रास खडी, इतर मान्य पास खडी 35 ब्रास व वाळू 16 ब्रास असे एकूण 51 ब्रास म्हणजे रॉयल्टी माफ रक्कम रूपये 51X200=10,200/- म्हणून रक्कम रूपये 9,039/- रॉयल्टी वसूल पात्र आहे.

3) अंदाजपत्रकातील व मुल्यांकनातील बाब क्रमांक 16 मध्ये नमूद केलेनुसार कामाच्या ठिकाणी कामाच्या तपशिलाचा नामफलक लावण्यात आलेला नाही. सदर नामफलक हा फ्लेक्स प्रिंट करुन चिकटवल्याचे दिसते.

**3.320 तोंडवली दत्तमंदिर येथे साठवण बंधारा बांधणे तालुका कणकवली.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 6,13,425/- खर्च करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक 5796 व 5976 लेखापरिक्षणात उपलब्ध झाल्या नाहीत.

2) देयकातील बाब क्रमांक 7 नुसार वापरलेल्या साहित्याची परिमाण 67.32 आहे. त्याचे रॉयल्टीची रक्कम रुपये 6,420/- वसूल होणे आवश्यक असतांना देयकातुन रुपये 3,210/- वसूल करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम रुपये 3,210/- वसूल होणे आवश्यक आहे.

3) सदर देयकावर मक्तेदार यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

**3.321 गोवळ गावठणवाडी येथे अंगणवाडी इमारत बांधणे.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 5,75,799/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंगणवाडी ज्या ठिकाणी बांधण्यात आली त्या जागेचा 7/12 अगर संमती पत्र कार्यनस्तीत आढळून आलेले नाही.

2) प्रशासकीय मान्यता अट क्रमांक 12 नुसार महाराष्ट्र जमिन महसूल कायदयाप्रमाणे सक्षम अधिकारी यांची इमारत बांधण्याची परवानगी घेतलेबाबतचे दस्तऐवज लेखापरीक्षणाचे वेळी कार्यनस्तीमध्ये आढळून आलेले नाहीत.

3) प्रशासकिय मंजुरी अट क्रमांक 14 नुसार व नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक स्थाविका/ 2007/ प्र.क्र.170/ का-1482, दिनांक 18/02/2011 च्या परिच्छेद 10(4) प्रमाणे दर्शनी भागावर दगडावर कोरीव काम करुन भिंतीत किंवा भिंतीच्या प्लास्टरमध्ये कामाचा सर्व तपशिल लिहीणे आवश्यक आहे. परंतु, तसेच केल्याचे छायाचित्रावरुन दिसत नाही. मोजमाप वहीमध्ये दर्शविलेली रक्कम रूपये 500/- वसुल करण्यात यावी.

4) कामाच्या पूर्वीचा व काम पूर्ण झाले नंतर अंगणवाडी इमारतीची नोंद असलेला जमिनीचा 7/12 उतारा घेण्यात आलेला नाही.

5) मालमत्ता हस्तांतरण पत्रक नाही.

**3.322 पाणी वापर सहकारी संस्थाकडून स्वामित्व् शुल्क् थकबाकीबाबत**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाच्या सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणावेळी पाणी वापर सहकारी संस्थांच्या स्वामित्व शुल्क वसूलीचे रजिस्टर तपासले असता सिंधुदुर्ग जिल्हयात एकूण 8 तालुक्यातून 103 बंधारे आहेत. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ल.पा.यो/1099/प्र/क्र/347/जल 1, दिनांक 31/07/2002 नुसार पाणी वापर सहकारी संस्था सिंचन व्यवस्था पाहतात. पाणी वापर सहकारी संस्थांनी लघू पाटबंधारे तलाव, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांचे स्वामित्व शुल्क म्हणून प्रती योजना प्रती वर्षी शासनाने रक्कम रूपये 1,000/- भरणे बंधनकारक आहे. तसेच साठवण तलावाकरता ही रक्क्म रूपये 10,000/- प्रती योजना प्रतीवर्ष राहील. तसेच मागील वर्षात जमा झालेल्या पाणीपपट्टीपैकी 20 टक्के रक्कम स्थानिक शुल्क् महणून संस्थेने शासनाकडे दरवर्षी भरायचे आहेत. दिनांक 31/03/2016 अखेर रक्कम रूपये 4,66,000/- इतकी स्वामित्व् शुल्काची थकीत रक्क्म आहे. सदरची रक्कम वसूल करणेबाबत आपल्या स्त्रावर कोणते प्रयत्न् झाले? याची माहीती लेखापरीक्षणात उपलब्ध् झालेली नाही. पाणी वापर सहकारी संस्थानी सिंचन व्यवस्थापन खर्चाचा हिशोब (त्रैमासीक) अहवाल कार्यकारी अभियंता सादर करावयाचा आहे. असे असताना रक्कम रुपये 4,66,000/- स्वामित्व् शुल्क् थकीत असताना, किती संस्थांनी आतापर्यंत त्रैमासिक अहवाल सादर केला? याचा खुलासा करावा. कार्यकारी अभियंता यांना हिशोब तपासण्याचे अधिकार असताना, किती संस्थाचे हिशोब तपासले व स्वामित्व् शुल्क् वसूल होणेस मदत झाली? याचा खुलासा सादर करावा. थकीत रक्कम रूपये 4,66,000/- वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

**3.323 सिमेंट कॉंक्रीट बंधारा पिंपळ कोठे क्रमांक 1 तालुका बागलाण.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,36,623/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बाब क्रमांक 4 providing erecting dismentaling RCC work (form work) चे एकूण काम 313.12 चौ.मी. करण्यात आलेले असून त्यासाठी रूपये 252.70/- दर देण्यात आलेला आहे. CSR नुसार 1.5 मीटर उंचीपर्यंत रूपये 89.65/- दर व 1.5 मीटर पेक्षा जास्त उंचीसाठी रूपये 252.70/- दर देणे आवश्यक आहे. तथापि, संपूर्ण बाबीसाठी रूपये 252.70/- दर दिल्यामुळे रक्कम रूपये 19,970/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

2) CSR मध्ये नमूद केल्यानुसार ठेकेदाराने प्रथम कामाच्या विम्याची रक्कम विमा संचालनालयाकडे भरणा करून जिल्हा परीषदेकडे विमा प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यास प्रदान करावयाच्या देयकामध्ये विम्याची रक्कम समाविष्ट करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने स्वत: विमा रक्कम भरणा करून विमा प्रमाणपत्र जिल्हा परीषदेकडे सादर केलेले नाही. त्यामुळे देयकामध्ये विम्याची रक्कम समाविष्ट करणे आवश्यक नसतांनाही लघुपाटबंधारे विभागाने देयकामध्ये 1 टक्का विमा रक्कम रूपये 13,899/- समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे सदर जादा प्रदान रक्कमेची वसुली होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक्र क्रमांक झेडपीए/2009/ प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 अन्वये रुपये 10 लाखांपर्यंत रुपये 100/- आणि त्यापुढील प्रत्येक 1 लाखासाठी रुपये 100/- या किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामासाठी रुपये 600/- किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते. तथापि, रुपये 100/- किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. त्यामुळे रुपये 500/- कमी मुद्रांकाची रक्कम संबंधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

5) बाब क्रमांक 5 - M-10 (1:3:6) चे एकूण काम 400.95 चौ.मी. करण्यात आलेले आहे. त्यामधून 20 टक्के प्लम वजा करणे आवश्यक होते. तथापि, 20 टक्के प्लम वजा न केल्यामुळे 80.19 चौ.मी. साठी रूपये 2,802.40/- दराने एकूण रूपये 2,24,724/- चे जादा प्रदान झालेले आहे.

**3.324 सारदे येथे साठवण तलाव बांधणे तालुका बागलाण.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 38) -** सदरबाबत रक्कम रूपये 9,74,363/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बाब क्रमांक 2 construction of embankment साठी available material 546.80 घ.मी. आणि borrow material 2,176.55 घ.मी वापरण्यात आलेले आहे. त्यासाठी एकूण रूपये 4,47,310/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे.

खोदकामातून माती 546.80 घ.मी., मऊ मुरुम 1,466.20 घ.मी. (म्हणजेच 518 ब्रास), मऊ दगड 1,274 घ.मी. (म्हणजेच 450 ब्रास) आणि कठिण दगड 1,128.40 घ.मी. (म्हणजेच 399 ब्रास) एवढे material उपलब्ध झालेले असतांना केवळ माती 546.80 घ.मी. Embankment साठी वापरण्यात आलेली आहे.

मऊ मुरुम, मऊ दगड व कठिण दगड एकूण 3,868.60 घ.मी. (म्हणजेच 1,367 ब्रास) उपलब्ध असतांना बाहेरुन material आणून काम केल्याचे दर्शविले आहे. Material उपलब्ध असतांना बाहेरुन material आणणे संयुक्तिक नाही. त्यामुळे 2,176.55 घ.मी. साठी रूपये 179.70/- प्रमाणे प्रदान केलेली रक्कम रूपये 3,91,126/- संबंधितांकडून वसुल करुन शासन लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

2) CSR मध्ये नमूद केल्यानुसार ठेकेदाराने प्रथम कामाच्या विम्याची रक्कम विमा संचालनालयाकडे भरणा करून जिल्हा परीषदेकडे विमा प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यास प्रदान करावयाच्या देयकामध्ये विम्याची रक्कम समाविष्ट करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने स्वत: विमा रक्कम भरणा करून विमा प्रमाणपत्र जिल्हा परीषदेकडे सादर केलेले नाही. त्यामुळे देयकामध्ये विम्याची रक्कम समाविष्ट करणे आवश्यक नसतांनाही लघुपाटबंधारे विभागाने देयकामध्ये 1 टक्का विमा रक्कम रूपये 9,647/- समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे सदर जादा प्रदान रक्कमेचे वसुली होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

**3.325 साठवण बंधारा दुरुस्ती (UCR) मुळेगाव, तालुका त्र्यंबकेश्वर.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 49) -** सदरबाबत रक्कम रूपये 4,23,235/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामातील बाब क्रमांक 6 dry slit चे एकूण परिमाण 3,573.50 घ.मी. एवढे असून त्यासाठी दर रूपये 79.50/- प्रमाणे एकूण रूपये 2,84,093/- ठेकेदारास प्रदान केलेले आहेत. साठवण बंधाऱ्यातील जमा झालेला गाळ (dry slit) आजूबाजूच्या शेतकऱ्यांना आवाहन करून घेऊन जाणेसाठी सांगणे उचित असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता ठेकेदाराकडून काम करुन घेण्यात आलेले आहे. तसेच सदरचे 1,263 ब्रास साहित्य कोठे टाकले, याबाबत मोजमाप पुस्तिकेत कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे शासन निधीचे रूपये 2,84,093/- चे नुकसान झाले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. सदरची रक्कम संबंधितांकडून वसुल करुन शासन लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

**3.326 गलाठी पा.त. पासून तिसगाव तालुका देवळा येथील सायंधारा नाल्यापर्यंत पाईपलाईन करणे तालुका देवळा.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 59) -** सदर बाबत रक्कम रूपये 14,74,458/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) रुपये 100/- कमी मुद्रांकाची रक्कम संबंधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

2) सदर कामाचे अंदाजपत्रकात RCC NP 2 CLASS PIPE 450 MM एकूण 1,800 RMT दर्शविला असून दर रूपये 650.85/- एवढा घेतलेला आहे. Rate analysis मध्येही असेच परिमाण दर्शविले आहेत. तथापि, अनुसुची ब मध्ये पाईपाची जाडी (DIA) नमूद केलेली नसून परिमाण 690 RMT दर्शविले असून दर रूपये 1,541.30/- दर्शविले आहे.

सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता 450 MM PIPE 1800 RMT व दर रूपये 650.85/- याप्रमाणे घेण्यात आलेली असतांना अनुसुची ब मध्ये परिमाण 690 RMT व दर 1,541.30/- काय आधारे दर्शविले, याबाबत समजू शकत नाही. परिमाणात बदल करावयाचा असल्यास पुन:श्च तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू, अशा प्रकारे तांत्रिक मान्यता न घेताच प्रत्यक्षात काम 723 RMT चे केले असून दर रूपये 1,541.30/- देण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रति RMT 890.45 (1,541.30 - 650.85) प्रमाणे एकूण 723 RMT साठी रूपये 6,43,795/- एवढया रक्कमेचे जादा प्रदान करण्यात आलेले आहे. सदर जादा प्रदानाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

3) RCC PIPE खरेदीची बिले देयकासोबत जोडलेली नाही.

4) RCC PIPE चा शासकीय प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल घेतलेला नाही.

5) MSSIDC चा दरकरार उपलब्ध नसल्याने दराची खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

**3.327 कामांच्या देयकात 1 टक्का विमा रक्कम समाविष्ट करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिष्च्छेद क्रमांक 70) -** सदर बाबत रक्कम रूपये 2,47,34,658/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लघुपाटबंधारे विभाग सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात निविदा नस्ती व मोजमाप पुस्तिका यांची तपासणी केली असता 23 कामांच्या देयकात 1 टक्का विमा रक्कम समाविष्ट केल्याचे आढळून आले.

2) CSR मध्ये नमूद केल्यानुसार ठेकेदाराने प्रथम कामाच्या विम्याची रक्कम विमा संचालनालयाकडे भरणा करून जिल्हा परीषदेकडे विमा प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यास प्रदान करावयाच्या देयकामध्ये विम्याची रक्कम समाविष्ट करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने स्वत: विमा रक्कम भरणा करून विमा प्रमाणपत्र जिल्हा परीषदेकडे सादर केलेले नाही. त्यामुळे देयकामध्ये विम्याची रक्कम समाविष्ट करणे संयुक्तिक नाही. देयकात विम्याची रक्कम समाविष्ट न करता विमा प्रमाणपत्रे सादर केली नसल्यामुळे शास्तीची रक्कम म्हणून 1 टक्का विमा रक्कम देयकातून कपात करणे आवश्यक होते. तथापि, लघुपाटबंधारे विभागाने देयकामध्ये 1 टक्का विमा रक्कम वरीलप्रमाणे समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे सदर जादा प्रदान रक्कमेचे वसुली होणे आवश्यक आहे.

**3.328 साठवण बंधारा दुरुस्ती, म्हसदी प्र. पिंपळनेर तालुका साक्रीबांधकामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 34, दिनांक 08/06/2015 अन्वये रक्क्म रुपये 14,54,305/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये व नियम 97 नुसार नमुना नंबर 39 अचल मालमत्ता नोंदवहीत नोंदी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

2) कोरे निविदा रक्कम ग्रामपंचायतीकडून घेतलेले नाहीत. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.428/वित्त-9, दिनांक 30/12/2008 अन्वये विना निविदा कामे देतांना कंत्राटाच्या रकमेच्या अनुषंगाने रुपये 10.00 लक्षच्या पुढील कंत्राट असल्याने रुपये 500/- संबंधिताकडून वसुल करावे.

3) लघुसिंचन बंधारा कामातील खरेदीबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 मधील परिच्छेद क्रमांक 1 (अ) (2) व शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2013/प्र.क्र.49/पंरा-7, दिनांक 07/02/2013 अन्वये ज्या वस्तु / साहित्याचे सेवा पुरवठयासाठी शासन दरकरार निश्चित नाहीत, त्या प्रत्येक वस्तुंची खरेदी करतांना रुपये 1,00,000/- पेक्षा जास्त अशी कोणतीही खरेदी दिनांक 19/10/2011 नंतर केवळ ई-टेंडरींग माध्यमातून खरेदी करणेबाबत बंधनकारक केले असतांना पंचायतीने ई-टेंडरींग केलेले नाही.

4) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2010//प्र.क्र.1/पंरा-4, दिनांक 26/03/2010 अन्वये कंत्राटदाराने वृक्ष संरक्षण पिंजऱ्यासह लागवड केल्याचे फोटो आढळून आले नाही. याबाबत उचित कार्यवाही करावी.

5) अंदाजपत्रकात एम.एस.अँगलची फ्रेम वापरुन फलक तयार करावयाचा होता. परंतु, तो भिंतीवर रंगविला असल्यामुळे रुपये 700/- वगळुन अतिरिक्त् रक्कम रुपये 2,300/- लेखापरीक्षणास अमान्य़ करण्यात येत आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.44/33 दिनांक 22/12/2000 च्या शासन परिपत्रकातील बाब क्रमांक 13 नुसार काम पूर्ण झालेवर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. तरी पुर्तता दर्शवून अनुपालन दर्शवावे.

**3.329 साठवण बंधारा दुरुस्ती, वणी तालुका शिंदखेडा बांधकामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 217, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 2,92,248/- खर्च करण्यात आला आहे. उपरोक्त कामाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये व नियम 97 नुसार नमुना नंबर 39 अचल मालमत्ता नोंदवहीत नोंदी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

2) कोरे निविदा रक्कम ग्रामपंचायतीकडून घेतलेले नाहीत. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.428/वित्त-9, दिनांक 30/12/2008 अन्वये विना निविदा कामे देतांना कंत्राटाच्या रकमेच्या अनुषंगाने रुपये 10.00 लक्षच्या पुढील कंत्राट असल्याने रुपये 500/- संबंधिताकडून वसुल करावे

3) लघुसिंचन बंधारा कामातील खरेदीबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7 दिनांक 19/10/2011 मधील परिच्छेद क्रमांक 1(अ)(2) व शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2013/प्र.क्र.49/पंरा-7 दिनांक 07/02/2013 अन्वये ज्या वस्तु / साहित्याचे सेवा पुरवठयासाठी शासन दरकरार निश्चित नाहीत, त्या प्रत्येक वस्तुंची खरेदी करतांना रुपये 1,00,000/- पेक्षा जास्त अशी कोणतीही खरेदी दिनांक 19/10/2011 नंतर केवळ ई-टेंडरींग माध्यमातून खरेदी करणेबाबत बंधनकारक केले असतांना पंचायतीने ई-टेंडरींग केलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2010//प्र.क्र.1/पंरा-4 दिनांक 26/03/2010 अन्वये कंत्राटदाराने वृक्ष संरक्षण पिंजऱ्यासह लागवड केल्याचे फोटो आढळून आले नाही. याबाबत उचित कार्यवाही करावी.

5) प्रत्यक्ष काम करतांना पाणी उपसलेले आहे. तथापि, पाणी उपसणे यंत्राचा पॉवर नमुद नाही व त्याचा किती तास वापर झाला? याची पडताळणी करण्यासाठी लॉगबुक लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे किती एच.पी.चे यंत्र किती तास वापरण्यात आले? याची लेखापरिक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे प्रदान रक्कम रूपये 5,190/- लेखापरिक्षणात अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

6) मोजमाप पुस्तकातील बाब क्रमांक 12 अन्वये कामाचे नावाच्या फलकाचे रक्कम रुपये 3,000/- प्रदान केलेले आहेत. तथापि, सदरचे फलकाचे फोटो नस्तीसोबत आढळून न आल्याने सदरची रक्कम लेखापरिक्षणास अमान्य करण्यात येत आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.44/33 दिनांक 22/12/2000 च्या शासन परिपत्रकातील बाब क्रमांक 13 नुसार काम पूर्ण झालेवर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. तरी पुर्तता दर्शवून अनुपालन दर्शवावे.

**3.330 साठवण बंधारे / कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व लघुपाटबंधारे योजनांचे सिंचन व्यवस्थापन आणि देखभाल दुरुस्तीसाठी लाभ धारकांच्या सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो/1099/प्र.क्र.347/जल-9, दिनांक 31/07/2000 च्या परिच्छेद क्रमांक 5.4 नुसार जिल्हा परिषदेने 0 ते 100 हे सिंचन क्षमतेच्या नविन कामांच्या योजनेसाठी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याखेरीज योजनेचे बांधकाम सुरु करण्यासाठी कार्यारंभ आदेश देऊ नयेत असे आदेश आहेत. तथापि, अशी कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

2) लघुपाटबंधारे तलाव, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आदि योजनांसाठी स्वामित्व धन शुल्क म्हणून रूपये 1,000/- प्रति योजना प्रति वर्ष संस्थेने शासनाकडे भरणे आवश्यक आहे. तसेच अगोदरच्या वर्षी जमा झालेल्या पाणीपट्टीपैकी 20 टक्के रक्कम स्थानिक शुल्क् म्हणून संस्थेने प्रतिवर्षी शासनाकडे भरणे आवश्यक आहे.

तथापि, उपरोक्त शासन निर्णयामधील निर्देशाप्रमाणे पाणी वापर संस्थांची स्थापना न झाल्यामुळे सन 2014-2015 या वर्षात पूर्ण झालेल्या एकुण 34 योजनांपोटी स्वामित्व् शुल्कापोटी रूपये 1,000/- प्रति योजनेप्रमाणे रूपये 34,000/- शासन महसुल बुडाला आहे. तसेच पाणीपट्टी वसुल केली नाही.

3) लघुपाटबंधारे योजनेतून पाण्याचा लाभ घेणा-या लाभार्थ्याकडून लेखा संहिता 1968 चे नियम 157 नुसार सिंचन पाणीपट्टी बसविणेबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो/1084/प्र.क्र.347/जल-1/15, दिनांक 11/07/2000 अन्वये नियमावली विहित केली आहे. तसेच पाटबंधारे विभागाकडील शासन निर्णय दिनांक 13/09/2001 पाणीपट्टी बसविल्याबाबत कार्यवाही केली नाही.

शासन परिपत्रक आर.डी.डी. क्रमांक लपायो-2008/प्र.क्र.153/जल-1, दिनांक 30/06/2008 मधील परिच्छेद क्रमांक 3(3) नूसार लघुपाटबंधारे प्रकल्पातून सिंचनासाठी पुरविलेल्या पाण्यापासून पाटबंधारे विभागाने ठरवून दिलेल्या पाणीपट्टी वसुल केल्याचे दिसून येत नाही. पाणीपट्टी वसुलीतून मुख्यत देखभाल दुरुस्तीचा खर्च करावयाचा असल्याने वसुलीची कार्यवाही प्राधान्याने करणे आवश्यक आहे.

4) अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 23/11/2016 अन्वये तालुकानिहाय पूर्ण झालेल्या कामाची यादी व स्थापन करण्यात आलेल्या पाणी वापर संस्था इत्यादीची माहिती मागविण्यात आली होती. तथापि, ती लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

**3.331 प्रकल्प /मक्तेदारासंबंधी ठेवावयाच्या नोंदवहया/माहिती व काम वाटप आदेशांचे काटेकोर पालन होणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्रमांक इएसई-2003/प्र.क्र.191/रोस्वयो-1, दिनांक 1/2/2006 मध्ये नमुद केल्याप्रमाणे बेरोजगारांच्या सेवा सोसायट्यांना तसेच लोकसेवा केंद्रांना रुपये 5 लाखापर्यंतची कामे विनानिविदा देणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे. सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार जिल्हयातील कामे देणा-या संबंधित विभागांनी / खात्यांनी शासन निर्णय / परिपत्रके / सूचनांचे अधीन राहून बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना / लोकसेवा केंद्रांना द्यावयाच्या सर्व कामांची यादी संबंधित जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व फेडरेशन यांचेकडे पाठवावी व त्यानुसार संबंधित संस्थांची क्षमता लक्षात

घेवून त्यांना समप्रमाणात कामाचे वाटप करणेत यावे, असे आदेशित करणेत आलेले आहे. परंतु, संबंधित विभागाने तशा नोंदवहया ठेवलेल्या नसून त्या पृष्टयर्थ तपासणीस कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध् झालेली नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/01/05/ प्र.क्र.26 /इमारती-2, दिनांक 21/03/2005 अन्वये नोंदणीकृत कंत्राटदार/बेरोजगार अभियंता/मजूर सहकारी संस्था यांना कामाचे वाटप करतांना नमुद अटी व शर्तीचे पालन होणे आवश्यक आहे.

अटी व शर्तीचे संबंधित अधिक्षक अभियंता यांनी प्रत्येक विभागाकडून कळविणेत आलेल्या कामांची यादी एकत्रित करुन काम वाटप सभेच्या 7 दिवस अगोदर बेबसाईटवर ठेवणे आवश्यक आहे. काम वाटप सभेत फक्त वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आलेल्या कामांचेच काटेकोरपणे लॉटरी पध्दतीने वाटप करावे. प्रसिध्द न झालेल्या एकाही कामाचे कोणत्याही परिस्थितीत वाटप करणेत येऊ नये, याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावयाची आहे, असे असतांना अशी कार्यवाही झालेचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/07/06/प्र.क्र.94/इमा-2, दिनांक 16/11/2006 नुसार मजूर सहकारी संस्थांना निविद न मागविता देण्यात येणा-या कामाच्या किंमतीच्या मर्यादेत रुपये 5 लक्षावरुन वाढ करुन रुपये 15 लक्षापर्यंत खालील अटी व शर्तीच अधिन राहून वाढ करणेत आलेली आहे.

अ) कामे देण्यासाठी मजूर सहकारी संस्थांची सुधारीत वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे.

1) अ वर्ग उच्चतम पात्रता रुपये 15 लक्षापर्यंत

2) ब वर्ग उच्चतम पात्रता रुपये 7 लक्षापर्यंत

ब) एका वर्षात जास्तीत जास्त 3 वा अधिकतम कामे मिळून एकुण 50 लक्षपर्यंतची कामे प्रतिवर्षी देण्यात यावेत. कार्यकारी अभियंता यांनी मजूर सहकारी संस्थेस कामाचे कार्यादेश देण्यापुर्वी संबंधित मजूर सहकारी संस्थेच्या पासबुकात नोंद घेणे आवश्यक आहे. तसेच एका वर्षात एकुण 50 लाखापेक्षा जास्त रक्कमेची कामे दिली जाणार नाहीत, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक ती नोंदवही ठेवून उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे नियंत्रण असणे आवश्यक आहे, अशा तरतुदी असतांना कामाचे वाटपाबाबत विहित नोंदवही ठेवणेत आलेली नाही. त्यामुळे संबंधित संस्थेस विहित मर्यादेपेक्षा जास्त रक्कमेची कामे व संस्थेची वर्गवारी नमुद नसल्याने अर्हतापेक्षा जादा रक्कमेची कामे दिली किंवा कसे, याबाबत खात्री करता आलेली नाही.

4) सदरचे काम इतर कोणत्याही पाटबंधारे विभाग / जलविद्युत / पाणी पुरवठा प्रकल्प जलाशयाखाली येण्याची शक्यता नाही, याबाबत कार्यकारी अभियंता यांनी तसे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

5) सदरचे काम अथवा कामाचा भाग विशेष कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही योजना कार्यक्रमात अंतर्भुत नाही, याबाबतचा दाखला उपअभियंता / कार्यकारी अभियंता यांनी देणे आवश्यक आहे.

6) काम पूर्ण झालेनंतर पुढील देखभालीसाठी सदरचा प्रकल्प ग्रामपंचायतीकडे रितसर हस्तांरीत करुन तसे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

7) अंदाजपत्रकावरील तांत्रिक मंजूरी कोणत्या तारखेस दिलेली आहे? तो दिनांक नमुद न करता मोघम स्वरुपात महिना व वर्ष नोंदविलेले आहे. त्यामुळे प्रशासकिय मान्यता पुर्वीच तांत्रिक मान्यता दिली आहे किंवा कसे, याबाबत साधार स्पष्टीकरण व्हावे.

8) बी-1 निविदेतील खालील नमुना क्रमांक 1 ते 5 मधील संबंधित ठेकेदार यांची आवश्यक ती माहिती नमुद करणेत आलेली नाही. सदरची माहिती निरंक ठेवल्यामुळे ठेकेदार सदर काम करणेस सक्षम असल्याचे निर्धारण कसे करण्यात आले, याबाबत साधार स्पष्टीकरण व्हावे.

### 3.332 जलयुक्त शिवार अभियान राबविणेबाबत.

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जलअ-2014/प्र.क्रमांक203/जल.7 दिनांक05/12/2014 अन्वये सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र - 2019 अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात आलेले आहे.

त्यासाठी सन 2015-2016 मध्ये 1,000 कोटी रुपयांची अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आलेली होती. तथापि, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) जिल्हा परिषद, नंदुरबार यांना जलयुक्त शिवार अभियान राबविण्यासाठी अंदाजपत्रकीय तरतूद प्राप्त झालेली नसतांना विभागाने जलयुक्त शिवार अभियांनातर्गत खालीलप्रमाणे कामे करण्यात आलेली आहेत. सन 2015-2016 मध्ये विविध योजनेवर निधी प्राप्त झालेला असुन कामे मात्र जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत राबविण्यात आलेली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आदिवासी उपयोजनेअंतर्गत प्राप्त निधीमधून 87 मंजुर करण्यात आलेली कामे अपुर्ण ठेऊन जलयुक्त शिवार योजनंसाठी निधी प्राप्त नसतांना 59 कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. यावरुन निधी ज्या कामासाठी प्राप्त होता. त्या कामासाठी न वापरता इतरत्र वळविण्यात आलेला आहे. यामुळे मुंबई वित्तीय नियम 57 व 58 चा भंग झालेला आहे.

2) जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत काही ठरावीक गावांची निवड केलेली आहे. सन 2015-2016 मध्ये नंदुरबार जिल्यामधून एकुण 72 गावांची निवड करुन त्याच गावांवर खर्च केलेला आहे. आदिवासी उपयोजना ही विशिष्ट भागासाठी राबविण्यात येत असते. जिल्हा वार्षिक निधीमधून इतर योजनांचा पैसा या योजनेसाठी वापरणे आवश्यक असतांना आदिवासी उप योजनेचा पैसा जलयुक्त शिवार योजनेवर कसा वापर केला? याचा खुलासा करावा.

3) आदिवासी उप योजनेचे एकुण अनुदान रूपये 7,41,03,000/- चा वापर जलयुक्त शिवार योजनेवर करण्यात आलेला आहे. सदर झालेला खर्च प्राप्त करुन आदिवासी उपयोजनेची प्रलंबित कामे पुर्ण करण्यात येऊन अनुपालन दर्शवावे.

**3.333 साठवण बंधारा कहाटुळ नंबर 7 (वडछील नाला) तालुका शहादा.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 451, दिनांक 30/06/2016 अन्वये रक्कम रुपये 8,22,169/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध नसतांना सन 2012-2013 मध्ये तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग धुळे यांचेकडून का घेण्यात आली? तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर काम का पुर्ण करण्यात आले नाही? याचा खुलासा करावा. सदर अंदाजपत्रकाचे दर सुधारणा करण्यात आली. तथापि, नवीन मार्गदर्शक सुचनानुसार नविन अंदाजपत्रक का करण्यात आले नाही? याचा खुलासा करावा.

2) सदर काम हे जलयुक्त शिवार अभियांनांतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, जलयुक्त शिवार अंतर्गत प्राप्त मार्गदर्शक सुचनानुसार सिमेंट कॉक्रीट बांध घेणेबाबतच्या तरतुदीची अंमलबजावणी का करण्यात आली नाही? याचा खुलासा करावा.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 148 (1) नुसार कामाचे आदेश देणेपुर्वी करारनामा करुन त्यात B1 प्रमाणे काम करणे मक्तेदाराकडुन कामाची सुरवात व ते कधी पुर्ण होईल अशा विविध प्रकाराच्या अटी शर्ती नमुद करणे आवश्यक आहे. करारातील कोणतीही अटी / शर्त भंग केल्यास दंडात्मक कारवाईची तरतुद करारनाम्यात करण्यात यावी अशी तरतूद आहे. तथापि, वरील कामाबाबत कार्यरंभ आदेश दिनांक 05/06/2015 रोजी देण्यात आलेला आहे व करारनामा मुद्रांक खरेदी दिनांक16/03/2016 रोजीची आहे. (करारनाम्यावर दिनांक नमुद नाही) यावरुन करारनामा काम पुर्ण झाल्यानंतर केलेला आहे. त्यामुळे करारनाम्याचा उददेश सफल होत नाही.

4) शासन निर्णय क्रमांक जलसं-2012/प्र.क्र./जल-7, दिनांक 12/11/2013 नुसार कॉक्रीट नाला बांध व सिमेंट बंधारे बांधण्यात येतील, तो परिसर हा तेथील रचना (Geological condition) पाझरणे योग्य आहे, याबाबतची खात्री भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडून करणेबाबत तरतूद असतांना सदर बांध बांधतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) अंदाजपत्रकातील दर पृथ:करणमध्ये Cement Concrete 1.2.4 नुसार सिमेंट दरवाढीचा फरक देण्यात आलेला आहे. DSR नुसार दर रूपये 4,951/- व मार्केट रेट नुसार रुपये 6,000/- प्रमाणे रूपये 1,049/- फरक देण्यात आलेला आहे. तथापि, प्रत्यक्ष सिमेंट खरेदी 765 बॅग रुपये 5,400/- M.T. प्रमाणे व 700 बॅग रुपये

5,300/- M.T. प्रमाणे करण्यात आलेली आहे. (नस्तीसोबत खरेदी बील) त्यामुळे सिमेंट दरामध्ये अतिप्रदान झालेले आहे.

6) Longitudinal section chart मधील Trial pits अन्वये खोदाईसाठी अनुक्रमे Soil, Hard murum, Soft sock असल्याचे नमुद आहे. तथापि, देयक अदायगीमध्ये खोदकामात Hard Rock नमुद करुन प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे अतिप्रदान झालेले आहे. जादाचे खोदकाम केल्याने एकुण वसुली रूपये 13,361.60/- करण्यात यावी.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक जी.आर.-34/सा-4/ 5999 दिनांक 08/01/2007 नुसार व Technical Note Sr.no. 1 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करणे, असे निर्देश आहेत. तथापि, सदर कामासाठी चाचणी अहवाल दिनांक 21/03/2016 रोजी प्राप्त करण्यात आलेला आहे. काम पुर्णत्वाचा दिनांक 14/03/2016 रोजीचा आहे. यावरुन कामावर वापरण्यात आलेले साहित्य चाचणी न करता वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे कामावरील साहित्याची व कामाच्या दर्जा आणि गुणवत्तेची खात्री पटवावी.

8) कार्यारंभ आदेशाप्रमाणे काम करण्याची मुदत 2 महिने देण्यात आलेली होती. संबंधीत ठेकेदाराने कामास मुदतवाढ मागीतलेली नसतांना कशाच्या आधारे विभागाने एकत्रित सर्व कामांना मुदतवाढ दिनांक 31/03/2016 पर्यंत दिली? याचा खुलासा करावा. कार्यारंभ आदेश दिनांक 05/06/2015 रोजीचा देण्यात आलेला आहे. कार्यरंभ आदेशाप्रमाणे कामास मुदत 2 महिन्याची देण्यात आलेली असतांना ई - निविदा प्रमाणे कामाची मुदत 180 देण्यात आलेली आहे. त्यामुळे 180 दिवसापुढील विलंबास विलंब आकार आकारणी करुनच मुदतवाढ देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. कार्यारंभ दिनांक 05/06/2015 पासून 180 दिवस 01/12/2015 पर्यंत काम पुर्ण करणे अपेक्षीत होते. तथापि, काम दिनांक 14/03/2016 रोजी पुर्ण झाल्याने 103 दिवस विलंब झालेला आहे. मुख्य कायर्कारी अधिकारी यांचे परिपत्रक क्रमांक जिपनं/बांध/लेखा/340/2012 दिनांक 09/02/2013 नुसार 3 ते 4 महिन्यासाठी विलंब आकार निविदा रकमेच्या 2 टक्के करणे आवश्यक आहे. त्यानुसार निविदा रक्कम रूपये 10,00,596.79/- 2 टक्के रूपये 20,012/- विलंब आकारणीची वसुली करण्यात यावी.

9) कामगार कल्याण विभागामार्फत कामावर लावण्यात आलेल्या मजुरांचा विमा काम सुरु करण्यापुर्वी उतरविणे आवश्यक असतांना विमा काढण्यात आलेला नाही. विम्याची रक्कम अंतीम देयकातून वसुल केलेली आहे. त्यामुळे विम्याचा उददेश सफल होत नाही.

**3.334 मौजे बामखेडा नंबर 1 (शिवनाला) साठवण बंधारा तालुका शहादा कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 70, दिनांक 15/10/2016 अन्वये रककम रुपये 12,57,804/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकातील Rate analysis मधील Item providing and laying in situ cement concrete 1:2:4 Grade M-15 मध्ये Cement Rate analysis करतांना Lead Statement नुसार दर रूपये 4.51/- असतांना analysis मध्ये रूपये 182.30/- घेतल्याने रूपये 177.79/- प्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक जी.आर.-34/सा-4/ 5999, दिनांक 08/01/2007 नुसार व Technical Note Sr.no. 1 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करणे, असे निर्देश आहेत. तथापि, सदर कामासाठी चाचणी अहवाल दिनांक 07/09/2015 रोजी प्राप्त करण्यात आलेला आहे. काम पुर्णत्वाचा दिनांकही 07/09/2015 रोजीचा आहे. यावरुन कामावर वापरण्यात आलेले साहित्य चाचणी न करता वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे कामावरील साहित्याची व कामाच्या दर्जा आणि गुणवत्तेची खात्री करता आली नाही.

3) दर पृथ:करणांत Cement दर रूपये 6,000/- मे.टन याप्रमाणे फरक अदा करण्यात आलेला आहे. तथापि, प्रत्यक्ष सिमेंट खरेदी रूपये 225/- प्रति बॅग प्रमाणे म्हणजे रूपये 4,500/- मे.टन याप्रमाणे केलेली आहे.

त्यामुळे रूपये 1,500/- मे.ट. याप्रमाणे अतिप्रदान झालेले आहे. रूपये 1500x0.26x Qty.310.53 एकुण रूपये 1,21,107/- अतिप्रदान वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

4) काम मंजुर करतांना काम हे बामखेडा गावांतर्गत असतांना काम पुर्ण झाल्यानंतर काम हस्तांतरण ग्रामपंचायत बामखेडा त.त. यांचेकडे कसे केले? याबाबत खुलासा करावा.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 148 (1) नुसार कामाचे आदेश देणेपुर्वी करारनामा करुन त्यात B1 प्रमाणे काम करणे मक्तेदाराकडुन कामाची सुरवात व ते कधी पुर्ण होईल? अशा विविध प्रकाराच्या अटी शर्ती नमुद करणे आवश्यक आहे. करारातील कोणतीही अटी / शर्त भंग केल्यास दंडात्मक कारवाईची तरतुद करारनाम्यात करण्यात यावी, अशी तरतूद आहे. तथापि, वरील कामाबाबत कार्यारंभ आदेश दिनांक 10/06/2015 रोजी देण्यात आलेला आहे व करारनामा मुद्रांक खरेदी दिनांक 04/09/2015 रोजीची आहे. (करारनाम्यावर दिनांक नमुद नाही) यावरुन करारनामा काम पुर्ण झाल्यानंतर केलेला आहे. त्यामुळे करारनाम्याचा उददेश सफल होत नाही. याबाबत खुलासा करावा व नियमानुसार काम झाले असल्याबाबतची खात्री पटवावी.

6) वरील काम हे जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत करण्यात आलेले आहे. जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जलअ-2014/प्र.क्रमांक203/जल-7 दिनांक05/12/2014 नुसार साखळी सिमेंट कॉंक्रीट नाला बांध बांधणेबाबत तरतुद असतांना विभागाने लघुपाटबंधारा बांधण्यात आलेले आहेत. त्यामुळे जलयुक्त शिवार अभियानांचा उददेश सफल होत नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 नुसार व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार पंचायत राज संस्थामार्फत करण्यात येणा-या सर्व प्रकारच्या कार्यकरारासाठी कंत्राटात मांडलेली रक्कम किंवा मुल्य दहा लाख रुपयांपर्यंत रूपये 100/- मुद्रांक शुल्क आकारणी करावी व रूपये 10 लाखापेक्षा रक्कमेच्या कार्यकरारासाठी 10 लाखापुढील प्रत्येक 1 लाखासाठी रूपये 100/- याप्रमाणे मुद्रांक शुल्काची आकारणी करणेबाबत तरतुद आहे. तथापि, वरील कामांचे मुल्य रूपये 12,57,804/- साठी रूपये 300/- मुद्रांक शुल्क असणे आवश्यक असतांना रूपये 100/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करण्यात आल्याने रूपये 200/- कमी वसुल केल्याने रूपये 200/- मुद्रांक शुल्क वसुल करुन शासन खाती भरणा करावे.

8) कामगार कल्याण विभागामार्फत कामावर लावण्यात आलेल्या मजुरांचा विमा काम सुरु करण्यापुर्वी उतरविणे आवश्यक असतांना विमा काढण्यात आलेला नाही. विम्याची रक्कम अंतीम देयकातून वसुल केलेली आहे. त्यामुळे विम्याचा उददेश सफल होत नाही.

9) कार्यारंभ आदेशाप्रमाणे काम करण्याची मुदत 2 महिने देण्यात आलेली होती. संबंधीत ठेकेदाराने कामास मुदतवाढ मागीतलेली नसतांना कशाच्या आधारे विभागाने एकत्रित सर्व कामांना मुदतवाढ दिली? याचा खुलासा करावा. तसेच वरील काम हे मुदतीनुसार पुर्ण झालेले नाही. याबाबत खुलासा करावा.

**3.335 साठवण बंधारा खोकसा नंबर 4 (कामोद) तालुका नवापूर.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 298, दिनांक 22/03/2016 अन्वये रककम रुपये 20,47,417/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्रमांक680/वित्त-9 दिनांक 31/01/2013 अन्वये प्रशासकीय मान्यता देणेबाबतचे शक्तींची प्रक्रांती (Devolution of powers) देण्यात आलेले आहेत. त्यानुसार रूपये 21,40,914/- रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार अध्यक्ष स्थायी समिती यांना असतांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता कशी दिली? यावरुन नियमबाहय प्रशासकीय मान्यता दिल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर काम हे नियमबाहय झालेले आहे.

2) मुळ अंदाजपत्रक सन 2007-2008 मध्ये तयार करण्यात आलेले होते. त्याच अंदाजपत्रकाचे दर सुधारणा (Recasting) दिनांक 28/04/2015 रोजी करण्यात आलेली आहे. सन 2007-2008 चे अंदाजपत्रक आज का वापरण्यात आले? याचा खुलासा करावा. नवीन कामाची पाहणी करुन नवीन अंदाजपत्रक तयार करुन काम का घेण्यात आले नाही? 7 ते 8 वर्षामध्ये ज्या जागेवर काम करावयाचे आहे, त्या जागेमध्ये नैसर्गिक कारणांमुळे बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अंदाजपत्रकात नमुद बाबींमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) तांत्रिक मान्यता प्राप्त केलेली असतांना सन 2007-2008 मध्ये काम का करण्यात आले नाही? जवळ-जवळ 8 वर्षानंतर काम करण्यात आले आहे. दर वर्षी सदर योजनेसाठी निधी प्राप्त झालेला असतांना काम विलंबाने होण्याचे कारण काय? सदर काम हे वेळेत केले असते तर रूपये 15,29,143/- खर्च आला असता कामास विलंब केल्यामुळे रूपये 20,47,417/- खर्च झालेला आहे. एकुण कामाच्या रकमेत रूपये 5,18,274/- ने वाढ झालेली आहे. पर्यायाने शासनाचे नुकसान झाले आहे. तसेच Benefit cost analysis प्रमाणे दर वर्षी 7,77,197.85 शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ झाली असती 777198 x 7 = रूपये 54,40,386/- रकमेचे शेतक-यांचे नुकसान झालेले आहे. सदर बंधारा वेळेत न बांधल्यामुळे एकुण रूपये 59,58,660/- रकमेचे नुकसान झालेले आहे.

4) मुळ अंदाजपत्रकानुसार बंधा-याचे काम हे Cement Concrete 1:3:6 of grade M-10 मध्ये 541.84 Qty चे काम घेण्यात आलेले होते. सुधारीत अंदाजपत्रकात Cement Concrete 1:2:4 of grade M-15 मध्ये घेण्यात आले असुन त्यामुळे बंधा-यांच्या किंमतीमध्ये वाढ झालेली आहे. बंधा-याच्या किमतीत वाढ करुन संबंधीत ठेकेदारास फायदा पोहचवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. शासन निर्णय जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलअ-2014/प्र.क्रमांक203/जल-7, दिनांक 05/12/2014 नुसार व मेरी नाशिक यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार नालाबांध बांधकाम करतांना 1:3:6 सिमेंट कॉंक्रीटचा वापर करणेबाबत तरतूद असतांना 1:2:4 चा वापर केल्यामुळे खालील प्रमाणे अतिप्रदान झालेले आहे. 1:3:6 साठी दर रूपये 2,925.69/- व 1:2:4 साठी दर रूपये 3,178.66/- फरक रूपये 252.96/- येतो वसुलीची परिगणना करण्यात येत आहे. रूपये 1,40,476/- वसुली करण्यात यावी.

5) मुळ अंदाजपत्रकानुसार N.O.F. ची Qty दोनहीसाठी एकुण 1.5 घेण्यात आलेली आहे. तथापि, मोजमाप पुस्तिकेनुसार 15 घेण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकापेक्षा एका बाबीवर जास्तीत जास्त 25 टक्के वाढ अपेक्षीत आहे. तथापि, मोठयाप्रमाणवर वाढ कशी याबाबत खुलासा करावा व जादा अदा रक्कम वसुल करावी.

6) कार्यरंभ आदेशाप्रमाणे काम करण्याची मुदत 2 महिने देण्यात आलेली होती. संबंधीत ठेकेदाराने कामास मुदतवाढ मागीतलेली नसतांना कशाच्या आधारे विभागाने एकत्रित सर्व कामांना मुदतवाढ दिनांक 31/03/2016 पर्यंत दिली. याचा खुलासा करावा. कार्यारंभ आदेश दिनांक 06/06/2015 रोजीचा देण्यात आलेला आहे. कार्यारंभ आदेशाप्रमाणे कामास मुदत 2 महिन्याची देण्यात आलेली असतांना ई - निविदा प्रमाणे कामाची मुदत 180 देण्यात आलेली आहे. त्यामुळे 180 दिवसापुढील विलंबास विलंब आकार आकारणी करुनच मुदतवाढ देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. कार्यारंभ दिनांक 06/06/2015 पासून 180 दिवस दिनांक 02/12/2015 पर्यंत काम पुर्ण करणे अपेक्षीत होते. तथापि, काम दिनांक 30/01/2016 रोजी पुर्ण झाल्याने 53 दिवस विलंब झालेला आहे. मुख्य कायर्कारी अधिकारी यांचे परिपत्रक क्रमांक जिपनं/बांध/लेखा/340/2012 दिनांक 09/02/2013 नुसार 1 ते 2 महिन्यासाठी विलंब आकार निविदा रकमेच्या 1 टक्के करणे आवश्यक आहे. त्यानुसार निविदा रक्कम रूपये 20,68,516.29/- 1 टक्के रूपये 20,685/- विलंब आकारणीची वसुली करण्यात यावी.

7) कामगार कल्याण विभागामार्फत कामावर लावण्यात आलेल्या मजुरांचा विमा काम सुरु करण्यापुर्वी उतरविणे आवश्यक असतांना विमा काढण्यात आलेला नाही. विम्याची रक्कम अंतीम देयकातून वसुल केलेली आहे. त्यामुळे विम्याचा उददेश सफल होत नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 148 (1) नुसार कामाचे आदेश देणेपुर्वी करारनामा करुन त्यात B1 प्रमाणे काम करणे मक्तेदाराकडुन कामाची सुरवात व ते कधी पुर्ण होईल? अशा विविध प्रकाराच्या अटी शर्ती नमुद करणे आवश्यक आहे. करारातील कोणतीही अटी / शर्त भंग केल्यास दंडात्मक कारवाईची तरतुद करारनाम्यात करण्यात यावी, अशी तरतूद आहे. तथापि, वरील कामाबाबत कार्यारंभ

आदेश दिनांक 06/06/2015 रोजी देण्यात आलेला आहे व करारनामा करण्यात आलेला नाही. त्यामुळे करारनाम्याचा उददेश सफल होत नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 नुसार व ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्रमांक514/ वित्त-9 दिनांक 20/11/2009 नुसार पंचायत राज संस्थामार्फत करण्यात येणा-या सर्व प्रकारच्या कार्यकरारासाठी कंत्राटात मांडलेली रक्कम किंवा मुल्य दहा लाख रुपयांपर्यंत रूपये 100/- मुद्रांक शुल्क आकारणी करावी व रूपये 10 लाखापेक्षा रक्कमेच्या कार्य करारासाठी 10 लाखापुढील प्रत्येक 1 लाखासाठी रूपये 100/- याप्रमाणे मुद्रांक शुल्काची आकारणी करणेबाबत तरतुद आहे. तथापि, वरील कामांचे मुल्य रूपये 21,40,914/- साठी रूपये 1,300/- मुद्रांक शुल्क असणे आवश्यक असतांना करारनामा करण्यात आलेला नसल्याने शासनाला महसुल मिळालेला नाही. तरी रूपये 1,300/- वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

10) शासन निर्णय क्रमांक जलसं-2012/प्र.क्रमांक/जल-7 दिनांक12/11/2013 नुसार कॉंक्रीट नाला बांध व सिमेंट बंधारे बांधण्यात येतील, तो परिसर हा तेथील रचना (Geological condition) पाझरणे योग्य आहे, याबाबतची खात्री भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडून करणेबाबत तरतूद असतांना सदर बांध बांधतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.336 मौजे धांद्रे खुर्द नंबर 2 साठवण बंधारा तालुका शहादा.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 35, दिनांक 03/01/2015 अन्वये रककम रुपये 15,86,795/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुळ अंदाजपत्रक दिनांक 17/03/2012 रोजी तयार करण्यात आलेले होते. त्याच अंदाजपत्रकाचे दर सुधारणा (Recasting) दिनांक 06/05/2015 रोजी करण्यात आलेली आहे. सदर काम सन 2012-2013 मध्ये का करण्यात आले नाही? विलंबाने काम केल्याने कामाच्या रकमेत रूपये 2,03,669/- ने वाढ झालेली आहे.

2) मुळ अंदाजपत्रकानुसार बंधा-याचे काम हे Cement Concrete 1:3:6 of grade M-10 मध्ये 541.84 Qty चे काम घेण्यात आलेले होते. सुधारीत अंदाजपत्रकात Cement Concrete 1:2:4 of grade M-15 मध्ये घेण्यात आले असुन त्यामुळे बंधा-यांच्या किंमतीमध्ये वाढ झालेली आहे. बंधा-याच्या किमतीत वाढ करुन संबंधीत ठेकेदारास फायदा पोहचवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. शासन निर्णय जलसंधारण विभाग क्रमांक जलअ-2014/प्र.क्रमांक203/जल-7, दिनांक 05/12/2014 नुसार व मेरी नाशिक यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार नाला बांध बांधकाम करतांना 1:3:6 सिमेंट कॉंक्रीटचा वापर करणेबाबत तरतूद असतांना 1:2:4 चा वापर केल्यामुळे खालीलप्रमाणे अतिप्रदान झालेले आहे. 1:3:6 साठी दर रूपये 2,925.69/- व 1:2:4 साठी दर रूपये 3,178.66/- फरक रूपये 252.96/- येतो वसुलीची परिगणना करण्यात येत आहे. रूपये 1,14,740/- वसुली करण्यात यावी.

3) सुधारीत अंदाजपत्रकातील दर पृथ:करणमध्ये सिमेंट दरवाढीचा फरक रूपये 230.78/- देण्यात आलेला आहे. प्रत्यक्ष सिमेंट खरेदी रूपये 4,540/- M.T. (नस्तीसोबत खरेदी बील) प्रमाणे केलेली आहे. DSR नुसार दर रूपये 4,951/- असतांना सिमेंट खरेदीच्या दराचा फरक अनुज्ञेय होत नाही. त्यामुळे सिमेंट दरामध्ये अतिप्रदान झालेले आहे. रक्कम रूपये 1,05,723/- वसुल करावी.

4) सदर काम हे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, जलयुक्त शिवार अंतर्गत प्राप्त मार्गदर्शक सुचनानुसार सिमेंट कॉंक्रीट बांध घेणेबाबतच्या तरतुदीची अंमलबजावणी का करण्यात आली नाही? याचा खुलासा करावा.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 148 (1) नुसार कामाचे आदेश देणेपुर्वी करारनामा करुन त्यात B1 प्रमाणे काम करणे मक्तेदाराकडुन कामाची सुरवात व ते कधी पुर्ण होईल? अशा विविध प्रकाराच्या अटी शर्ती नमुद करणे आवश्यक आहे. करारातील कोणतीही अटी / शर्त भंग केल्यास दंडात्मक कारवाईची तरतुद करारनाम्यात करण्यात यावी, अशी तरतूद आहे. तथापि, वरील कामाबाबत कार्यारंभ

आदेश दिनांक 05/06/2015 रोजी देण्यात आलेला आहे. करारनामा काम पुर्ण झाल्यानंतर केलेला आहे. त्यामुळे करारनाम्याचा उददेश सफल होत नाही.

6) शासन निर्णय क्रमांक जलसं-2012/प्र.क्रमांक/जल-7, दिनांक 12/11/2013 नुसार कॉंक्रीट नाला बांध व सिमेंट बंधारे बांधण्यात येतील, तो परिसर हा तेथील रचना (Geological condition) पाझरणे योग्य आहे, याबाबतची खात्री भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडून करणेबाबत तरतूद असतांना सदर बांध बांधतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

7) Longitudinal section chart मधील Trial pits नुसार व प्रत्यक्ष खोदकामानुसार 0.40 मी. पासून S.R. व 1.40 मी पासुन H.R. असतांना वाटर कुशन 18.20x7.50x0.45 = 61.42 चे का घेण्यात आले? H.R. वरच असतांना वॉटर कुशनची आवश्यकता काय होती? याबाबत खुलासा करावा व अनावश्यक ठिकाणी मोठया रुंदीचे वॉटर कुशन घेतल्याने अनावश्यक खर्च करण्यात आलेला आहे. अनावश्यक बांधकाम केल्याने वसुली रूपये 1,88,347.5/- करण्यात यावी.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक जी.आर.-34/सा-4/ 5999, दिनांक 08/01/2007 नुसार व Technical Note Sr.no. 1 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करणे, असे निर्देश आहेत. तथापि, सदर कामासाठी चाचणी अहवाल दिनांक 26/08/2015 रोजी प्राप्त करण्यात आलेला आहे. काम पुर्णत्वाचा दिनांक 19/08/2015 रोजीचा आहे. यावरुन कामावर वापरण्यात आलेले साहित्य चाचणी न करता वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे कामावरील साहित्याची व कामाच्या दर्जा आणि गुणवत्तेची खात्री पटवावी.

9) कार्यारंभ आदेशाप्रमाणे काम करण्याची मुदत 2 महिने देण्यात आलेली होती. संबंधीत ठेकेदाराने कामास मुदतवाढ मागीतलेली नसतांना कशाच्या आधारे विभागाने एकत्रित सर्व कामांना मुदतवाढ दिनांक 31/03/2016 पर्यंत दिली? याचा खुलासा करावा. कार्यारंभ आदेश दिनांक 05/06/2015 रोजीचा देण्यात आलेला आहे. कार्यरंभ आदेशाप्रमाणे कामास मुदत 2 महिन्याची देण्यात आलेली असतांना ई-निविदा प्रमाणे कामाची मुदत 180 देण्यात आलेली आहे. त्यामुळे 180 दिवसापुढील विलंबास विलंब आकार आकारणी करुनच मुदतवाढ देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

10) कामगार कल्याण विभागामार्फत कामावर लावण्यात आलेल्या मजुरांचा विमा काम सुरु करण्यापुर्वी उतरविणे आवश्यक असतांना विमा काढण्यात आलेला नाही. विम्याची रक्कम अंतीम देयकातून वसुल केलेली आहे. त्यामुळे विम्याचा उददेश सफल होत नाही.

**3.337 मौजे तोंडापुर, तालुका जामनेर येथील साठवण बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 17,99,649/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2004/प्र.क्र.18/वित्त-9(33), दिनांक 30/06/2004 आणि शासन निर्णय क्रमांक ग्रासयो 2007/प्र.क्र.1/यो.9, दिनांक 08/05/2007 मधील परिच्छेद 3.2.8 नुसार मजूर सहकारी संस्था, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व ग्रामपंचायत यांना व नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांमधे 33:33:34 या प्रमाणात कामांचे वाटप करावयाचे आहे. नोंदवहीची मागणी केलेली असतानाही, ती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे काम वाटप समितीने शिफारस असल्याची व विहीत प्रमाणात वाटप करण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

2) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/1087/सी.आर-94/बीएलडीजी/2, दिनांक 14/06/1989 अन्वये कंत्राटदार यांचे टेंडर ॲक्सेप्ट झाल्यापासुनच्या तारखेपासुन 10 दिवसांचे आत टेंडरमध्ये नमुद केलेले डिपॉझीटची रक्कम रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बॅंकेची ठेव पावती कार्यकारी अभियंता यांचे नावे तारण पुढील एक वर्ष मुदत असलेली घेणे आवश्यक असतांना 2.5 टक्के सुरक्षा अनामत रूपये 20,000/- जळगांव जनता

सह.बॅक लि., जळगांव या खाजगी बॅकेची ठेव पावती घेणेत आलेली आहे व उर्वरीत कंत्राटदार यांचे धावते देयकातुन कपात करणेत आलेली आहे. सदर शासन आदेशानुसार कार्यवाही करणेत आलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 150 नुसार तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाज तयार करुन त्यांचे तंत्र शाखेत परिनिरीक्षण करणे आवश्यक आहे. तद्नुसार कार्यवाही करण्यात यावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 परिच्छेद क्रमांक 17 नुसार जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारुन आऊटसोर्सिंग पध्दतीने त्रयस्थ पक्ष नियंत्रण कक्ष गठीत करुन होणारी कामे यांचा दर्जा व गुणवत्ता विहित केलेल्या निकषानुसार राहील, याची खबरदारी घ्यावी, असे सूचित केलेले आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968, नियम 147 व 197 नुसार पुर्ण कामाच्या नोंदी नमुना नंबर 69 मधील पुर्ण कामांची नोंदवही व नमुना नंबर 48 मधील करार नोंदवहीमध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु, सदरच्या नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेत आलेल्या नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीए 1099/सीआर 54/03, दिनांक 20/05/1999 अन्वये प्रत्यक्ष कामांच्या जागी माहिती दर्शक फलक बसविणेत आलेला असुन त्यात करारनाम्यातील अटी शर्तीनुसार 24 महीन्यांचा दोष निवारण कालावधी नमुद असतांना माहीती फलकात दोष निवारण कालावधी नमुद करणेत आलेला नाही.

7) GUIDE BOUND दबाईची नोंद मोजमाप पुस्तीका ॲटम नंबर 11 मध्ये करणेत आलेली असुन सदरच्या कामामध्ये 5 टक्के कमी श्रिंकेज वजा केलेली असल्यामुळे कंत्राटदार यांना रक्कम रुपये 10,303/- एवढे जादा प्रदान झालेले असुन सदरची रक्कम संबधीताकडुन वसुल करावी.

9) मुख्य अभियंता (स्थानिक स्तर) पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक मु.अ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये क्लीअरींग द साईड ही बाब अंदाजपत्रकात अंतर्भुत करणेत येऊ नये असे असतांना रक्कम रुपये 5,525/- कंत्राटदार यांना प्रदान करण्यात आली आहे. तरी सदरची रक्कम रुपये 5,525/- संबधीतांकडुन जबाबदारी निश्चित करुन वसुल करावी.

**3.338 ग्रामपंचायत आचेगांव, तालुका भुसावळ येथील साठवण बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 14,37,860/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2004/प्र.क्र.18/वित्त-9(33), दिनांक 30/06/2004 आणि शासन निर्णय क्रमांक ग्रासयो 2007/प्र.क्र.1/यो.9, दिनांक 08/05/2007 मधील परिच्छेद 3.2.8 नुसार मजूर सहकारी संस्था, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व ग्रामपंचायत यांना व नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांमधे 33:33:34 या प्रमाणात कामांचे वाटप करावयाचे आहे. काम वाटप समितीने शिफारस असल्याची व विहीत प्रमाणात वाटप करण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

2) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/1087/सी.आर-94/बीएलडीजी/2, दिनांक 14/06/1989 अन्वये कंत्राटदार यांचे टेंडर ॲक्सेप्ट झाल्यापासुनच्या तारखेपासुन 10 दिवसांचे आत टेंडरमध्ये नमुद केलेले डिपॉझीटची रक्कम रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बॅकेची ठेव पावती कार्यकारी अभियंता यांचे नावे तारण पुढील एक वर्ष मुदत असलेली घेणे आवश्यक असतांना कंत्राटदार यांचेकडुन 1 टक्के रोख स्वरुपात व धावते देयकातुन 4 टक्के कपात करणेत आलेली आहे. सदर शासन आदेशानुसार कार्यवाही करणेत आलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 150 नुसार तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाज तयार करुन त्यांचे तंत्र शाखेत परिनिरीक्षण करणे आवश्यक आहे. तदनुसार कार्यवाही करण्यात यावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 परिच्छेद क्रमांक 17 नुसार जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारुन आऊटसोर्सिंग पध्दतीने त्रयस्थ पक्ष नियंत्रण कक्ष गठीत करुन होणारी कामे यांचा दर्जा व गुणवत्ता विहित केलेल्या निकषानुसार राहील याची खबरदारी घ्यावी, असे सूचित केलेले आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968, नियम 147 व 197 नुसार पुर्ण कामाच्या नोंदी नमुना नंबर 69 मधील पुर्ण कामांची नोंदवही व नमुना नंबर 48 मधील करार नोंदवहीमध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु, सदरच्या नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेत आलेल्या नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीए 1099/सीआर 54/03, दिनांक 20/05/1999 अन्वये प्रत्यक्ष कामांच्या जागी माहिती दर्शक फलक बसविणेत आलेला असुन त्यात करारनाम्यातील अटी शर्तीनुसार 24 महीन्यांचा दोष निवारण कालावधी नमुद असतांना माहीती फलकात दोष निवारण कालावधी नमुद करणेत आलेला नाही.

7) मुख्य अभियंता (स्थानिक स्तर) पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक मु.अ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये क्लीअरींग द साईड ही बाब अंदाजपत्रकात अंतर्भुत करणेत येऊ नये, असे असतांना रक्कम रुपये 5,652/- कंत्राटदार यांना प्रदान करण्यात आली आहे. तरी सदरची रक्कम रुपये 5,652/- संबधितांकडुन जबाबदारी निश्चित करुन वसुल करण्यात यावी.

**3.339 मौजे हातेड बु, तालुका चोपडा येथे साठवण बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 325, दिनांक 30/03/2016 अन्वये रक्कम रुपये 9,21,942/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग यांचे पत्र क्रमांक संकिर्ण 8289/375/89 लपा (2), दिनांक 01/01/1990 नुसार बांधकामाचे गुणनियंत्रक योग्य प्रकारे होण्यास कामासाठी वापरलेले दगड खडी यांची शासकिय तंत्रशाळेतुन काम सुरु करण्यापुर्वी तपासणी करून चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करणे आवशक असतांना सदर कामाचा चाचणी अहवाल काम दिनांक 11/12/2015 रोजी पुर्ण झाल्यानंतर दिनांक 12/03/2016 रोजी प्राप्त झाला आहे.

2) कामावर गौण खनिज वापरले असुन गौण खनिज रक्कम कमी वसूल केलेली आहे. कामावर एकुण परिमाण 1232.88 एवढे गौण खनिज वापरले असुन गौण खनिज रक्कम रुपये 1,74,254/- वसुल करणे आवश्यक असतांना रुपये 91,871/- वसुल करुन रुपये 82,383/- कमी वसुल केली आहे. तरी कमी वसुल केलेली रक्कम वसुल करावी.

3) सदरच्या कामामध्ये 5 टक्के कमी श्रिंकेज वजा केलेली असल्यामुळे कंत्राटदार यांना रक्कम रुपये 8,576.68/- ऐवढे जादा प्रदान झालेले असुन सदरची रक्कम संबधीताकडुन वसुल करावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी नमुना नंबर 39 नोंदवहीतील रकाने परिपुर्ण नोंदवुन हस्तांतरणासंबंधी कार्यवाही पुर्ण केल्याचे प्रमाणित करुन शासकिय जागेचा 7/12 जागेचा ले आऊट / नकाशा नमुना 8 ड पत्रक प्राप्त नाही.

5) महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते-1, दिनांक 11/6/2004 प्रमाणे कामाचे अंदाजपत्रक काळजीपुर्वक व वस्तूनिष्ठ परिस्थितीवर आधारीत असावे. काही बाबी अंदाजपत्रकातील परिमाणत बदल होणे अटळ असल्यास त्याचा सविस्तर प्रस्ताव करून त्यास कार्यकारी अभियंता यांनी सुधारीत तांत्रिक मान्यता दिलेली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 42,387.00/- चे जादा प्रदान झालेले आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीए 1099/सीआर 54/03, दिनांक 20/05/1999 अन्वये प्रत्यक्ष कामांच्या जागी माहिती दर्शक फलक बसविणेत आलेला नाही. त्यामुळे

माहिती दर्शक फलक बसविणेसाठी केलेले एकूण प्रदान रूपये 2,568/- अनुज्ञेय ठरत नाही. सदरची रक्कम वसूल करणेत यावी.

7) मक्तेदाराने मुदतीत काम पुर्ण न केल्यामुळे दिनांक 11/09/2015 ते दिनांक 11/12/2015 एकुण 91 दिवस काम उशिराने पुर्ण झाल्याने रक्कम रूपये 4,550/- वसूल करणे आवश्यक आसतांना रुपये 750/- वसूल केले आहेत. वसुल रुपये 3,800/- कमी वसुल केलेली रक्कम वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

8) R.R.C कामासाठी C.S.R नुसार बेसिक दर रूपये 60,179.50/- असुन सदर दरामध्ये steel Diff.cost (50670 - 47171 = 3528.30) रुपये 3,528.30 बेसिक दर मध्ये घेउुन रक्कम प्रदान केली आहे. सदर दराबाबत कोणतेच कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे सदर कामावर एकुण परिमाण 0.721*3528.30 = 2543.90 रुपये प्रमाणे जादा प्रदान झाले असुन रक्कम वसुल करुन दर्शवावी.

**3.340 लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांनी उपलब्ध करुन दिलेल्या पूर्ण कामांबाबत सर्वसाधारण आक्षेप.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 51) -** कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडील उपलब्ध झालेलया पूर्ण कामांच्या नस्त्यांचे अवलोकन करता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालांमध्ये विकास कामे पूर्ण करतांना त्यासाठी आवश्यक जमिन भूसंपादनाद्वारे अथवा बक्षीसपत्राद्वारे ताब्यात घेऊन त्या जमिनींच्या मालमत्ताविषयक नोंदी जिल्हा परिषद मालकीच्या झाल्याबाबत अभिलेखे संबंधीत संचिकांमध्ये संलग्न करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे मुळ जमिनीच्या मालकाने भविष्यात न्यायालयात दाद मागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/ जल, दिनांक 31/07/2000 मधील परिच्छेद एक नुसार लघुपाटबंधारे योजनांच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांना एकत्र येऊन योजनेच्या सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीसाठी सहकारी पाणीवापर संस्था स्थापन करुन सिंचनक्षेत्र हस्तांतरीत केल्याचे कागदपत्र पहावयास मिळाले नाही. तसेच उपरोक्त नमूद शासन निर्णयान्वये स्वामित्व शुल्क भरणा करावा, असे नमूद असतांना आतापर्यंत पूर्ण झालेले साठवण बंधाऱ्यांबाबत याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2009/प्र.क्र.180/पं.रा-8, दिनांक 31/12/2009 नुसार कामाचे निविदेमध्ये दोषनिवारण कालावधी नमूद करणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नाही.

4) प्रस्तावित विकास कामे व त्यासाठी मक्तेदार म्हणून शिफारस करण्यापूर्वी संबंधीत मजूर सहकारी संस्थेचा किंवा सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांच्या कामाचा अनुभव, अर्हता व क्षमता याची जिल्हा काम वाटप समिती यांचेकडून सांगड घातली जाते किंवा कसे? याबाबत कोणताही अहवाल नस्तीसोबत जोडण्यात येत नाही. तसेच संबंरधीत मजूर सहकारी संस्थेकडून निविदा भरुन घेतल्यानंतर थेट कार्यारंभ आदेश देण्यात येततात. मात्र मक्तेदाराचा अनुभव, त्याची तांत्रिक व आर्थिक क्षमता स्पष्ट करणारे तपशिल निविदेसोबतच्या विहित विवरणपत्रांमध्ये भरुन घेण्यात येत नाहीत, त्यामुळे विकास कामांसाठी योग्य मजूर सहकारी संस्थेची मक्तेदार म्हणून नियुक्ती झाल्याची लेखापरिक्षणात खात्री करता येत नाही. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जीआर/34/का-4/5162, दिनांक 09/01/1987 नुसार शासकीय प्रयोगशाळेचा गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना खाजगी इंजिनिअरींग कॉलेजकडून गुणवत्ता तपासणी करण्यात येते.

6) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे शासन परिपत्रक क्रमांक मुअ/लपा (स्था.स्तर) उपविअ/2/1042/सन 2006, दिनांक 13/04/2006 नुसार वहन अंतर व नकाशा 10 कि.मी.

च्या पुढील अंतराचे ठिकाणसाठी अधीक्षक अभियंता यांनी अंतरे प्रमाणीत करणे आवश्यक आहे, तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 मधील बाब क्रमांक 13 नुसार काम पूर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 120 नुसार अंदाजपत्रकातील काही बाबींच्या कामामध्ये होणारी बचत इतर बाबींसाठी खर्च करण्यात येऊ नये, नियम 153 नुसार यासाठी अंदाजपत्रकाप्रमाणे काम करुन घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता / उपविभागीय अभियंता / शाखा अभियंता यांची आहे, तथापि, एका बाबीवरील बचत ही दुसऱ्या बाबीवर वापरण्यात येत असल्याचे आढळून येते.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 146 नुसार कामाचे आदेश देण्यापूर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदाराकडून कामाची सुरुवात व ते कधी पूर्ण होईल अशा विविध प्रकारच्या अटी व शर्ती नमूद करणे आवश्यक आहे. तथापि, करारनामा करतांना करारनामा हा अपूर्ण स्वरुपात भरलेला असतो, करारनाम्यावर करारनामा करुन घेणार व करारनामा करुन देणार यांच्या स्वाक्षऱ्या नसतात.

**3.341 कोपरगांव पध्दतीचा बंधारा बांधकाम मौजे रुईछत्तीसी तालुका अहमदनगर.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 19,80,521/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ई-निविदा सुचना प्रसिध्दी करणेत आली असुन एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या असुन चंद्रचुड धोंडीराम ढोरकुले यांची अंदाजपत्रकीय दराच्या 4.99 जादा दराची सर्वात कमी दराची असुन वाटाघाटी करुन 3 टक्के जादा दराची मंजुर करणेत आली असुन दिनांक 01/11/2014 रोजी कामाचे आदेश देणेत आले.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2004/प्र.क्र.18/वित्त-9(33), दिनांक 30/06/2004 आणि शासन निर्णय क्रमांक ग्रासयो 2007/प्र.क्र.1/यो.9, दिनांक 08/05/2007 मधील परिच्छेद 3.2.8 नुसार मजूर सहकारी संस्था, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व ग्रामपंचायत यांना व नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांमधे 33:33:34 या प्रमाणात कामांचे वाटप करावयाचे आहे. वरील नमूद अर्धसमास पत्राने कामवाटप समितीचे काम वाटपाबाबतची नोंदवहीची मागणी केलेली असतानाही, ती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे काम वाटप समितीने शिफारस असल्याची व विहीत प्रमाणात वाटप करण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

3) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वि.मा.सं.-1098/प्र.क्र.29/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2/2000/प्र.क्र.837/पं.रा.8(35), दिनांक 15/09/2003, तसेच संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्र.वि.नि.1801/सी.आर.-जि.प./संकीर्ण, दिनांक 30/07/2002 नुसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधीत कंत्राटी कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. आदेशाप्रमाणे कार्यवाही न करता कार्यारंभ आदेश क्रमांक 68 चे, दुसऱ्या कामाचे विमा प्रामणपत्राची छायांकीत प्रत कामाचे नस्तीसोबत जोडणेत आलेली असुन शासनाची दिशाभुल करुन शासन महसुलाचे नुकसान झालेले असून संबंधीताकडून 1 टक्के विम्याची रक्कम रुपये 19,805/- वसूल करावी.

4) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/1087/सी.आर-94/बीएलडीजी/2, दिनांक 14/06/1989 अन्वये कंत्राटदार यांचे टेंडर ॲक्सेप्ट झाल्यापासुनच्या तारखेपासुन 10 दिवसांचे आत टेंडरमध्ये नमुद केलेले डिपॉझीटची रक्कम रोख स्वरुपात किंवा राष्टीयकृत बॅकेच बचत प्रमाणपत्र स्वरुपात कंत्राटदार यांचेकडुन 2 टक्के दराने घेणे आवश्यक असतांना कंत्राटदार यांचे 1 ले धावते देयकातुन कपात करणेत आलेली आहे. उर्वरीत 1 टक्के कमी कपात केलेली रक्कम रुपये 17,332/- संबधीतांकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करणेत यावी सदर शासन आदेशानुसार कार्यवाही करणेत आलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152(3) नुसार 10 टक्के किंवा रुपये 10,000/- यापैकी जादा रक्कमेची जादा दरानुसार निविदा असल्यास नविन सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी अभियंता यांची पुर्व मंजुरी घेऊन मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात येतील आणि त्या ऐवजी कमी केलेले अंदाज दाखल करण्यात येतील, असे स्पष्ट नमुद असतांना तशी कार्यवाही केली असल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले नाही.

6) सदर निविदेतील विवरणपत्रांमधील माहिती निविदाकारांनी भरलेली नाही. ब-1 करारनाम्यातील अटी शर्तीप्रमाणे परीपुर्ण भरणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता निविदा स्विकृत करणेत आलेली आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 150 नुसार तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाज तयार करुन त्यांचे तंत्र शाखेत परिनिरीक्षण करणे आवश्यक आहे. तद्नुसार कार्यवाही करण्यात यावी.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/ वित्त-4, दिनांक 30/08/2010 परिच्छेद क्रमांक 17 नुसार जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारुन आऊटसोर्सिंग पध्दतीने त्रयस्थ पक्ष नियंत्रण कक्ष गठीत करुन होणरी कामे यांचा दर्जा व गुणवत्ता विहित केलेल्या निकषानुसार राहील याची खबरदारी घ्यावी, असे सूचित केलेले आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968, नियम 147 व 197 नुसार पुर्ण कामाच्या नोंदी नमुना नंबर 69 मधील पुर्ण कामांची नोंदवही व नमुना नंबर 48 मधील करार नोंदवही मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु, सदरच्या नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेत आलेल्या नाहीत नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीए 1099/सीआर 54/03, दिनांक 20/05/1999 अन्वये प्रत्यक्ष कामांच्या जागी विहित प्रपत्रात कामांची माहिती दर्शविणारा फलक दोष निवारण कालावधीसह कंत्राटदार यांनी बसविणे आवश्यक आहे. तथापि, माहिती दर्शक फलक बसविणेत आलेला नाही. त्यामुळे बाब क्रमांक 13 मध्ये माहिती दर्शक फलक बसविणे साठी केलेले एकूण प्रदान रुपये 3,850/- अनुज्ञेय ठरत नाही. सदरची रक्कम वसूल करणेत यावी. रुपये 3,850/- शासकिय अनुदानासाठी अंतिम अमान्य करणेत येत आहे.

11) निविदा दराच्या 3 टक्के जादा दराची निवीदा स्विकारल्यामुळे एकूण रक्कम रुपये 1,05,226/- एवढ्या रक्कमेचे जादा प्रदान झालेले आहे.

12) मोजमाप पुस्तीकेत अनुक्रमांक 2,4,5,9,10,11,12 या बाबींवर एकूण रक्कम रुपये 1,19,705/- एवढा कमी खर्च करणेत आलेला असुन तसेच अनुक्रमांक 1,3,6 या बाबींवर रुपये 67,908/- एवढा जादा खर्च करणेत आलेला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 120(2) प्रमाणे अंदाजपत्रकातील कोणत्याही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत कामाच्या इतर बाबीवर खर्च करता येणार नाही. तसेच नियम 153(1) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मक्तेदाराची व अंदाजपत्रकाप्रमाणे काम करुन घेण्याची जबाबदारी अभियंत्याची आहे. असे असूनही वरीलप्रमाणे एखाद्या बाबीचे वर्जन करुन अन्य बाबीवर अधिक खर्च केला आहे व एका बाबीवरील बचत दुसऱ्या बाबीवर वापरण्यात आली आहे. जे या तरतूदीबाहय आहे. कार्यकारी अभियंता यांची मान्यता घेतलेल्या बचत-अधिक्य तक्त्यात संयुक्तीक कारणे तपशिलवार दिलेले नाही.

**3.342 साठा बंधारा बांधकाम कोहोकळी (गायकवाडमळा) तालुका पारनेर.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रूपये 18,13,748/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ई-निविदा सुचना प्रसिध्दी करणेत आली असुन एकूण 4 निविदा प्राप्त झाल्या असुन सुधीर संजय डुबे यांची अंदाजपत्रकीय दराच्या 4.99 टक्के जादा दराची सर्वात कमी दराची असुन दिनांक 22/09/2014 रोजी वाटाघाटी करुन 4.40 टक्के जादा दराची मंजुर करणेत आली असुन दिनांक 01/11/2014 रोजी कामाचे आदेश देणेत आले.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2004/प्र.क्र.18/वित्त-9(33), दिनांक 30/06/2004 आणि शासन निर्णय क्रमांक ग्रासयो 2007/प्र.क्र.1/यो.9, दिनांक 08/05/2007 मधील परिच्छेद 3.2.8 नुसार मजूर सहकारी संस्था, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व ग्रामपंचायत यांना व नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांमध्ये 33:33:34 या प्रमाणात कामांचे वाटप करावयाचे आहे. वरील नमूद अर्धसमास पत्राने कामवाटप समितीचे काम वाटपाबाबतची नोंदवहीची मागणी केलेली असतानाही, ती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे काम वाटप समितीने शिफारस असल्याची व विहीत प्रमाणात वाटप करण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

3) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वि.मा.सं.-1098/प्र.क्र.29/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2/2000/प्र.क्र.837/पं.रा.8(35), दिनांक 15/09/2003, तसेच संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्र.वि.नि.1801/सी.आर.-जि.प./संकीर्ण, दिनांक 30/07/2002 नुसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधीत कंत्राटी कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. आदेशाप्रमाणे कार्यवाही न करता, नियमबाह्य देयकामधून विमा रक्कम कपात केली आहे. त्यामुळे योजनेचा मुळ हेतू सफल झाला नाही.

4) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परीपत्रक क्रमांक सीएटी/1087/सी.आर-94/बीएलडीजी/2, दिनांक 14/06/1989 अन्वये कंत्राटदार यांचे टेंडर अॅक्सेप्ट झाल्यापासुनच्या तारखेपासुन 10 दिवसांचे आत टेंडरमध्ये नमुद केलेले डिपॉझीटची रक्कम रोख स्वरुपात किंवा राष्टीयकृत बॅकेची ठेव पावती कार्यकारी अभियंता यांचे नावे तारण पुढील एक वर्ष मुदत असलेली घेणे आवश्यक असतांना कंत्राटदार यांचेकडुन 1 टक्के धावते देयकातुन कपात करणेत आलेली आहे. सदर शासन आदेशानुसार कार्यवाही करणेत आलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152(3) नुसार 10 टक्के किंवा रूपये 10,000/- यापैकी जादा रक्कमेची जादा दरानुसार निविदा असल्यास नविन सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी अभियंता यांची पुर्व मंजुरी घेऊन मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात येतील आणि त्याऐवजी जादा केलेले अंदाज दाखल करण्यात येतील, असे स्पष्ट नमुद असतांना तशी कार्यवाही केली असल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले नाही.

6) सदर निविदेतील विवरणपत्रांमधील माहिती निविदाकारांनी भरलेली नाही. ब-1 करारनाम्यातील अटी शर्तीप्रमाणे परीपुर्ण भरणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता निविदा स्वीकृत करणेत आलेली आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 150 नुसार तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाज तयार करुन त्यांचे तंत्र शाखेत परिनिरीक्षण करणे आवश्यक आहे. तद्नुसार कार्यवाही करण्यात यावी.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 परिच्छेद क्रमांक 17 नुसार जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारुन आऊटसोर्सिंग पध्दतीने त्रयस्थ पक्ष नियंत्रण कक्ष गठीत करुन होणरी कामे यांचा दर्जा व गुणवत्ता विहित केलेल्या निकषानुसार राहील याची खबरदारी घ्यावी, असे सूचित केलेले आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968, नियम 147 व 197 नुसार पुर्ण कामाच्या नोंदी नमुना नंबर 69 मधील पुर्ण कामांची नोंदवही व नमुना नंबर 48 मधील करार नोंदवही मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु, सदरच्या नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेत आलेल्या नाहीत. नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

10) मोजमाप पुस्तीकेत अनुक्रमांक 1 व 4 या बाबींवर एकूण रक्कम रुपये 18,243/- एवढा कमी खर्च करणेत आलेला असुन तसेच अनुक्रमांक 2,5,6,8 या बाबींवर रुपये 96,170/- एवढा जादा खर्च करणेत आलेला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 120(2) प्रमाणे अंदाजपत्रकातील कोणत्याही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत कामाच्या इतर बाबीवर खर्च करता येणार नाही. तसेच नियम 153(1) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मक्तेदाराची व अंदाजपत्रकाप्रमाणे काम करुन घेण्याची जबाबदारी अभियंत्याची आहे. असे असूनही वरीलप्रमाणे एखाद्या बाबीचे वर्जन करुन अन्य बाबीवर अधिक खर्च केला आहे व एका बाबीवरील बचत दुसऱ्या बाबीवर वापरण्यात आली आहे. जे या तरतूदीबाह्य आहे. कार्यकारी अभियंता यांची मान्यता घेतलेल्या बचत-अधिक्य तक्त्यात संयुक्तीक कारणे तपशिलवार दिलेले नाही.

11) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट राज्य, मुंबई यांचे दिनांक 04/05/2012 च्या अधिसुचनेनुसार नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन 2 टक्के व अनोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसुल करणे आवश्यक असतांना सदर कंत्राटदार यांचे नस्ती सोबत व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र नसतांना 2 टक्के मुल्यवर्धीत कर वसुल करणेत आलेला आहे. कमी वसुल 3 टक्के रक्कम रुपये 54,412/- संबधीतांकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करणेत यावी.

**3.343 पाझर तलाव दुरुस्ती वालवड, तालुका कर्जत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 34) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,33,999/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीसोबत मंजूर प्राकलन लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही. त्यामुळे प्राकलनाप्रमाणे काम झाल्याची तपासणी करता आली नाही. सबब प्राकलनातील दराप्रमाणे विहीत दर लावून व प्राकलना प्रमाणेच काम झाले किंवा नाही? याची पडताळणी करता आली नाही.

2) कामाचे नस्तीसोबत खोदकामाचे मोजमापाचे फिल्डबुक तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही. सबब प्रत्यक्ष मोजमाप पुस्तकात नोंदविलेली मापांची पडताळणी फिल्डबुक अभावी करता आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी नमुना 69 मध्ये घेणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) निविदातील विवरणपत्रामधील माहिती निविदाकारांनी भरलेली नाही. त्यामुळे निविदाकाराकडील उपलब्ध हत्यारे व संयंत्रे कर्मचारी, तांत्रिक कर्मचारी, मजूर इत्यादी आवश्यक बाबी त्यांच्याकडे असल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. सदर उणीवा असताना निविदा स्वीकारलेली नाही.

5) सदरील कामाच्या नस्तीसोबत जोडलेला वाढ / घट तक्ता व त्यात नमुद केलेला खर्च महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 120(2) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबींवर खर्च करण्याची तरतुद नाही. तसेच नियम क्रमांक 153 (3) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे कामे करून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता यांची आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. व कामांचे ट्रायलपीट व सर्वेक्षणानुसार अंदाजपत्रके तयार केल्याचे दिसून येत नाही.

**3.344 पिंपळवंडी (कालेकरवाडी), तालुका जुन्नर, जिल्हा पुणे येथे साठवण सिमेंट बंधारा बांधणे कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदर कामावर रक्कम रूपये 12,04,080/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) काम मूळ मुदतीत पूर्ण होत नसलेने कार्यकारी अभियंता, छोटेपाटबंधारे विभाग यांचे ग्रामपंचायत पिंपळवंडी यांना दिलेली नोटीस क्रमांक 441, दिनांक 27/05/2015 अन्वये दिनांक 27/05/2015 अन्वये 75 टक्के काम पुर्ण करणे आवश्यक असताना दिनांक 27/05/2015 पर्यत उपअभियंता आंबेगाव यांनी केलेल्या सर्वेनुसार /

प्रत्यक्ष तपासणी नुसार कामास सुरवात नसलेचे नमूद केले आहे. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक 682, दिनांक 25/08/2015 अन्वये दिलेली प्रशासकीय मान्यता व निविदा रद्द करणेत आली आहे.

तथापि, उपअभियंता आंबेगाव यांनी कार्यकारी अभियंता छोटेपाटबंधारे विभाग यांनी काम रद्द केले असुनही ग्रामपंचायतीने दिनांक 02/07/2015 रोजी काम सुरु करुन दिनांक 28/08/2015 रोजी पुर्ण केलेचे दिनांक 03/09/2015 चे पत्रान्वये कळविले आहे. त्याअनुषंगाने ग्रामपंचायतीने जर दिनांक 02/07/2015 रोजी काम सुरु केले होते, तर तेव्हाच का कळविले नाही? याचाच अर्थ सदरचे काम दिनांक 25/08/2015 नंतर दंडात्मक कार्यवाही होवू नये, म्हणून दिनांक 03/09/2015 पर्यंत 08 दिवसात पूर्ण केले आहे. त्यामुळे 12 महिन्यांची मुदत असणारे काम एवढे कमी कालावधीत पुर्ण करण्यात आले आहे. कामाचा दर्जा व केलेले काम योग्य असलेबाबत कार्यकारी अभियंता यांचा लाभधारक ग्रामस्थांचा / शेतकरी यांचा सविस्तर अहवाल उपलब्ध झाला नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/ कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर या खाती 1 टक्के उपकाराची रक्कम रुपये 12,040/- वसूल करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 11,866/- वसूल केलेली आहे. तरी कमी वसूल रक्कम रुपये 174/- संबधीतांकडून वसूल करून शासन खाती भरणा करावी.

3) महाराष्ट्र शासन, बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2008/प्र.क्र.85, दिनांक 11/06/2004 अन्वये मूळ अंदाजपत्रक हे काळजीपूर्वक वस्तुनिष्ठ परिस्थितीवर करणे आवश्यक आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

निविदा शर्त क्रमांक 14 व 15, 38 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114, 118, 120 व 152 (2) अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरू नये. तसेच एखाद्या बाबीतील तरतूदीमध्ये 25टक्के पेक्षा जास्त वाढ होत असेल किंवा खर्चात 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्या कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही झालेली नाही. सदरबाबत सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेता रक्कम रुपये 1,26,900/- खर्च करणेत आलेला आहे.

4) उपरोक्त प्रमाणे माती, मऊ मुरुम, कठिण मुरुम व मउ खडक यांचे खोदाईचे काम कमी केले आहे. त्यामुळे साठवण बंधाराची पाणी साठविण्याची क्षमता कमी झालेची दिसून येते व सदर कामाचा मूळ उद्देश लाभार्थी शेतक-यांना सिंचन व लागवडीसाठी जास्तीत जास्त पाणी देणे ओलीताखालील क्षेत्र वाढविणे हा सफल होत नाही. उपरोक्त मुद्दा क्रमांक 1 प्रमाणे काम कमी कालावधीत अंदाजपत्रकाप्रमाणे खोदाईचे संपुर्ण काम न करताच केले आहे. तसेच बाब क्रमांक 6 वरील काम न केलेने कामाचा दर्जा व काम मजबूत भक्कम झालेची पडताळणी करता आली नाही.

वरीलप्रमाणे तसेच इतर बाबींवर अंदाजपत्रकापेक्षा रक्कम रुपये 1,09,470/- कमी खर्च केलेला आहे व सदरची बचत उपरोक्तप्रमाणे इतर ठिकाणी वापरण्यात आली आहे.

5) खोदाईमधून 32 CUM माती, 39 CUM HM, 255 CUM SOFT ROCK, 60 CUM HARD ROCK निघाले आहे. तथापि, सदर बाबींचा कोठेही वापर न करता बांधकामासाठी साहित्य बाहेरुन आणले आहे. खोदकामातील साहित्य वापरण्यात आलेले नाही. तसेच साहीत्य वापरणेयोग्य नसलेचा शेरा मोजमाप नोंदवहीत नोंदविण्यात आलेला नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट 1099/प्र.क. 56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये शासकिय प्रयोगशाळेतून साहित्याची तपासणी सदरचे काम सुरु करणेपूर्वी अथवा सदरचे साहित्य वापरणेपूर्वी करणे आवश्यक आहे. तथापि, M 10 बाबतचा तपासणी अहवाल हा दिनांक 28/09/2015 रोजीचा म्हणजे काम पुर्ण दिनांक 25/08/2015 नंतरचा आहे. तसेच कामात वापरलेले परिमाण हे M 15 आहे.

7) बंधारा हा त्यात पाणी साठलेवर ते पाणी गळती (लिकेज) होत नाही, याबाबतचा कार्यकारी अभियंता, छोटेपाटबंधारे विभाग, पुणे यांचा सविस्तर स्वतंत्र टेस्टींग रिपोर्ट हा नस्तीसोबत उपलब्ध झाला नाही. तरीही कपात करुन ठेवण्यात आलेली 10 टक्के टेस्टींग चार्जेसची रक्कम फक्त देयकावर No objection to release the

deposit असा शेरा देवून सुरक्षा अनामत अदा करण्यात आलेली आहे. तथापि, याबाबत सदरची चाचणी कधी घेण्यात आली? त्याचा निरिक्षण तपासणी अहवाल घेणे आवश्यक आहे. केलेले काम योग्य झाले असलेबाबत व सदर योजनेचा लाभ शेतकरी व ग्रामस्तांना होत असलेबाबत लाभार्थी गावांचा जिल्हास्तरावर छोटेपाटबंधारे विभागाने केलेल्या कामांबाबतचा अहवाल घेणे आवश्यक आहे.

**3.345 विठ्ठलवाडी (कळस) येथे सिमेंट काँक्रीट बंधारा बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.तालुका इंदापुर.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदर कामावर रक्कम रूपये 18,52,580/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ठेकेदाराचा मुदतवाढीबाबतचा अर्ज दिनांक 11/10/2015 आहे. काम पुर्ण झालेनंतर अर्ज सादर करण्यात आला. जि.प./छो.पा.वी./875, दिनांक 03/11/2015 अन्वये नाममात्र दंड रुपये 884/- ने मुदतवाढ देण्यात आली. निविदेतील अटी व शर्ती क्रमांक 2 अनुसार जास्तीत जास्त 1 टक्के ते 10 टक्के पर्यंत दंड वसूल करणेच्या तरतूदीनुसार रूपये 18,525/- एवढी रक्कम वसूल करणे आवश्यक असताना नाममात्र दंड रुपये 884/- आकारण्यात आल्याने उर्वरित दंडाची रक्कम रुपये 17,641/- संबंधीतांकडून वसूल करून जिल्हा परिषद निधीमध्ये भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झोडपी 2009/ प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार करारनामा हा अंदाजपत्रकीय रक्कम विचारात घेऊन रूपये 1,100/- च्या मुद्रांकावर करणे आवश्यक होते. तो रूपये 900/-चे मुल्य मुद्रांकावर करण्यात आलेला आहे. मुद्रांक शुल्काचे रूपये 200/- वसूल करणे आवश्यक आहे.

3) विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनि 2307/जिप/सातारा/विमा संकीर्ण अभि 2, दिनांक 16/11/2007 जिल्हा परिषद, पुणे बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक जिप/बां/प्र.क्र.793, दिनांक 25/03/2011 नुसार देयकामधून 1 टक्के रक्कम रुपये 18,525/- वसूल करणे आवश्यक असताना देयकमधून रक्कम रूपये 849/- कमी वसूल करणेत आलेले आहेत. तरी सदरची रक्कम संबधीतांकडून वसूल करून विमा कंपनीकडे भरणा करावी व विमा प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र./108/ कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर या खाती 1 टक्के उपकाराची रक्कम रुपये 18,525/- वसूल करणे आवश्यक असताना देयकमधून रक्कम रुपये 849/- कमी वसूल केलेले आहेत. तरी कमी वसूल रक्कम रुपये संबंधीतांकडून वसूल करून शासन खाती भरणा करावी.

5) पाणी वापर सहकारी संस्था तयार केलेचे प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 147 नुसार मंजुर करण्यात आलेल्या कामाचा प्रत्येक करारनामा नमुना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 67 (1) नुसार प्रगतीची नोंदवही प्रपत्र 23 मध्ये ठेवलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिप/सन2000/ प्र.क्र.180/परा.8, दिनांक 31/12/2009 व निविदा शर्त क्रमांक 20 नुसार दोषदायित्वाकरीता सुरक्षा अनामत घेण्यात येते. ती घेतल्याचे नस्तीतील अभिलेख्यात आढळून आलेली नाही.

**3.346 नादकुंड, कोल्हापूर बंधारा तालुका भोर कामाचे अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 26) -** सदर कामावर रक्कम रूपये 36,11,486/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रकल्प हा मौजे नांद या गावाजवळील नाल्याचे मधील परिसरात आहे. प्रस्तावित असुन पावसाळ्यात पावसाचे पाणी साठवून उन्हाळ्यात त्याचा वापर करणे हा आहे. सदरचा प्रकल्प हा पूर्णपणे 50 टक्के

मान्सून पावसावर अवलंबुन आहे. त्याअनुषंगाने Rainfall figure चा तक्ता जोडण्यात आला आहे. तो सन 2005 पर्यंत पडलेल्या पावसाचा असुन सदरचे काम सन 2014-2015 मधील आहे. मधल्या 12 वर्षातील तक्ता जोडलेला नाही. तसेच साठवण बंधारासाठीची जागा शासकीय / जिल्हापरिषद / ग्रामपंचायतीचे / खाजगी कोणाचे मालकीची आहे. याबाबत 7/12 बक्षीसपत्र अथवा मालकीबाबतची कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

2) सदरचे काम हे श्री.संदीप सोनबा जागडे यांना 5 टक्के जादा दराने देण्यात आले आहे. तथापि, त्यांचे बांधकाम विभागाकडील नोंदणीप्रमाणपत्र तपासता त्याची मुदत दिनांक 04/09/2013 पर्यंत आहे. तद्नंतर, नुतनीकरणाची कागदपत्रे नस्तीस उपलब्ध झाली नाही. तथापि, कामाचा कालावधी तद्नंतरचा आहे. उपरोक्त तक्त्यात नमूद माहीतीप्रमाणे ई-निविदा प्रकिया राबविण्यात आली आहे. तथापि, त्याबाबत कोणत्या राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहीरात दिली? याबाबतचे जाहीरातीचे कात्रण उपलब्ध झाले नाही. ई-पोर्टल विकसीत करण्यात आलेचे दिसून येत नाही.

3) लघु पाटबंधारे विभाग नियम पुस्तिकेमधील भाग नंबर 7 नियम क्रमांक 8.6 (4) नुसार हार्ड रॉकमध्ये 0.60 mt. पेक्षा जास्त खोदकाम करणेचे नसताना देखील वरील कामामध्ये हार्ड रॉक मध्ये 0.60 पेक्षा जादा खोदाई केल्याचे मोजमाप पुस्तक क्रमांक 910 पान क्र.10 वर घेतलेल्या नोंदींवरून दिसून येते. सदर खोदाई आवश्यक असलेबाबत मोजमाप नोंदवहीत कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष तपासणी अंती शेरा मारलेला नाही. खोदाईची रक्कम रूपये 11440.45/- वसूल करावी.

4) सदर विकास कामात स्टील व मुरुम ह्या चाचण्या मानकांप्रमाणे आवश्यक आहेत. तथापि, सदरची चाचणी केलेली नाही. सिमेंट M 10 ची तपासणी काम पूर्ण झालेवर दिनांक 08/01/2014 ला करण्यात आली आहे. तसेच कामावर सिमेंट कॉंक्रीट ग्रेड M15 वापरलेचे नमूद आहे. तथापि, साहित्य तपासणी ही M 10 ची आहे.

5) निविदा शर्त क्रमांक 14 व 15 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114, 118, 120 व 152 (2) अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरू नये. तसेच एखाद्या बाबीतील तरतूदीमध्ये 25 टक्के पेक्षा जास्त वाढ होत असेल किंवा खर्चात रूपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्या कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते. सदरबाबत सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेतलेने रक्कम रूपये 3,65,113/- जादा खर्च केलेला आहे.

6) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/ कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर या खाती 1 टक्के उपकाराची रक्कम रुपये 36,114/- वसूल करणे आवश्यक असताना देयकमधून रक्कम रुपये 672/- कमी वसूल केलेले आहेत. तरी कमी वसूल रक्कम रुपये संबंधीतांकडून वसूल करून शासन खाती भरणा करावी.

7) अधिसूचना क्रमांक जेओ (एचक्यु)/व्हीएटी/2005/97, दिनांक 04/04/2012 नुसार दिनांक 01/04/2012 पासून मूल्यवर्धित कर 5 टक्के वसूल करणे बंधनकारक आहे. तथापि, सदर ठेकेदाराचे एमव्हॅट नोंदणीबाबत प्रमाणपत्र उपलबध नाही. तरी कमी कपात रक्कम रूपये 1,08,345/- शासनास भरणा करुन चलन दाखविणेत यावे.

8) बंधारा हा त्यात पाणी साठलेवर ते पाणी गळती (लिकेज) होत नाही, याबाबतचा कार्यकारी अभियंता, छोटेपाटबंधारे विभाग, पुणे यांचा सविस्तर स्वतंत्र टेस्टींग रिपोर्ट हा नस्तीसोबत उपलब्ध झाला नाही. तरीही कपात करून ठेवण्यात आलेली 10 टक्के टेस्टींग चार्जेसची रक्कम फक्त देयकावर No objection to release the deposit असा शेरा देऊन अदा करण्यात आलेली आहे.

**3.347 पाझर तलाव दुरुस्ती कौठडी, तालुका दौंड कामाचे अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 49) -** सदर कामावर रक्कम रूपये 20,19,508/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रकल्प हा मौजे कोठडी जवळ असुन सदरचे काम हे अस्तित्वातील पाझर तलावाचे दुरुस्ती चे आहे. तथापि, मूळ प्रकल्प हा कोणत्या वर्षातील आहे? त्याचे बांधकाम कोणी केले आहे? कोणत्या वर्षात केले आहे?

नजीकचे काळातील असेल तर लगेचच दुरुस्ती का करावी लागत आहे? शासन अथवा जिल्हा परिषद यांचेकडून याबाबत कोणतीही माहीती अथवा कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. तसेच मूळ कामाचे स्वरुप कोणते आहे व सदयस्थितीत दुरुस्ती नेमकी कशाची व का करावयाची आहे? याबाबत सविस्तर वर्णन अंदाजपत्रकासोबत (Discription of work) जोडलेले नाही. सदरचा प्रकल्प हा पूर्णपणे 50 टक्के मान्सून पावसावर अवलंबुन आहे. त्याअनुषंगाने Rainfall figure चा तक्ता नजिकचे काळातील जोडण्यात आला नाही.

2) निविदा शर्त क्रमांक 14 व 15 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114, 118, 120 व 152 (2) अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरू नये. तसेच एखाद्या बाबीतील तरतूदीमध्ये 25 टक्के पेक्षा जास्त वाढ होत असेल किंवा खर्चात रूपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्या कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते.

3) तसेच सदर कामात आरसीसी वर्क CCM-15 (40 MSA) 7.50 CUM हे काम का करण्यात आले नाही? त्यामुळे काम टिकाउ, मजबुत व गुणवत्ता पूर्वक झालेबाबत व सदरचे काम करण्याची गरज नसलेबाबत उपअभियंता / कार्यकारी अभियंता यांचा तपासणी अहवाल अथवा निरिक्षण टिपणी उपलब्ध नाही.

4) केलेले काम योग्य झाले असलेबाबत व सदर योजनेचा लाभ शेतकरी व ग्रामस्तांना होत असलेबाबत लाभार्थी गावांचा जिल्हास्तरावर छोटेपाटबंधारे विभागाने केलेल्या कामांबाबतचा अहवाल घेणे आवश्यक आहे. बंधारा हा त्यात पाणी साठलेवर ते पाणी गळती (लिकेज) होत नाही. याबाबतचा कार्यकारी अभियंता, छोटेपाटबंधारे विभाग, पुणे यांचा सविस्तर स्वतंत्र टेस्टींग रिपोर्ट हा नस्तीसोबत उपलब्ध झाला नाही. तरीही कपात करुन ठेवण्यात आलेली 10 टक्के टेस्टींग चार्जेसची रक्कम फक्त देयकावर No objection to release the deposit असा शेरा देऊन अदा करण्यात आलेली आहे. तथापि, याबाबत सदरची चाचणी कधी घेण्यात आली? त्याचा स्वतंत्र निरिक्षण अहवाल जोडलेला नाही. पाणी वापर संस्था स्थापन केलेचे प्रमाणपत्र नाही.

**3.348 मौजे कुळकजाई (महादेव इंगळे शेत), तालुका माण, नविन साठवण बंधारा बांधणेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 21, दिनांक 11/12/2015 अन्वये रक्कम रुपये 9,62,205/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे अंदाजपत्रक पहावयास न मिळाल्याने अंदाजपत्रकानुसार काम झाले किंवा कसे? तसेच त्यानुसार रक्कम प्रदान करण्यात आली किंवा नाही? याची पडताळणी करता आली नाही.

2) मे.श्री. कन्स्ट्रक्शन्स, सातारा यांची 9.56 टक्के अंदाजपत्रकापेक्षा कमी दराची निविदा मंजुर करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 151(3) अनुसार कामाची स्विकारलेली निविदा मंजुर अंदाजपत्रकापेक्षा 10 टक्के किंवा रुपये 10,000/- यापैकी जी रक्कम जास्त असेल / पेक्षा कमी आहे, असे आढळून आले तर अंदाजाची नव्याने रचना करण्यात यावी व ते कार्यकारी अभियंत्यांकडून मंजुर करून घ्यावेत. अशी तरतूद आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास 2011/प्र.क्र.217/पंरा 4, दिनांक 15/11/2011 अनुसार कामाचा दर्जा व गुणवत्तेबाबत चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक असतांना तसे अहवाल घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत पडताळणी करता आलेली नाही.

4) सदर कामावर 318 घनमीटर इतके गौण खनिज वापरले आहे. सदर गौण खनिजाची रॉयल्टी रूपये 141.28 प्रती घनमीटरप्रमाणे रुपये 44,927/- एवढी वसुल करणे अपेक्षित होते. तथापि, प्रत्यक्षात रुपये 22,472/- वसुली करण्यात आलेली आहे. कमी आकारलेली रक्कम रुपये 22,455/- वसुल करुन शासनास भरणा करण्यात यावी व पुर्तता दाखवावी.

**3.349 मौजे सिध्देश्वर कुरोली (अटाळी क्षेत्र) साठवण बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 32, दिनांक 25/08/2015 अन्वये रक्कम रुपये 19,52,122/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री.बि.जी.इंगळे यांची 13.50 टक्के अंदाजपत्रकापेक्षा कमी दराची निविदा मंजुर करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 151(3) अनुसार कामाची स्विकारलेली निविदा मंजुर अंदाजपत्रकापेक्षा 10 टक्के किंवा रुपये 10,000/- यापैकी जी रक्कम जास्त असेल/ पेक्षा कमी आहे, असे आढळून आले तर अंदाजाची नव्याने रचना करण्यात यावी व सुधारीत अंदाजित खर्चाच्या 5 टक्के दराने खर्च अंर्तभूत करुन निम्न निविदा दराने नवीन संक्षिप्त अंदाज तयार करण्यात यावेत व ते कार्यकारी अभियंत्यांकडून मंजुर करुन घ्यावेत, अशी तरतूद आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) सदर कामावर 738 घनमीटर इतके गौण खनिज वापरले आहे. सदर गौण खनिजाची रॉयल्टी 141.28 प्रती घनमीटरप्रमाणे रुपये 1,82,110/- एवढी वसुल करणे अपेक्षित होते. तथापि, प्रत्यक्षात रुपये 52,175/- वसुली करण्यात आलेली आहे. कमी आकारलेली रक्कम रुपये 52,175/- वसुल करुन शासनास भरणा करण्यात यावी व पुर्तता दाखवावी.

3) अंतिम देयक पहाता ते दिनांक 05/06/2015 रोजी नोंदले असून बाब क्रमांक 5 ची नोंद कार्यकारी अभियंता यांनी दिनांक 21/05/2015 रोजी चेकिंग केल्याबाबत स्वाक्षरी केलेली आहे. नोंदणी केलेली नसतांना चेकिंग केल्याची विसंगती दिसून येते.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152, 153 (1) (2) नुसार कंत्राटदाराने मंजुर अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक आहे. त्यानुसार काम न करता परिमाणामध्ये वाढ अथवा बचत झाल्याचे दिसून आले.

निविदेतील अट क्रमांक 38 (1) व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 120 (2) अन्वये कामातील एखाद्या बाबीवरील बचत ही दुसऱ्या बाबीवर खर्च करता येत नाही. त्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.350 साठवण बंधारा दुरुस्ती लोहारे, तालुका वाई कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 16, दिनांक 05/06/2015 अन्वये रक्कम रुपये 11,26,812/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) देयकासोबत पाणी उपसा नोंदवहीनुसार दिनांक 23/03/2015 ते दिनांक 07/04/2015 कालावधीतील 80 तास पाणी उपसा केलेला असताना मोजमाप नोंदवही पान क्रमांक 35 वरील दिनांक 07/04/2015 अखेर 210 तास पाणी उपसण्याची नोंद घेतलेने 110 तासाचे प्रतीतास रूपये 210/- प्रमाणे रूपये 23,100/- चे अतिप्रदान झालेले असून सदर रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 138 नुसार निविदे संदर्भातील जाहिराती स्थानिक वृत्तपत्रात तसेच राज्यशासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करता केवळ ई-निविदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. त्यामुळे निविदेस व्यापक प्रसिध्दी मिळालेली नाही.

**3.351 मौजे गुरसाळे (शिवेचा मळा), तालुका खटाव येथे नवीन साठवण बंधारा बांधणेबाबत**.

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 27) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 39, दिनांक 22/09/2015 अन्वये रक्कम रुपये 15,85,441/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मे.अभियंता कन्स्ट्रक्शन्स, वडूज यांची 15.70 टक्के अंदाजपत्रकापेक्षा कमी दराची निविदा मंजुर करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 151 (3) अनुसार कामाची स्विकारलेली निविदा मंजुर अंदाजपत्रकापेक्षा 10 टक्के किंवा रुपये 10,000/- यापैकी जी रक्कम

जास्त असेल / पेक्षा कमी आहे, असे आढळून आले, तर अंदाजाची नव्याने रचना करण्यात यावी व ते कार्यकारी अभियंत्यांकडून मंजुर करुन घ्यावेत, अशी तरतूद आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) बाब क्रमांक 6 नुसार आरसीसी कामासाठी माईल्ड स्टील बाबतचा दर असून दरपृथ:करण करतांना डिएसआर प्रमाणे दर व प्रत्यक्ष दर पृथ्थकरणात नमूद स्टीलच्या दरामध्ये फरक आढळून आला.

दर पृथ्थकरणामध्ये चुकीचा दर घेतल्याने प्रति मे.टन रुपये 6,288.76/- प्रमाणे जादा आदाई झाली आहे. सदर कामावर 5.900 में. टन एवढे स्टील वापरले असल्याने प्रती मे. टन रुपये 6,288.76/- प्रमाणे रुपये 37,104/- जादा आदाई झाली असून ती वसुल करुन शासन भरणा करणे आवश्यक आहे.

3) अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 8 नुसार सदर कामाचे आरसीसीसाठी सिमेंट काँक्रीटच्या प्रती घनमीटर 10 किलो स्टील वापरणे आवश्यक होते. बाब क्रमांक 7 M-15 CC चे परिमाण 424.84 घनमीटर असून त्यासाठी 4.248 मे. टन एवढे स्टील आवश्यक आहे. तथापि, प्रत्यक्ष बाब क्रमांक 8 पहाता 5.900 मे. टन स्टील वापरले आहे. म्हणजेच 1.652 मे. टन जादा स्टीलचा वापर झाला आहे. त्यामुळे दर रुपये 56,210.70/- प्रती मे. टन प्रमाणे 1.652 मे. टनचे रुपये 92,860/- जादा आदाई करण्यात आलेली आहे. सदर रक्कम संबंधीतांकडून वसुली करुन दाखवावी.

4) कामाचा निविदा 15.70 टक्के कमी दराची मंजुर केली असल्याने कामाचा दर्जा व गुणवत्तेबाबत तडजोड न होणे आवश्यक आहे. त्यामुळे दर्जा योग्य असल्याचे प्रमाणीत करावे.

**3.352 कोल्हापूर पध्दतीचा बंधारा, कापूसखेड तालुका वाळवा, जिल्हा सांगली.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर कामासाठी जाहीर ई-निविदा सूचना क्रमांक 2 सन 2013-2014 प्रसिध्द करून प्राप्त 2 निविदांपैकी कमी दराची निविदा मे.गायत्री कन्स्ट्रक्शन, विटा, सांगली यांची वाटाघाटीने अंदाजपत्रकीय दराच्या 2.70 टक्के जादा दराने मंजुर करून सदर कामावर 3 प्रमाणकान्वये रक्कम रूपये 40,30,657/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाकरीता जाहीर निविदा प्रसिध्दीव्दारे फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त दोन निविदांची तुलनात्मक दरपत्रक करून त्यामधूनच कमी दराची निविदा वाटाघाटीने मंजुर केली आहे परंतु, तुलनात्मक दरपत्रकासाठी कमीत कमी तीन निविदा असणे आवश्यक आहे. तीन निविदा प्राप्त न झाल्यास फेर निविदा मागविणे गरजेचे होते. परंतु, प्रस्तुत प्रकरणी तसे केले नाही. प्राप्त दोन निविदांमधून कमी दराची निविदा मंजुर केल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नाही.

2) सदर कामाची निविदा आरएसआर सन 2011-2012 नुसार मूळ अंदाजीत रक्कमेवर 2.70 टक्के जादा दराने निविदा मंजुर केली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 139(3) नुसार 20 लक्ष ते 1 कोटी रूपये यामधील खर्चाच्या बांधकामासाठी 2 टक्के पर्यंत किंवा 1 लक्ष रूपये यातील आधिक असेल ती रक्कम मंजुर करता येते. त्याप्रमाणे कार्यवाही करणे संयुक्तीक होते. परंतु, प्रस्तुत प्रकरणी तसे न केल्याने एकूण बील रक्कम रूपये 40,30,647/- च्या 2.70 टक्के प्रमाणे रुपये 1,08,827/- इतक्या जादा दराने आदा केल्याने रक्कम रूपये 8,827/- चे नियमबाह्य अतिप्रदान झाले आहे.

3) सदर कामाचे बाब क्रमांक 6 माईल्ड स्टील आरसीसी वर्क चे काम 5.630 मेट्रिक टन केले आहे. त्यासाठी स्टील 10, 12, 16, 25, एमएम सरासरी दर रूपये 47,855/- घेवून दर रूपये 60,744.35/- प्रती मेट्रिक टन निश्चित करून मक्तेदारास रक्कम आदा केली आहे. परंतु, सदर बाबीचे दरपृथ:करण पत्रक पाहता सदर दरामध्ये Add 10 टक्के over heads रक्कम रूपये 4,785.50/- प्रती मेट्रिक टन वाढीव दर घेतलेला आहे. तसेच सदर दरामध्ये लेबर चार्जेसचा दर समाविष्ठ असताना अनावश्यक ओव्हर हेड चार्जेसचा दर रूपये 4,785.50/- घेतल्याने 5.630 मेट्रिक टन पोटी रक्कम रूपये 26,942/- चे अतीप्रदान झाले आहे.

4) सदर कामाचे रूपये 100/- च्या स्टॅंप पेपरवर करारपत्र करून घेतले आहे व कामाचे पहिल्या रनिंग बिलातून रूपये 6,361/- स्टॅंप डयुटी रक्कम म्हणून कपात केली आहे. परंतु, मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे

अनुच्छेद 63 प्रमाणे कार्य करारावर मुद्रांक शुल्क देय आहे. त्यामुळे सदर कामाचे देयकातून कपात केलेली रूपये 6,361/- मुद्रांक शुल्कची रक्कम भरणा करून पुर्तता करावी.

5) बंधा-याचे काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक 07/05/2003 च्या शासन परिपत्रकानुसार सदर बंधारा ग्रामपंचायत / जलसंधारण समितीकडे हस्तांतर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.353 सिमेंट नाला बंधारा वाळेखिंडी ग.नं. 114, तालुका जत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 16,30,785/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर सिमेंट नाला बंधारा कामास प्रशासकीय मंजुरी दिनांक 30/03/2013 रोजी मिळाली असताना, कामास कार्यारंभ आदेश दिनांक 28/01/2014 रोजी दिला आहे. इतक्या विलंबाने सिमेंट नाला बंधा-याचे काम सुरू केल्याने स्वीकृत निविदा रक्कमेत वाढ झाली आहे. त्यामुळे निविदा रक्कमेपेक्षा जादा खर्च रक्कम रूपये 1,85,464/- झाला आहे.

2) सदर कामाचे बाब क्रमांक 4 MS bar reinforcement of RCC work चे काम 2.00 मेट्रिक टन झाले आहे. त्यापोटी रक्कम रूपये 1,07,628/- इतका खर्च केला आहे. परंतु, महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलसं-2012/प्र.क्र.1/जल-7, दिनांक 12/11/2013 अन्वये सिमेंट नाला बांधाची कामे ही प्लेन सिमेंट काँक्रीट (पीसीसी) मध्येच करावीत, असे स्पष्ट आदेश असताना सिमेंट बंधाराचे काम आरसीसी मध्ये केलेले आहे. त्यामुळे सदर बाबीवरील खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) सदर कामाचे बाब क्रमांक 3 सीसी एम 15 चे काम 402.68 घनमीटरचे झाले आहे. परंतु, सदर बाबीचे परिमाणातून किवॉलचे परिमाण वजा करणे आवश्यक असता तसे केले नाही. तरी किवॉल परिमाणापोटीची रक्कम परिगणित करून वसुल करावी.

4) सदर कामाचे मोजमाप पुस्तक 858 पृष्ठ क्रमांक 160, 161 प्रमाणे soft strata खोदकाम 477.30 घनमीटर परिमाणाची रक्कम प्रथम देयकातून प्रदान केले असताना परत अंतिम देयकामध्ये 200 घनमीटर खोदकाम रक्कम प्रदान केली आहे. त्यामुळे प्रती घनमीटर रूपये 58.20 दराने रक्कम रूपये 11,240/- चे अतीप्रदान झाले आहे.

5) सदर कामाचे व्दितीय देयकातून विमाची रक्कम रूपये 566/- कपात केलेली नाही.

6) बंधा-याचे काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक 07/05/2003 च्या शासन परिपत्रकानुसार सदर बंधारा ग्रामपंचायत / जलसंधारण समितीकडे हस्तांतर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.354 आटपाडी (लोणारकी), तालुका आटपाडी येथे पाझर तलाव बांधणे.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 46,15,982/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे एकूण देयक रक्कम रूपये 46,15,982/- इतके असून 1 टक्के प्रमाणे कामगार उपकर रूपये 46,160/- इतका होत असताना रक्कम रूपये 7,040/- इतकाच उपकर कपात केलेला आहे. तरी आता उर्वरीत रक्कम रूपये 39,120/- कामगार उपकर रक्कम वसूल करावी.

2) सदर काम सुरू करणेचा कार्यारंभ आदेश दिनांक 26/07/2011 रोजीचा आहे. काम पूर्ण करणेची मुदत 18 महिने होती. मक्तेदारानसे काम मुदतीत पुर्ण केले नाही. मक्तेदाराने कामास विलंब झाल्याने व्दितीय मुदतवाढीचा मागणी अर्ज दिनांक 17/03/2016 रोजी केला आहे. उपअभियंता पंचायत समिती आटपाडी यांनी सदर व्दितीय मुदतवाढ मागणी अर्जाबाबत प्रतिकुल शिफारस केली आहे. मक्तेदारास कामाच्या होणा-या विलंबाबाबत तीन नोटीस दिलेल्या आहेत. मक्तेदाराने विहित मुदतीत मागणी अर्ज केला नाही. तसेच प्रथम मुदतवाढ विनादंड केली आहे. त्यामुळे दिनांक 01/04/2014 ते दिनांक 31/03/2016 अखेर मुदतबाहय कालावधी 730 दिवस प्रति दिन रूपये 25/- प्रमाणे एकूण दंडाची रक्कम रूपये 18,250/- वसुल करणे आवश्यक आहे.

3) सदर कामाचे बाब क्रमांक 1 झाडे झुडपे काढणे, तोडणे, स्वच्छ करणेचे परिमाण 6113.48 चौरस मीटर दर रूपये 1.25 प्रमाणे रूपये 7,641/- इतके बील आदा केले आहे. परंतु, एकदा मक्तेदारास कामाचा मक्ता मंजुर झाल्यानंतर त्या कामाच्या दोहातील झाडेझुडपे काढणे, येवू न देणे, साईट स्वच्छ ठेवणे याची जबाबदारी मक्तेदाराची असते. त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करणे संयुक्तीक नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्राविधो/2007/प्र.क्र.1/योजना दिनांक 08/05/2007 मधील 2.7 नुसार कामाची निविदा प्रसिध्द झालेस कार्यारंभ आदेश देतेवेळी 5 टक्के सुरक्षा अनामत रक्कम घेणे आवश्यक असता 4 टक्केप्रमाणे सुरक्षा अनामत घेणेत आलेली आहे.

5) बंधा-याचे काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक 07/05/2003 च्या शासन परिपत्रकानुसार सदर बंधारा ग्रामपंचायत / जलसंधारण समितीकडे हस्तांतर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 117 नुसार पूर्ण कामाची नोंद नमुना नंबर 69 घेऊन पुर्तता करावी.

**3.355 अपूर्ण कामाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 34) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लघु पाटबंधारे विभाग, स्थानिक स्तर, सांगली यांना लघुसिंचनाची कामे कार्यान्वीत करण्याकरीता जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून अनुदान वर्ग केले जाते. परिशिष्ट क्रमांक 1 मध्ये नमूद केलेप्रमाणे सन 2015-2016 मध्ये 9 पाझर तलाव व 11 कोल्हापूर पद्धतीचे बंधारे अशी एकूण 20 कामे दिनांक 31/03/2016 अखेर अपुर्ण आहेत. ती विहित मुदतीत पुर्ण झालेली नाहीत. तसेच सदर अपुर्ण कामावर आजअखेर एकूण रुपये 660.60 लाख इतका निधी गुंतुन पडलेला आहे. सदर कामांना जेवढा विलंब होईल त्यामुळे भाव दरवाढ रक्कम जास्त प्रमाणावर द्यावी लागणार आहे. प्रशासकीय मंजुर रक्कमेत कामे पुर्ण होणार नाहीत. तरी याबाबत वेळीच कामे पुर्ण होण्याच्या दृष्टीने पुढील आर्थिक वर्षात प्राधान्याने आर्थिक तरतूद करुन कामे पुर्ण करावीत.

2) लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, सांगली प्राप्त अनुदानातून परिशिष्ट क्रमांक 1 मध्ये नमूद पाझर तलाव व सिमेंट बंधा-याची 49 व कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-याची 10, देखभाल दुरुस्ती कामे 10, वेस्टर्न कोल फिल्ड इंडिया ltd नागपूर अर्थ सहाय्यीत बंधारे दुरुस्ती 2, जलयुक्त शिवार अभियान कामे 65, अग्रणी नदी पुर्नवजीवन सिमेंट बंधारे 11 व स्वीय निधी देखभाल व दुरूस्ती 1 अशी एकूण 109 कामे दिनांक 31/03/2016 अखेर अपुर्ण आहेत. ती विहित मुदतीत पुर्ण झालेली नाहीत. तसेच सदर अपुर्ण कामावर आजअखेर एकूण रुपये 1,909.87/- लाख इतका निधी गुंतुन पडलेला आहे. सदर कामांना जेवढा विलंब होईल. त्यामुळे भाव दरवाढ रक्कम जास्त प्रमाणावर द्यावी लागणार आहे. प्रशासकीय मंजुर रकमेत कामे पुर्ण होणार नाहीत. तरी याबाबत वेळीच कामे पुर्ण होण्याच्या दृष्टीने पुढील आर्थिक वर्षात प्राधान्याने आर्थिक तरतूद करुन कामे पुर्ण करावीत.

**3.356 पाझर तलाव होसूर तालुका चंदगड बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 38,58,473/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची ई-निविदा दिनांक 21/12/2013 ते 04/01/2014 या कालावधीत खुली करण्यात आली होती. त्यास अनुसरून खालील प्रमाणे ई-निविदा दर प्राप्त झाले आहेत.

अशोक एम चौगले यांचे सर्वात कमीचे दर असल्याने त्यांची निविदा मंजुरी करता विचारात घेऊन सहायक अभियंता यांचे पत्र क्रमांक प्रशा 5/निविदा/128/2014, दिनांक 08/01/2014 अन्वये वाटाघाटीने निविदा दर कमी करण्यास श्री.अशोक चौगले यांना कळवून वाटाघाटीकरिता बोलावले आहे. तथापि प्रत्यक्षात प्राप्त निविदा दर ऑन लाईन प्रत सादर केलेली नाही. त्यामुळे प्राप्त दाराची सत्यता प्रमाणित करता येत नाही.

2) सर्वात कमीचे दर दिलेले निविदाधारक श्री.चौगले यांनी दिनांक 24/01/2014 च्या पत्रान्वये 28 टक्के ऐवजी 24 टक्के जादा दराने सदर काम करणेस तयार असल्याचे कळविले असून अधिक्षक अभियंता, पुणे यांनी

मक्तेदाराशी केलेल्या तडजोडी प्रमाणे सहायक अधिक्षक अभियंता, पुणे यांचे पत्र क्रमांक प्रशा-5/निविदा/ 718/2014, दिनांक 11/02/2014 प्रमाणे मक्तेदार अंदाजपत्रक दराने सदर काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे व त्याप्रमाणे कामाचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि अधिक्षक अभियंता यांच्यासोबत झालेल्या दर तडजोडी सभा इतिवृत्त उपलब्ध झाले नाही.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका नियम 150 प्रमाणे प्राप्त निविदा 10 टक्के पेक्षा जादा दराची असल्यास अंदाजपत्रकाची पुर्नमांडणी करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी 28 टक्के इतके जादा दर प्राप्त झाले असताना अंदाजपत्रक पुर्नमांडणी करून नवीन निविदा मागणी करण्याची कार्यवाही करणे आवश्यक होते, तसे न करता दर कमी करण्याबाबत तडजोड करण्यात आली आहे. तथापि दर कमी करताना त्याची कारणमीमांसा करण्यात आली नाही.

4) सदर तलावाकरिता केलेल्या भूसंपादनाचा अहवाल सादर केलेला नाही. कामास अधिक्षक अभियंता यांनी पत्र क्रमांक प्रशा 5/मुदतवाढ/623/2016, दिनांक 15/02/2016 अन्वये कामास प्रथम मुदतवाढ दिनांक 30/06/2017 पर्यंत दिली असून त्यात भूसंपादन कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्यास सूचित केले आहे. सबब शासन निर्णय क्रमांक भूसंपादन-2003/355/2003/मोप्र 2, दिनांक 17/10/2003 प्रमाणे भूसंपादन कार्यवाही पूर्ण न करता काम सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. सबब कामास विलंब होऊन परिणामी कामाची किंमत वाढ झाली व योजनेपासून मिळणारे फायदे मिळण्यास उशीर होत आहे. त्यामुळे योजना नियोजित वेळेत फलद्रूप झाली नाही.

5) अंदाजपत्रकीय तरतुदी पेक्षा कामात 125 टक्के इतकी वाढ झाल्याने वाढीव रक्कम रूपये 48,39,717/- रक्कमेस मुख्य अभियंता यांनी दिनांक 03/03/2016 च्या पत्रान्वये निविदा शर्त 38 प्रमाणे जादा खर्चास मंजुरी दिली आहे. परंतु सदर अतिरिक्त दायित्वाचा सुधारित प्रशासकीय मंजुरी प्रस्तावात समावेश करून त्यास जिल्हा परिषदेची सुधारित प्रशासकीय मंजुरी घेण्यात आलेली नाही.

6) तलावाच्या माती कामाच्या घनिकारणाचा गुणनियंत्रक यांचा प्रयोगशाळा चाचणी अहवाल सादर केलेला नाही.

7) सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका 271 अन्वये पावसाळ्यापूर्वी काम सुरक्षित करून पावसामुळे तलावाच्या कोणत्याही भागास नुकसान पोचणार नाही अशी कार्यवाही अपेक्षित आहे. तथापि सदर प्रकरणी असे नियोजन झालेले दिसून येत नाही. सबब काम तात्काळ पूर्ण करणे आवश्यक आहे.

**3.357 पाझर तलाव नागरदळे, तालुका चंदगड, जिल्हा कोल्हापूर क्रमांक 2 चे बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 84,00,558/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाझर तलाव नागरदळे क्रमांक 2, तालुका चंदगड या योजनेच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील नोंदवही क्रमांक 40 सन 2012 नुसार व आदेश जावक क्रमांक मुअ/प्रशा-6/5279, दिनांक 15/10/2011 अन्वये रक्कम रुपये 78,95,461/- इतक्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानंतर या योजनेस जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील ठराव क्रमांक 45, दिनांक 03/05/2012 नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

निविदा मागविताना शासनाच्या प्रचलित नियमानुसार रितसर निविदा मागविण्यात येवून श्री.अशोक महादेव चौगले, सोनाळी, तालुका कागल या ठेकेदाराचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.45 टक्के इतक्या जादा दराचे निविदा प्राप्त निविदेतील कमीतकमी दराचे निश्चित करुन निविदा क्रमांक ब-1/अअ/19/सन 2012-13 अन्वये स्विकृत करण्यात आले. या कामाची निविदा रक्कम रुपये 81,78,610/- इतकी आहे. त्यानंतर या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक 16/11/2012 रोजी देणेत आले.

परंतू वरील प्रमाणे प्राप्त निविदेतील कमीतकमी दराची 15.45 जादा दराचे निविदा स्विकृती पूर्वी 10 टक्के पेक्षा जादा दराची निविदा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114 नुसार व 115,116,118,119 प्रमाणे मुळअंदाजपत्राका पेक्षा 10 टक्के पेक्षा जादा होणा-या मुळ अंदाजपत्रकिय रक्कमेत वाढ

होत असलेने सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यास प्रशासकिय व तांत्रिक मान्यता घेवून निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित निविदा स्विकृती नियमानुसार वरील प्रमाणे फेरनिविदा काढून निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते.

2) निविदा 15.45 टक्के जादा दराची निविदा स्विकृत केल्यामुळे सन 2011-12 च्या DSR नुसार 4.848 टक्के जादा दराने निविदा स्विकृत केल्यामुळे रुपये 3,43,438/- एवढ्या जादा दराने निविदा स्विकृत केल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे.

3) सदर कामाच्या अंदाज पत्रकाच्या अवलोकन करता या कामावरील गौण खनिजावरील स्वामित्वधना पोटी 43,011 घ.मी. रक्कम रुपये 30,44,086/- एवढी रक्कम शासनास मंजूर रक्कमेतून शासनास महसूला पोटी भरणाकरणे अपेक्षित होते. त्यानुसार सदर प्रकल्पाच्या मंजूर निधीपैकी 30 ते 35 टक्के रक्कम शासनास भरावी लागत असल्याने सदर कामाचा प्रकल्पखर्च हा पोकळ दिसून येतो. त्यामुळे प्रत्यक्षात खर्च होणारा निधी हा प्रकल्पाच्या एकूण मंजूर निधी 65 ते 70 टक्के एवढा निधी खर्च पडतो. त्यामुळे प्रकल्पावर होणा-या खर्चाचा स्वामित्वधना पोटी होणारा खर्च फक्त पाझर तलाव बांधकामासाठी सुट मिळणेबाबत जलसंधारण विभागाकडून विभागीय आयुक्तामार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठवून कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रकल्प खर्चामध्ये संभाव्य बचत होवून प्राप्त होणार संपूर्ण निधी पाझर तलाव बांधकामासाठी विनियोग होवू शकेल.

4) सदर प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या तांत्रिक मान्यता आदेशानुसार या योजनेखाली संबधीत ग्रामपंचायतीने पाणी वापर संस्था स्थापन करणे बंधनकारक असल्याने तशी संस्था स्थापन केलेबाबतच्या पृष्ठर्थ कोणतेही लेखे पडताळण्यास उपलब्ध झाले नसल्याने पाणी वापर संस्था स्थापन केल्याचे खात्री करता आलेली नाही.

5) सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणारी भूसंपादनासाठी गट नं.706 व 668 मध्ये भूसंपादनासाठी मोजणीबाबत भूमीअभिलेख कार्यालयाकडून मोजणी रजिस्टर नंबर 334/13/283 दिनांक 27/12/2013 नुसार भूमापन गट नं.668 मध्ये 97.15 आर व 706 गट नं. मध्ये 1 हे 98.01 आर असे एकूण 2.95.16 हेक्टर जमीन मोजणी करुन घेणेत आले. सदर जमीनीचे कब्जेदार ग्रामपंचायतीच्या नांवे आहे. त्याप्रमाणे 7/12 उता-यावर नोंद आहे. परंतू भूसंपादना नंतर शासनाच्या / जिल्हा परिषद यांचे नांवे अधिग्रहित करुन भूसंपादन झाले बाबतचे नोंद उता-यावर नसल्याने कार्यवाही पूर्ण झालेली नाही. असे दिसून येते. तरी याबाबत तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तसेच सदर पाझर तलावाचे सांडवा पुच्छ कालव्याचा काहीभाग खाजगी जमिनीत येत असल्याने सदरबाबत भूसंपादनाबाबत काय कार्यवाही केली या बाबत स्पष्टता दिसून येत नाही. या खाजगी जमिनीचे भूसंपादन होणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रकल्पाचे कामास सुरुवात भूसंपादनापूर्वीच केल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रकल्प बांधकामध्ये विलंब होणेची शक्यता नाकारता येत नाही. सदर अनियमितेबाबत गंभिरतेने दखल घेवून कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

6) सदर पाझर तलाव बांधकामाचा नियत बांधकाम पूर्ण करणेचा कालावधी 24 महिनेचा असल्याने सदर कालावधीत बांधकाम पूर्ण होवू शकलेले नाही. त्यामुळे मुदतवाढ देण्यासाठी कंत्राटदाराने विहित कालावधीत मुदतवाढीचा प्रस्ताव निविदा अट-2 प्रमाणे अर्ज सादर करणे आवश्यक असता तशी कार्यवाही झाली नसल्याने संबंधीत कंत्रादारावर 1 टक्के प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तसेच सदर प्रकल्प मार्च 2016 अखेर प्रगती पथावर असल्याने कंत्रादारास मुदतवाढ मंजूर करताना दंडात्मक कारवाई करुन भाव दरवाढ अनुज्ञेय राहाणार नाही. कारण सदर प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण झालेला नाही.

7) प्रशासकीय मान्यतेतील अटी नसुार ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक नागरी 2011/प्र.क्र.192/निधी जल 5, दिनांक 02/02/2012 अन्वये तरतूदीचे पालन सादर योजनेमध्ये करणे आवश्यक आहे या बाबत प्रमाणित करुन पूर्तता सादर करणे आवश्यक आहे.

8) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमाक ग्रापकं/109/ प्र.क्र.10/पापु 7, दिनांक 11/12/1997 अन्वये वापरलेल्या साहित्याचा मान्यताप्राप्त संस्थेकडे चाचणी अहवाल घेणे आवश्यक

असता तसे कार्यवाही केल्याचे लेखे पडताळणीस उपलब्ध झाले नाहीत. तरी संबधीत पाझर तलावामध्ये वापरणेत अलेली माती, मुरुम योग्य दर्जाचे असल्याचे सादर खात्री पटवावी.

9) कामाचे ठिकाणी संबंधीत प्रकल्पाचे सविस्तर माहिती व दोषदायित्व इत्यादी बाबतचे माहिती फलक महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक व्हिपी-1099/सीआर/54/03, दिनांक20/05/2000 नुसार व सार्वजनिक बांधकाम खात्याच्या नियमावली नुसार माहिती फलक लावणे आवश्यक आहे.

10) पाझर तलावाचे काम पूर्ण झाल्यावर तांत्रिक मंजूरीतील अट क्रमांक 4 मध्ये नमूद केलेप्रमाणे दिनांक 07/05/2003 च्या शासन च्या शासन परिपत्रकानुसार सदर पाझर तलावाचे देखभाल व दुरुस्तीसाठी ग्रामपंचायतीकडे / जिल्हा परिषदेकडे नियमानुसार हस्तांतरीत करणेबाबत सहाय्यक अधिक्षक अभियंता, लघुपाटबंधरे (स्था.स्तर) मंडळ पुणे 6 चे पत्र प्रशा-5 नागरदळे क्रमांक 2/1480/सन 2010, दिनांक 07/06/2010 अन्वये कार्यवाही केल्याचे पुर्ततेसह अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

**3.358 मौजे बॅगेहळळी येथील सिमेंट बंधारा गाळ काढणे / नाला सरळीकरण व खोलीकरण करणे.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,88,367/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 20 प्रमाणे काम 20 टक्के जादा करावयाचे आहे. सदरचे काम निविदा किंमत रुपये 4,88,367/- चे 20 टक्के जादा सहित रुपये 5,86,040/- इतक्या मुल्यांचे करणे बंधनकारक असतांना ते रुपये 4,88,367/- इतकेच केले आहे. कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 20 प्रमाणे 20 टक्के जादा काम केलेले नाही. त्यामुळे त्यांना रुपये 4,88,367/- इतके मुल्य देयक ठरत नाही. तरी रुपये 4,88,367/- चे 20 टक्के रुपये 97,673/- इतके कामाच्या मुल्यांकनातून कपात करुन रुपये 3,90,693/- इतके प्रदान करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केले नाही. त्यामुळे ठेकेदारास रुपये 97,673/- चे जादा प्रदान झाले आहे. त्याची वसुली करण्यात यावी. रुपये 97,673/- चा खर्च लेखापरिक्षणांत अंतिम अमान्य करण्यांत येत आहे.

2) देयक रुपये 4,88,367/- मधून आयकर रुपये 9,767/- (2 टक्के) कपात केले नाही. तरी आता आयकर रुपये 9,767/- वसुल करुन शासनखाती जमा करुन अनुपालन करावे.

**3.359 मौजे शिंगोर्णी येथील सिमेंट बंधारा गाळ काढणे, नाला खोलीकरण, सरळीकरण करणे.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 33) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,91,880/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 12 व 13 नुसार देयकांतून उपकर व विमा 1 टक्के प्रमाणे निविदेच्या रक्कमेनुसार (रुपये 6,13,463/-) कपात करणे बंधनकारक असतांना कामांवरील खर्च रक्कमेतून केले आहे. या कामांवरील खर्च रुपये 3,91,880/- आहे. तर कामाचे निविदा रक्कम रुपये 6,13,463/- इतके आहे. विमा व उपकर निविदा रक्कमेवर प्रत्येकी रुपये 6,135/- इतके कपात करणे आवश्यक असतांना ते रुपये 3,919/- प्रत्येकी कपात केले आहे. त्यामुळे उपकर व विमा प्रत्येकी रुपये 2,216/- कमी कपात झाले आहे. कमी कपात रक्कम रुपये 4,432/- (2,216*2) वसुलात आणून शासनखाती जमा करुन अनुपालन करावे.

2) सदर कामाचे अंदापजत्रकानुसार नाला खोलीकरण व सरळीकरण खोदाईच्या कामांतून प्राप्त माती, मुरुमाचे परिमाणापैकी किमान 90 टक्के परिमाण guide bund साठी व conveying and disposing material साठी वापरणे बंधनकारक आहे. खोदाईतून प्राप्त 9677 घ.मी. माती / मुरुम पैकी 90 टक्के परिमाण 8709 घ.मी. वरील दोन कामांसाठी वापरणे आवश्यक होते. परंतु, फक्त 6745 घ.मी. (guide bund साठी 2600 घ.मी. व conveying and disposing material साठी 4145 घ.मी.) वापरले आहे. त्यामुळे नाला खोदाई / गाळ काढणे कामांतील 1964 घ.मी. (8,709-6,745) माती मुरुम नाल्यामध्येच राहिले आहे. त्यामुळे खोदाईचे काम समाधानकारक झालेले नाही. त्यामुळे 1964 घ.मी. चे conveying and disposing material चे दर रुपये 39/- प्रमाणे एकूण रुपये 76,596/- संबंधीत ठेकेदारांकडून वसुल करण्यात यावे.

3) कामाचे कार्यरंभ आदेशातील तरतूदीनुसार ठेकेदाराने किमान 20 टक्के जादा करण्याचे असतांना जादा काम केले नाही, म्हणून देयकांतून रुपये 13,664/- कपात करुन अनामत सदरी जमा केले आहे. ठेकेदाराने रुपये 13,664/- चे काम केले असल्याने कामाचे मुल्यांकनात वजा करुन उर्वरीत रक्कम कामांवर खर्च नोंदविणे आवश्यक होते. तथापि, असे न करता 20 टक्के लोकसहभाग म्हणून कपात केल्याने कामांवर रुपये 13,664/- जादा खर्च झाले आहे. जादा रुपये 13,664/- खर्च लेखापरिक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे. सदर रक्कम शासनखाती जमा करुन अनुपालन करावे.

**3.360 नाला खोलीकरण व सरळीकरण, व गाळ काढणे कामांवर जादा खर्च नोंदवून अनामत सदरी रक्कम जमा केलेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 49) -** तपासणी सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणांवेळी लघु पाटबंधारे विभागाकडील सन 2015-2016 मधील पूर्ण कामांची तपासणी केले असता, नाला सरळीकरण, खोलीकरण व गाळ काढणे कामांवर जादा खर्च नोंदवून त्या रक्कमा अनामत सदरी जमा केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखाशिर्ष 2702/5492 अंतर्गत नाला सरळीकरण, खोलीकरण व गाळ काढणेची कामे ठेकेदाराने अंदाजपत्रकापेक्षा किमान 20 टक्के जादा काम करणे बंधनकारक राहिल, अशी अट कार्यारंभ आदेशात नमुद केले होते. त्याप्रमाणे नाला सरळीकरण, खोलीकरण व गाळ काढणेची काम ठेकेदारांनी किमान 20 टक्के जादा केल्यानंतर त्यांना अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण रक्कमेचे प्रदान केले आहे. तथापि, जे ठेकेदारांनी नाला सरळीकरण, खोलीकरण व गाळ काढणेची काम अंदाजपत्रकापेक्षा 20 टक्के जादा काम करणार नाहीत, त्यांच्या देयकांतून (त्यांनी केलेल्या कामाच्या मुल्यांतून) 20 टक्के रक्कम कपात करुन देयक 20 टक्के कमी रक्कमेने देयक खर्च टाकणे आवश्यक होते. असे न करता ज्या ठेकेदारांनी नाला सरळीकरण, खोलीकरण व गाळ काढणे काम किमान 20 टक्के जादा केले नाहीत, मुल्यांकनाप्रमाणे देयक पारीत करुन त्यांत 20 टक्के रक्कम कपात करुन सदर रक्कम अनामत सदरी जमा केले आहे व कालांतराने या 20 टक्के कपात अनामत रक्कमा संबंधीत ठेकेदारांस नियमबाहयरित्या प्रदान करुन कार्यारंभ आदेशातील अटीचे उल्लंघन केले आहे. ज्या ठेकेदारांनी नाला सरळीकरण, खोलीकरण व गाळ काढणे काम किमान 20 टक्के जादा केले नाही. त्यांचे देयकांतून 20 टक्के कपात / केलेल्या कामाचे मुल्यांकनातून 20 टक्के रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कमेस देयक खर्च नोंदविणे आवश्यक होते. तसे न करता कामाचे मुल्यांकनाएवढी रक्कम कामांवर खर्च नोंदवून 20 टक्के रक्कम लोकसहभाग म्हणून अनामत सदरी जमा केले आहे. त्यामुळे सदर कामांवर 20 टक्के जादा खर्च नोंदविले आहे. त्यामुळे इतक्या रक्कमेने शासन निधी जादा खर्च झाले आहे. परिशिष्ट क्रमांक 06 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सन 2015-2016 मध्ये अशाप्रकारे अंदाजपत्रकापेक्षा 20 टक्के काम कमी केले आहेत. त्या कामाच्या देयकांतून 20 टक्के रक्कम कपात केले असून एकूण 30 कामांत रक्कम रूपये 13,49,422/- नियमबाहयरित्या कपात करुन अनामत सदरी जमा केले आहे. सदर रक्कम रूपये 13,49,422/- ने देयक कमी खर्च दर्शविणे आवश्यक होते. परंतु, तसे न केल्याने रुपये 13,49,422/- शासन निधी जादा खर्च झाले आहे. जादा खर्च रक्कम रुपये 13,49,422/- व्याजासह शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

2) अशाप्रकारे कपात केलेल्या रक्कमातून सन 2016-2017 मध्ये एकूण रक्कम रुपये 3,57,976/- (चारे व कोथळे येथील कामा, शेलेवाडी, मौजे सुळेवाडी, मंगरूळ) संबंधीत ठेकेदारांस अनामत म्हणून परत केल्या आहेत. या रक्कमा त्यांना देय नसताना परत केल्या आहेत. या गंभीर स्वरूपाच्या अनियमितेबाबत संबंधीतांवर योग्य ती कार्यवाही करून परत केलेल्या रक्कमा व्याजासह वसूल करुन शासन निधीत जमा करावे.

**3.361 पाझर तलाव उराड बांधकाम खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 63,78,673/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यारंभ आदेशातील व करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे डिसेंबर 2014 पर्यत काम सुरु न करता सदर कामास कंत्राटदाराने स्वत: विलंबाने सुरुवात केली असल्याने सदर कंत्राटदारास मार्च 2014 ते डिसेंबर 2014 पर्यत दरवाढीच्या निर्देशानुसार देण्यांत आलेला दरवाढीचा लाभ अनुज्ञेय ठरत नाही, असे असंताना संबंधीतांस रुपये 1,58,291/-) नियमबाहयपणे दिलेला दरवाढीचा (PRICE VARIATION लाभ अनुज्ञेय नसल्यामुळे सदर रक्कंम वसूलपात्र ठरते, याबाबत योग्य तो खुलासासह अनुपालन करण्यांत यावे.

2) अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार उपलब्ध असलेल्या साहित्याचा 90 टक्के पूर्नवापर करणे आवश्यक आहे. परंतू सदर कामावर उपलब्धं असलेल्या साहित्याचा 80 टक्के पुर्नवापर केल्याचे आढळून आले आहे साहित्याचा अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार पूर्नवापर का करण्यांत आलेला नाही याबाबत योग्यं तो खुलासा करण्यांत यावा.

3) कार्यारंभ आदेशातील अटी व शर्तीनुसार कामाचे ठिकाणी आणलेल्या साहित्याची तसेच काम सुरु असतांना नियमानुसार आवश्यक असलेल्या चाचण्याचा अहवाल सादर करणे आवश्यंक आहे. साहित्याच्या चाचणी अहवालाशिवाय देयके अदा केले जाणार नाहीत याबाबतचा स्पष्टं उल्लेख केला असतांना चाचणी अहवाल नससतांना देयकाचे प्रदान केल्याचे दिसून येते. देयकासोबत चाचणी अहवाल नसल्यामुळे सदर बांधकाम योग्यं दर्जाचे झाल्याबाबत खात्री पटत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 167 व 168 अन्वये तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1001/प्रक.-60/38, दिनांक 18/08/2001 अन्वये कार्यकारी अभियंता / उपअभियंता यांनी कामाची तपासणी करणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता यांनी तपासणी केल्याबाबतचा दिनांक नमूद केलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-1099/ प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 तसेच शासन परिपत्रक क्रमांक 2009/प्रक्रं.81/पंरा-07, दिनांक 08/06/2009 अन्वये बांधकामाचे जागी नामफलक लावणे आवश्यंक असतांना अशा प्रकारची कार्यवाही केल्याबाबत लेखापरीक्षण कालावधीत आढळून आले नाही तसेच नामफलकाचा फोटो कॉपी नस्तीस आढळून आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, लघुपाटबंधारे विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आयडब्ल्यु-2264/18106/एलआय, दिनांक 06/08/1976 नुसार पाणी उपसा संदर्भात ऑईल इंजिनचे लॉगबुक ठेवण्यांत आलेले नाही. त्यामुळे पाणी उपसा संदर्भात अदा केलेली रक्कंम मान्यं करता येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग जलसुधार प्रकल्प, शासन निर्णय क्रमांक 1006/688/06, दिनांक 14/06/2007 अन्वये सिंचन तलाव बांधकाम होणेपूर्वी शासनाने ठरवून दिलेल्या धोरणांनुसार सहकारी पाणीवाटप संस्था स्थापन केल्याचे दिसून येत नाही.

8) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/1009/प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 नुसार गौणखनिजाची प्रतिब्रास रुपये 200/- प्रमाणे कपात करुन शासन खाती भरणा करणे आवश्यंक आहे. सदर कामावर वापरण्यांत आलेल्या गौण खनिजाची रक्कम रुपये 15,87,200/- वसुल करणे आवश्यंक होते. परंतू सदर रक्कंम प्रथम देयकातून वसूल करण्यांत आलेली नाही.

तसेच रॉयल्टी पासेस देयकासोबत आढळून आलेल्या नाहीत, सदर कामावर वापरण्यांत आलेल्या गौण खनिजाच्या रॉयल्टीपासेस लेखापरीक्षण कालावधीपर्यत उपलब्ध करुन देण्यांत आल्या नाहीत, त्यामुळे सदर रक्कम वसुल पात्र ठरते.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/2009/प्र.क्र.40/ जा क्र 3, दिनांक 19/10/2001 अन्वये संबंधीत कंत्राटदारावर 2 वर्ष देखभालीची हमी देण्यात यावी. त्यासाठी 10 टक्के रक्कम 2 वर्ष देण्यात येउ नये (राखीव ठेवावी) असे सुस्पष्ट आदेश असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही. नियमबाहयतेबाबत लेखापरिक्षणास सप्रमाण अनुपालन दर्शवावे.

10) वाटाघाटी नंतर 2 टक्के जादा दराने ठरविलेली किंमत ही रूपये 61,93,063/- एवढी होती. परंतु प्रत्यक्षात सदर कामावर रूपये 63,78,673/- एवढी रककम खर्ची पडलेली दिसुन येते. जादा शोधन रककम रूपये 1,85,610/- बाबत योग्य खुलासा सादर करण्यात यावा.

**3.362 कोल्हापूर पध्दतीचा बंधारा धानोरा म्हाली, तालुका चांदूर रेल्वे बाधंकाम खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 31,82,201/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता यांनी तांत्रिक मंजूरी प्रदान केलेल्या अंदाजपत्रकीय किमतीपेक्षा (रुपये 49,14,537 - 22,00,874 = रुपये 27,13,663/-) रुपये 27.14 लक्ष ने बदलामुळे वाढ होत आहे, असे दिसते सदरहू होणा-या वाढीव दायीत्वास मंडळ कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे आवश्यंक असतांना त्यानुसार कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

2) विभागीय कार्यालयाचे पत्र क्रंमाक जिप/पाबं/उपकाअ/2481, दिनाक 28/06/2010 चे पत्रात नमूद केल्यानुसार प्रकल्पाचे कामात होणा-या बदलास वाढीव दायित्व निर्माण होत असल्यास अधीक्षक अभियंता यांची मंजूरी घेणे आवश्यंक असतांना त्यानुसार सुध्दा कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) संबंधीत कंत्राटदाराने विहित कालावधीत काम केले नसल्याने संबंधीतावर करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही करुन दंडनीय कार्यवाही करणे आवश्यंक असतांना त्यानुसार कार्यवाही न करता संबंधीतां सोबत करण्यांत आलेला करारनामा क्रमांक ब-1/42/2010-11 रद्द करण्यांत आलेला आहे संबंधीतांकडून वसुल केलेली अनामत रक्कम व सुरक्षा ठेव शासन खाती जमा करणे आवश्यंक असतांना त्यानुसार कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

4) अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रंमाक जिप/पाबं/तां200/2014, दिनांक 22/01/2015 नुसार या कामामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे अटीच्या अधीन राहून करारनामा क्रंमाक ब-1/42/2010-11 करारनाम्यातील कलम 15(2) अन्वये रदद करण्यांत आलेला आहे. संबंधीतांनी झालेल्या खर्चाची जबाबदारी स्विकारुन एक रकमी रक्कंम भरण्यास सुधारीत प्रशासकीय मान्यंतेबाबत विचार करता येईल असा शेरा टिपणीचे एन 24 वर नोंदविला आहे तसेच एन-27 वरील शेरा नुसार दोषीविरुध्दं संयुक्तं खाते चौकशी सुरु करावी व करारनामा रद्द करुन सुधारीत प्रशासकीय मंजूरी करीता सादर करावे असे नमूद केले आहे. त्यानुसार सदर कामासंबंधी जबाबदार असलेल्या (1) श्री अ.ना.राणे कार्यकारी अभियंता (से.नि.) रुपये 4,34,715/- (2) श्री आर.के.भगत उपअभियंता रुपये 3,47,772/- (3)श्री व्हि.बी.राठोड शाखा अभियंता रुपये 3,47,772/- असी एकूण रुपये 11,30,259/- ची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून सदर रक्कम वसूली बाबत संबंधीतांस कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. परंतू लेखापरीक्षणाचे कालावधी पर्यंत संबंधीतांकडून सदर रक्कम वसुल करण्यांत आल्याचे आढळून आले नाही. सदर रक्कंम संबंधीतांकडून वसुल करुन अनूपालन करण्यांत यावे.

5) सदर कामाचे सुधारीत अंदांजपत्रकास अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ अमरावती यांचे पत्र जावक क्रमांक प्रशा-1/1209/सन 2012, दिनांक10/04/2012 नुसार रुपये 49,10,128/- ची सुधारीत तांत्रिक मंजूरी प्रदान केली असून जिल्हा परिषद स्थायी समिती विशेष सभा ठराव क्रमांक 2, दिनांक 03/03/2015 अन्वये वरील कामास सुधारीत प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यांत आली असून त्यानुसार नव्याने करारनामा करण्यांत आला होता. वरील प्रमाणे सदर सुधारीत करारनामा केला असतांना सुध्दा सदर कंत्राटदाराला कामाचे आदेश देण्यात आले नाहीत. कामाचे आदेश न देता सदर कामाचे सुधारीत अंदांजपत्रकास अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ अमरावती यांचे पत्र जावक क्रमांक प्रशा-1/929/सन 2014-15, दिनांक 11/03/2015 नुसार रुपये 62,31,300/- ची सुधारीत तांत्रिक मंजूरी प्रदान केली असून जिल्हा परिषद स्थायी समिती विशेष सभा ठराव क्रमांक 1 दिनांक 12/06/2015 अन्वये वरील कामास सुधारीत प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यांत आली असून त्यानुसार नव्याने करारनामा करण्यांत आला. वरील दोन्ही अंदाजपत्रकास अधिक्षक अभियंता यांनी तांत्रिक मंजूरी प्रदान करुन केलेल्या अंदाजपत्रकीय किमती मध्ये रुपये 13.20 लक्ष ने बदलामुळे वाढ होत आहे.

6) सदर कामास प्रथम कामाचे आदेश दिनांक 28/02/2011 ला देण्यात आले होते. सदर कामाची मुदत दिनांक 27/02/2012 पूर्ण होत असतांना काम पूर्ण करण्यात आले नाही. सदर कामावर सन 2011-12 मध्ये रक्कम रुपये 9,32,943/- खर्च करण्यात आला.काम पुर्ण न केल्यामुळे कंत्राटदारावर काय कारवाई करण्यात आली याचा खुलासा करण्यात यावा.

7) सदर कामावर सन 2011-12 ते सन 2015-16 पर्यंत कोणताही खर्च करण्यात आला नाही व सदरचे काम 4 वर्षापासून अपूर्ण स्थितीत होते. पर्यायाने सदर प्रकल्पाची अंदापत्रकीय किंमत रुपये 20 लाखावरुन रुपये 63 लाखापर्यंत वाढवून सदर काम सन 2015-16 मध्ये सुरु करण्यात आले.सिंचन विभागाने अपूर्ण स्थितीतील बांधकामे प्रथमता पूर्ण करणे आवश्यक असतांना 4 वर्षापर्यंत सदरचे काम अपूर्ण ठेवून प्रकल्पाची किंमत 43 लाखांनी वाढलेली आहे. सदर वाढीव खर्चाची व प्रकल्प अपूर्ण असण्याची जबाबदारी निश्चित करुन अनुपालन सादर करावे.

**3.363 कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा सर्व्हेक्षणासाठी निरर्थक खर्च करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 74,14,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा सर्व्हेक्षणासाठी इतक्या मोठया प्रमाणात खर्च करण्यासाठी प्रथम जिल्हयामध्ये किती बंधारे प्रस्तावित केले आहे व त्यासाठी अनुदान उपलब्ध आहे काय याबाबत विभागाने कोणतीही शहनिशा न करता केवळ सर्व्हेक्षणासाठी खर्च केल्याचे दिसुन येते. वरील सर्व्हेक्षणाचे काम झाल्यानंतर केवळ दोन ते तीनच बंधाऱ्याची कामे हाती घेण्यात आल्याचे करारनामा नोंदवहीवरुन दिसुन येते.

2) सर्वेक्षणासाठी इतक्या मोठया प्रमाणात खर्च न करता ज्या बंधाऱ्याचे काम हाती घ्यावयाचे आहे त्याच बंधाऱ्याचे सर्वेक्षण करणे आवश्यक असताना विभागाने योग्य नियोजन न करता केवळ अनुदान खर्ची टाकण्याचे उदेशाने खर्च केल्याचे दिसुन येते.

3) कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा सर्वेक्षण करणेसाठी जवळपास रुपये 74.14 लक्ष खर्च केल्याने सिंचन क्षेत्रात वाढ होण्यासाठीचा उदेश सफल होत नसल्याने केलेला खर्च निरर्थक ठरतो. विभागाने पुरविलेल्या माहिती नुसार सिचंन क्षेत्रामध्ये कोणतीही वाढ झाली नसल्याने नाहक खर्च केल्याचे दिसुन येते. तसेच वारंवार सव्हेक्षणासाठी खर्च करणे उचित ठरत नाही.

4) सर्वेक्षण झाल्यानंतर संबधीत कंत्राटदाराने सर्वेक्षण केलेल्या जागेचा 7/12, जागेचे फोटो, बंधाऱ्याची डीझाईन व अनुषंगिक अभिलेखे विभागास सादर करणे आवश्यक असतांना तश्या नस्त्या नसल्याने कंत्राटदारांनी सर्वेक्षणाचे काम केल्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री होत नाही. याबाबत उचित चौकशी होणे आवश्यक आहे.

**3.364 नियमबाहयपणे सिमेंट दर तफावत देणेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015 -2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये एकुण रूपये 2,48,744 /- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सिमेंट दर तफावत अदा करणे संबधी शासन आदेश अथवा जिल्हादर सुचीमध्ये अशी कोणतेही आदेश नसतांना विभागाने नियमबाहय पणे सिमेंट दर तफावत बिल सादर करुन संबधीत कंत्राटदारास देयक अदा करुन शासन निधीचा दुरूपयोग केला आहे.

2) प्रमाणकामध्ये अथवा सोबत जोडलेल्या अभिलेख्यामध्ये सिमेंट दर तफावतीची कश्याप्रकारे परीगणना केली या बाबत कोणतेही अभिलेखे जोडण्यात आली नाही. सरसकट रक्कम कशी अदा केली या बाबत खुलासा करावा.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 144 (2) नुसार देयकातुन 3 टक्के सुरक्षा ठेव का कपात केली नाही याबाबत खुलासा करावा.

4) नस्ती मध्ये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नसल्याने काम पुर्ण झाले किंवा नाही या बाबत खुलासा करावा. संबधीत कत्रांटदाराने काम पुर्ण केले किंवा कसे या बाबत देयकासोबत कोणतेही अभिलेखे जोडण्यात आले नाही. केवळ कंत्राटदारास आर्थिक लाभासाठीच देयक सादर केल्याचे अभिलेख्यावरुन दिसुन येते.

5) कामाचे अंदाजपत्रकामध्ये अशाप्रकारची दर तफावत देण्याबाबत कोणतही तरतुद करण्यात आलेली नसतांना ही दर तफावत कशी देण्यात आली.

वरील बाबीवरुन केवळ कंत्राटदाराचे आर्थिक लाभासाठीच देयक पारीत केले असल्याने सदरचा खर्च लेखापरीक्षणास मान्य नसल्याने याची वसुली होणे आवश्यक आहे.

**3.365 महात्मा फुले जलभुमी अभियान अंतर्गत उपविभाग वरुड यांनी खरेदी केलेल्या निड्ल्स कामामधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रूपये 60,35,000/- खर्च करण्यात आला आहे. उपविभाग वरुड यांनी निविदा प्रक्रीया करुन 3 कंत्राटदारास कामे देण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 10 टक्के पेक्षा कमी दराची निविदा असतांना सुधारीत अंदाजपत्रक का करण्यात आले नाही. इतक्या कमी दराने काम करण्यास कंत्राटदारास काम कसे परवडले याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे. त्यामुळे कामाचा दर्जा बाबत लेखापरीक्षणास सांशकाता असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार कामाची तात्रिक पडताळणी अहवाल देयकासोबत नसल्याने कामाची गुणवत्ता व दर्जा बाबत लेखापरीक्षणाची खात्री करता आली नाही.

2) निविदेतील अट क्रमांक 25 नुसार “कार्यारंभ आदेश दिल्यानंतर एक नमुना निडल सात दिवसाचे आत तयार करुन तपासणी करीता सादर करावी व मान्यतेनंतरच पुढील निडल्स तयार कराव्यात” मात्र याप्रमाणे नमुना निडल घेण्यात आल्या नाहीत. त्यामुळे घेतलेल्या निडल हया तपासणी न करताच खरेदी केल्याचे दिसते कारण अशाप्रकरची तपासणी केल्याचा चाचणी अहवाल लेखापरिक्षणाला उपलब्ध झाला नाही. त्यामुळे गुणवत्तापुर्ण निडल खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

3) कामाची मुदत दिनांक 18/03/2016 पर्यंत असतांना काम पुर्ण करण्यात आले नाही. मुदतवाढ दिल्याचे दस्तंऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. सर्व कामाची मुदत मार्च 2016 पर्यंत असतांनाही कामे उशिराने पुर्ण केल्याने कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नाही. याचा खुलासा करावा.

4) सर्व कामाच्या निविदा एकाच वेळी अंतिम करण्यात आल्या आहेत. मात्र काही कामे ही 15.15 टक्के कमी दराने तर काही कामे ही 20.56 टक्के कमी दराने दिली आहेत. उद्योग, उर्जा विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार खरेदी करतांना बाजारभाव पाहून त्यानुसार खरेदी करणे आवश्यंक आहे. जर एक कंत्राटदार 20.56 टक्के इतक्या कमी दराने काम करण्यास तयार आहे. तर इतर कंत्राटदारासोबत तशा प्रकारे वाटाघाटी करण्यास वाव होता. त्यामुळे साधारणत: 2 ते 5 टक्के दराचा नुकसान झाल्याचे दिसते.

5) कामाचे तुकडे पाडून काम केले आहे. खरेदी करणारी यंत्रणा एकच असतांना वेगवेगळया कामाच्या वेगवेगळया निविदा काढण्याचे प्रयोजन काय? वरिष्ठांची मंजुरी टाळण्यासाठी अशाप्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येते.

6) कामाचे मोजमाप पुस्तिकेची पडताळणी केली असता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 ब नुसार कामाची उप अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन 100 टक्के अंतीम कामाची नोंद करणे व नियम 168 क नुसार कार्यकारी अभियंत्यानी 5 टक्के तपासणी करणे आवश्यक असतांना तशा पाहणी / तपासणी केल्याचे दिसुन आले नाही.

7) नविन फळया टाकल्यानंतर जुन्या फळयांची विल्हेवाट कशी लावण्यात आली याबाबत देयक अथवा नस्तीमध्ये कोणताही उल्लेख नाही.

8) कोल्हापुरी बंधारा गावनिहाय कोणत्या बंधाऱ्यामध्ये किती फळया आहेत. याबाबत विभागाकडे कोणतेही अभिलेखे नसल्याने केलेल्या कामाची सत्यता पडताळता येत नाही.

9) फळयांची खरेदी ही B1 Tender न करता खुली निविदा प्रक्रीया करुन खरेदी धोरणानुसार केली असती तर इतरही पुरवठादार प्रक्रीयेत सामील झाले असते, त्यामुळे बाजारातील तुलनात्मक दराचा फायदा झाला असता.

**3.366 कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा भिलटेक, तालुका चांदुररेल्वे उपविभाग तिवसा येथील कामाचे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 26) -** सदरबाबत रक्कम रूपये 51,61,970/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 07/07/2013 रोजी निविदा उघडण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम 217 अन्वये कोणत्याही कामाचा कार्यारंभ आदेश हा निविदा स्विकृत झाल्यापासुन 90 दिवसाचे आत देणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा सदर निविदेचा कालावधी संपुष्टात येतो. ती वैध राहत नाही, परंतु श्री एम.आय.बैस यांना कामाचा आदेश दिनांक 04/03/2014 रोजी देण्यात आला आहे. त्यामुळे सदर निविदा ही नियमबाहय ठरते.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपिए 2009/प्र.क्र.1, दिनांक 20/11/2009 नुसार रुपये 10 लाखाचे वर रुपये 100/- प्रमाणे व त्यानंतर प्रति लाख रुपये 100/- प्रमाणे करारनामा करणे बंधनकारक असतांना रुपये 5,000/- चे स्टॅम्पेपवर करारनामा करण्यात आला आहे. रुपये 200/- कमी ने करण्यात आला आहे रुपये 200/- वसुली करुन दर्शवावी.

3) मोजमापपुस्तीकेची तपासणी केली असता, स्वामित्व धनाची रुपये 3,02,881/- इतकी कपात करण्यात आली आहे. परंतु सदर स्वामित्वधनाची रक्कम योग्य लेखाशिर्षाखालील जमा करण्यात आली नसुन ती तसीच पडुन असल्याचे दिसुन येते.

4) महाराष्ट्र शासन, लघुपाटबंधारे विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आयडब्ल्यु-2264/18106/एलआय दिनांक 06/08/1976 नुसार पाणी उपसा संदर्भात ऑईल इंजिनचे लॉगबुक ठेवण्यांत आलेले नाही. त्यामुळे पाणी उपसा संदर्भात अदा केलेली रक्कंम मान्यं करता येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो-2001/प्र.क्र.104/ जल-01, दिनांक 01/01/2002 मधील क्रमांक 5 अन्वये तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास-1001/प्र.क्र.60/38, दिनांक 18/08/2001 नूसार बांधकामाचे देयक मंजूर करतांना त्या बांधकामाचा गुणनियंत्रण चाचणी अहवाल गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत घेवून देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. देयकासोबत चाचणी अहवाल नसल्यामुळे सदर बांधकाम योग्य दर्जाचे झाल्याबाबत खात्री पटत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 तसेच शासन परिपत्रक क्रमांक 2009/प्रक्र.81/पंरा-07, दिनांक 08/06/2009 अन्वये बांधकामाचे जागी नामफलक लावणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही केल्याबाबत लेखापरीक्षण कालावधीत आढळून आले नाही. तसेच नामफलकाचा फोटो कॉपी नस्तीस आढळून आली नाही. त्यामुळे सदर रक्कम अमान्यं करण्यात येत आहे.

7) देयकासोबत चाचणी अहवाल नसल्यामुळे सदर बांधकाम योग्य दर्जाचे झाल्याबाबत खात्री पटत नाही.

**3.367 धामणा साठवण तलावासाठी अवैधरित्या उत्खनन करून वापरलेल्या गौण खणिजाची वसुली करणे व इतर अनियमितता.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत रक्कम रूपये 64,25,459/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार पोपटखेड येथून गौण खनिज आणने आवश्यक असतांना नमुद ठिकाणहून मुरुम न आणता अनभोरा तालुका मुर्तीजापूर येथून गौण खनिज आणला. अनभोरा येथून गौण खनिजाच्या वहन अंतरास प्रादेशीक कार्यालयाची मान्यता न घेताच दुस-या तालुक्यातील खाजगी खाणपटटा धारक श्री.प्रांजल नरेंद्र पुरोहीत, मुर्तीजापूर यांचेकडून मुरुम आणल्याचे निदर्शनास आले.

अंदाजपत्रकानुसार गौण खनिज पोपटखेड येथून आणणे आवश्यक असतांना 6175 क्यु.घ.मी. मुरुम म्हणजेच 2,182 ब्रास गौण खनिज अनभोरा तालुका मुर्तीजापूर श्री.प्रांजल नरेंद्र पुरोहीत यांचेकडून आणला तशा मुरुमाच्या पासेस देयकासोबत जोडण्यात आल्या आहेत. 2182 ब्रास मुरुम X रुपये 200 प्रति ब्रास प्रमाणे रुपये

4,36,400/- मुरुमापोटी कंत्राटदाराला प्रदान करण्यात आले. वहन अंतरास मंजुरी नसल्यामुळे अतिप्रदान झाले असण्याची शक्यता आहे.

2) देयका नुसार बांधकामाकरीता 642.02 क्यु.घ.मी. (227 ब्रास) रेती वापरली. सोबत जोडलेल्या गौण खनिजाच्या पासेस मध्ये रेतीच्या रॉयल्टीच्या पासेस नसल्यामुळे रेतीचे अवैधरित्या उत्खनन करुन गौण खनिज वापरला असल्याचे निदर्शनास आले. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 कलम 48(7) व अधिसुचना महसुल व वन विभाग दिनांक 12/06/2015 नुसार झालेल्या सुधारणेनुसार वैध प्राधिकाराशिवाय गौण खनिजाचे उत्खनन केल्यास गौण खनिजाच्या प्रति ब्रासच्या बाजारभाव दराच्या पाचपट दराने वसुल करण्याची तरतुद आहे. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 कलम 48 नुसार तसेच जिल्हा अधिकारी, अकोला यांचे परीपत्रक क्रमांक कक्ष 29/खणिकर्म/कावि 583/2016, दिनांक 05/04/2016 नुसार दिनांक 26/08/2015 पासून अकोला जिल्हयातील रेतीचे बाजार मुल्य प्रति ब्रास रुपये 3,000/- असून बाजार भावाच्या पाचपट प्रति ब्रास रुपये 15,000/- रुपये प्रमाणे 227 ब्रासच्या रेतीच्या दंडाचे वसुलीबाबत जिल्हा अधिकारी, अकोला यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

तसेच रेतीच्या पासेस नसल्यामुळे पोपटखेड येथून रेती आणण्यासाठी 40 कि.मी.लिड घेऊन वाहतुक दराचे लिडसह दर रुपये 588.05 प्रति घ.मी प्रमाणे 642.02 क्यु.घ.मी.चे रुपये 3,77,540/- वसुल करून शासन खाती भरणा करावा. तसेच देयके पारीत करण्यापुर्वी देयकाची तपासणी न करणा-या संबंधितावर योग्य कारवाई करावी का करण्यात येऊ नये?

3) निविदा प्रक्रिया दिनांक 06/02/2014 पासून सुरु होऊन दिनांक 18/07/2014 रोजी निविदा उघडण्यात आल्या. या कालावधीत दोन वेळा मुदतवाढ देऊन साधारणत: सहा महिने निविदा प्रक्रीया राबविण्यात आली. ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक निविदा-2012/प्र.क्र.97/परा-7 दिनांक 23/09/2013 मधील तरतुदीनुसार निविदा मुदतवाढीची कार्यवाही केली नाही. या शासन निर्णयातील अनुक्रमांक 4 मधील तरतुदीनुसार या कामाला निविदा सुचनेचा प्रथम कालावधी 25 दिवस, व्दितीय कालावधी 15 दिवस, तृतीय कालावधी 10 दिवस या प्रमाणे निविदा 50 व्या दिवशी निविदा उघडली असती. त्यानुसार मुदतवाढ न देता केवळ कंत्राटदाराने तांत्रिक कारण नमुद करून कार्यालयाने मुदतवाढ वाढवून दिली. कार्यालयाने कंत्राटदाराने नमुद केलेल्या तांत्रिक कारणाची चौकशी न करता दोन वेळा मुदतवाढ दिली. निविदा प्रक्रिया प्रदीर्घकाळ चालल्यामुळे निविदा पारदर्शकपणे पार पाडली आहे, असे म्हणता येणार नाही. या शासन निर्णयानुसार निविदा प्रक्रिया पार पाडली नसल्यामुळे विलंबाबद्दल खुलासा होणे आवश्यक आहे. ज्या वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली, त्याचे वृत्तपत्रे / कात्रण नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे पुरेशी प्रसिध्दी देण्यात आली अथवा नाही, याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 138 (1) व 6(ब) तसेच त्यामधील सुधारणा महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीओ2005/प्र.क्र.366/वित्त-1, दिनांक 05/02/2008 मधील निर्देशानुसार रुपये 50 लाखापेक्षा जास्त खर्चाच्या कामासाठीची जाहिरात जिल्हास्तरावर क वर्ग मराठी / हिंदी / इंग्रजी दैनिकात आळीपाळीने व विभागीय स्तरावरील ब वर्ग मराठी / हिन्दी / इंग्रजी व राज्य स्तरावर अ वर्ग दैनिकात मराठी / हिन्दी / इंग्रजी विभागीय माहिती उपसंचालक यांचे मार्फत त्यांचे रोष्टर शिफारशीनुसार दैनीक आवृत्तीत प्रसिध्द करणे आवश्यक आहे. या प्रमाणे प्रसिध्दी केली असल्यास सप्रमाण खुलासा करावा.

4) पाणी वापर संस्था स्थापणेबाबत अभिलेख उपलब्ध न झाल्यामुळे पाणी वापर संस्था स्थापण न करताच साठवण तलावाचे काम सुरु केले असल्यामुळे योजनेचा मुळ उद्येश पुर्ण सफल झाला आहे, असे म्हणता येणार नाही. याबाबत योग्य कार्यवाही करुन खुलासा करावा.

5) सदर कामाकरिता एकूण 3 निविदा प्राप्त असून 03 निविदा उघडण्यात आल्या. श्री. एस.डी.चव्हाण यांची निविदा वगळता उर्वरीत दोन नामंजूर निविदा नस्तीमध्ये उपलब्ध नसल्याने लेखापरिक्षणात पडताळणी करता आली नाही. उघडण्यात आलेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.10 टक्के जास्त दराने होती. संबंधित कंत्राटदारासोबत वाटाघाटीनंतर 11 टक्के जास्त दराने निविदा मंजूर करुन कंत्राटदारास दिनांक 20/04/2015 रोजी कार्यादेश देण्यात आला. प्रत्यक्षात निविदा उघडल्याचा दिनांक 18/07/2014 आहे. निविदा उघडल्यापासून ते कामाचा कार्यादेश देण्यास 10 महिने म्हणजेच अवास्तव्य कालावधी लागला असल्याने सदर काम

सुरु होण्यात विलंब झाला. तसेच उपअभियंता, अकोट यांचे पत्र क्रमांक 3171/2015 दिनांक 20/10/2015 नुसार विलंबाने काम सुरु झाल्याचे पत्रात नमुद आहे. विलंबाबाबत खुलासा करावा.

6) अंदाजपत्रीकिय दरापेक्षा 10 टक्के पेक्षा ज्यादा दराची निविदा असल्यास निविदा स्विकृतीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 39 (2) शासनाची मंजुरी घेणे आवश्यक होते. शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए1089/प्र.क्र.2982/28, दिनांक 24/05/1989 नुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10 टक्के पेक्षा ज्यादा दराच्या निविदा प्राप्त झाल्यास नमुद केलेल्या अंदाजपत्रकीय दराशी तुलना न करता निविदा ज्या वर्षी मागविल्या, त्या वर्षाच्या सार्वजनीक बांधकाम विभागाच्या प्रचलित दराशी तूलना करावी. कंत्राटदार यांनी अंदाजपत्रकीय दरा पेक्षा 17.10 टक्के जास्त दराने निविदा भरली. निविदा मंजुर झालेल्या दराची प्रचलित वर्षाच्या बांधकामाच्या दराशी तुलना करून ते दर प्रचलीत दरापेक्षा 11टक्के येत असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 39 (2) शासनाची मंजुरी न घेताच निविदा मंजुर केली. झालेली निविदा प्रक्रिया नियमाचे उल्लघन करणारी आहे. याबाबत शासनाची मंजुरी घ्यावी.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146, 147 व 148 नुसार करारनामा करुन नमुना 48 मधील करारनामा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर करारनाम्यात बांधकाम आदेश क्रमांक, दिनांक, काम पुर्ण करण्याचा कालावधी, रक्कम, इतर अटी शर्ती नमुद कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केलेली नाही. कंत्राटदाराशी केलेल्या करारनाम्यावर काम विहित मुदतीत पूर्ण झाले नाही. तर त्यासाठी दंडाची तरतुद नमुद करण्यात आलेली नाही. यामध्ये दंडाचा कोठेही उल्लेख नाही कारण विविध कारणामुळे कंत्राटदाराकडून काम करण्यास विलंब होऊ शकतो.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट 1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 खडी, मुरुम, सिमेंट, स्टील, इत्यादी साहित्याचे वापरापूर्वी शासकीय प्रयोगशाळेकडुन चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33 दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दररोज तारखेसह मापे नमूद केली नाहीत. तसेच सदर मोजमापे 100 टक्के तपासतांना उपअभियंता यांनी दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. कार्यकारी अभियंता यांनी प्रत्येक कामाची रुपये 50,000/- चे प्रत्येक टप्प्यात तपासणी केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 नुसार योग्य ती कार्यवाही केलेली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 124 अन्वये मक्तेदाराकडे सोपविण्यात आलेले प्रत्येक कामाचे कार्यादेश पुस्तक ठेवावे व त्यामध्ये कार्यकारी अभियंता यांचे आदेश, कामातील बदल, सुचना, दुरुस्ती यांच्या नोंदी घेणेबाबत निर्देश आहेत. सदर बुक ठेवण्यात आलेले नाही तथा लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेले नाहीत.

11) कार्यक्रमाच्या प्रभावी अमंलबजावणी करीता व कामाची गुणवत्ता राखण्यासाठी कामाची अमलबजावणी पारदर्शक होण्याच्या दृष्टीने जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जलशी-2015/प्र.क्र.115/ जल-7, दिनांक 13/03/2015 नुसार quality control monitor यांचेमार्फत कामाचे दोन वेळा समवर्ती मुल्यमापन होणे आवश्यक असतांना ते केले नाही.

**3.368 तामशी साठवण तलाव बांधकामाधील अतिरीक्त कामाबाबत व गौण खनिजाची वसुली करणेबाबत**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत रक्कम रूपये 24,90,241/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अ.बाहेरुन आणलेल्या 5344.29 घ.मी. गौणखणीजाच्या रॉयल्टीच्या पासेस नसल्यामुळे (5344.29 घ.मी./2.83 घ.मी = 1888.442 ब्रास) 1888 ब्रासच्या रॉयल्टीच्या मेटल, रेतीच्या पासेस उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे 1888 ब्रासचे अवैधरित्या उत्खनन करून वापर केला असल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम,

1966 कलम 48(7) व अधिसुचना महसुल व वनविभाग दिनांक 12/06/2015 नुसार झालेल्या सुधारणेनुसार गौण खनिजाचे अवैधरित्या उत्खनन केल्यास गौण खनिजाची बाजारभावाच्या दराच्या प्रति ब्रासच्या पाचपट दंडाची तरतुद आहे.

उपरोक्त विवरणपत्रानुसार रेती 323 ब्रासचे अवैधरित्या उत्खनन केले म्हणून महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 कलम 48 नुसार तसेच जिल्हा अधिकारी, अकोला यांचे परीपत्रक क्रमांक कक्ष 29/ खणिकर्म/कावि 583/2016 दिनांक 05/04/2016 नुसार दिनांक 26/08/2015 पासून अकोला जिल्हयातील रेतीचे बाजार मुल्य प्रति ब्रास रुपये 3,000/ असून बाजारभावाच्या पाचपट प्रति ब्रास रुपये 15000 प्रमाणे 323 ब्रास रेतीच्या त्याचप्रमाणे मुरुम व मेटल बाजार मुल्य प्रति ब्रास रु.2000/ असून बाजारभावाच्या पाचपट प्रति ब्रास रुपये 10,000/- प्रमाणे उर्वरीत 1565 ब्रासच्या मुरुम तसेच मेटलच्या दंडाचे वसुलीकरीता जिल्हा अधिकारी यांचे अभिप्राय घेण्यात यावेत. तसेच देयके पारीत करण्यापुर्वी देयकाची तपासणी न करणा-या जबाबदार कर्मचाऱ्यावर / अधिका-यावर योग्य कार्यवाही करावी.

ब. उदग्रहणक्षेत्रातील वापरलेल्या व बाहेरील आणलेल्या गौण खनिजाची वसुली रुपये 35.34/- घ.मी. कमी दराने वसुल करण्याच्या प्रयोजनाचा खुलासा करावा.

2) अंदाजपत्रक तयार करतांना गौण खनिजाचे दर वगळून अंदाजपत्रक तयार करून कंत्राटदाराने सुध्दा निविदा भरतांना गौण खनिजाचे दर वगळून निविदा भरणे आवश्यक आहे जेणे करुन भविष्यात गौण खनिजाचे दर वाढल्यास शासनाचे नुकसान होऊ नये, हा त्यामागचा उद्देश आहे. उदा. मोजमाप पुस्तक क्रमांक 3167/36 ते 3 वरील गोषवा-यानुसार उदग्रहण क्षेत्रातील 42354 घ.मी. गौण खनिजाचे उत्खनन केले असून त्यापैकी 29,015.81 घ.मी. गौण खनिज गेरु असल्यामुळे नाकारण्यात आले. म्हणजे त्याचा वापर करण्यात आला नाही. निरीक्षण टिपणीनुसार पत्र क्रमांक 834 दिनांक 04/06/2009 नुसार उच्च तलावाच्या बाजुने सदर गौण खनिज टाकणे बाबत निर्देश होते. बांधकाम विभागाचे शासन परीपत्रक 1098/98/98 मो.प्र. दिनांक 04/09/2000 मधील अटी व शर्ती नुसार उदग्रहण क्षेत्रातील गौण खनिजाचा वापर गुणवत्तेनुसार कार्यवाही केल्याबाबत व 29015.81 घ.मी. गौण खनिज गेरु नाकारण्याबाबतचा सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी न घेण्याच्या प्रयोजनाचा खुलासा करावा.

3) बांधकामाचे पिचिंग करीता 4272.26 क्यु.घ.मी. साहित्य वापरले आहे. तथापि, साहित्याचे गौण खनिज पासेस नस्तीसोबत आढळून आले नाहीत. त्यामुळे पिचिंग करीता रुपये 4272.26 क्यु.घ.मी. 30 सें.मी. आकाराचे दगड 30 कि.मी.लिड घेऊन वाहतुक दरासह रुपये 207.30/- प्रति.घ.मी. आणून बसविल्याचे मोजमाप पुस्तकात दर्शविले आहे. सोबत गौण खनिजाचे रॉयल्टीच्या पासेस नसल्यामुळे गौण खनिजाची रक्कम रुपये 8,85,639/- वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 कलम 48 नुसार तसेच जिल्हा अधिकारी, अकोला यांचे परीपत्रक क्रमांक कक्ष 29/खणिकर्म/कावि 583/2016 दिनांक 05/04/2016 नुसार दिनांक 26/08/2015 नुसार 4272.26 क्यु.घ.मी. (1510 ब्रास) दंड रुपये 10,000/- हजार प्रति ब्रास प्रमाणे दंडाचे वसुलीबाबत जिल्हा अधिकारी, अकोला यांचा अभिप्राय घ्यावा.

4) ज्या वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली त्या वृत्तपत्रे / कात्रण नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे पुरेशी प्रसिध्दी देण्यात आली अथवा नाही, याबाबत खात्री करता आली नाही. रुपये 50 लाखा पेक्षा जास्त खर्चाच्या कामासाठीची जाहिरात जिल्हास्तरावर क वर्ग मराठी / हिंदी / इंग्रजी दैनिकात आळीपाळीने व विभागीय स्तरावरील ब वर्ग मराठी / हिन्दी / इंग्रजी व राज्य स्तरावर अ वर्ग दैनीकात मराठी/हिन्दी/इंग्रजी विभागीय माहिती उपसंचालक यांचेमार्फत त्यांचे रोष्टर शिफारशी नुसार आवृत्तीत प्रसिध्द करणे आवश्यक आहे. याप्रमाणे प्रसिध्दी केले असल्यास सप्रमाण खुलासा करावा.

5) पाणी वापर संस्था स्थापण न करताच साठवण तलावाचे काम सुरु केले असल्यामुळे योजनेचा मुळ उद्देश सफल झाला नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-1097/प्र.क्र.1943/33 दिनांक 04/09/2000 नुसार अंदाजपत्रक तयार करतांना खोदकामासाठी चाचणी खड्डे घेणे आवश्यक आहे. अशी

कार्यवाही न केल्याने सदर कामात मुळ परिमाणापेक्षा प्रत्यक्षात कार्यान्वीत बाबी मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सदोष अंदाजपत्रक तयार केल्यामुळे सदर कामाचा खर्चात दरवर्षी नवीन नवीन बाब निर्माण करून विलंब होत असल्यामुळे व काम पूर्ण् होण्यास विलंब झाल्यामुळे लाभार्थी शेतकरी सिंचनापासुन वंचित राहत आहेत. कामाचे आदेश दिनांक 29/03/2008 पासून देण्यात आले असून सदर काम 18 महिन्यात पूर्ण करणे आवश्यक असतांना अद्यापपर्यंत काम पूर्ण झाले नाही. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2001/21/516/2001/लपा, दिनांक 18/09/2001 नुसार अंदाजपत्रकातील बाबीच्या किंमतीमध्ये चुका झाल्याने वाढणा-या खर्चात वाढ होत असल्याचे दिसते.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146, 147 व 148 नुसार करारनामा करुन नमूना 48 मधील करारनामा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर करारनाम्यात बांधकाम आदेश क्रमांक, दिनांक, काम पुर्ण करण्याचा कालावधी, रक्कम, इतर अटी शर्ती नमुद कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केलेली नाही. नस्तीमध्ये करारनामासाठी कोरा मुद्रांक जोडलेला आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट 1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 खडी, मुरुम, सिमेंट, स्टील, इत्यादी साहित्याचे वापरापूर्वी शासकीय प्रयोगशाळाकडुन चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/ 33 दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दररोज तारखेसह मापे नमूद केली नाहीत. तसेच सदर मोजमापे 100 टक्के तपासतांना उपअभियंता यांनी दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. कार्यकारी अभियंता यांनी प्रत्येक कामाची रुपये 50,000/- चे प्रत्येक टप्पयात तपासणी केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 नुसार योग्य ती कार्यवाही केलेली नाही.

10) कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करीता व कामाची गुणवत्ता राखण्यासाठी कामाची अंमलबजावणी पारदर्शक होण्याच्या दृष्टीने जलसंधारण विभाग, शासन परीत्रक क्रमांक जलशी-2015/प्र.क्र.115/ जल-7, दिनांक 13/03/2015 नुसार quality control monitor यांचे मार्फत कामाचे दोन वेळा समवर्ती मुल्यमापन होणे आवश्यक असतांना ते केले नाही.

**3.369 जवाहर/ धडक सिंचन विहीर योजनांअतर्गत मंजुर विहीरी बाबत व अनुदान अखर्चीतबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत रक्कम रूपये 24,18,47,324/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नियोजन विभागाचा शासन निर्णय 2013/प्र.क्र.123/रो.ह-यो-, दिनांक 23/01/2014 नुसार दिनांक 30/06/2014 पर्यंत विहीरी पुर्ण करणे आवश्यक होते. परंतु, नियोजन विभागाचे परिपत्रक योजना-2013/ प्र.क्र.123/ रो.ह.यो-5, दिनांक 02/07/2014 नुसार अपुर्ण विहीरीला मुदतवाढ देऊन दिनांक 31/07/2014 पर्यंत अपुर्ण विहीरी पुर्ण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. विहीत कालावधीत विहीरी पुर्ण न केल्यामुळे बांधकामाच्या व मजुरीच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे लाभधारक पुन्हा अनुदान वाढवून मागू शकतात. त्यामुळे अपूर्ण विहीरी तात्काळ पुर्ण होणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे जेणे करून शासन निधीचे वाढीव अनुदान मागणीमुळे आर्थिक नुकसान होणार नाही. विहीत कालावधीत अपुर्ण विहीरी पुर्ण झाल्या नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक विका/1297/प्र.क्र.81/रो.ह.यो.10, दिनांक 01/10/1997 अन्वये आदेश दिल्यानंतर 14 महिन्यात विहीरीचे बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा दिलेल्या अनुदानाची रक्कम वसुल करण्याचे निर्देश आहेत. त्याचप्रमाणे प्रथम हप्ता वितरीत करुनही अद्यापपर्यंत कामास सुरुवात न केलेल्या विहीरीची संख्या कार्यालयाने सादर केलेल्या माहितीनुसार 1570 आहे. 1570 लाभधारकाला प्रती लाभार्थी रुपये 10,000/- प्रमाणे रुपये 1,57,00,000/- चे अग्रीम प्रदान करण्यात येऊन विहीरीचे बांधकाम सुरु करण्यात आले नाही. नियोजन विभागाचा शासन निर्णय 2013/प्र.क्र.123/रो.ह-यो-, दिनांक 23/01/2014 नुसार दिनांक 30/06/2014 ज्या लाभार्थ्यांना स्वारस्य नसेल, अशा लाभार्थ्यांकडून अग्रीम वसुलीची कार्यवाही नियोजन विभाग, शासन परीपत्रक

क्रमांक भौतीक -2013/प.क्र.29/रोहयो-5, दिनांक 16/09/2013 नुसार लाभधारकाकडून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. रुपये 1,57,00,000/-वसुली करण्यात यावी.

3) धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत प्रगती पथावरील विहीरी पुर्ण करण्यासाठी देय होणारा वाटप नियोजन विभागाचे परीपत्रक योजना-2013/प्र.क्र.123/रो.ह.यो-5, दिनांक 02/07/2014 नुसार दिनांक 15 ऑगस्ट पर्यंत पुर्ण करून उर्वरीत निधी तात्काळ शासन खाती भरणे आवश्यक असतांना सादर लघुसिंचन विभागाने सादर केलेल्या माहितीच्या आधारे माहे मार्च 2016 अखेर रुपये 22,61,57,324/ इतका निधी शिल्लक असल्याचे नमुद केले आहे. सदर निधी शासन खाती योग्य लेखाशिर्षाखाली भरण्यात यावे.

4) एकूण मंजुर विहीरी 7473 पैकी उर्वरीत 2968 विहीरी अद्यापर्यंत अपूर्ण असल्यामुळे त्यात शासकीय निधीची रक्कम गुतलेली असुन त्याचा सिंचनाचा प्रत्यक्ष लाभ लाभार्थींना होत नाही. त्यामुळे सदर अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर विहीरीचे कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने जातीने लक्ष घालुन आवश्यक उपाययोजना करावी व अपूर्ण विहीरीची कामे त्वरीत पूर्ण करण्यात यांवी.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 100 प्रमाणे नमूना-42 मध्ये प्रकल्प नोंदवही, नमूना-23 मध्ये कामाची प्रगती नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तसेच पूर्ण झालेल्या विहीरींच्या नोंदी नमूना-69 मधील पूर्ण झालेल्या बांधकामाच्या नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. परंतु, अशा प्रकारे कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

6) एकूण मंजूर 7473 विहीरी पैकी पूर्ण 4505 विहीरी पासुन किती लाभार्थी शेतक-यांना सिंचनाचा वापर करुन त्यांचे उत्पन्न व जीवनमान उंचावण्यास मदत झाली, याबाबतचे अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. तसेच अदयापही 2968 विहीरी अपूर्ण असुन सदर योजनेची फलश्रृतीबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

**3.370 भेंडी महल सिंचन तलावाचे दुरुस्तीबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत रक्कम रूपये 13,42,285/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शेतक-यांना सुलभतेने व आवश्यनकतेनुसार न्याय्य पाण्याचे वाटप मिळण्यासाठी त्यासाठी लाभधारकांना सहभागी करून लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या क्षेत्रात महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/जल1, दिनांक 31/07/2000 नुसार लाभधारकाची पाणीवापर संस्था स्थापन न करताच काम सुरु करण्यात आले.

2) बाब क्रमांक 8 च्या कामाची तपासणी दिनांक 15/07/2015 रोजी केली असून त्यासाठी 1633 घनमीटर (577 ब्रास) रबल दिनांक 22/08/2015 रोजी आणल्याचे दर्शविले आहे. काम पुर्ण झाल्यानंतरचे गौण खनिज आणण्याचे प्रयोजन काय? काम संपल्यानंतरच्या रॉयल्टी पासेस केवळ औपचारीकता पुर्ण करण्याकरीता गौण खनिजाच्या पासेस दर्शविण्यात आल्या. सदर 1633 घनमीटर गौण खनिज अवैधरित्या उत्खनन करून वापरल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 कलम 48(7) व अधिसुचना महसुल व वनविभाग दिनांक 12/06/2015 नुसार झालेल्या सुधारणेनुसार गौण खनिजाचे अवैधरित्या उत्खनन केल्यास गौण खनिजाची बाजारभावाच्या दराच्या प्रति ब्रासच्या पाचपट किमंत वसुल करणे आवश्यक आहे. 577 ब्रास गौण खणिज अवैधरित्या उत्खनन केले म्हणून महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 कलम 48 नुसार तसेच जिल्हा अधिकारी, अकोला यांचे परीपत्रक क्रमांक कक्ष 29/खणिकर्म/कावि583/2016, दिनांक 05/04/2016 नुसार दिनांक 26/08/2015 अहवालानुसार अकोला जिल्हयातील मेटल बाजार मुल्य प्रति ब्रास रुपये 2,000/ असून बाजारभावाच्या पाचपट प्रति ब्रास रुपये 10,000/- प्रमाणे 577 ब्रासच्या दंडाची वसुलीबाबत जिल्हा अधिकारी यांचा अभिप्राय घेऊन वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. देयके पारीत करण्यापुर्वी देयकाची तपासणी न करणा-या जबाबदार कर्मचा-यावर / अधिका-यावर योग्य कार्यवाही करावी.

4) जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक कमांक जलशी-2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक 13/03/2015 नुसार पुर्ण झालेल्या कामाचे अंतीम देयक सादर करण्यापुर्वी कामाची तपशीलवार माहिती ग्रामसभेला देणे आवश्यक

असतांना जेणे करून ग्रामस्थाकडून काही तक्रार आल्यास त्या तक्रारीप्रमाणे काम झाल्याची खात्री करणे. ग्रामसभेला न कळविल्यामुळे काम झाले किंवा कसे, याबाबत खात्री पटत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146, 147 व 148 नुसार करारनामा करुन नमूना 48 मधील करारनामा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर करारनाम्यात बांधकाम आदेश क्रमांक, दिनांक, काम पुर्ण करण्याचा कालावधी, रक्कम, इतर अटी शर्ती नमुद कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केलेली नाही. नस्तीमध्ये करारनामासाठी कोरा मुद्रांक जोडलेला आहे. कंत्राटदाराशी केलेल्या करारनाम्यावर काम विहित मुदतीत पूर्ण झाले नाही, तर त्यासाठी दंडाची तरतुद नमुद करण्यात आलेली नाही. यामध्ये दंडाचा कोठेही उल्लेख नाही कंत्राटदाराकडून काम करण्यास विलंब होऊ शकतो.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट 1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 खडी, मुरुम, सिमेंट, स्टील, इत्यादी साहित्याचे वापरापूर्वी शासकीय प्रयोगशाळाकडुन चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दररोज तारखेसह मापे नमूद केली नाहीत. तसेच सदर मोजमापे 100 टक्के तपासतांना उपअभियंता यांनी दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. कार्यकारी अभियंता यांनी प्रत्येक कामाची रुपये 50,000/- चे प्रत्येक टप्पयात तपासणी केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 नुसार योग्य ती कार्यवाही केलेली नाही.

**3.371 चीचारी गाव तलाव दुरुस्तीबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत रक्कम रूपये 4,60,041/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाचे आदेश दिनांक 12/06/2015 रोजी देण्यात आले असून त्याच दिवशी कामाचे देयके टिपणी नुसार सादर केल्याचे निदर्शनास आले. एकाच दिवशी 8800 झुडपे तोडणे व पोपटखेड येथुन 40 किमी अंतरावरुन 829.75 घमी (293 ब्रास) गौण खणिज आणून तलावदुरुस्तीचे काम कसे शक्य झाले? याबाबत खुलासा होण आवश्यक आहे.

2) श्री.प्रविण वरणकार कंत्राटदार यांनी सन 2013-2014 च्या दरापेक्षा 19.20 टक्के कमी दराने निविदा किंमत रुपये 3,63,632/- ची असल्यामुळे त्यांना रुपये 3,63,632/- हजार प्रदान करणे आवश्यक असतांना त्यांना रुपये 4,01,414/- प्रदान झाले असल्यामुळे रुपये 37,782/- ज्यादा प्रदान झाले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 124 अन्वये मक्तेदाराकडे सोपविण्यात आलेले प्रत्येक कामाचे कार्यादेश पुस्तक ठेवावे व त्यामधे कार्यकारी अभियंता यांचे आदेश, कामातील बदल, सुचना, दुरुस्ती यांच्या नोंदी घेणेबाबत निर्देश आहेत. सदर बुक ठेवण्यात आलेले नाही व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 नुसार बांधकाम पुर्ण करण्याआधी किंवा बांधकामात रचनात्मक फेरबदल करावयाचे असतील, तेव्हा व जादा खर्च संभाव्य असेल त्यावेळी वरिष्ठ प्राधिका-याच्या पुर्व परवानगीशिवाय बांधकाम करु नये. तसेच नियम 153/1 नुसार मान्यताप्राप्त अंदाजात दिलेल्या विनिर्देशानुसार बांधकाम काटेकोरपणे पार पाडावयाचे असतांना तसे केल्याचे आढळत नाही. त्यामुळे ज्यादा केलेला खर्च वसुली पात्र आहे. लेखा शाखेत देयके सादर करतांना देयकाची योग्य तपासणी न केल्यामुळे ज्यादा प्रदान झाले आहे.

3) सदर कामाची टिपणी सादर करतांना दिनांक नमुद नसणे, ज्या दिवशी कामाचा आदेश दिला, त्या दिवशी देयके सादर केले. जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक जलशी-2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक 13/03/2015 नुसार पुर्ण झालेल्या कामाचे अंतिम देयक सादर करण्यापुर्वी कामाची तपशीलवार माहिती ग्रामसभेला देणे आवश्यक आहे. जेणे करून ग्रामस्थाकडून काही तक्रार आल्यास त्या तक्रारीप्रमाणे काम झाल्याची खात्री करणे शक्य होईल. ग्रामसभेला न कळविल्यामुळे काम झाले किंवा कसे, याबाबत खात्री पटत नाही.

4) उदग्रहणक्षेत्रातील गौण खणिज वापरल्याबाबत रुपये 70.68 घ.मी दराने गौण खणिजाचा भरणा शासन खाती भरण्यात येतो. बी शेडयुल्डमध्ये गौण खणिजाचा समावेश नसल्यामुळे त्याचे वेगळे देयक सादर करून उपरोक्त प्रमाणकाचा अनुक्रमांक 2 नुसार 829.46 घमी गौण खणिजाचे रुपये 70.68 घ.मी दराने रुपये 58,626/- वेगळे देयक सादर करून भरणा केल्याचे आढळून आले. गाव तलाव दुरुस्तीसाठी कंत्राटदाराने उदग्रहण क्षेत्राबाहेरून गौण खणिज आणल्याचे दर्शवून 40 कि.मी लिड घेऊन 829.46 घ.मी. त्यासाठी प्रति घमी दर रुपये 573/- प्रमाणे कंत्राटदाराला गौण खणिजापोटी रुपये 4,75,695/- उपरोक्त अनुक्रमांक 1 च्या प्रमाणकानुसार निविदेनुसार 19.20 टक्के कमी करून रुपये 3,84,362/- अदा केले. गौण खणिज उदग्रहण क्षेत्राबाहेरून आणले असल्यास त्याच्या गौण खणिजाच्या पासेस असणे आवश्यक आहे. त्यामुळे रुपये 3,84,362/ ची वसुली करावी.

गौण खनिजाच्या पासेस नसल्यामुळे गौण खणिज अवैधरित्या उत्खनन करून वापरल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 कलम 48(7) व अधिसुचना महसुल व वन विभाग, दिनांक 12/06/2015 नुसार झालेल्या सुधारणेनुसार गौण खणिजाचे अवैधरित्या उत्खनन केल्यास गौण खनिजाची बाजारभावाच्या दराच्या प्रति ब्रासच्या पाचपट किमंत वसुल करणे आवश्यक आहे. (829.75 घमी) 293 ब्रास गौण खणिज अवैधरित्या उत्खनन केले म्हणून महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 कलम 48 नुसार तसेच जिल्हा अधिकारी, अकोला यांचे परीपत्रक क्रमांक कक्ष 29/खणिकर्म/कावि583/2016, दिनांक 05/04/2016 नुसार दिनांक 26/08/2015 अहवालानुसार अकोला जिल्हयातील मेटल बाजार मुल्य प्रति ब्रास रुपये 2,000/ असून बाजारभावाच्या पाचपट प्रति ब्रास रुपये 10,000/- प्रमाणे 293 ब्रासची दंडाची वसुलीबाबत कार्यवाही जिल्हा अधिकारी, अकोला यांचा अभिप्राय घेऊन करावी.

5) शेतक-यांना सुलभतेने व आवश्यक्तेनुसार न्याय्य पाण्याचे वाटप मिळण्यासाठी लाभधारकांना सहभागी करून लधुपाटबंधारे प्रकल्पाच्या क्षेत्रात महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/जल1, दिनांक 31/06/2000 नुसार लाभधारकाची पाणीवापर संस्था स्थापन केली नसल्याचे निदर्शनास आले.

**3.372 कोल्हापुरी बंधारा भंडारज बुद्रुक यांचे विशेष देखभाल व दुरूस्तीच्या कामावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** याबाबत रक्कम रूपये 4,49,807/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाची नस्तीची तपासणी केली असता टिपणी नमुद केल्यानुसार 7 कंत्राटदारांना निविदेत भाग घेतला होता. सर्वात कमी दराची निविदा श्री.वरणकार याची अंदाजपत्रकिय दरापेक्षा 20.11 टक्के ज्यादा दराने भरली होती. तसेच इतर कंत्राटदाराच्या निविदा लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे सदर निविदा धारक निविदा भरण्यास पात्र होते किंवा कसे, याची खात्री पटत नाही.

2) कंत्राटदाराला कामाचे आदेश दिले होते. परंतु, त्याने काम करण्यास नकार दिला. काम नाकारल्यानंतर त्याचे नाव काळ्या यादी टाकून अनमात ठेव जप्त न करता कार्यालयाचे पत्र क्रमांक 1128 दिनांक 14/07/2015 नुसार त्याच कंत्राटदाराला कामाचे पुन्हा आदेश निविदा उघडल्यानंतर दोन महिने उशीरा दिले.

3) काम पुर्ण झाले नसतांना कंत्राटदार श्री.वरणकार यांना दिनांक 16/07/2016 रोजी एफ.डी.आर. परत केला.

4) दिनांक 31/03/2016 पर्यंत कार्यकारी अभियंता यांनी कामाची तपासणी केल्याची नोंद मोजमाप पुस्तिकेत नाही. कामाचे अंदाजपत्रक उपलब्ध न झाल्यामुळे अंदाजाप्रमाणे काम झाल्याबाबत खात्री पटली नाही.

5) गौण खणिज रेतीच्या एकूण 13 पासेस असून त्यापासेसवर 26 ब्रास रेती आणल्याचे नमुद आहे. जिल्हा खणिकर्म विभाग, अकोला यांचेकडून रेतीच्या लिलावधारकांना बारकोड असलेल्या गौण खणिजाच्या पासेस दिल्या असून त्यावर फक्त 1 ब्रास नमुद असते. या मध्ये दोन ब्रास कशा नमदु केल्या? तसेच सदर पासेस हया रेतीच्या नसून गौण खणिज रेती 26 ब्रास अवैधरित्या आणल्याचे आढळून आले. 26 ब्रासच्या रॉयल्टीच्या रेतीच्या वेगळया रंगाच्या मुद्रांकीत असलेल्या पासेस उपलब्ध झाल्या नाही. त्यामुळे 26 ब्रासचे अवैधरित्या उत्खनन करून वापर केला असल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 कलम 48(7) व अधिसुचना महसुल व वन विभाग दिनांक

12/06/2015 नुसार झालेल्या सुधारणेनुसार गौण खणिजाचे अवैधरित्या उत्खनन केल्यास गौण खणिजाची बाजारभावाच्या दराच्या प्रति ब्रासच्या पाचपट किमंत वसुल करणे आवश्यक आहे.

रेती 26 ब्रासचे अवैधरित्या उत्खनन केले म्हणून महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 कलम 48 नुसार तसेच जिल्हा अधिकारी, अकोला यांचे परीपत्रक क्रमांक कक्ष 29/खणिकर्म/कावि 583/2016, दिनांक 05/04/2016 नुसार दिनांक 26/08/2015 पासून अकोला जिल्हयातील रेतीचे बाजार मुल्य प्रति ब्रास रुपये 3,000/ असून बाजारभावाच्या पाचपट प्रति ब्रास रुपये 15,000/- प्रमाणे 26 ब्रासच्या दंडाच्या वसुलीबाबत जिल्हा अधिकारी यांचा अभिप्राय घेऊन वसुलीची कारवाई करण्यात यावी. तसेच देयके न तपासताच प्रदान करणा-या कर्मचारी / अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात यावी.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146, 147 व 148 नुसार करारनामा करणे आवश्यक असतांना सदर करारनाम्या कामाचा संपूर्ण तपशिल नमुद करणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

7) कार्यक्रमाच्या प्रभावी अमलबजावणी करीता व कामाची गुणवत्ता राखण्यासाठी कामाची अमंलबजावणी पारदर्शक होण्याच्या दृष्टीने जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक कमांक जलशी-2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक 13/03/2015 नुसार quality control monitor यांचे मार्फत कामाचे दोन वेळा समवर्ती मुल्यमापन होणे आवश्यक असतांना ते केले नाही.

8) जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जलशी-2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक 13/03/2015 नुसार पुर्ण झालेल्या कामाचे अंतीम देयक सादर करण्यापुर्वी कामाची तपशीलवार माहिती ग्रामसभेला देणे आवश्यक असतांना जेणेकरून ग्रामस्थाकडून काही तक्रार आल्यास, त्या तक्रारी प्रमाणे काम झाल्याची खात्री करणे. ग्रामसभेला न कळविल्यामुळे काम झाले किंवा कसे, याबाबत खात्री पटत नाही.

**3.373 भुसंपादन प्रकरणी वाढीव मोबदला अदा करण्यातील अनियमीतता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,41,24,282/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाकडे असलेले एकुण प्रकल्प किती आहेत त्यांची नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे

i) विभागाकडील एकुण प्रकल्प, प्रकल्प नुसार आवश्यक असलेली जमीन, ii) अधिग्रहीत केलेली जमीन, iii) आतापर्यंत किती जमीनीचा मोबदला अदा केलेला आहे याबाबत नोंदी घेतलेल्या असणे आवश्यक असतांना याप्रमाणे प्रकल्पाची नोंदवही ठेवलेली नाही. सबब विभागाने जमीन संपादीत केल्याबाबतचा त्यांचे क्षेत्राबाबतचा अभिलेख ठेवलेला नाही. त्यामुळे जमीन मोबदला, वाढीव मोबदला कशाचे आधारे अदा करण्यात येतो? याची तपासणी कराता येत नाही.

2) भुसंपादन प्रकरणी पाझर तलाव दुधखेडा 1/47/2009-10 व्यतिरिक्त इतर नस्तीमध्ये जमीन संपादीत करणे बाबतचा प्रस्ताव अधिनीयम 18/4 भाग-2 नुसार जोडलेला नाही. त्यामुळे कामास आवश्यक जमीन सदर प्रकरणी प्रशासकीय मंजुरी, तांत्रिक मंजुरी आदेश कामाकरीता निधीची मंजुरी, अंदाजपत्रकीय तरतुद याबाबत माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. स्थायी समिती मंजुरी जमीनीचे 7/12 उतारे नाहीत. जमीन देण्यास संबंधीत कास्तकाराचे त्यांचे स्वाक्षरीसह असलेले संमती पत्र संबंधीत नस्तीमध्ये आढळुन आलेले नाही.

3) विभागाकडुन जिल्हाधिकारी / भुसंपादन अधिकारी यांना प्रस्ताव सादर झाल्यानंतर व भुसंपादन अधिकरी यांनी भुसंपादन अधिनीयम 1984 नुसार आवश्यक ती कार्यवाही केल्यानंतर जिल्हा परीषदेस जमीन उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र जमीन अधिग्रहीत केल्यानंतर जमीनीच्या ताबा पावत्या नाहीत.

4) दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर यांना रक्कम प्राप्त झाल्याची शासकीय पोच पावती नमुना 1 प्राप्त करवुन घेतेलेली नाही.

5) भुसंपादन वाढीव मोबदला संबंधित शेतकऱ्यांना रक्कम प्राप्त झाल्याची पोच पावती नमुना 10 बरेच प्रकरणी नस्ती मध्ये लावण्यात आलेली नाही.

6) गाव तलाव डव्हा भुसंपादन प्रकरण 3/47/97-98 चे अंतिम निवाडा चे प्रतीची तपासणी केली असता निवाड्यामध्ये त्र्यंबक सोनाजी इंगळे यांचे नाव आहे. मात्र वाढीव मोबदला किसन सोनाजी इंगळे यांचे नावे प्रमाणक क्रमांक 1235 दिनांक 31/03/2016 अन्वये अदा केलेली आहे. तसेच उपविभागीय अधिकारी भुसंपादन वाशिम यांचे पत्र क्रमांक 1444 दिनांक 21/06/2014 मध्ये किसन सोनाजी इंगळे यांना वाढीव मोबदला देणे करीता फरकाची रक्कम न्यायालयात जमा करणे बाबत विभागास पत्र दिलेले आहे. मात्र सदर पत्रामध्ये भुसंपादन प्रकरणाचा उल्लेख नाही. सबब अदा केलेली रक्कम योग्य व्यक्तीस अदा केल्याची खात्री आवश्यक तो अभिलेख उपलब्ध करुन खात्री पटवावी. अन्यथा रक्कम वसुल करण्यात यावी.

7) गाव तलाव मोहजा इंगोले भुसंपादन प्रकरण 11/47/97-98 प्रकरणात वाढीव मोबदला प्रकरणी सहाय्यक सहकारी अभियोक्ता यांनी 30/12/2014 रोजी झालेल्या वाढीव निकाला विरोधात महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, नागपुर यांचेकडे अपील करणे बाबत नमुद केलेले आहे. विशेष भुसंपादन अधिकरी पत्र क्रमांक 2762 दिनांक 20/12/2015 अन्वये सदर प्रकरणात विधी व न्याय विभाग नागपुर यांचेकडुन वाढीव मोबदला प्रकरणी अभिप्राय घेणेबाबत सुचीत केलेले असतांना याप्रमाणे विधी व न्याय विभागाचा अभिप्राय प्राप्त करवुन न घेताच वाढीव मोबदला रक्कम अदा केलेली आहे.

8) भुसंपादन प्रकरणी 6 शेतकऱ्यांची जमीन संपादीत केलेली असतांना वाढीव मोबदला करीता 11 शेतकरी कसे न्यायालयात गेलेले आहेत? खुलासा करावा. वाढीव मोबदला प्रकरणी जमीनीचे क्षेत्रफळ मुळ संपादनापेक्षा वाढवुन दाखविलेले आहे. जमीनीचे क्षेत्रफळ कसे वाढलेले आहे खुलासा करावा. याबाबत सुधारीत निवाडा तयार केलेला असल्यास तो नस्ती मध्ये आढळुन आलेला नाही. तरी सदर प्रकरणी खात्री करुन एकुण शेतकरी संख्या, तसेच त्यांची संपादीत केलेली जमीन याबाबत आवश्यक तो अभिलेख अनुपालनार्थ सादर करावा. जादा प्रदान झालेले असल्यास रक्कम वसुल करुन योग्य शासन शिर्षकी भरणा दर्शवुन अनुपालन सादर करावे.

**3.374 कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा नावली ता.रीसोड जि.वाशीम बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 25,88,132/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 नूसार निविदेच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व करार करून घेणा-याच्या स्वाक्ष-या आवश्यक आहेत. परंतु, करारनामा करणा-या सोबत तशा प्रकारचे प्रत्येक पेजवर सहया नसताना पुढील कार्यवाही का केली? खुलासा करावा.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी झालेले / कंत्राटदाराने केलेले कामाचे पांच टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, तशा प्रकारची मोजमाप पुस्तिकेवर तपासणी केल्याची नोदं नसताना देयकाची रक्कम शोधन केली आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क.44/33, दिनाक 22/12/2000 नूसार कामाचे मोजमापे नोदंविताना अभियंत्याने दिनाकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतू, अशी कार्यवाही केली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1099/प्र.क्र.59/135, दिनांक 31/01/2000 नुसार बांधकामावर साहित्य वापरण्यापूर्वी गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून साहित्याची चाचणी करणे आवश्यक आहे. साहित्य वापरण्यापूर्वी चाचणी केली नाही. याबाबत खुलासा करून पूर्तता दाखविण्यात यावी.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंद नोंदवही नमुना 23 मध्ये घेणे आवश्यक असतांना त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) सदर कामात वापरण्यात येणाऱ्या संधनाकाचे चाचणी अहवाल 28 दिवस CURING नंतरचे असावेत. परंतु, चाचणी अहवाल 113 दिवसांचे आहेत. याबाबत खुलासा करण्यात यावा.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 128(1) नुसार कामाची मुदत संपण्यापूर्वी 15 दिवस अगोदर मुदतवाढ अर्ज करणे आवश्यक आहे. सदर कामास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांनी दिनांक03/09/2014 ते दिनांक 31/03/2015 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. परंतु, संबंधित कंत्राटदाराचा मुदतवाढ अर्ज लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार मोजमाप नोंदवहीवर दुबार प्रदान टाळण्यासाठी मोजमापाच्या पानावर कर्णरेषा मारून रद्द करून व मोजमाप नोंदवहीमध्ये प्रमाणक क्रमांक व दिनांकासह लाल शाईने पृष्ठांकन करण्यात येऊन संबंधितास रक्कम अदा करणे आवश्यक आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही न करण्याबाबतचा खुलासा करण्यात यावा. यामुळे संबंधितास दुबार प्रदान होण्याची शक्यता नकारता येते नाही. तरी याबाबत खुलासा करून अनुपालन दर्शविण्यात यावे.

9) ग्रामविकास व जल संधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33 दिनांक 21/12/2000 नुसार काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तकेत नोंदवणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे सदर कामाचे मोजमाप पुस्तकेत काम पूर्णत्वाचा दाखला नोद्विलेला नाही.

**3.375 कोल्हापुरी बंधारा गोवर्धन ता.रिसोड बांधकाम करणे अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,11,63,989/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे देयका मधून मातीचे काम केल्यामुळे रककम गौण खनीजची रककम कपात केल्याचे दाखविले आहे. मातीचे काम करण्यापूर्वी तहसिलदाराचे परवाणगी घेणे आवश्यक होते. परंतू, तशा प्रकारची मंजूरी नसल्यामूळे मोजमाप पुस्तिकाप्रमाणे मातीचे काम झाले किंवा कसे, खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व करार करून घेणा-याच्या स्वाक्ष-या आवश्यक आहेत. परंतू, करारनामा करणा-या सोबत तशा प्रकारचे प्रत्येक पेजवर सहया नसताना पूढील कार्यवाही का केली? खुलासा करावा.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी झालेले / कंत्राटदाराने केलेले कामाचे पांच टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. परंतू, तशा प्रकारची मोजमाप पुस्तिकेवर तपासणी केल्याची नोंद नसताना देयकाची रक्कम शोधन केली आहे.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क.44/33 दिनांक 22/12/2000 नूसार कामाचे मोजमापे नोदंविताना अभियंत्याने दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतू, अशी कार्यवाही केली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1099/प्र.क्र.59/135, दिनांक 31/01/2000 नुसार बांधकामावर साहित्य वापरण्यापूर्वी गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून साहित्याची चाचणी करणे आवश्यक आहे. साहित्य वापरण्यापूर्वी चाचणी केली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंद नोंदवही नमुना 23 मध्ये घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार मोजमाप नोंदवही वर दुबार प्रदान टाळण्यासाठी मोजमापाच्या पानावर कर्ण रेषा मारून रद्द करून व मोजमाप नोंदवहीमध्ये प्रमाणक क्रमांक व दिनांकासह लाल शाईने पृष्ठांकन करण्यात येऊन संबंधितास रक्कम अदा करणे आवश्यक आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही न करण्याबाबतचा खुलासा करण्यात यावा. यामुळे संबंधितास दुबार प्रदान होण्याची शक्यता नकारता येते नाही.

8) महाराष्ट्र शासन, लघुपाटबंधारे विभाग, परिपत्रक क्रमांक आयडब्ल्यू-2264/18106/एलआय दिनांक 06/08/1976 नुसार पाणी उपसा संदर्भात ऑइल इंजिनचे लॉगबूक ठेवण्यांत आले नाही. त्यामुळे, पाणी उपसा संदर्भात अदा केलेली रक्कम मान्य करता येत नाही.

**3.376 कोल्हापुरी बंधारा पेनबोरी तालुका रिसोड जिल्हा वाशीम बांधकाम करणे अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रूपये 26,99,112/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 नूसार निविदेच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व करार करून घेणा-याच्या स्वाक्ष-या आवश्यक आहेत. परंतू, करारनामा करणा-या सोबत तशा प्रकारचे प्रत्येक पेजवर सहया नसताना पुढील कार्यवाही का केली? खुलासा करावा.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी झालेले / कंत्राटदाराने केलेले कामाचे पांच टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. परंतू, तशा प्रकारची मोजमाप पूस्तिकेवर तपासणी केल्याची नोदं नसताना देयकाची रककम शोधन केली आहे.

3) ग्रामविकास व जल संधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार कामाचे मोजमापे नोदंविताना अभियंत्याने दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतू, अशी कार्यवाही केली नाही.

4) सदर कामाचे नस्तीप्रमाणे दिनांक 06/02/2014 रोजी कंत्राटदाराला दर वाटाघाटी करीता बोलविण्यात आल्याचे नमूद केले आहे. परंतू, सदर कामाचे प्राकलन/करारनामा नस्तीवर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी वाटाघाटी केल्याचे आढळून आले नाही.

5) कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्रमांक 383 दिनांक 10/02/2015 अन्वये संबधित कंत्राटदार यांचे विरूध्द सदरचे काम विहीत मूदतीत काम पूर्ण न केल्यामूळे कामाच्या विलंबाबाबत प्रशासकीय मान्यतेचे 01 टक्के इतक्या रककमेचे दंड आकारणी करण्यात यावी. तसेच काम विहीत मूदतीत पूर्ण करून घेण्याची जबाबदारी शाखा अभियंता व उपविभागीय अभियंता यांची होती. जबाबदारी पार न पाडल्यामूळे संबधितावर कार्यवाही करणेचे प्रस्ताव सादर केले. परंतू, संबधितावर कोणती कार्यवाही केली? या बाबत खूलासा झाला नाही.

6) सदर कामात वापरण्यात येणाऱ्या संधनाकाचे चाचणी अहवाल 28 दिवस CURING नंतरचे असावेत परंतु चाचणी अहवाल 128 दिवसांचे आहेत.याबाबत खुलासा करण्यात यावा.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक व्ही.पी.एम/1099/प्र.क्र54/08, दिनांक 20/05/1999 तसेच शासन निर्णय क्रमांक स्थानिक विकास कार्यक्रम 369/1145 दिनांक 28/11/2003 अन्वये रककम रूपये 20 हजार वरील कामाचे ठिकाणी माहीतीचे फलक लावणे आवश्यक आहे. परंतू, सदर कामाची ठिकाणी बांधकाम संदर्भात माहीतीचे फलक लावण्यात आले नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 128(1)नुसार कामाची मुदत संपण्यापूर्वी 15 दिवस अगोदर मुदतवाढ अर्ज करणे आवश्यक आहे. सदर कामास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशीम यांनी मुदतवाढ दिली आहे. परंतु, संबंधित कंत्राटदाराचा मुदतवाढ अर्ज लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंद नोंदवही नमुना 23 मध्ये घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार मोजमाप नोंदवहीवर दुबार प्रदान टाळण्यासाठी मोजमापाच्या पानावर कर्णरेषा मारून रद्द करून व मोजमाप नोंदवहीमध्ये प्रमाणक क्रमांक व दिनांकासह लाल शाईने पृष्ठांकन करण्यात येऊन संबंधितास रक्कम अदा करणे आवश्यक आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही न करण्याबाबतचा खुलासा करण्यात यावा. यामुळे संबंधितास दुबार प्रदान होण्याची शक्यता नकारता येते नाही. तरी याबाबत खुलासा करून लेखापरिक्षणास पूर्तता करून दर्शविण्यात यावे.

**3.377 मौजे शरद पाझर तलावाचे बांधकामाच्या अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 12,99,373/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखापरीक्षण कालावधीत प्रथम देयक प्रमाणक क्रमांक 2461/23/05/2016 ला अदा करण्यात आले असुन सदर काम अपुर्ण असल्याचे दिसुन आले.

2) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक लपायो 2001/प्र.क्र.104/जल01/ग्राविवि/जसंवि, दिनांक 01/01/2002 मधील क्रमांक 5 अन्वये तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास-1001/प्र.क्र.60/38, दिनांक 18/08/2001 नुसार बांधकामाचे देयक मुजुर करतांना त्या बांधकामाचा गुणनियंत्रण चाचणी अहवाल गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत घेवुन देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. देयकासोबत चाचणी अहवाल नसल्याने सदर बांधकाम योग्य दराचे झाल्याबाबत खात्री पटत नाही. सदर बांधकामावर वापरण्यात येणारे साहित्य कामावर वापरण्यापुर्वी चाचणी करणे आवश्यक आहे. परंतु चाचणी अहवाल नस्तीला आढळुन आला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 167 व 168 अन्वये तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास-1001/प्र.क्र.60/38, दिनांक 18/08/2001 अन्वये कार्यकारी अभियंता / उपअभियंता यांनी कामाची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु कामाची तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी आढळुन आली नाही.

4) कार्यारंभ आदेशानुसार सदर कामाचे देयकातुन 3 टक्के सुरक्षा ठेव रुपये 38,981/- कपात करणे आवश्यक असतांना प्रथम देयकातुन 2 टक्के सुरक्षा ठेव रुपये 23,635/- कपात केली आहे. त्यामुळे उर्वरीत सुरक्षा ठेव रक्कम रुपये 15,346/- वसुलपात्र ठरते.

5) कार्यारंभ आदेशानुसार सदर काम पुर्ण करण्याचा कालावधी दिनांक 19/07/2014 ते 19/07/2015 आहे. सदर कालावधीत काम पुर्ण झाले नसुन पत्र क्रमांक 696, दिनांक 31/03/2016 अन्वये मुदतवाढ देण्यात आली. काम पुर्ण करण्याचा कालावधी संपल्यावर तब्बल 8 महिन्यानंतर मुद्दतवाढ देण्यात आली. सदर कालावधीतील दंडनिय व्याजाची रक्कम वसुल करावी.

6) सदर प्रथम देयकामधुन 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना रुपये 19,140/- कपात करण्यात आला. उर्वरीत रक्कम रुपये 6,847/- वसुल करावे.

7) विक्रीकर कपात 2 टक्के रुपये 25,987/- वसुल करणे आवश्यक असतांना रुपये 17,040/- कपात करण्यात आली. रुपये 8,947/- वसुल करणे आवश्यक आहे.

**3.378 मौजे सावरगाव बंगला साठवण तलाव तालुका पुसद जिल्हा यवतमाळ येथील बांधकामात झालेल्या अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 38,20,847/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर काम शेडयुल दरापेक्षा -22.61 कमी दराने मंजुर करण्यात आले असुन कामाचा दर्जा व गुणवत्ता राखणे महत्वाचे आहे. तसेच कंत्राटदाराने परिशिष्ठ ब मधील नमुद बाबनिहाय दरपृथ:करण सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे दरपृथ:करण सादर केल्याचे दिसुन आले नाही. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत व गुणवत्तेबाबत सांशकता निमार्ण होते.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 2001/प्र.क्र.104/जल01, दिनांक 01/01/2002 मधील क्रमांक 5 अन्वये तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक परास-1001/प्र.क्र.60/38/दिनांक 18/08/2001 नुसार बांधकामाचे देयक मुजुर करतांना त्या बांधकामाचा गुणनियंत्रण चाचणी अहवाल गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत घेवुन देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. देयकासोबत चाचणी अहवाल नसल्याने सदर बांधकाम योग्यदराचे झाल्याबाबत खात्री पटत नाही. सदर बांधकामावर

वापरण्यात येणारे साहित्य कामावर वापरण्यापुर्वी चाचणी करणे आवश्यक आहे. परंतु चाचणी अहवाल नस्तीला आढळुन आला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 167 व 168 अन्वये तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास-1001/प्र.क्र.60/38, दिनांक 18/08/2001 अन्वये कार्यकारी अभियंता / उपअभियंता यांनी कामाची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु कामाची तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी आढळुन आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम 152(3) नुसार 10 टक्के पेक्षा कमी दराच्या निवीदा प्राप्त झाल्यास सदर निवीदा प्रकरणी reduced rate ने अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाची निवीदा - 22.81 टक्के कमी दराची असल्याने सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु त्यानुसार कार्यवाही केल्याचे आढळुन आले नाही.

5) कार्यारंभ आदेशानुसार सदर काम पुर्ण करण्याचा कालावधी दिनांक 18/04/2013 ते 17/04/2014 आहे. सदर कालावधीत काम पुर्ण झाले नसुन जिल्हा परिषद, सिंचन विभाग यवतमाळ यांचे पत्र क्रमांक 2470, दिनांक 30/11/2015 नुसार दिनांक 18/04/2014 ते 02/11/2015 या कालावधीकरीता प्रतिदिन 50/- रुपये याप्रमाणे दंड आकारुन मुदतवाढ देण्यात आली. तसेच कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, यवतमाळ यांचे पत्र क्रमांक 2010, दिनांक 31/03/2016 पर्यंत सदर काम पुर्ण केले नाही. त्यामुळे दिनांक 01/04/2016 पासुन प्रति दिन रुपये 150/- याप्रमाणे दंड आकारण्यात येण्याबाबत पत्र दिले आहे. परंतु दंड आकारण्यात आला नाही. सदर कालावधीतील दंडनिय व्याजाची रककम वसुल करावी.

6) मोजमाप पुस्तीकेवर खाडाखोड व उपरीलेखन केलेले आहे. व त्यावर स्वाक्षरी सुध्दा घेण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/2009/ प्र.क्र.40/जाक्रं 3, दिनांक 19/10/2001 अन्वये कंत्राटदारास 2 वर्ष देखभालीची हमी देण्यात यावी. त्यासाठी 10 टक्के रककम 2 वर्ष देण्यात येवू नये. असे स्पष्ट आदेश असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.379 मौजे गळव्हा, अंतरगाव क्र.1, गणोरी क्र.1, खेकडी, मंगरुळ गावातील कोल्हापुरी बंधाऱ्याकरीता उपविभाग दारव्हा अंतर्गत नवीन बर्गे बसविणे व जुने बर्गे दुरुस्त करण्यामधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,37,268/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर काम शेडयुल दरापेक्षा-5.52 टक्के कमी दराने मंजुर करण्यात आले असुन कामाचा दर्जा व गुणवत्ता राखणे महत्वाचे आहे. तसेच कंत्राटदाराने परिशिष्ट ब मधील नमुद बाबनिहाय दरपृथ:करण सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे दरपृथ:करण सादर केल्याचे दिसुन आले नाही. त्यामुळे बर्गाच्या दर्जाबाबत व गुणवत्तेबाबत सांशकता निमार्ण होते.

2) कंत्राटदाराचे vat certificate अभिलेख्यास आढळले नाही. त्यामुळे 5 टक्के vat कपात करणे आवश्यक आहे.

3) मोजमापपुस्तीकेची पडताळणी केली असता मोजमापपुस्तीकेवर प्रशासकीय मंजुरी क्रमांक दिनांक तसेच तांत्रिक मंजुरी क्रमांक दिनांक नमुद नाही.

4) गावातील कोल्हापुरी बंधा-यामध्ये जे बर्गे टाकण्यात आले किंवा काढण्यात आले. सदर काम आवश्यक असल्याबाबत ग्रामपंचायतीचा ठराव लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही. त्यामुळे सदर कामाची आवश्यकता असल्याबाबत खात्री करता आली नाही.

5) कोल्हापुरी बंधा-यावर जे बर्गे टाकण्यात आले किंवा काढण्यात आले. ते कोणाच्या ताब्यात होते. व किती होते. याबाबतची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

6) वरील कामावर बर्गे टाकण्यात आले व काढण्यात आल्याचे दर्शविण्यात आले. परंतु सदर कोल्हापुरी बंधा-यात पाणी उपलब्ध होते व त्याचा वापर सिंचनासाठी केल्याबाबत खात्री करता आली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 167 व 168 अन्वये तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परा/1001/प्र.क्र.60/38, दिनांक 18/08/2001 अन्वये कार्यकारी अभियंता / उपअभियंता यांनी कामाची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु कामाची तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी आढळुन आली नाही.

8) टाकलेले किंवा काढलेले बर्गे ग्रामपंचायत स्थळी सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय कोणत्याही कामाचे देयक अदा करु नये. असे असतांना सुध्दा प्रमाणपत्र आढळुन आले नाहीत.

**3.380 मौजे जुमडा, तालुका देऊळगांव राजा येथे पाझर तलावाचे कामावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सिचंन विभाग, जिल्हा परिषद बुलडाणा चे सन 2015-16 चे उपविभाग देऊळगांव राजा चे मुळ नस्ती देयक प्राकलन नस्तीचे लेखापरीक्षण केले असता प्रमाणक क्रमांक 2041, दिनांक 13/01/2016 अन्वये प्रथम धावते देयकान्वये रक्कम रुपये 27,65,649/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे देयकाची तपासणी केली असता वित्त विभागाने एकुण मुल्यांकनातून कमी दराची रक्कम कपात करणे आवश्यक असतांना मुल्यांकनातुन रॉयल्टीची रक्कम वजा करून त्यानंतर bleow दर कपात केला आहे. त्यामुळे संबंधीत कत्रांटदाराला जादा प्रदान झाले आहे. याची जबाबदारी निश्चित करून रक्कम रूपये 10,807/- वसुल करण्यात यावे.

2) उपरोक्त कामामध्ये दगडाचा वापर हा प्रत्यक्षात 305.11 क्यु.मी.केलेला असतांना यावर रॉयल्टीची रक्कम कपात करणे आवश्यंक असतांना प्रत्यक्षात 257.50 क्यु.मी.हिशोबात घेउन रॉयल्टी कपात केली आहे, त्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झाले आहे. उपरोक्त रॉयल्टीची कमी कपात रक्कम रूपये 3,869/- वसुल करण्यात यावे.

3) एकुण 5 निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी दोन निविदा रद्द करण्यात आल्या आहेत. परंतु कोणत्या कारणामुळे सदर निविदा रद्द केल्या याचा तपशील नस्तीमध्ये आढळला नाही.

4) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 114 नुसार जेव्हा मुळ अदांजपत्रकापेक्षा रूपये 10,000/- वा 10 टक्के ह्यापैकी जी जास्त आहे. तेवढ्याने खर्च कमी होत असेल तर सुधारीत अदांजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर काम हे 17.51 टक्के कमी दराने असल्यामुळे सुधारीत अदांजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. तसेच लेखा संहिता नियम क्रमांक 152 (3) नुसार सुधारीत प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळले नाही.

**3.381 मौजे मेढंगाव, तालुका देऊळगांव राजा येथे पाझर तलाव कामावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सिचंन विभाग, जिल्हा परिषद बुलडाणा चे सन 2015-16 चे उपविभाग देऊळगांव राजा चे मुळ नस्ती देयक प्राकलन नस्तीचे लेखापरीक्षण केले असता प्रमाणक क्रमांक 3057, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 20,80,696/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.420/ वित्त-9, दिनांक 01/06/2008 मधील शासनाने 73 व्या घटना दुरूस्तीनुसार घटना दुरूस्तीनुसार अनुसूची 11 मधील जिल्हा परीषदांना हस्तातरंण करण्याबाबत घेतलेल्या निर्णयामुळे जिल्हा परिषदेची कामाची व्याप्ती वाढली आहे. त्यामुळे निवीदा स्विकृती जलद होउन विकास कामे शिघ्रपुर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे ज्या कामांना प्रशासकीय व तांत्रीक मंजुरी मिळाली आहे. अशा कामाच्या निविदा त्वरीत काढण्यात याव्यात त्यामध्ये दिरंगाई

करण्यात येउ नये असे शासनाचे आदेश असतांना निविदा प्रसिध्दी व स्विकृतीसाठी जास्त कालावधी लागल्याने शासन आदेशाचा भंग झाला आहे. खुलासा करावा.

2) निविदेतील अटी व शर्तीनुसार कामाचा आदेश पारीत केल्यानंतर कंत्राटाराने ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार काम विहीत मुदतीत पुर्ण करण्याकरीता नियोजीत कार्यक्रम सादर करणे आवश्यक असुन त्यानुसार काम करणे बंधनकारक आहे, परंतु कंत्राटदाराने कामाचे नियोजन केल्याचे आढळत नाही.

3) उपरोक्त कामाची नस्तीची तपासणी केली असता नस्ती / टिपणी पान क्रमांक 5, दिनांक 07/10/2015 नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी निविदा स्विकृत करतांना शासन अधिसुचना दिनांक 11/05/2015 नुसार सुधारीत दराने रॉयल्टीची रक्कमं वसुल करावी असे स्पष्ट नस्तीत नमुद केले आहे. परंतु त्याप्रमाणे कारवाई केल्याचे आढळत नाही. त्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झाले आहे. तसेच सदर काम हे अधिसुचना प्रसिध्द झाल्यानंतर सुरू झाले आहे. त्यामुळे शासन महसुलाचे खालीलप्रमाणे नुकसान झाले आहे. त्याचा तपशील आहेत. कमी कपात गौण खनिजाची रक्कम रूपये 79,384/- संबंधीताकडून वसुल करण्यात यावी.

4) सदर कामातील अदांजपत्रकीय बाब क्रमांक 15 provinding laying plain c.c.1.3.6 work कामाच्या दरपृथकरणामध्ये पाण्याची वाहनावळ घेतली आहे, परंतु अशा प्रकारची तरतुद दरसुचीमध्ये आढळत नाही, या बाबतीत शासन निर्णय / परिपत्रक असल्यास लेखापरीक्षणास अनुपालनार्थ सादर करण्यात यावे. त्यामुळे त्यावर झालेला खर्च रूपये 3,002/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2010/575/2010, दिनांक 02/11/2010 अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 चे परीच्छेद क्रमांक 23 ते 46 मध्ये मुख्य अभियंता / अधिक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता / उपविभागीय अभियंता यांची कर्तव्ये विस्तृतपणे विशद केली आहे. त्याला अनुसरून कामाची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने आवश्यतेप्रमाणे स्थळपाहणी वेळोवेळी करणे आवश्यक आहे. प्रत्येक भेटीच्यावेळी भेटनोंदवहीत नोदविल्याप्रमाणे भेटीची सखोल निरीक्षण टिपणी प्रत्येक भेटीच्या वेळी देण्यात यावी. सन 2015-16 या वित्तीय वर्षात सक्षम प्राधीक-याने भेटी देउन निरीक्षण टिपण्याव्दारे दिलेल्या भेट नोदवही / निरीक्षण टिपन्या लेखापरीक्षण तपासणीत उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कामात गुणवत्ता राखण्याकरीता सक्षम प्राधीकरणाने शासन आदेशाची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे शासन आदेशाचे पालन केल्याचे आढळत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472, दिनांक 09/02/2009 मधील बाब क्रं.10 अन्वये विविध् योजनेतुन हाती घेतलेल्या कामाची माहीती ग्रामसभेस देउन खर्चाची माहीती द्यावयाची आहे. तशाप्रकारे ग्रामसभेस माहीती विवरण पत्र अ संकलीत करून देयकासोबत जोडल्याचे आढळले नाही.

**3.382 मौजा बेला, तालुका उमरेड येथील गाव तलावाचे नुतनीकरण.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 13,88,596/- खर्च करण्यात आला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे**.**

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 151 अन्वये आणि अधिनियम 1961 चे कलम 125 अन्वये प्रशासकीय मंजुरी नंतर तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक असतांना सदर कामाची प्रशासकीय मंजुरी व तांत्रिक मंजुरी एकाच दिवशी घेतली आहे.

2) सदर कामाचे अंदाजपत्रकाची तपासणी केली असता बाब क्रमांक 6 :- Providing & Laying c c pipe of I.S.N.P.Class required die meter ..............cm 1:2 etc.comp. चे दर पृथ:करणात ऊस कारखान्याचे 10 कि.मी. पर्यतच्या परीसरातील कामासाठी 5 टक्के अधिक दर द्यावयाचे असतांना 10 टक्के दिल्यामुळे रुपये 192.38 प्रती RMT जादा प्रदान झाले आहे.

उपरोक्त बाबीतील पाईपचे प्रती RMT कामासाठी रुपये 4039.98 द्यावयाचे असतांना रूपये 4232.36 दिल्यामुळे रुपये 192.38 प्रती RMT जादा प्रदान झाले आहे. रुपये 3,848/- जादा प्रदान केलेली रक्कम संबंधीताकडून वसुल करुन निधीत जमा करावे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट साहित्य-1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार सिमेंट, खडी, रेती याचा वापर करणेपुर्वी शासकीय गुणनियंत्रन प्रयोग शाळेतुन गुणवत्ता चाचणी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

4) सदर कामाचे नस्तीची तपासणी केली असता ग्रामपंचायतीचे टॅन नंबर आढळुन आले नाही. कार्यारंभ आदेश अट क्रमांक 8 नुसार ग्रामपंचायतीची देयके भुगतानासाठी ग्रामपंचायतीजवळ टॅन नंबर असणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीजवळ टॅन नंबर नसल्यास त्याचे देयकातुन 20 टक्के रक्कम कपात करावयाची असतांना विभागाने तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.383 मौजा बोथलीठाणा, तालुका उमरेड येथील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा दुरुस्ती.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत रक्कम रूपये 4,04,943/- खर्च करण्यात आला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 151 अन्वये आणि अधिनियम 1961 चे कलम 125 अन्वये प्रशासकीय मंजुरी नंतर तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक असतांना सदर कामाची प्रशासकीय मंजुरी तांत्रिक मंजुरीनंतर घेतली आहे.

2) सदर कामाची मुदत दिनांक 09/05/2015 पर्यत होती. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 184 अन्वये मुळ मुदत संपण्यापुर्वी 15 दिवस अगोदर संबधीत कंत्राटदाराने मुदतवाढीसाठी अर्ज सादर करणे आवश्यक असुन त्यानंतर अर्ज केल्यास ग्राह्य धरता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश असतांना कंत्राटदाराने मुळ मुदत संपल्यानंतर दिनांक 29/12/2015 ला मुदत वाढीसाठी अर्ज सादर केला आहे. मुळ मुदत संपल्यावर 7 महिने 20 दिवस उशिरा सादर केलेल्या अर्जाचे आधारे (शेतात पिके असल्याने बांधकाम स्थळी मजुर व साहित्य पोचविणे शक्य न झाल्यामुळे काम वेळेवर पुर्ण करता आले नाही असे कारण नमुद करुन) दिनांक 10/05/2015 ते 31/01/2016 पर्यत 267 दिवसाची अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपुर यांचे पत्र क्रमांक 168, दिनांक 13/01/2016 अन्वये नाममात्र दंड रुपये 40/- प्रति दिवस प्रमाणे रुपये 10,680/- दंड आकारुन मुदतवाढ मंजुर करण्यात आली.

कार्यारंभ आदेश दिनांक 10/02/2015 चा असुन कामाची मुदत 3 महिने दिनांक 09/05/2015 पर्यंत आहे. कंत्राटदाराने दिलेले कारण संयुक्तीक नसुन सदर कालावधीत मार्च, एप्रील, मे पर्यंत शेतात पिके राहात नसतांना कंत्राटदाराचे हलगर्जीपणामुळे उशिर झाल्याचे स्पष्ट होत आहे. तरी निविदा करारनाम्यातील अट क्रमांक 2 अन्वये उशिरा केलेल्या कामाचे बाबतीत करारनामा मुल्याचे 10 टक्के पर्यत रक्कम वसुल करुन दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतुद असतांना नाममात्र दंड रुपये 10,680/- वसुल केला आहे. तरी संबंधीताकडून करारनामा मुल्याचे 10 टक्के प्रमाणे रुपये 38,510/- वसुल करुन निधीत जमा करावे.

3) काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावर काम पुर्ण केल्याची दिनांक 31/12/2015 दर्शविलेली असुन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक 13/01/2016 चे पत्रानुसार दिनांक 10/05/2015 ते 31/01/2016 पर्यंत 267 दिवसाची मुदतवाढ दिलेली असतांना मुदतवाढ देण्याचे आधी काम पुर्ण झाल्याचे दाखविले आहे.

4) बंधारा हस्तांतरणाबाबत ताबा पावतीची तपासणी केली असता, ताबा पावतीवर सरपंच व सचिव, ग्रामपंचायत बोथलीठाणा यांची स्वाक्षरी असुन जावक क्रमांकचा स्टॅम्प मारलेला आहे. परंतु त्यावर जावक क्रमांक व दिनांक नमुद नाही. त्यामुळे ग्रामपंचायतकडे हस्तांतरण केव्हा झाले याबाबत खात्री करता आली नाही.

**3.384 सुकळी (स्टे.) येथील जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत कोल्हापुरी बंधारा दुरुस्ती कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** प्रमाणक क्रमांक 436, दिनांक 29/07/2015 अन्वये रक्कम रुपये 1,50,148/- जिल्हा निधीच्या रोख पुस्तकात खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलअ-2014/प्र.क्र.203/जल-7, दिनांक 05/12/2014 मधील मुद्दा क्रमांक 24 नुसार कामाचे मुल्यमापन त्रयस्थ संस्थेकडून करणे आवश्यक असतांना कामाचे मुल्यमापन त्रयस्थ संस्थेकडून करण्यात आले नाही.

2) सदर कामासाठी गिट्टी व रेतीचा वापर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक साहित्य/1099/प्र.क्र.65/35, दिनांक 30/06/2006 नुसार बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी करणे आवश्यक असतांना कार्यवाही केलेली नाही.

3) प्रशासकीय मान्यता अट क्रमांक 20 नुसार साठवन बंधारे या कामात गाळ काढण्याचे काम सुरु करण्यापुर्वी संबंधीत पाणी वापर संस्था यांच्या सुचना विचारात घेवून काम पुर्ण करणे आवश्यक असतांना पाणी वापर संस्था यांच्या सुचना विचारात न घेता काम पुर्ण करण्यात आले.

4) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलअ-2014/प्र.क्र.203/जल-7, दिनांक 05/12/2014 मधील मुद्दा क्रमांक 22 नुसार जलयुक्त शिवार अभियानाची फलनिष्पती निश्चित करतांना कामापुर्वीची व कामानंतरची परिस्थिती व कामाचे GIS Based डिजीटल फोटोग्राफ्स (अंक्षास व रेखांश सह) काढणे आवश्यक असतांना लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेल्या नस्तीत फोटोग्राफ्स (अंक्षास व रेखांश सह) आढळून आले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 नियम 166(अ)(3)(सहा) काम प्रत्यक्ष पुर्ण केल्याचा दिनांक नमुद करणे आवश्यक असतांना काम प्रत्यक्ष पुर्ण केल्याचा दिनांक काम पुर्ण प्रमाणपत्रावर नमुद करण्यात आला नाही. त्यामुळे काम विहित मुदतीत झाले किंवा नाही याची पडताळणी करता आली नाही.

**3.385 वायगांव-3 (महादेव तलाव) येथील जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत गाळ काढणे कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** प्रमाणक क्रमांक 663, दिनांक 11/08/2015 अन्वये रक्कम रुपये 94,280/- जिल्हा निधीच्या रोख पुस्तकात खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलअ-2014/प्र.क्र.203/जल-7, दिनांक 05/12/2014 मधील मुद्दा क्रमांक 24 नुसार कामाचे मुल्यमापन त्रयस्थ संस्थेकडून करणे आवश्यक असतांना कामाचे मुल्यमापन त्रयस्थ संस्थेकडून करण्यात आले नाही.

2) प्रशासकीय मान्यता अट क्रमांक 3 नुसार वरिष्ठ भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, वर्धा यांचेकडून अभिप्राय / प्रमाणपत्र घेतल्यानंतरच कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात यावे असे नमुद असतांना वरिष्ठ भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, वर्धा यांचेकडून अभिप्राय / प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

3) प्रशासकीय मान्यता अट क्रमांक 20 नुसार साठवन बंधारे या कामात गाळ काढण्याचे काम सुरु करण्यापुर्वी संबंधीत पाणी वापर संस्था यांच्या सुचना विचारात घेवून काम पुर्ण करणे आवश्यक असतांना पाणी वापर संस्था यांच्या सुचना विचारात न घेता काम पुर्ण करण्यात आले.

4) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलअ-2014/प्र.क्र.203/जल-7, दिनांक 05/12/2014 मधील मुद्दा क्रमांक 22 नुसार जलयुक्त शिवार अभियानाची फलनिष्पती निश्चित करतांना कामापुर्वीची व कामानंतरची परिस्थिती व कामाचे GIS Based डिजीटल फोटोग्राफ्स (अंक्षास व रेखांश सह) काढणे आवश्यक असतांना लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेल्या नस्तीत फोटोग्राफ्स (अंक्षास व रेखांश सह) आढळून आले नाही.

**3.386 तलाव खोलीकरणासाठी मशिन भाडयाने घेण्यातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत 6 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 56,93,160/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाअधिकारी हयांच्या अध्यक्षेतेखाली 29/05/2015 झालेल्या सभेमध्ये गाळ काढण्याकरीता पोकलँडचे वापर करण्याची परवानगी दिली परंतु वाहतुक लोकसहभागातुन करण्याचे निर्देश दिले असे असतांना सुध्दा वाहतुकीसाठी 9 टिप्पर लावून त्यांचे पेमेंट जिल्हानिधी मधून करण्यात आले त्यामुळे जिल्हाधिकारी हयांच्या निर्देशाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेपिऐ-2009/प्र.क्र.514/ वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार रुपये 4,700/- मुद्रांक शुल्क आकारून करारनामा करणे आवश्यक होते परंतु रुपये 500/- च्या मुद्रांकावर करारनामा करण्यात आला त्यामुळे रुपये 4,200/- वसूलीपात्र ठरते.

3) शासन परिपत्रक क्रमांक झेडपीऐ-2008-प्रक्रं428-वित्त 9, दिनांक 30/12/2008 नुसार कोऱ्या निविदा संचाचे विक्रिचे दर रुपये 50 लाख ते 2 कोटीच्या कामापर्यंत रुपये 5,000/- आकारण्यात यावी असे नमूद आहे. परंतु कंत्राटदाराने निविदा शुल्क रुपये 500/- भरलेले आहे. त्यामुळे रुपये 4,500/- संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावे.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 144 नुसार सर्वसाधारणपणे अंदाजपत्रकानुसार 5 टकके रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून ठेवण्यात येईल असे नमूद आहे. परंतु लघुपाटबंधारे विभागाकडून संबंधित कंत्ारटदाराकडून 5 टक्के सुरक्षा अनामत रक्कम ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे रुपये 2,84,658/- संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करारनाम्यातील अटी शर्तीनूसार 5 वर्षाकरीता ठेवण्यात यावे.

5) तलाव खोलीकरणासाठी मशिन भाडयाने घेणेकरीता ई-निविदा काढून कंत्राटदार श्री संजय पोहरकर हयांचे 3 पोकलँड व 9 टिप्पर यांचे दर स्विकुत करण्यात आले. लघुपाटबंधारे विभागाकडून हि निविदा मागवितांना पोकलँड 200 व टिप्पर 10 टनाचे मागविण्यात आले परंतु या कंत्राटदाराचे दर स्विक़त करण्यात आले त्या कंत्राटदाराकडे पोकलँड 200 टनाचे नसतांना सुध्दा त्याचे दर स्विकुत करून त्याला नियमबाहयरित्या काम देण्यात आले. प्रत्यक्ष कंत्राटदाराकडे हिताची एक्स 70 व जेसीबी जिएस-140 हे पोकलँड आहे.

**3.387 जलयुक्त शिवार योजनेतंर्गत नाला बांध व नाला खोलीकरण मौजा कवलेवाडा येथिल अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 14,29,448/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रक तयार करतांना exacavation in soft murum हया ॲटममध्ये कठीण मुरुम खोदकामाचे दर घेउन प्रति क्युबिक मिटर रुपये 10.85 अधिक प्रदान करण्यात आलेले आहे. संबंधित कामामध्ये exacavation in soft murum हया ॲटमवर 1964.29 क्युबीक मीटर ऐवढे काम दाखविण्यात आलेले आहे. म्हणजेच रुपये 21,313/- संबंधित कंत्राटदाराला अधिक प्रदान करण्यात आलेले आहे.

2) अंदाजपत्रकामध्ये सुरवातीला खोदकाम केलेले साहित्य 30 मिटर पर्यंत लिड दाखविण्यात आले आहे. परंतु त्याच खोदकाम केलेल्या उपलब्ध साहित्यापासून साईडबंड बांधकाम करतांना मात्र 150 मिटर लिड दाखविण्यात आलेली आहे. सिएसआर 13-14 दराप्रमाणे 30 मिटरचे दर 7.75 रुपये आहे. तर 150 मिटरचे दर 28.70 रुपये आहे म्हणजेच प्रति क्युबिक मिटर 20.95 रुपये अधिक प्रदान करण्यात आलेले आहे. सदर कामामध्ये गाईड बंड बांधकामावर 756.52 परीमाण दाखविण्यात आलेले आहे. म्हणजेच रुपये 15,849/- रुपये अधिक प्रदान करण्यात आलेले आहेत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, ई-निविदेमध्ये सेक्शन 1 मुद्दा 2 अन्वये The cost of clearance as specified above is deemed to be include in the item of exacavation असे नमूद असतांना सुध्दा साईड क्लिअरंन्स करीता रुपये 264 खर्च करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर रक्कम वसूलीपात्र ठरते.

4) अधिक्षक अभियंता यांचे पत्र दिनांक 17/04/2015 अन्वये ज्या निविदा 10 टक्के पेक्षा कमी दराने मंजूर करण्यात आलेले आहेत त्यांचेकडून प्रति लाखामागे 1 टक्के हयाप्रमाणे परफॉरम्न्स सिक्युरिटी कपात करण्यात यावी परंतु संबंधित कंत्राटदाराचे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 13.99 टक्कयांनी कमी असून सुध्दा परफॉरम्न्स सिक्युरीटी कपात करण्यात आलेली नाही व निविदाग्राहय धरण्यात आली. त्यामुळे संबंधीत कंत्राटदाराकडून रुपये 66,814/- वसूल करून करारनाम्यातील अटी व शर्तीनूसार पाच वर्षाकरीता ठेवण्यात यावे.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 209-प्रक्र81-परा-7, दिनांक 08/06/2009 नुसार कामाचे माहीती दर्शविणारे फलक कामाचे ठीकाणी लावणे आवश्यक आहे. सदर फलकाची तरतूद अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे. परंतु वरील कामामध्ये संगणकावर एडीटींग करुन माहीती फलक तयार करून फक्त देयकासोबत संलग्न केल्याचे स्पष्ट दिसून येते म्हणजेच प्रत्यक्षकामावर माहीती फलक न लावता माहिती फलकाचे रक्कम रुपये 21,265/- उचल केल्याचे दिसून येते.

6) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148-1 नुसार मुदतवाढीसाठी मुदत संपण्यापुर्वी 15 दिवस अगोदर अर्ज देणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे संबंधित कंत्राटदाराने अर्ज न करता लघुपाटबंधारे विभागाकडून माहे ऑक्टोबर 2015 मध्ये विना दंड मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मुदतवाढ देतांना पावसाळयामुळे पाणी साचल्यामुळे काम न करता आल्यामुळे मुदतवाढ देण्याचे कारण नमूद केलेले आहे परंतु मोजमाप पुस्तिकेचे अवलोकन केले असता दिनांक 11/05/2015 ते 20/05/2015 मध्ये एकुण 70 तास डिवाटरींग करीता 5 एचपी च्या 3 मोटार लावून पाणी बाहेर काढण्याचे काम करण्यात आलेले आहे. म्हणजेच माहे जुन पर्यंत काम करण्यात आलेले आहे. त्यामुळे मुदतवाढ प्रस्तावमध्ये चुकीचे कारण नमुद करुन विना दंड मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याबाबत पुनर्विलोकन करण्यात येवुन संबंधीत कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करुन वसुलची रक्कम शासन खाती जमा करण्यात यावी.

7) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमांक जलस-2012-प्रक्रं.1/जल 7, दिनांक 12/11/2013 अन्वये सिमेंट नाला बांधाच्या काटछेदाप्रमाणे नाला तळपातळीच्या खाली पाया खोदाई कठीण खडकापर्यंत व जास्तीत जास्त 1.20 मि. घेण्यात यावी असे नमूद आहे. म्हणजेच 1.2 मिटर खोदाई कठीण खडकापर्यंत करावयाची आहे. साधारणपणे भंडारा जिल्हयामध्ये माहे एप्रिल ते जुन पाण्याची पातळी खुप खाली असते. त्यामुळे 1.20 मिटरवर मोठया प्रमाणात पाणी लागणे शक्य नाही असे असतांना सुध्दा वरील कामामध्ये 5 एचपीचे 8 मोटार पंप एकुण 441 तास दिनांक 11/05/2015 ते 20/05/2015 पर्यंत वापरण्यात आले आहे. सर्वसाधारणपणे 1 एचपी मोटार 1 तासाला 1,500 हजार लिटर पाणी काढण्याची क्षमता असतांना 5 एचपी च्या 3 मोटार 70 तास लावून कंत्राटदाराला डिवाटरींग करीता अधिकचे प्रदान केल्याचे दिसून येते.

8) अर्धसमास प्रत्र कमांक 5, दिनांक 25/11/2016 अन्वये जलयुक्तशिवार योजनेतील ज्या कंत्राटदारांना ई-निविदेव्दारे कामे मंजूर झालेले आहेत. त्या कंत्राटदाराने सादर केलेले कामाबाबतचे दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावे याबाबत मागणी करण्यात आली होती परंतु उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

**3.388 कोल्हापूर पध्दतीचा साठवन बंधारा बांधकाम मौ.म्हसवानी.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचा कार्यादेश क्रमांक 05, दिनांक 01/10/2013 अन्वये कामाचा कालावधी 12 महिने देण्यात आलेला आहे. त्याअन्वये कंत्राटदारानी दिनांक 30/09/2014 ला काम पुर्ण करणे बी-1 निविदा करारनाम्याप्रमाणे बंधनकारक आहे. सदर कंत्राटदारानी अंतरिम मोजमापाप्रमाणे व कामपुर्णत्वाच्या प्रमाणपत्रा अन्वये दिनांक 28/05/2015 ला काम पुर्ण केलेला आहे. करारनामा मान्य प्रमाणे कंत्राटदारानी दिनांक 01/10/2015 ते दिनांक 28/05/2015, 243 दिवस उशिराने काम पुर्ण केलेला आहे. विभागाने सदरची मुदतवाढ नाममात्र प्रती दिवस रुपये 6/- इतक्या दरानी मंजुर करुन देयकातुन रुपये 1,458/- दंड वसुल केलेला आहे. बी-1 निविदा करारातिल अट क्रमांक 2 प्रमाणे कंत्राटदारानी विहीत मुदतीत काम पुर्ण न केल्यास अंदाजपत्रकीय मुल्याच्या कमीत कमी 1 टक्के

जास्तीत जास्त 10 टक्के दंड आकारण्याची तरतुद असतांना विभागाने निविदा करारातील अटी प्रमाणे दंडात्मक कार्यवाही केली नाही. अंदाजपत्रकीय मुल्याच्या कमीत कमी 1 टक्के दंड रुपये 14,822/- आकारणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात रुपये 1,458/- दंड आकारल्यामुळे शासनाचे रुपये 13,364/- इतके नुकसान झालेले आहे. रक्कम वसुल करण्यात यावी.

2) सदर कामाच्या अंतिम मोजमापाप्रमाणे कामासाठी 218.56 ब्रास गौण खनिजाचा वापर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, दिनांक 11/05/2015 चे अधिसुचनेनुसार प्रती ब्रास रुपये 400/- प्रमाणे गौण खनिजावर रॉयल्टी वसुल करणे बंधनकारक आहे. देयकातुन 218.56 ब्रास गौण खनिजावर प्रतीब्रास रुपये 400/- प्रमाणे रुपये 87,424/- रॉयल्टी रक्कम देयकातुन कपात करणे आवश्यक आहे. परंतु रुपये 43,712/- इतके कपात केल्यामुळे शासन महसुलाचे रुपये 43,712/- इतके नुकसान झालेले आहे. तरी रुपये 43,712/- जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करुन शाषन शिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

3) अंदाजपत्रकीय साहित्याचे वहन अंतर 02 कि.मी. पेक्षा जादा असतांना मुख्य अभियंता याची मान्यता नसल्याबाबत.

सदर कामाच्या अंतिम मोजमापाप्रमाणे खालिल बाबीचे अंतिम मोजमापे नोंदवून त्यांचे मुल्यांकनाप्रमाणे संबंधीतास रक्कम प्रदान करण्यात आली आहे. सदर बाबीच्या कामात खालीलप्रमाणे साहित्याचा वापर करण्यात आलेला आहे. कामाचे ठिकाण व साहित्य उपलब्धतेचे ठिकाण यातील वहन अंतर 02 कि.मी. पेक्षा जास्त आहे. महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1098/(96/98)/मो.प्र(व), दिनांक 04/09/2000 प्रमाणे साहित्य सामुग्रीचे वहन अंतर अंदाजपत्रकात 02 कि.मी. पेक्षा जास्त असल्यास मुख्य अभियंता यांची मान्यता घेण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. परंतु सदर साहित्य सामुग्रीचे वहन अंतर हे 02 कि.मी. पेक्षा जास्त असतांना शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.389 मरारटोला येथे वाघनदीवर पुरसंरक्षण भिंत बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,57,600/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचाच्या अंतिम मोजमापाप्रमाणे खालिल बाबीचे अंदाजपत्रकात नमुद परिमानापेक्षा जादा काम करण्यात आलेले आहे.

सदर बाबीचे अंदाजपत्रकात नमुद परिमानापेक्षा जादा काम करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते 1, दिनांक 11/06/2004 तसेच बी-1 निविदा करारमान्यातील अट क्रमांक 38 प्रमाणे एखाद्या बाबीचे अंदाजपत्रकातील परिमानापेक्षा 25 टक्के किंवा रुपये 5,000/- या पैकी जे कमी असेल ह्या पेक्षा त्याबाबीचे जादा काम होत असल्यास वरिल शासन निर्देशाप्रमाणे व बी-1 निविदा करारमान्यातील अट क्रमांक 38 प्रमाणे त्या बाबीचे काम करण्याच्या अगोदर वरिल नियमाप्रमाणे योग्य कार्यवाही करुन काम करणे आवश्यक होते. परंतु नियमाप्रमाणे कुठलीही कार्यवाही न करता व जादा कामाबाबत कुठलेही संयुक्तीक कारण नसल्यामुळे जादा केलेले काम नियमबाहय ठरते. त्यामुळे जादा कामाचे मुल्य रुपये 61,317/- मान्य करता येत नाही.

2) सदर कामाच्या अंतिम मोजमापाप्रमाणे कामासाठी 134.76 ब्रास गौण खनिजाचा वापर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, दिनांक 11/05/2015 चे अधिसुचनेनुसार प्रती ब्रास रुपये 400/- प्रमाणे गौण खनिजावर रॉयल्टी वसुल करणे बंधनकारक आहे. देयकातुन 134.76 ब्रास गौण खनिजावर प्रतीब्रास रुपये 400/- प्रमाणे रुपये 53,905/- रॉयल्टी रक्कम देयकातुन कपात करणे आवश्यक आहे. परंतु रुपये 26,972/- इतके कपात केल्यामुळे शासन महसुलाचे रुपये 26,972/- इतके नुकसान झालेले आहे. तरी रुपये 26,972/- जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करुन शाषन शिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

**3.390 कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधकाम मौजा इंदोरा करटी तालुका तिरोडा.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 7,34,066/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचा कार्यादेश दिनांक 02/06/2012 अन्वये कामाचा कालावधी 12 महिने देण्यात आलेला आहे. तथापि, करारनाम्याप्रमाणे कंत्राटदारानी दिनांक 01/06/2013 ते दिनांक 31/03/2015, 530 दिवस उशिराने काम पुर्ण केलेले आहे. विभागाने सदरची मुदतवाढ नाममात्र प्रती दिवस रुपये 10/- इतक्या दरानी मंजुर करुन देयकातुन रुपये 5,300/- दंड वसुल केलेला आहे. बी-1 निविदा करारातिल अट क्रमांक 2 प्रमाणे कंत्राटदारानी विहीत मुदतीत काम पुर्ण न केल्यास अंदाजपत्रकीय मुल्याच्या कमीत कमी 1 टक्के जास्तीत जास्त 10 टक्के दंड आकारण्याची तरतुद असतांना विभागाने निविदा करारातील अटी प्रमाणे दंडात्मक कार्यवाही केली नाही. अंदाजपत्रकीय मुल्याच्या कमीत कमी 1 टक्के दंड रुपये 7,648/- आकारणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात रुपये 5,300/- दंड आकारल्यामुळे शासनाचे रुपये 2,348/- इतके नुकसान झालेले आहे. रक्कम वसुल करण्यात यावी.

**3.391 बंधारा दुरुस्ती, पांढरसराड तालुका सावली उपविभाग मुल चे बांधकाम.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 8,94,405/- खर्च करण्यात आले आहे. मुल उपविभाग अंतर्गत मौजा पांढरसराड बंधारा दुरुस्ती कामाच्या नस्तीची तपासणी करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य् अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) पुणे परिपत्रक क्रमांक मुमअ/उविअ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये अंदाजपत्रकात साईट क्लिअरन्स् बाब क्रमांक 1 नुसार नोंदविलेला Qty 4500 sq.mt.XRs.1.25 = रुपये 5,625/- खर्च मान्य करता येत नाही.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमासं-1098/प्र.क्र.29/98, दिनांक 20/06/1998 आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/पंरा.8(35), दिनांक 15/09/2003 नुसार काम सुरू होण्यापुर्वी कामाचा व कामवरील मजूरांचा विमा, शासकीय विमा निधी मुंबई यांचेकडे काम सुरू होणेपुर्वी विमा काढलेला नाही. शासन निर्णयाचे उल्लंघन करण्यात आले आहे.

3) सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक एसटीआर/1097/प्र.क्र.106/सांबा, दिनांक 09/02/1998 तसेच शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/5, दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामासाठी वापरण्यात येणा-या सामुग्रीची चाचणी काम सुरू होण्यापुर्वी करणे आवश्यक असतांनाही चाचणी अहवाल नस्तीत नाही. त्यामुळे नियमानुसार 10 टक्के रक्कम विभागाने रोखून ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

4) रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर ग्रामपंचायत व कार्यकारी अभियंता लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी केलेल्या करारनाम्यावर कामासंबंधी अटी व शर्ती नमुद नाही.

5) बी-1 निवीदा फॉर्मच्या प्रत्येक पृष्ठावर कार्यकारी अभियंता लघुसिंचन, जिल्हा परिषद चंद्रपूर यांची सही नाही.

6) काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नमुना-65 मध्ये नाही.

7) सदर काम गावठाण्याच्या हददीत असल्याचे ग्रामपंचायतीचे वा गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीई-2001/प्र.क्र.115/ बील-9, दिनांक 26/08/2002 नुसार ग्रामपंचायतींना कामे देतांना ग्रामपंचायतीकडे सदर कामासाठी लागणारे संयत्रे व औजारे नसतील तर त्यांना अशी कामे देण्यात येऊ नये असे स्पष्ट आदेशा असतांना सदर ग्रामपंचायतीकडे सयंत्रे व औजारे उपलब्ध् असल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे किंवा प्रमाणपत्र नस्तीत आढळले नाही.

9) Dewatering केल्याबाबत नस्तीत लॉग बुकाची प्रत नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148 नुसार कामाची दंड आकारुन मुदत वाढ घेण्यात आल्याचे दस्ताऐवज नस्तीत आढळले नाही.

**3.392 साईट क्लिअरन्स वर केलेले खर्च करणे व रॉयल्टी वर व्हॅट व टीसीएस ची कपात न करेणबाबतची अनियमितता.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर चे सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना, सन 2015-16 मध्ये विविध योजनेअंतर्गत प्राप्त् निधीतून पूर्ण झालेले बांधकामांची नस्ती तपासली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य् अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानीक स्तर) पुणे परिपत्रक क्रमांक मुमअ/उविअ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये अंदाजपत्रकात साईट क्लिअरन्स् ही बाब अंतर्भूत करून केलेला खर्च रूपये 14,055/- लेखापरीक्षणास मान्य् करता येत नाही.

2) राजुरा उपविभाग अंतर्गत करारनामा क्रमांक ब-1/आदिवासी/94/2015-16, सिमेंट प्लग बंधारा क्रं.1,धुनकी तालुका कोरपना या कामाचे प्रमाणक क्रमांक 1467, दिनांक 31/03/2016 रुपये 5,70,836/- प्रदान केले असून रॉयल्टी 266.77x141.36 = रुपये 37,711/- या रक्कमेऐवजी रुपये 34,577/- इतकी रक्क्म कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे उर्वरित रक्कम रुपये 3,134/- इतकी रॉयल्टीची रक्कम वसुल करुन शासन खाती जमा करण्यात यावा.

**3.393 सिमेंट प्लग बंधारा, चारगाव, तालुका सावली येथील बांधकामात आढळून आलेली अनियमितता.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद, चंद्रपूर मध्ये लघुसिंचन विभागाचे सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करीत असतांना 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 5,90,011/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/जल 1, दिनांक 31/07/2000 नुसार नमुद मुद्दा क्रमांक 5.4 नुसार जिल्हा परिषद अंतर्गत 0-100 हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन योजनेसाठी त्या क्षेत्राच्या सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे नोंदणी करण्यात आलेली नाही.

2) सदर कामात बाब क्र. 9- प्रोव्हायडींग अँड फिलींग इन फाऊँडेशन विथ अप्रूव्ड एक्सकॅव्हेड मटेरियल----- ईटीसी. व बाब क्र. 10- प्रोव्हायडींग एमबँकमेंट फ्रॉम ऑलरेडी डिपॉझीटेड सॉईल---- ईटीसी. मधून रॉयल्टी कपात करण्यात आलेली नाही. सदर बाबकरिता सीएसआर 2013-14 मध्ये पान क्र. 40 वर प्रदान केलेल्या देयकाचे दर रॉयल्टीच्या रक्कमेचा समावेश करुन तयार करण्यात येत आले आहे. त्यामुळे रॉयल्टीची दोन्ही बाब मध्ये अनुकमे बाब क्र. 9 मध्ये 34.48 क्युमी करिता जादा प्रति क्युमी रुपये 70.70 (99.30-28.60) प्रमाणे एकूण रुपये 2437.74 व बाब क्र. 10 मध्ये 194.112 क्युमी करिता जादा प्रति क्युमी रुपये 70.65/- (101-30.55) प्रमाणे एकूण रुपये 13714.01 जादा प्रदान करण्यात आले आहे. तसेच सदर रॉयल्टीवरील 10 टक्के व्हॅट व 2 टक्के टी.सी.एस. असे एकूण रुपये 1938.24 संबंधिताकडून वसुल होणे आवश्यक आहे.

3) दक्षता व गुणवत्ता नियंत्रण मंडळ (बांधकाम), नागपूर यांचे जिल्हा प्रयोगशाळा, चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक 4868, दिनांक 06/05/2015 अन्वये सी.सी. एम. 150 चा चाचणी अहवालनुसार कॉम्प्रेसिव्ह स्ट्रेंथ 28 दिवसाकरिता तिन क्युबची अनुक्रमे 118, 109, 113 मे.टन. आढळून आलेली आहे. सदर कामाकरिता एम- 150 चे ग्रेड वापरण्यात आल्याने त्याची कॉम्प्रेसिव्ह स्ट्रेंथ कमीत कमी 150 मे.टन. असणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे चाचणी अहवाल प्राप्त न झाल्याने कामाचा दर्जा चांगला नसल्याचे निष्पन्न होते.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 146 व 148 नुसार करारनामा करतेवेळी त्यात कंत्राटदाराकडून करण्यात आलेल्या कपातीसह संपूर्ण तपशील नोंदविणे व तो अटी व शर्ती सह लिहिणे बंधनकारक आहेत. डिवाटरींग बाब वापरल्याबाबत लॉग बुक प्रत सादर करण्यात आलेली नाही.

5) सदर कामासाठी सिमेंट, गिट्टी, रेती, स्टील व इतर साहित्याचा वापर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास परिपत्रक क्रमांक साहित्य/1099/प्र.क्र.-65/35, दिनांक 30/06/2006 नुसार बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याची काम सुरू करण्यापूर्वी शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी करणे आवश्यक असतांना कार्यवाही केलेली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये दिलेल्या सूचना व घालून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार कामे ग्रामपंचायतीमार्फत करण्यात यावीत. तथापि सदर कामे कंत्राटदार अथवा ग्रामपंचायतीने स्वत: मार्फत केले याबाबत बोध घेता आला नाही. त्यामुळे सदर कामाचे प्रदान केलेल्या रक्कमेतून शासकीय नियमाप्रमाणे भारतीय आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194(सी) नुसार 2 टक्के आयकर व त्यावरील सरचार्ज असे एकूण रुपये 15,850/- कपात करणे आवश्यक आहे.

**3.394 सिमेंट प्लग बंधारा, पांजरेपार-2, तालुका नागभीड येथील बांधकामात आढळून आलेली अनियमितता.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** जिल्हा परिषद, चंद्रपूर मध्ये लघुसिंचन विभागाचे सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करीत असतांना प्रमाणक क्रमांक 929, दिनांक 31/3/2016 अन्वये रक्कम रुपये 5,85,767/- खर्च करण्यात आला आहे. त्यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/ जल 1, दिनांक 31/07/2000 नुसार नमुद मुद्दा क्र. 5.4 नुसार जिल्हा परिषद अंतर्गत 0-100 हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन योजनेसाठी त्या क्षेत्राच्या सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे नोंदणी करण्यात आलेली नाही.

2) सदर कामात वहनावळ विवरणपत्र (लीड स्टेटमेंट) मध्ये सिमेंटकरिता सिमेंट बॅगच्या किंमतीतील फरक रुपये 2/- प्रति बॅग असतांना दर पृथ:करणात प्रति क्युमी करिता रुपये 83/- प्रति बॅग जादा घेण्यात आल्याने दर पृथ:करणात बाब क्र. 3, बाब क्र. 4, बाब क्र. 5 व बाब क्र.11 मध्ये जादा दर तयार करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधिताकडून जादा प्रदान केलेले एकूण रुपये 59,770/- वसुल होणे आवश्यक आहे. सदर जादा प्रदान बाबत अर्धसमास पत्र क्रमांक क्यु. 16, दिनांक 23/05/2017 अन्वये विचारणा केली असता लेखापरिक्षण कालावधीत उत्तर देण्यात आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 146 व 148 नुसार करारनामा करतेवेळी त्यात कंत्राटदाराकडून करण्यात आलेल्या कपातीसह संपूर्ण तपशील नोंदविणे व तो अटी व शर्ती सह नोंदविलेला नाही.

4) सदर कामासाठी सिमेंट, गिट्टी, रेती, स्टील व इतर साहित्याचा वापर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास परिपत्रक क्रमांक साहित्य/1099/प्र.क्र.-65/35, दिनांक 30/06/2006 नुसार बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याची काम सुरू करण्यापूर्वी शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी केलेली नाही.

5) सदर कामाचे मोजमाप पुस्तिका क्रमांक अ-899 ची अर्धसमास पत्र क्रमांक क्यु 17, दिनांक 23/05/2017 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षण कालावधीत लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाही. डिवाटरींग केल्याबाबत लॉग बुकची प्रत सादर करण्यात आलेली आहे.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये दिलेल्या सूचना व घालून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार कामे ग्रामपंचायतीमार्फत करण्यात यावीत. तथापि, सदर कामे कंत्राटदार अथवा ग्रामपंचायतीने स्वत: मार्फत केले याबाबत बोध घेता आला नाही. त्यामुळे सदर कामाचे प्रदान केलेल्या रक्कमेतून भारतीय आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194(सी) नुसार 2 टक्के आयकर व त्यावरील सरचार्ज असे एकूण रुपये 16,113/- कपात करणे आवश्यक आहे.

**3.395 साठवणूक बंधारा बांधकाम, खेडेगाव, तालुका धानोरा, जिल्हा गडचिरोली मधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** उपविभाग गडचिरोली अंतर्गत मौजा खेडेगाव, तालुका धानोरा, जिल्हा गडचिरोली येथे साठवणूक बंधारा बांधकाम करणेकरीता रक्कम रुपये 11,66,664/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर साठवण बंधा-याची सिंचन क्षमता 14.48 हेक्टर असून महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-1002/प्र.क्र.310/जल-1, दिनांक 27/11/2003 नूसार 30 हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमता असलेले साठवणूक बंधारे कार्यान्वीत करण्यात येवू नये. आणि 20 हेक्टर पेक्षा कमी

सिंचन क्षमता नसलेले योजनांना शासनाची परवानगी घेणे आवश्यक असतांना सदर योजना नियमबाहय राबविल्याचे दिसून येते. तसेच कमीत कमी लाभार्थी संख्या 11 असणे आवश्यक असतांना लाभार्थी शेतकरी संख्या 6 असल्याचे निदर्शणास आले.

2) सदर कामाचे प्राक्कलन (अंदाजपत्रक) मंजूर करतांना महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2010/(570/2010)/मोप्र-2, दिनांक 20/10/2010 नूसार बांधकाम साहित्य प्रत्यक्ष कामाचे जागेपासून प्रस्तावित वहन अंतरापेक्षा कमी अंतरावर उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत कार्यकारी अभियंता यांनी खातरजमा केल्याचे दिसून येत नाही.

3) अंदाजपत्रकात बांधकाम साहित्य गिट्टी 40 मीमी व दगड इत्यादीचे डोंगरगाव खानिपासून कामाचे ठिकाणापर्यंतचे वहन अंतर (lead charge) 74 कि.मी. दर्शविले असून महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन आदेश क्रमांक संकिर्ण 2010/(570/2010)/मोप्र-2, दिनांक 17/01/2015 नूसार 25 किलोमीटर वरील वहन अंतरास अधिक्षक अभियंता यांची मान्यता घेतल्याचे दिसून आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2011/प्र.क्र.499/11/मोप्र-2, दिनांक 02/04/2012 नूसार सदर कामाचे संकल्पन व रेखाचित्रे यांना कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिल्याचे दिसून आले नाही.

5) निविदा रूपये 15,85,470/- किमतीची असल्यामूळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2006/प्र.क्र.366/वित्त-9, दिनांक 31/12/2009 मधील कोष्टकानूसार जिल्हा स्तरावरीलही दैनिक व साप्ताहिकात जाहिरात दिलेली नाही. सदर कामाचे ई-निविदा सूचना प्रकाशित झालेबाबतचे वृत्तपत्राचे कात्रण सदर नस्तीत दिसून आले नाही. त्यामूळे सदर निविदा प्रसिध्दीबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/ प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 मधील परीच्छेद क्रमांक 5.4 नूसार पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याखेरीज योजनेचे बांधकाम करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्यात येवू नये असे असतांनाही नियमबाहय कार्यारंभ आदेश क्रमांक 1009, दिनांक 17/06/2014 दिल्याचे दिसून आले. तसेच निविदा दिनांक 07/12/2013 ला उघडलेली असून महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका 1984 मधील परीच्छेद क्रमांक 217 नूसार निविदा उघडले पासून 30 दिवसाचे आत दिनांक 06/01/2014 किंवा त्यापूर्वि कार्यारंभ आदेश देणे आवश्यक असतांना दिनांक 17/06/2014 रोजी 163 दिवसाचे विलंबाने कार्यारंभ आदेश दिल्याचे दिसून आले.

7) कंत्राटदार मे. आर. आर. कंस्ट्रक्शन गडचिरोली यांची निविदा 23.99 टक्के कमी दराची स्विकृत केलेली असून जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152(3) आणि महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका 1984 चे परीच्छेद क्रमांक 150 नूसार स्विकारलेल्या निवेदेची रक्कम 10 टक्के किंवा त्याहून कमी असल्यामूळे सुधारीत अंदाजपत्रक तयार केलेले नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक 19/102001 नूसार काम पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षापर्यंत देखभाल दुरूस्तीची जबाबदारी कंत्राटदाराची असून त्यांचे देयकातून 10 टक्के सुरक्षा अनामत (Security Deposit) रूपये 1,16,666/- कपात करणे आवश्यक असतांना रूपये 93,334/- कपात केले असून रूपये 23,332/- कमी कपात केलेली आहे.

9) प्रमाणकासोबत जोडलेले दंड आकारणी तक्त्यात दिनांक 31/03/2015 ते दिनांक 30/04/2015 पर्यंत 31 दिवस होत असतांना 16 दिवस x 75 = रूपये 1,200/- आकारणी केली आहे. त्यामूळे 15 दिवस x 75 = रूपये 1,125/- कमी दंड आकारणी केल्याचे दिसून येते. करारनामातील क्लॉज 2 नूसार विलंबाबाबत 10 टक्के पर्यंत दंडात्मक कारवाहीची अट असून त्याप्रमाणे कारवाही केलेली नाही.

10) मूदतवाढीसाठी कंत्राटदाराने अर्ज केलेले नसतांनाही अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद गडचिरोली यांनी पत्र क्रमांक 1058, दिनांक 21/09/2015 नूसार काम पूर्ण दिनांक 03/06/2015 नंतर 111 दिवसाचे विलंबाने मूदतवाढ दिल्याचे दिसून येते.

11) बांधकाम साहित्य गिट्टी व दगड डोंगरगाव खानीतून घेतलेले असून महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन आदेश क्रमांक संकिर्ण 2010/(570/2010)/मोप्र-2, दिनांक 17/01/2015 नूसार सदर साहित्य बांधकामासाठी योग्य असल्याचे गुणनियंत्रन विभागाचे प्रमाणपत्र दिसून आले नाही.

12) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2015/(510/2015)/सिंव्य(कामे), दिनांक 14/08/2015 आणि महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-याकडून अधिनियम, 2005 (MMISFACT 2005) तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/ प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 नूसार योजनेच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांनी एकत्र येवून योजनेच्या सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्तीसाठी लाभधारकांची पाणी वापर संस्था स्थापन केलेली नाही.

**3.396 साठवणूक बंधारा तोडका-2, तालूका अहेरी, जिल्हा गडचिरोलीचे बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** उपविभाग अहेरी अंतर्गत मौजा तोडका, तालूका अहेरी, जिल्हा गडचिरोली येथे साठवणूक बंधारा क्रमांक-2 बांधकाम करणेकरीता रक्कम रुपये 11,07,021/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर साठवण बंधा-याची सिंचन क्षमता 12.50 हेक्टर असून महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-1002/प्र.क्र.310/जल-1, दिनांक 27/11/2003 नूसार 30 हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमता असलेले साठवणूक बंधारे कार्यान्वीत करण्यात येवू नये. आणि 20 हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमता नसलेले योजनांना शासनाची परवानगी घेणे आवश्यक असतांना सदर योजना नियमबाह्य राबविल्याचे दिसून येते. तसेच कमीत कमी लाभार्थी संख्या 11 असणे आवश्यक असतांना लाभार्थी शेतकरी संख्या 10 असल्याचे निदर्शणास आले.

2) सदर कामाचे प्राक्कलन (अंदाजपत्रक) मंजूर करतांना महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2010/(570/2010)/मोप्र-2, दिनांक 20/10/2010 नूसार बांधकाम साहित्य प्रत्यक्ष कामाचे जागेपासून प्रस्तावित वहन अंतरापेक्षा कमी अंतरावर उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत कार्यकारी अभियंता यांनी खातरजमा केल्याचे दिसून येत नाही.

3) अंदाजपत्रकात बांधकाम साहित्य गिटटी 40 मी.मी. चे रेपनपल्ली खानिपासून कामाचे ठिकाणापर्यंतचे वहन अंतर (lead charge) 38 कि.मी. आणि सिमेंट व सलाख याबाबीकरीता आलापल्ली मार्केट 73 किमी वहन अंतर दर्शविले असून महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन आदेश क्रमांक संकिर्ण 2010/(570/2010)/मोप्र-2, दिनांक 17/01/2015 नूसार 25 किलोमीटर वरील वहन अंतरास अधिक्षक अभियंता यांची मान्यता घेतल्याचे दिसून आले नाही.

4) निविदा रूपये 11,33,761/- किमतीची असल्यामूळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2006/प्र.क्र.366/वित्त-9, दिनांक 31/12/2009 अन्वये सदर कामाचे ई-निविदा सूचना (प्रथम, व्दितीय व तृतीय) प्रकाशित झालेबाबतचे वृत्तपत्राचे कात्रण सदर नस्तीत दिसून आले नाही. त्यामूळे सदर निविदा प्रसिध्दीबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

5) मोजमाप पूस्तक 4805 पृष्ठ क्रमांक 36 वर 965 सिमेंट बॅग चा वापर झाल्याचे नमूद असून 880 सिमेंट बॅग खरेदी केल्याचे प्रमाणके नस्तीसोबत जोडलेली असून 85 (965-880) सिमेंट बॅग कमी खरेदी केल्याचे दिसून येते. त्यामूळे विहित गुणवत्तेनूसार काम झालेले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक 19/10/2001 नूसार काम पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षापर्यंत देखभाल दुरूस्तीची जबाबदारी कंत्राटदाराची असून दोष निवारण कालावधी नियमबाह्य एकच वर्ष दिल्याचे कार्यारंभ आदेशावरून दिसून येते. तसेच देयकातून 10 टक्के सुरक्षा अनामत (Security Deposit) रूपये 1,10,702/- कपात करणे आवश्यक असतांना रूपये 88,561/- कपात केले असून रूपये 22,141/- कमी कपात केलेली आहे.

7) बांधकाम साहित्य गिट्टी रेपनपल्ली खानीतून घेतलेले असून महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन आदेश क्रमांक संकिर्ण 2010/(570/2010)/मोप्र-2, दिनांक 17/01/2015 नूसार सदर साहित्य बांधकामासाठी योग्य असल्याचे गुणनियंत्रन विभागाचे प्रमाणपत्र दिसून आले नाही.

8) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2015/(510/2015)/सिंव्य(कामे), दिनांक 14/08/2015 आणि महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-याकडून अधिनियम, 2005 (MMISFACT 2005) तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/ प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 नूसार योजनेच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांनी एकत्र येवून योजनेच्या सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्तीसाठी लाभधारकांची पाणी वापर संस्था स्थापण केलेली नाही.

**3.397 साठवण बंधारा चुरचुरा (माल) बांधकाम मधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर बांधकामावर रक्कम रुपये 3,51,175/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनामा (नियम 146) Stamp paper कोरा आहे तसेच B-1 टेंडर पेपर वर सरपंच / सचिव ग्रामपंचायत चुरचुरा (माल) ची स्वाक्षरी आहे. का.अ. (सि) ची स्वाक्षरी नाही. दस्तऐवज भरलेला नाही.

2) जिल्हा परिषद सदस्य यांचे मागणीनुसार चुरचुरा (माल) येथील काम घेतल्याचे अंदाजपत्रकाचे जनरल रिपोर्टमध्ये नमुद आहे. शेतकऱ्याची मागणी, भौगोलीक परिस्थिती, सर्व्हेनुसार कामाची आवश्यकता परिस्थिती होती काय याचा उल्लेख नाही. नैसर्गिक परिस्थिती साठवण बंधारा घेण्यास उपयुक्त होती किंवा कसे किती कास्तकारांना सिंचनाचा फायदा होईल, किती विहीरी त्या परिसरात आहे. ज्यामुळे त्याचा फायदा होईल याचा उल्लेख टिपणीत व कामाची आवश्यकता काय यामध्ये नमूद नाही. साठवणुक बंधारा बांधनेस्तव ग्रामपंचायतीचे पत्र दिनांक 24/09/2014 अन्वये मागणी मौजा महादवाडी ग्रामपंचायत चुरचुरा (माल) येथील प्रस्तावित बंधाऱ्यापासून शेती ओलीत साठी व बंधाऱ्याची देखभाल, दुरूस्ती व लोखंडी फळ्या सुस्थितीत ठेवण्याचे हमीपत्र श्री वसंत मगरु मेश्राम व इतर गावकरी यांनी उपविभागीय अधिकारी (जिल्हा परिषद) सिंचाई यांना लिहून दिलेले आहे.

3) अंदाजपत्रकानुसार 6 निडल्स लोखंडी फळ्या तरतुद आहे. परंतु ग्रामपंचायतने लोखंडी फळ्या केल्याबाबत बिल देयका सोबत/नस्ती सोबत आढळून आले नाही. लोखंडी फळ्या तपासणी अहवाल आढळून आला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1009/प्र.क्र.43/जल-3, दिनांक 19/10/2001 नुसार ठेकेदारावर देखभालची 2 वर्षाची हमी ठेवून 10 टक्के निधी राखून ठेवावा अशा सूचना आहेत. परंतु कार्यारंभ आदेश दोषनिवारण कालावधी 1 वर्षाची अट आहे. कालावधी कमी केल्याचे कारण स्पष्ट केलेले नाही.

5) It. No. 8 Providing & construction of embankment soil & murum 17,500 x 70.68 = 12,369/- अंदाजपत्रकात भुस्वामित्वधन (Royalty) ची तरतुद केलेली आहे. सदर रक्कम सिंचाई विभागाने शासनास जमा करणे अपेक्षीत होते. परंतु रक्कम जमा केलेली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय विकास 2011/प्र.क्र.217/परा-8, दिनांक 15/11/2011 नुसार राज्य गुणवत्ता नियंत्रण (SQM) यंत्रणेकडून कामाची पाहाणी करणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सुद्धा अचानक पाहाणी करणे आवश्यक आहे. तसे केल्याचे आढळून आले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हि.पी.एम.1099/प्र.क्र.54/ 08, दिनांक 20/5/1999 नुसार कामाचा नामफलक लावणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

8) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परारा 1001/प्र.क्र.40/जल-3, दिनांक 19/10/2001 1 ते 8 अन्वये बंधाऱ्याची जागा निवडतांना पुरेशी खबरदारी घेणे बद्दल सूचना आहे. प्रामुख्याने बंधाऱ्याच्या जागी पायासाठी चांगला खडक शक्यतो नदीतळ / पातळीला किंवा कमीतकमी खोलीवर असावा. कमीतकमी उंचीमधे पाण्याचा जास्तीत जास्त साठा होईल, काठावर सिचंनासाठी विहीरी अस्तित्वात असणे अधिक

चांगले बंधाऱ्यातील पाणीसाठा पावसाळ्याच्या सरत्या काळात पुरेसा राहील अशाच नदी नाल्यावर बंधारे ची जागा निश्चित करावी. तसेच सुरक्षात्मक तरतुदीस तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्यांनी जागेची प्रत्यक्ष पाहाणी करुन निश्चित करावयात व बंधाऱ्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करतांना याबाबतचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे असे नमूद आहे. परंतु बंधाऱ्याच्या जागा निवडीसंदर्भात प्रस्तावात नैसर्गिक व भौगोलीक परिस्थितीचा उल्लेख नाही. संबंधीत अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे सूचनांचे पालन झाले नसल्याचे दिसुन येते.

9) जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सुप्रमा/0411/(262) 2001 मो.प्र.-1, दिनांक 10/08/2011 मधील सूचना नुसार प्रकल्पाकरीता जमिन संपादन केल्याशिवाय निविदा प्रक्रिया सुरू करु नये. प्रकल्पाच्या कोणत्याही दायित्वास मान्यता देऊ नये. तसेच अंदाजपत्रक तयार करणेपुर्वी आवश्याक ते विस्तृत सर्वेक्षण व अन्वेषण करण्यात यावे. परंतु बंधाऱ्याच्या ठिकाणची जमिनी बाबतचे दस्तऐवज नस्तीला आढळून आले नाही.

10) शासन परिपत्रक दिनांक 19/10/2001 मधील मार्गदर्शक सूचना क्रमांक 12 व 13 नुसार लाभ क्षेत्रातील लाभधारकांनी सहकारी संस्था बंधारा बांधण्यापुर्वीच स्थापन करण्यात यावी. परंतु लाभधारक शेतकऱ्यांनी सहकारी संस्था नोंदणी झाल्याचे आढळून आले नाही.

11) शासन परिपत्रक दिनांक 19/10/2001 मार्गदर्शक सूचना क्रमांक 17 नुसार 30 हेक्टर सिंचन क्षमतेपेक्षा कमी क्षमतेचे बंधारे बांधण्यात येवू नये. परंतु सदर साठवणुक बंधाऱ्याची सिंचन क्षमता 15.81 हेक्टर ची आहे. तरी खुलासा व्हावा.

12) शासन परिपत्रक दिनांक 19/10/2001 मार्गदर्शक सूचना क्रमांक 15 नुसार संबंधीत Needle Rubber Seal बसविणे व पाणी साठवले आहे असे लेखी प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे कार्यकारी अभियंता (सिंचाई) जिल्हा परिषद गडचिरोली यांना पाठविल्याचे आढळून आले नाही.

**3.398 सिमेंट बंधारा योजनेतील कामाबाबत. (उपविभाग औरंगाबाद)**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रुपये 51,55,673/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्धसमास पत्र क्रमांक 02, दिनांक 17/10/2016 अन्वये मागणी करुनही जिल्हा परिषदेतील जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती बैठकीचे इतिवृत्तांत नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट/साहित्य-1099/प्र.क्र.56, दिनांक 30/06/2000 तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण.2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष-बां.सा., दिनांक 18/11/2009 कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी व परिक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणण्यात येईल, असे पहावे. परंतु, विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. म्हणून काम गुणवत्तापूर्ण झाले किंवा कसे, याबाबतची खात्री करता येत नाही. तरी याबाबत कामांची तांत्रिक तपासणी होणे आवश्यक आहे.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदी रक्कम प्रदानाच्या वेळेस लाल शाईने रदद करून प्रदान करणे आवश्यक असताना तशा पध्दतीने कर्णरेषा काढलेली नाही. त्यामुळे एकाच देयकाची दुबार अदाई झालेबाबतची शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/ परा-8, दिनांक 31/12/2009 अन्वये प्रत्यक्ष कामाचे जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु, उपरोक्त प्रकरणात अशा पध्दतीने माहिती दर्शविणारे फलक बसविलेले नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1001/प्र.क्र.40/जल-3, दिनांक 19/10/2001 नुसार संबंधीत संस्थेने (मक्तेदाराने) 2 वर्ष देखभाल हमी घेणे आवश्यक असून देयकाच्या 10 टक्के रक्कम राखून ठेवणे आवश्यक असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच कार्यारंभ आदेशात दोष दायीत्व निवारण कालावधी 2 वर्ष असलेबाबत स्पष्टपणे नोंद घेण्यात आलेली नाही.

6) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्थर), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक मुअ/लपा/स्थास्थ/उविअ/2/1042, दिनांक 13/04/2006 नुसार वहन नकाशा व वहन अंतर 10 कि.मी. पुढील अधिक्षक अभियंता यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. उपलब्ध साहित्याबाबतचा Quarry Chart प्रमाणे नकाशा संचिकेत संलग्न करणे आवश्यक आहे. विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे दर पृथ:करणात दर्शविलेले वहनाचे दर योग्य असलेबाबतची खात्री करता येत नाही.

7) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकल्पना 0411/9262/2011/मोप्र, दिनांक 15/09/2011 अन्वये प्राकलनाचे सुकल्पन तयार करतेवेळी प्रकल्पाची पाया पातळी निश्चित करतेवेळी ट्रायल पीट बोअर इत्यादी प्रकारे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. परंतु, उपरोक्त कामाचे संचिकेत ट्रायल पीट घेतलेबाबतची अभिलेखे आढळून आलेली नाहीत.

8) सर्व कामांचे बाबतीत वापरलेल्या सिमेंटच्या खरेदीच्या मुळ पावत्या देयकासोबत संलग्न केलेल्या नाहीत. त्यामुळे देयकासोबत / मोजमाप पुस्तीकेत नोंदविलेल्या सिमेंट कंझम्प्शन स्टेटमेंटमधील सिमेंट बॅगची दर्शविलेली संख्या योग्य असलेबाबत खात्री करता आली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/ प्र.क्र.514/ वित्त-9, दिनांक 20/11/2009 अन्वये रक्कम रुपये 10 लक्षपर्यंतच्या कामास रुपये 100/- चे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक आहे व त्यापुढील प्रत्येक लाखास रुपये 100/- या प्रमाणे कार्यकरारावर मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. परंतु, खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कामाचे बाबतीत कमी शुल्काच्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. तरी याबाबत आवश्यक मुद्रांक शुल्क रक्कम रुपये 1,900/- संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

10) अनुक्रमांक 1 च्या कामाचे बाबतीत करारनाम्यावर निविदेची रक्कम व ठेकेदाराचे नांव नमूद नाही.

**3.399 सिमेंट बंधारा व नाला खोलीकरण व बांधकामातील अनियमिततेबाबत. खांडवी क्रमांक 1 तालुका परतूर जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,06,133/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खांडवी क्रमांक 01 तालुका परतुर येथील गट क्रमांक 478 मध्ये सिमेंट बंधारा व नाला खोलीकरण बांधकामास प्रशासकीय मान्यता दिली. गट क्रमांक 478 मध्ये 400 मीटर नाला खोलीकरणाच्या कामास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी मंजुरी दिली. परंतु, 140 मीटर लांबीचे खोलीकरण काम झाल्यानंतर नाल्यामध्ये कठीण भुस्तर असल्यामुळे नाला खोलीकरण शक्य होत नसल्याचा अहवाल उपविभागीय अभियंता, परतुर यांनी दिनांक 28/03/2016 च्या पत्रात नमुद केले. गट क्रमांक 478 च्या उर्वरित निधीत गट क्रमांक 252 च्या नाल्याचे खोलीकरण करण्याची परवानगी मागितली. परंतु, परवानगी न घेताच रेकॉर्डींग मोजमाप पुस्तिकेत करण्यांत आली. तसेच या प्रकारचे इतर कोणते कामे केली? याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे.

2) अंदाजपत्रकात बाब क्रमांक 11 मातीकाम रुपये 26,443/- चे बाब क्रमांक 12 दगडी काम, बाब क्रमांक 13 अन्वये स्टील काम रुपये 69,437/- व माहीती फलक 2,677/- ची कामे केली नाही. जर याबाबीची आवश्यकता नव्हती. तर अंदाजपत्रकात तरतुद का करण्यांत आली? याचा खुलासा व्हावा.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 153 (1) नुसार मान्य आराखडयानुसार व अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक आहे. परंतु, उपरोक्त बाबीचे काम केले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्रमांक 80/पंरास/8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी विहीत प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारे फलक लावणे आवश्यक आहे. संचिकेत फोटो नसल्याने फलक लावले किंवा नाही? याची खात्री करता येत नाही. शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही का करण्यांत आली नाही? खुलासा करावा.

**3.400 सिमेंट नाला बंधारा, मनापूर क्रमांक 01 ता भोकरदन कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,48,986/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता खोदकामातुन 1,915.56 घनमीटर माती निघालेली आहे. या मातीचा उपयोग बाब क्रमांक 08 Embarkment साठी करणे आवश्यक असतांना ठेकेदाराने 161.74 घनमीटर दर 96.13 व 378 रुपये 15,548/- घनमीटर दर 115.17 रक्कम 43,543/- इतकी माती बाहेरुन आणल्याचे दर्शविले आहे. उपलब्ध् मातीचा वापर न केल्यामुळे रक्कम रुपये 59,091/- चे शासनाचे नुकसान झालेले आहे. याची वसुली करण्यांत यावी.

2) सदरील काम इतर विभागामार्फत केले किंवा कसे? यासाठी तालुका कृषी विभागाचे पत्र जावक क्रमाक/तां/मग्रा/ 1349/2014, दिनांक 31/12/2014 अन्वये नाहरकत प्रमाणपत्र दिले. परंतु, मनापुर क्रमांक 01 च्या कामाचे आदेश दिनांक 19/11/2015 रोजी एक वर्षानंतर निर्गमीत केले. या एक वर्षाच्या कालावधीत इतर विभागाकडून काम करण्यांत आले किंवा कसे? याबाबत कागदोपत्री खुलासा करण्यांत यावा.

3) मनापुर क्रमांक 01 व 02 ची कामे वेगवेगळी आहे किंवा कसे? असा संभ्रम निर्माण होतो. याबाबत चौकशी करुन कामे वेगवेगळी असल्याचे कागदोपत्री दर्शवावे व आक्षेपाची पुर्तता करावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्रमांक 80/ पंरास/ 8 दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी विहीत प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारे फलक लावणे आवश्यक आहे. संचिकेत फोटो नसल्याने फलक लावले किंवा नाही? याची खात्री करता येत नाही. शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही का करण्यांत आली नाही? खुलासा करावा.

**3.401 सन 1994 पासून लघूपाटबंधारे विभागाची कामे अपूर्ण असणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

जिल्हा परिषद, जालनाच्या लघुपाटबंधारे विभागाच्या सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात विभागाने अपुर्ण कामाची जी यादी लेखापरीक्षणास सादर केली आहे, त्यावरुन सन 1994-1995 ते सन 2015-2016 पर्यंत कामे पुर्ण झालेली नाहीत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परीपत्रक क्रमांक बी.जी.टी.-2090/अर्थसंकल्प/डी, दिनांक 18/06/1999 व क्रमांक बी.जी.टी.-1097/प्र.क्रमांक -16/अर्थसंकल्प/19, दिनांक 19/04/1997 नुसार जी कामे पुर्ण करण्याच्या बाबतीत विलंब झाल्याने त्यांच्या किंमतीत वाढ होऊन शासनावर आर्थिक भार पडतो. तरी सदर कामे प्रथम प्राधान्याने पुर्ण करण्यांत यावी व त्यानंतरच नवीन कामांना मंजुरी देण्यांत यावी. परंतु, लघुपाटबंधारे विभाग, जालनाने मागील कांमे अपुर्ण ठेवून नवीन कामांना प्रशासकीय मान्यता दिल्याचे दिसुन येते.

2) सिंचन विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेल्या यादीवरुन खालीलप्रमाणे अपुर्ण कांमे ठेवलेली आहेत:-

| अनुक्रमांक | कामाचे नांव | कामाची संख्या |
|---|---|---|
| 1 | कोल्हापुरी पध्दीतीचे बंधारे | 164 |
| 2 | पाझर तलाव / गांव तलाव | 279 |
| | एकूण : | 443 |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे कामांवर रक्कम रुपये 849.68 लक्ष चा खर्च करण्यांत आलेला आहे. इतक्या मोठया प्रमाणात कामांना मान्यता दिल्यामुळे एकूण 443 कामे अपुर्ण राहीली. सन 1994-1995 ते आजपर्यंत म्हणजे जवळपास 23 वर्षे कामे पुर्ण न झाल्यामुळे शासनाचा झालेला खर्च हा पुर्णपणे निरर्थक ठरलेला आहे.

3) महाराष्ट्र शासनाने सिंचनाखालील जास्तीत जास्त जमीन आणण्याच्या हेतूने अशा प्रकारची कामे घेण्याबाबत योजना राबविलेली होती. ज्यामुळे या योजनेचा सरळ सरळ फायदा जिल्हयातील शेतक-यांना होणे अपेक्षीत होते. परंतु, 23 वर्षात कामे पुर्ण न झाल्यामुळे अप्रत्यक्षपणे कोटयावधी रुपायाच्या उत्पन्नास शेतकरी मुकला असल्याचे दिसुन येते.

4) मंजुर कामे विहीत मुदतीत पुर्ण न झाल्यामुळे मुळ कामाच्या अंदाजपत्रकापेक्षा कामाच्या किंमतीत कितीतरी पटीने वाढ होते. ज्याचा बोझा शासनावर पडतो. त्यामुळे वाढीव कामांवर होणा-या खर्चाची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

5) उपरोक्त अपुर्ण कामांवर झालेला खर्च रक्कम रुपये 849.68 लक्ष संबंधीत जबाबदारांकडून वसुल का करण्यांत येवू नये? याबाबत समर्थनिय खुलासा करुन अनुपालन सादर करावे.

**3.402 सिमेंट नाला बांधकाम, वझर सरकटे क्रमांक 02 ता परतूर कामात झालेल्या जादा अदाईबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालनाचे सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात प्रमाणक क्रमांक 60, दिनांक 04/09/2015 अन्वये रक्कम रुपये 4,99,643/- खर्च करण्यात आला आहे. सदर कामाची तपासणी केली असता जादा रक्कम अदा केल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकाची तपासणी केली असता बाब क्रमांक 06 सिमेंट काँक्रीट (M-10) साठी रुपये 2,727.25/- प्रति घनमीटर दर अंदाजपत्रकाच्या गोषवा-यात (Abstract) मध्ये दर्शविण्यांत आलेला आहे. या बाबीच्या दर पृथ:करणाची तपासणी केली असता (M-10) चा बेसीक दर रूपये 2502.26/-, 01 टक्का लेबर सेस रुपये 25.02/- यांची बेरीज रूपये 2,527.28/- येत असतांना रूपये 2,727.20/- दर्शविण्यांत आली आहे. रूपये 2,727.20/- याच दराने 150.34 घनमीटर कामासाठी रक्कम रुपये 4,10,019/- अदाई करण्यांत आली आहे. रक्कम रुपये 200/- प्रति घनमीटर प्रमाणे 150.34 घनमीटरचे रुपये 30,068/- जादा अदाई करण्यांत आलेले आहे. याची वसुली करुन शासन खाती भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्रमांक 80/ पंरास/8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी विहीत प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारे फलक लावणे आवश्यक आहे. संचिकेत फोटो नसल्याने फलक लावले किंवा नाही? याची खात्री करता येत नाही. शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही का करण्यांत आली नाही? खुलासा करावा.

**3.403 मुर्ती, तालुका अंबाजोगाई येथी क्रमांक 01 व 02 च्या नाला खोलीकरण कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** लघुपाटबंधारे विभागाच्या सन 2015-2016 चे लेखापरीक्षणादरम्यान खासदार निधीचे 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 5,88,701/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 151 नुसार प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतरच तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामात अशी कार्यवाही न झालेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 (ब)(6) नुसार दिनांकित स्वाक्ष-या केलेल्या नाहीत. प्रत्यक्ष दिनांक नमूद करून व तो दौरा दैनंदिनीशी योग्य अचुक असल्याचे खात्री पटवावी. लेखा संहिता नियम 180 अन्वये घेण्यात आलेल्या नोंदी लाल शाईने क्रॉस चिन्ह करून खोडलेल्या नाहीत.

3) जिल्हाधिकारी, बीड यांचे प्रशासकीय मंजुरी आदेश क्रमांक जिनिस/संस/खास्थाविका/पीएम 2015-16/ प्रमा/1397, दिनांक 18/11/2015 मधील अट क्रमांक 01 अन्वये या कामांसाठी खाजगी जागा असल्यास लागणाऱ्या जागेचे दानपत्र नियमानुसार रजिस्टर करुन जागा शासनाच्या नावे करुन घेऊनच कामास सुरुवात करावी. खाजगी मालमत्तेवर कामे घेण्यात येवु नयेत. याबाबत मालकी हक्काचा सात-बाराचा उतारा सत्यप्रतीत जोडण्यात यावा, असे आदेशीत असताना जागेचे सात-बारा खाजगी व्यक्तींचे असुन शासन मालकीचे नाहीत व दानपत्रही करुन घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अटी व शर्तीनुसार जागेची निवड केली नसल्याचे दिसते.

4) जिल्हाधिकारी यांचे कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद बीड यांना दिलेले पत्र क्रमांक 1185, दिनांक 02/11/2015 मधील अट क्रमांक 06 अन्वये अंदाजपत्रकात निश्चित घ्यावयाच्या कामाचे ठिकाण स्पष्ट नमुद करावे. तसेच ज्या जागेवर काम प्रस्तावित करण्यात आले, त्या जागेचे काम सुरु होण्यापुर्वीच दोन फोटो

अंदाजपत्रकासमवेत सादर करण्यात यावेत, असे असताना अंदाजपत्रकामध्ये सदर प्रस्तावित जागा निश्चितीचे ठिकाण नमुद केलेले नाही व फोटोही जोडण्यात आलेले नाहीत व उपअभियंत्यांचा स्थळ पाहणी अहवालही जोडलेला नाही.

5) उपरोक्त दोन्ही कामांच्या नस्तींमध्ये गट क्रमांक 348 चा एकच सातबाराजोडलेला असुन यावर मालकाचे नाव भागुजी मानाजी फड, रघुनाथ मानाजी फड, भगवान मानाजी फड यांचे नावे असुन दोन्ही कामांचा व या जागेच्या सातबाराचा काहीही संबंध दिसुन येत नाही. दोन्ही कामांच्या जागेबाबत एकच सात-बारा जोडला असल्यामुळे सदर एकाच कामाची व्दिरुक्ती करुन देयकाची अदाई झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. दोन्ही कामाच्या जागेबाबत एकच 7/12 जोडला असल्याने तसेच सदर कामाचे मंजूरी आदेश लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत व सदरील सातबाराच्या सत्यप्रतीही जोडलेल्या नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.प-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शवणारे फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु, कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही न करता बांधकामाच्या देयकाची प्रदाने केली आहेत.

### 3.404 लघुपाटबंधारे विभागाच्या उपविभाग केज येथील देयकांच्या नस्तीमधील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** लघुपाटबंधारे विभागाच्या सन 2015-2016 चे लेखापरीक्षणा दरम्यान 37 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 83,38,247/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 151 नुसार प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतरच तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामात अशी कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व करार करून घेणा-यांच्या स्वाक्ष-या असणे आवश्यक असते. टेंडरवर करार करून घेणा-यांच्या प्रत्येक पेजवर स्वाक्ष-या नाहीत. असे असतांना पुढील प्रक्रिया केलेली आहे.

3) विवरणपत्रातील सर्व कामांचे नस्तीमध्ये प्राक्कलन (Estimate) जोडलेले नाहीत. तरी देखील कार्यकारी अभियंता यांनी मोजमापे योग्य असल्याचे प्रमाणीत केल्याचे नस्तीवरुन दिसुन येते.

4) अनुक्रमांक 07 मधील कामाचे जिल्हाधिकारी बीड यांचे त्रयस्थ तांत्रिक पथकाचे तपासणी अहवाल दिनांक 21/12/2015 नुसार अहवालातील मुद्दा क्रमांक 07 अन्वये पिचींगचे काम बाकी असल्याचे नमुद केले आहे. त्यानुसार शाखा अभियंता यांनी 60 टक्के देयक अदा करणेच्या प्रस्तावास कार्यकारी अभियंता यांची मान्यता घेतली नसल्याचे दिसुन येते. वरील दिनांक 21/12/2015 रोजीच्या अहवालानुसार पिचींगचे काम बाकी असताना उपअभियंता यांनी काम दिनांक 29/06/2015 रोजी पुर्ण झाल्याचे पुर्णत्व प्रमाणपत्र दिले आहे. तसेच पिचींगचे काम कधी पुर्ण झाले? याची नोंद नस्तीमध्ये नमुद नाही. म्हणजे काम पुर्ण नसताना पुर्ण देयकाची अदाई झाली असल्याचे दिसुन आले.

5) अनुक्रमांक 11 मधील कामांसाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी प्रस्तावास दिनांक 09/06/2015 रोजी मंजुरी दिली असुन करारनामा मात्र दिनांक 06/06/2015 रोजी म्हणजे मंजुरी आधीच करण्यात आला असल्याचे आढळुन आले. तसेच अनुक्रमांक 29, 30, 34 कामांमध्ये देखील निविदा मंजुरी नंतर झाली असताना करारनामा मात्र आधीच करण्यात आले आहेत.

6) अनुक्रमांक 13 ते 17 कामांमध्ये एकाच गावांचे विविध कामे असुन सर्व नस्तीमध्ये एकच ग्रामपंचायत ठराव वापरला असुन यावर कोठेही कामांचा उल्लेख नाही वा किती कामे मंजुर करण्यात आली? हे नमुद नाही. नस्तीमध्ये चाचणी अहवालाच्या प्रती देखील छायांकित जोडल्या आहेत. सिमेंट नाला बंधाराचे कामांकरिता त्रयस्थ समिती स्थापन केलेली असुन या समितीचे अहवाल देखील सोबत जोडण्यात आलेले नाहीत. तसेच कामांचे गट

क्रमांक व जागा हस्तांतरणाच्या प्रती, सातबारा देखील उपलब्ध नाहीत. त्यामुळे सदर कामांमध्ये व्दिरुक्ती झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) अनुक्रमांक 15 मध्ये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र दिनांक 03/03/2015 रोजीचे असताना नस्तीमध्ये सदर काम दिनांक 23/05/2015 रोजी व अनुक्रमांक 17 मध्ये देयकासोबतचे प्रमाणपत्रानुसार दिनांक 09/03/2015 रोजी काम पुर्ण झाल्याचे नमुद असुन नस्तीमध्ये मात्र दिनांक 25/05/2015 रोजी काम झाल्याचे आढळते. चेक मेजरमेंट न दाखवता काम पूर्ण झालेले नसताना आदाई करण्यात आली.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 (ब)(6) नुसार दिनांकित स्वाक्ष-या केलेल्या नाहीत. प्रत्यक्ष दिनांक नमूद करून व तो दौरा दैनंदिनीशी योग्य अचुक असल्याचे खात्री पटवावी.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.प-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शवणारे फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु, कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

**3.405 गोडाऊन भाडेसाठी होणा-या निर्रथक खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा परिषद बीड येथील लघुपाटबंधारे विभागाच्या 2015-2016 मध्ये विभागाने गोडाऊन भाडेसाठी प्रमाणक क्रमांक 24, दिनांक 13/10/2015 अन्वये रक्कम रुपये 87,420/- खर्च नोंदविला आहे.

1) लघुपाटबंधारे विभागाने श्री महादेव तांगडे यांची एम.आय.डी.सी. भागातील इमारत घर क्रमांक 3-14-278 नवा क्रमांक 3-14-385 तळमजला व दुसरा मजला व खुली सहन जागा एकूण 1535 चौरसफुट दिनांक 01/11/2010 पासुन रुपये 14,570/- प्रतिमहा दराने गोडाऊनसाठी भाडेतत्वावर 10 वर्षासाठी करार करुन घेतलेली आहे. तत्पुर्वी इतर इमारत मालकाची एम.आय.डी.सी. येथील 40 X 70 ची इमारत मार्च 2004 पासुन प्रतिमहा रुपये 4,006/- भाडयाने होती. सन 2002 पासुन जिल्हा परिषदेकडील सिमेंट व इतर बांधकाम साहित्य खरेदी शासनाने बंद केलेली आहे. सदरचे गोडाऊन मध्ये लोखंडी पहारी, नळ योजनेचे निरुपयोगी साहित्य तसेच कोल्हापुरी बंधारे गेट इत्यादी निरुपयोगी साहित्य ठेवलेले आहे.

शासन निर्णय क्रमांक जेईपी-1096/सीआर-3588/26, दिनांक 22/01/2000 अन्वये तसेच वेळोवळी शासनाने निरुपयोगी साहित्याचे निर्लेखन करुन सदरच्या वस्तु जाहीर लिलावाने विक्री करणेबाबत सूचना दिलेल्या असतांनाही याबाबत विभागाने कांहीही कार्यवाही न करता 10 वर्षासाठी भाडेकरार करुन गोडावुन किरायाने घेतलेले आहे. सदर गोडाऊनवर दोन पहारेकरी असुन त्यांचा वेतनाचा खर्च देखील सदरील निरोपयोगी साहित्य सांभाळणेसाठी होत आहे. याबाबत विनावापर पडुन असलेल्या साहित्याची विल्हेवाट लावणेबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती टिप्पण क्रमांक 06, दिनांक 20/06/2017 अन्वये मागणी केली असता याबाबत विभागाने काहीही अभिप्राय दिले नाहीत.

2) गोडाऊन किरायापोटी वरील प्रमाणे प्रदान केलेल्या रकमेवर आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (आय) नुसार 10 टक्के आयकराची कपात रुपये 8,742/- करणे आवश्यक असतांना केलेली नाही. सबब सदरील आयकराची रक्कम संबंधीताकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.406 लघुपाटबंधारे विभागाकडील विविध कामाची अंदाजपत्रके तयार करतांना सिमेंटचे प्रचलित बाजारभाव व प्रादेशिक दरसूची मधील सिमेंट दर यामधील फरक रक्कम दरपृथ:करणामध्ये समाविष्ट करतेवेळी झालेली अनियमितता.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद बीड येथील लघुपाटबंधारे विभागाच्या 2015-2016 चे लेखापरीक्षणात विविध कामाच्या तपासणीवेळी असे निदर्शनास आले की, प्रादेशिक दरसूची सन 2011-2012, 2012-2013, 2013-2014 मध्ये सिमेंटचा दर प्रति गोणी रूपये 223/- असा आहे. प्रादेशिक दरसूचीमधील सर्वसाधारण सूचना क्रमांक 13 नुसार कामाची अंदाजपत्रके तयार करताना स्टील व सिमेंट या बांधकाम साहित्यासाठी प्रादेशिक दरसूचीमधील दर व प्रचलित बाजारभाव यामधील फरक विचारात घेणेबाबत सूचना

आहेत. लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी सिमेंटचा प्रचलित बाजारभाव रूपये 300/- प्रति गोणी गृहीतधरून प्रत्येक कामाच्या अंदाजपत्रकामध्ये सिमेंट फरक रूपये 77/- प्रति गोणी समाविष्ट करून त्यानुसार अंदाजपत्रकातील दर निश्चित केलेले आहेत. प्रचलित बाजारभाव ठरविणेसाठी त्यांनी स्थानिक सिमेंट पुरवठादार यांच्याकडून सन 2015-2016 मध्ये दर मागवून दर निश्चिती केलेली नाही. याबाबत त्यांना टिप्पण क्रमांक 5, दिनांक 20/06/2007 अन्वये रूपये 77/- प्रतिगोणी सिमेंट फरक समाविष्ठ करणेबाबत अभिलेख / नस्ती सादर करणेबाबत विनंती करूनही सदर अभिलेख सादर केलेले नाहीत. तथापि, त्यांनी याबाबत सहाय्यक अधिक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक भांशार/4148/2012, दिनांक 25/09/2012 अन्वये सिमेंटचा बाजारभाव रूपये 300/- ठरविला असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही केली असल्याचे सांगितले. सन 2015-2016 मधील प्रचलित बाजारभावाची कुठलीही शहानिशा न करता सिमेंट फरक रक्कम अंदाजपत्रकात समाविष्ट करून ठेकेदारास प्रदान करणे नियमबाह्य आहे.

विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे विविध कामावर एकूण 72754 गोणी सिमेंटचा वापर दर्शविलेला असून सिमेंट फरक रक्कम रूपये 56,02,058/- ठेकेदारास अदा झालेली आहे. यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद बीड यांचे परिपत्रक क्रमांक कार्या-1/प्रशा-2/98/ 2002, दिनांक 21/08/2002 नुसार ठेकेदाराने आणलेल्या सिमेंटची साठानोंदवही ठेवावयाची असुन त्यात प्रतिदिन वापर नोंद तसेच साप्ताहिक अहवाल नोंदवावयाचे आहेत. तथापि, विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही.

2) ठेकेदाराने स्थानिक बाजारातुन खरेदी केलेल्या सिमेंटची बीले कार्यालयाकडे सादर करण्यांत आलेली नाहीत. त्यामुळे ठेकेदाराने कामावर आणलेले सिमेंट कोणत्या ग्रेड चे व कोणत्या दराने खरेदी केलेले होते? तसेच सदरील सिमेंटचा वापर करणेपूर्वी दर्जाबाबत अहवाल प्राप्त करुन घेतलेले नाहीत. खरेदी दराची कुठलीही शहनिशा न करता संबंधीतास सिमेंट फरक रक्कम अदा करण्यांत आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती 1961 चे कलम 109 अन्वये सदरील दरास स्थायी समितीची मान्यता घेतलेली नाही. सबब सिमेंट फरकापोटी रुपये 56,02,058/- अदा करण्यांत आलेली रक्कम लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

**3.407 सिमेंट नाला बंधारे बांधकामाच्या अंदाजपत्रकात प्रादेशिक दरसूचीतील योग्य बाबीचा दर न दिल्याने ठेकेदारास जादा प्रदान झालेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. जिल्हा परिषद बीड येथील लघुपाटबंधारे विभागाच्या सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात माती भराव कामासाठी अंदाजपत्रकात जो दर दिलेला आहे, तो दर गाभा भराव काम यासाठीचा असल्याचे प्रादेशिक जिल्हा दरसुचीनुसार दिसून येते. या बाबीनुसार माती दिड मिटर पर्यंत उचलणे, पाणी शिंपडणे, रोलर दबाई करणे, इत्यादी बाबीचा समावेश आहे. परंतु, कामात केवळ माती, मऊ खडक / मुरुम, खोदलेल्या जागी भरणे इतकेच कामे आहेत.

उर्वरित बाबी करणे आवश्यक नाही. त्यामुळे सदर बाबीसाठी रुपये 2.65 पैसे प्रति घ.मि. दर देणे आवश्यक असतांना सदरचा दर न देता रुपये 97.40 हा दर दिल्यामुळे ठेकेदाराला जादा अदाई झाल्याचे दिसून येते.

जादा दर दिल्याने ठेकेदारास विवरणपत्रातील एकूण 73 प्रमाणकान्वये रुपये 6,72,869/- चे अतिप्रदान झालेले असून सदरील रक्कम वसूलपात्र ठरते.

**3.408 सिमेंट नाला बंधारा व कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा विशेष दुरुस्ती अंबाजोगाई उपविभागातील कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** लघुपाटबंधारे विभागाच्या सन 2015-2016 चे लेखापरीक्षणादरम्यान उपविभाग अंबाजोगाई चे 31 प्रमाणकांची तपासणी केली असता सदरबाबत रक्कम रूपये 1,08,97,872/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अनुक्रमांक 24 खोडवासावरगाव पा.त.दु. तसेच अनुक्रमांक 16 चिचखंडी सदरील संचिकेत साहित्य गुणवत्ता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

2) अनुक्रमांक 33 दरडवाडी क्रमांक 01 मध्ये सदरील कामाचे ठेकेदार श्रीमती अमृता रमेश झेंड यांनी निविदेतील अटीनुसार आयकर भरणा विवरणपत्र सादर केलेले नाही. तसेच संचिकेत ठेकेदाराचा कार्यारंभ आदेश व साहित्य चाचणी गुणवता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपिए-2000/प्र.क्र.44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तीका ठेवणे आवश्यक आहे. तथापि, विभागाने एकाच मोजमाप पुस्तीकेत वेगवेगळया कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

4) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 151 नुसार प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतरच तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामात अशी कार्यवाही झालेली नाही.

5) शासन परिपत्रक क्रमांक पंरास 01/प्र.क्र.160/38, दिनांक 18/08/2001 नुसार मोजमापे मान्य असलेबाबत मोजमाप पुस्तीकेत ठेकेदाराची स्वाक्षरी घेतलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व करार करून घेणा-यांच्या स्वाक्ष-या असणे आवश्यक असते. टेंडरवर करार करून घेणा-यांच्या प्रत्येक पेजवर स्वाक्ष-या नाहीत. असे असतांना पुढील प्रक्रिया केलेली आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 (ब)(6) नुसार दिनांकित स्वाक्ष-या केलेल्या नाहीत. प्रत्यक्ष दिनांक नमूद करून व तो दौरा दैनंदिनीशी योग्य अचुक असल्याचे खात्री पटवावी. लेखा संहिता नियम 180 अन्वये घेण्यात आलेल्या नोंदी लाल शाईने क्रॉस चिन्ह करून खोडलेल्या नाहीत.

8) दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शवणारे फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु, कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाची / योजनेची प्रगती नोंदवही नमुना नंबर 23 तसेच नियम 97 अन्वये नमुना नंबर 39 मध्ये स्थावर मालमत्ता नोंदवही, नमुना ठेवलेली नाही.

**3.409 लेखाशिर्ष-2702-6131 अंतर्गत केलेल्या सी.एन.बी. व कोल्हापुर पध्दतीचा बंधारा कामातील अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,36,22,495/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 अन्वये कंत्राटदारासोबत करारनामा करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने मुळ लेखापरिक्षण अहवालामधील परिशिष्ट-2 मधील अनुक्रमांक 1 ते 29 कामाच्या संचिकेतील करारनामे तपासली असता त्यात खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या:-

(i) पाच कामांच्या करारनाम्यावर कंत्राटदार व साक्षीदार यांच्या स्वाक्षऱ्या आढळून आल्या नाहीत.

(ii) 14 कामांच्या करारनाम्यावर साक्षीदार यांच्या स्वाक्षऱ्या आढळून आल्या नाहीत.

2) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष-बां.सा., दिनांक 18/11/2009 नुसार कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी व परीक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणण्यात येईल. तसेच अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक गुनि-1/1019 दिनांक 24/05/2006 व गुनि-1/2031 दिनांक 03/11/2006 नुसार बांधकाम साहित्याच्या चाचण्या वारंवारीतेनुसार घेऊन या चाचण्या बांधकाम साहित्य कामावर वापरण्या अगोदर घेणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक देयकासोबत उपविभागाने बांधकाम साहित्यांच्या चाचण्यांचा वारंवारीता तक्ता जोडणे आवश्यक आहे. तथापि, विभागाने अशी कार्यवाही न करता वारंवारीतेनुसार कमी चाचण्या घेऊन बांधकाम साहित्य कामावर वापरल्यानंतर चाचण्या घेतलेल्या आहेत.

3) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक शासन राजपत्र असाधारण-67, दिनांक 11/05/2015 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खानिजामधून स्वामित्व धनाची रुक्कम वसूल करणे

आवश्यक आहे. तथापि, कामाच्या देयकातून स्वामित्व धनाच्या रक्कमा कमी कपात केलेल्या आहेत. सबब, कमी कपात केलेली रुक्कम रुपये 20,234/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

4) काही कामाच्या संचिका तपासल्या असता सदरील कामाच्या अंदाजपत्रकासाठी सन 2013-2014 ची प्रादेशिक दरसूची वापरलेली आहे. सन 2013-2014 च्या प्रादेशिक दरसूचीत बाब : आधीच खोदलेल्या उपलब्ध माल ढिगामधून निवडलेल्या माल सामग्रीने सरळ भरावाच्या आवरण क्षेत्राची रचना करणे, थरामध्ये मांडणी करणे, ढेकळे फोडणे, भरावाचे सपाटीकरण करणे, जलशिंपण व संघनन करणे या बाबीचा दर रुपये 14.45/- (पृष्ठ क्रमांक 6 वर) अनुज्ञेय आहे. तथापि, सदरील कामाच्या अंदाजपत्रकातील दर पृथःकरण विवरणे तपासली असता अंदाजपत्रकामध्ये सदर बाबीचा दर रुपये 28.60/- दर्शवून दर पृथःकरण केलेले आहे. त्यामुळे रक्कम रूपये 64,935/- जादा प्रदान झालेले आहे.

सबब, जादा प्रदान झालेली रुक्कम रुपये 64,935/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

5) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमाप 1098/प्र.क्र.28, दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाच्या मूल्याच्या 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि, खालील विवरणपत्रातील तपशिलानुसार देयकातून 1 टक्के विमा रक्कम कपात करून ती रक्कम विमा संचालनालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु, सदर कामामधून विम्याची रक्कम कपात केलेली नाही. तेव्हा कमी कपात रुपये 31,084/- संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

6) चार कामाच्या संचिका तपासल्या असता, सदरील कामे ही सन 2012-2013 व सन 2013-2014 या वर्षातील आढळून आली.

एका कामावर 31/03/2015 अखेर खर्च करणे अपेक्षित होते. तर तीन कामावर 31/03/2014 अखेर खर्च करणे अपेक्षित होते. परंतु, सदर कामे मार्च-16 मध्ये पूर्ण करून सन 2015-2016 मध्ये 3,86,503/- खर्च नोंदविला आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-10.15/प्र.क्र.18/अर्थोपाय दिनांक 25/08/2015 मधील क (ii) नुसार जी कामे सुरु होऊन भौतिकदृष्ट्या अपूर्ण आहेत, ती कामे पुढील दिनांक 31/03/2016 पर्यंत पूर्ण होतील, असे विभागाकडून नियोजन केले जाईल. या अटींच्या अधीन राहून दिनांक 31/03/2016 पर्यंत खर्च करण्याची परवानगी विभागस्तरावर देण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश असताना अशी परवानगी विभागाने दिले बाबतची अभिलेखे लेखापरीक्षणात दर्शविले नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस 1099/ प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत नवीन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा अधिक रक्कमेच्या दर्शक फलक कामाच्या ठिकाणी लावावा. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा केली जाणार नाही, अशा स्पष्ट सुचना असतांना चार कामाच्या अंदाजपत्रकात माहिती दर्शक फलकाची तरतुद केली नसून प्रत्यक्षात मोजमाप पुस्तिकेवरून माहिती दर्शक फलक बसविलेचे दिसून आले नाही. तरी सदर नियमबाहयतेबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

8) काही कामाच्या संचिकेत तसेच देयकासोबत बांधकाम साहित्याच्या चाचण्यांचा वारंवारीता अहवाल दिसून आला नाही.

9) सिमेंट बंधारा बांधकाम झरी व बोर्डी या कामाच्या मोजमापासंबंधीच्या मोजमाप पुस्तिका क्रमांक 2,399 व 579 लेखापरीक्षणात अर्धसमास पत्राद्वारे लेखी मागणी करुनही सादर केलेल्या नाहीत.

### 3.410 जलयुक्त शिवार अभियानांतर्गत केलेल्या सी.एन.बी. नाला खोलीकरण, बळकटीकरण व कोल्हापुर पध्दतीचा बंधारा दुरुस्ती कामातील अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,67,79,685/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 अन्वये कंत्राटदारासोबत करारनामा करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने 11 कामाच्या संचिकेतील करारनामे तपासली असता त्यात खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या:-

(i) दोन कामांच्या करारनाम्यावर कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे यांच्या स्वाक्षऱ्या आढळून आल्या नाहीत.

(ii) एका कामांच्या करारनाम्यावर कंत्राटदार यांची स्वाक्षरी आढळून आली नाही.

2) 8 कामाच्या निविदा कमी दराने मंजूर झालेल्या आहेत. विभागाने निविदा मंजूर केलेल्या कामाच्या कंत्राटदारांना, "आंपण इतक्या कमी दराने कामे कशी करणार? याबाबतचा सविस्तर अहवाल विभागास सादर करावा, असे कळविले होते." परंतु, याबाबतचा कंत्राटदरांचा सविस्तर अहवाल संचिकेत दिसून आला नाही. यावरुन कामाची अंदाजपत्रके तयार करताना Trial Pit घेऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवालानुसार अंदाजपत्रके तयार करण्यात आली नसल्याचे स्पष्ट होते. तसेच अंदाजपत्रकीय दराच्या 10 टक्के व त्याहु न अधिक रक्कमेच्या कमी दराने निविदा मंजुर केल्यास कामाचा दर्जा यथायोग्य राहील्याबाबत विभागाने प्रमाणित करणे आवश्यक होते. परंतु, अशी कार्यवाही झाल्याचे संचिकेवरुन दिसुन येत नाही. तसेच कमी दराच्या निविदा मंजुर झाल्याने राहिलेल्या अखर्चित (शिल्लक) रक्कमेबाबत योग्य ते स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

3) एका कामाचे अंदाजपत्रक रुपये 17,94,500/- असुन सदर कामाची निविदा 25.07 टक्के कमी दराने मंजुर आहे. मात्र कामाचे मोजमाप पुस्तिकेनुसार एकुण मुल्यांकन रुपये 16,32,361/- नोंदविले आहे. वास्तविक पाहता 25.07 टक्के कमी दराने निविदा मंजुर केल्याने प्रत्यक्षात रुपये 13,45,875/- मुल्यांकन नोंदविणे आवश्यक होते. सदर तफावतीबाबत स्पष्टीकरण करावे.

4) महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 प्रमाणे कार्य कराराकरीता रुपये 10 लाखांपर्यंतच्या कामाकरीता रुपये 100/- व त्यापुढील प्रत्येक लाखाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता रूपये 100/- राहील. असे असताना कामाचा कार्य करार रुपये 29,53,851/- चा आहे. तेंव्हा रुपये 2,100/- मूल्यांच्या मुद्रांकावर कार्य करार करणे आवश्यक होते. परंतु, विभागाने रुपये 1,500/- मूल्यांच्या मुद्रांकावर कार्य करार केलेला आहे. तरी रक्कम रुपये 600/- संबंधित कंत्राटदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

5) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष-बां.सा., दिनांक 18/11/2009 नुसार कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी व परीक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणण्यात येईल. तसेच अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक गुनि-1/1019 दिनांक 24/5/2006 व गुनि-1/2031 दिनांक 03/11/2006 नुसार बांधकाम साहित्याच्या चाचण्या वारंवारीतेनुसार घेऊन या चाचण्या बांधकाम साहित्य कामावर वापरण्या अगोदर घेणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक देयकासोबत उपविभागाने बांधकाम साहित्यांच्या चाचण्यांचा वारंवारीता तक्ता जोडणे आवश्यक आहे. तथापि, विभागाने अशी कार्यवाही न करता वारंवारीतेनुसार कमी चाचण्या घेऊन बांधकाम साहित्य कामावर वापरल्यानंतर चाचण्या घेतलेल्या आहेत.

6) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक शासन राजपत्र असाधारण-67, दिनांक 11/05/2015 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खानिजामधून स्वामित्व धनाची रुक्कम वसूल करणे आवश्यक आहे. तथापि, कामाच्या देयकातून स्वामित्व धनाची रक्कम रूपये 1,099/- कमी कपात केली आहे. सबब, कमी कपात केलेली रक्कम रूपये 1,099/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

7) अकरा कामाच्या संचिका तपासल्या असता, सदरील कामाच्या अंदाजपत्रकासाठी सन 2013-2014 ची प्रादेशिक दरसूची वापरलेली आहे. सन 2013-2014 च्या प्रादेशिक दरसूचीत बाब : आधीच खोदलेल्या उपलब्ध माल ढिगामधून निवडलेल्या मालसामग्रीने सरळ भरावाच्या आवरण क्षेत्राची रचना करणे, थरामध्ये मांडणी करणे, ढेकळे फोडणे, भरावाचे सपाटीकरण करणे, जलशिंपण व संघनन करणे या बाबीचा दर 14.45/- (पृष्ठ क्रमांक 6 वर) अनुज्ञेय आहे. तथापि, सदरील कामाच्या अंदाजपत्रकातील दर पृथःकरण विवरणे तपासली असता अंदाजपत्रकामध्ये सदर बाबीचा दर रुपये 28.60/- दर्शवून दर पृथःकरण केलेले आहे. त्यामुळे रुक्कम रुपये 58,070/- जादा प्रदान

झालेले आहे. सबब, जादा प्रदान झालेली रक्कम रुपये 58,070/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस 1099/ प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत नवीन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा अधिक रक्कमेच्या दर्शक फलक कामाच्या ठिकाणी लावावा. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा केली जाणार नाही, अशा स्पष्ट सुचना असतांना चार कामाच्या अंदाजपत्रकात माहिती दर्शक फलकाची तरतुद केली नसून प्रत्यक्षात मोजमाप पुस्तिकेवरून माहिती दर्शक फलक बसविलेचे दिसून आले नाही. तरी सदर नियमबाहयतेबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

9) दोन कामाच्या संचिकेत तसेच देयकासोबत बांधकाम साहित्याच्या चाचण्यांचा वारंवारीता अहवाल दिसून आला नाही.

10) एका कामाची संचिका तसेच संदर्भ मोजमाप पुस्तिका क्रमांक 665 इत्यादी अभिलेखे लेखापरीक्षणात अर्धसमास पत्राद्वारे लेखी मागणी करुनही सादर केलेली नाहीत.

11) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जलशि-2015/प्र.क्र.115/जल-7 दिनांक 13/03/2015 अन्वये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कामांची गुणवत्तापूर्वक व पारदर्शी पद्धतीने अंमलबजावणी होण्यासंदर्भात खालील मुद्यांवर काटेकोरपणे कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत.

(i) काम सुरु असताना कामाचे किमान 2 वेळा समवर्ती मूल्यमापन करण्यात यावे, असे निर्देश असताना समवर्ती मूल्यमापन केलेबाबतचे अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

(ii) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत कामे पूर्ण झाल्यानंतर कामांचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत/संस्थेमार्फत मूल्यमापन करण्यात यावे. परंतु, कामे पूर्ण झाल्यानंतर कामांचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत/संस्थेमार्फत मूल्यमापन केलेचे अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

(iii) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत कामे सुरु होण्यापूर्वी, कामे सुरु असताना व काम पूर्ण झाल्यानंतर कामांचे डिजिटल (GPA Tagged) काढून ज्यामध्ये कामाच्या स्थळाचा अक्षांश / रेखांश नमूद असेल, असे फोटो काढून ते जनतेच्या माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावेत, असे स्पष्ट निर्देश असताना अशी कार्यवाही केलेचे संचिकेवरून दिसून आले नाही.

(iv) गावाचा पाण्याचा ताळेबंद तयार केल्यानंतर गावातील लोकांनी सुचविल्यानुसार उपचारांचा/कामांचा अंतर्भाव गावाच्या कृती आराखड्यात करून त्यास ग्रामसभेची मान्यता घेतलेबाबतची अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

(v) कृती आराखड्यानुसार निश्चित करण्यात आलेली कामे प्रत्यक्षात सुरु करण्यापूर्वी कामांची माहिती ग्रामपंचायतीना देणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केलेचे दिसून आले नाही.

(vi) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या कामांचे अंतिम देयक संबंधित कंत्राटदारांना अदा करण्यापूर्वी अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी पूर्ण केलेल्या कामांची तपशीलवार माहिती ग्रामसभेस अवगत करणे आवश्यक आहे. त्याशिवाय अंतिम देयके अदा करू नयेत, असे स्पष्ट निर्देश असताना अशी उचित कार्यवाही केलेली नाही.

(vii) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील तरतुदीनुसार गावामध्ये घेण्यात आलेल्या विकास कामांची माहिती प्रत्येक सहा महिन्यातून एकदा ग्रामसभेस देणे आवश्यक आहे. जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये ग्रामसभेची भूमिका अनन्य साधारण महत्वाची आहे. ग्रामसभा ही सार्वभौम आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये लोकांचा सहभाग हा महत्वाचा मुद्दा असून या कार्यक्रमाअंतर्गत उपचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना उपचारा/कामाबाबत ग्रामपंचायतीस माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानुसार जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत गावामध्ये घेण्यात येणाऱ्या कामांबाबत ग्रामसभेस माहिती देण्यात आलेबाबतचे अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

**3.411 सरोध बंधारा बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 47,41,221/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक पविनि/कार-डब्ल्युसी/xxxv।।शाविनि/ संकिर्ण/ फ-2, दिनांक 27/04/2006 नुसार कामांचे देयकातून 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम वसूल करावयाची आहे. कंत्राटदाराकडून 1 टक्के विमा रक्कम रुपये 51,343/- वसूल करुन शासन खाती भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए/2009/प्र.क्र.-108/ कामगार - 7, दिनांक 17/06/2010 अन्वये कंत्राटदाराचे कामाचे देयकातून 1 टक्के कामगार कल्याण उपकर कपात करावयाचे आहे. लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, हिंगोलीने वरीलप्रमाणे नमुद केलेल्या कामामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकर रक्कम रुपये 51,343/- कपात केलेली नाही. रक्कम रुपये 51,343/- संबंधिताकडून वसूल करुन शासन खाती भरणा करावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार बांधकामाचे सर्व साहित्याचे गुणवत्ता चाचणी करणे अवश्यक आहे. परंतु, गुणवत्ता चाचणी केली नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्र कक्ष बा.स., दिनांक 18/11/2009 नुसार साहित्य वापरण्यापूर्वी साहित्य चाचणी घेणे आवश्यक आहे. परंतू, अशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 नुसार कार्यकारी अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेवर दिनांकीत स्वाक्षरी केली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी रक्कम रुपये 1,00,000/- च्या पटीमध्ये कामाचे मोजमाप केल्याचे दिसून आले नाही.

6) निविदेतील जोडपत्र क्रमांक 1 मधील अटीनुसार विक्रीकर आयुक्ताकडील व प्राप्ती कर आयुक्ताकडील नोंदणीपत्र व तसेच निविदेच्या दिनांकापर्यंत मुल्यवर्धीत कर व प्राप्ती कर भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर न करता नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक सादर केला आहे.

7) जागेचे दानपत्र महसुल विभागाकडे नोंदणी केली नाही.

8) उक्त कामांबाबतची सुरक्षा अनामत रक्कम जिल्हा परिषदेच्या खात्यात जमा केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास दशविले नाहीत.

**3.412 सरोध बंधारा, मौजे बेलमंडल, तालुका कळमनुरी कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रूपये 5,86,565/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक पविनि/कार-डब्ल्युसी/xxxv।।शाविनि/ संकिर्ण/ फ-2, दिनांक 27/04/2006 नुसार कामांचे देयकातून 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम वसूल करावयाची आहे. कंत्राटदाराकडून 1 टक्के विमा रक्कम रुपये 7,202/- वसूल करुन शासन खाती भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए/2009/प्र.क्र.-108/

कामगार - 7, दिनांक 17/06/2010 अन्वये कंत्राटदाराचे कामाचे देयकातून 1 टक्के कामगार कल्याण उपकर कपात करावयाचे आहे. रक्कम रुपये 7,202/- संबंधिताकड्न वसूल करुन शासन खाती भरणा करावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार बांधकामाचे सर्व साहित्याचे गुणवत्ता चाचणी करणे अवश्यक आहे. परंतु, गुणवत्ता चाचणी केली नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्र कक्ष बा.स., दिनांक 18/11/2009 नूसार साहित्य वापरण्यापूर्वी साहित्य चाचणी घेणे आवश्यक आहे. परंतू, अशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 नुसार कार्यकारी अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेवर दिनांकीत स्वाक्षरी केली नाही.

5) निविदेतील जोडपत्र क्रमांक 1 मधील अटीनुसार विक्रीकर आयुक्ताकडील व प्राप्तीकर आयुक्ताकडील नोंदणीपत्र व तसेच निविदेच्या दिनांकापर्यंत मुल्यवर्धीत कर व प्राप्तीकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर न करता नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक सादर केला आहे.

6) जागेचे दानपत्र महसुल विभागाकडे नोंदणी केली नाही.

7) कंत्राटदार शेख नासिर शेख अहमद, रहाणार - कळमनुरी, यांचेकडून धनादेशाद्वारे रक्कम मिळालेबाबत मुद्रांकीत पोंच घेतलेली नाही.

**3.413 लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) यांना ठेव पद्धतीने सोपविलेल्या कामासाठी प्राप्त निधीचे 40 टक्के रक्कम रूपये 1 कोटी 94 लक्ष वर्ग करण्यास जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती यांनी मान्यता दिलेली असताना रक्कम वर्ग न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,94,00,000/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो-1092/प्र.क्र. 79/जल-1, दिनांक 08/01/1993 अन्वये व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 261 (1) अन्वये जिल्हा परिषद यांनी लघुसिंचनाची कामे कार्यान्वित करण्याकरिता लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) यांचे कडे वर्ग करावी, असे स्पष्ट केलेले आहे. त्या अनुषंगाने जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती यांचे ठराव क्रमांक 190 व 191 दिनांक 16/05/2015 अन्वये 40 टक्के निधी रक्कम रुपये 194 लक्ष वर्ग करण्याबाबत मंजुरी दिलेली असताना वर्ग केलेली नाही. जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती जिल्हा परिषद नांदेड यांनी मान्यता दिलेली असताना रक्कम वर्ग न करण्याचे प्रयोजन काय? याबाबत स्पष्टीकरणासह खुलासा होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो-1092/प्र.क्र.22/ 28/77/78/जल-1, दिनांक 03/03/1993 मधील तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता स्थानिक स्तर यांनी वर्ग केलेल्या रक्कमेबाबतचे दरमहा खर्चाचे विवरणपत्र जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, अर्धसमासपत्राद्वारे लेखी मागणी करूनही सादर न केल्याने जिल्हा परिषदेकडून सन 2014-2015 देण्यात आलेल्या रक्कमेपैकी खर्च केलेली रक्कम किती? अपूर्ण कामे व पूर्ण झालेली कामे किती? याबाबतचे अभिलेखे उपलब्ध न केल्यामुळे खातरजमा करता आली नाही.

3) उक्त शासन निर्णयातील सूचना क्रमांक 5 (2) नुसार कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, स्थानिक स्तर यांनी ठेवनिधीतील बांधकामे / लघुपाटबंधारे योजना पूर्ण झाल्यावर सदर बांधकामे / लघुपाटबंधारे योजना व्यवस्थापनासाठी जिल्हा परिषदेला हस्तांतरित करावयाच्या आहेत. परंतु, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) यांनी आज पावेतो किती कामे पूर्ण केली? किती योजना व्यवस्थापनासाठी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केली नाही. याबाबतचे अभिलेखे दर्शविले नाही.

4) जिल्हा परिषदेने वर्ग केलेल्या निधीच्या खर्चा संबधिची उपयोगिता प्रमाणपत्रे, काम पूर्णत्वाची प्रमाणपत्रे, योजना यशस्वीरित्या राबविलेबाबतचा योजनेचा फलश्रुती अहवाल दर्शवून अनुपालन अहवाल सादर करावा.

5) उक्त शासन निर्णयातील सूचना क्रमांक 6 नुसार जिल्हा परिषदेकडील लघुसिंचनाची कामे लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) यांनी कार्यान्वित करताना त्याबाबतचे विहित Agency Charges योग्य त्या लेखाशीर्षाखाली जमा केलेबाबतची अभिलेखे लेखापरीक्षणात सादर केली नाहीत.

**3.414 भूसंपादन प्रकरणी वाढीव मावेजा प्रदान करण्यासाठी तरतूद नसताना ईतर लेखाशीर्षातून नियमबाह्य प्रदान करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 18,14,950/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेडने उपलब्ध केलेल्या तरतूद व खर्चाचे विवरणपत्राची तपासणी केली असता भूसंपादन प्रकरणी वाढीव मावेजासाठी लेखाशीर्ष 3451-2503 लघुपाटबंधारे योजना भूसंपादन मधून तरतूद मंजूर करून खर्च करणे आवश्यक असताना सदर प्रकरणासाठी तरतूदच उपलब्ध नसताना नियमबाह्य 2702-6194 लघुपाटबंधारेची कामे या लेखाशिर्षा अंतर्गत खर्च नोंदविलेला आहे. त्यामुळे नोंदविलेला खर्च रक्कम रूपये 18,14,950/- मान्य करता येत नाही. सदर रक्कम वसूल करून संबधीत खाते भरणा करणे आवश्यक आहे.

2) भूसंपादन अधिनियम 1894 अन्वये भूसंपादन प्रकरणी योग्य ती कार्यवाही वेळीच अनुसरणे आवश्यक आहे. महसूल व वन विभाग पत्र क्रमांक 07/2007/प्र.क्र.91/आ-2, दिनांक 27/08/2008 व विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक 2010/पुनर्वसन/भूसंपादन कक्ष-1/सी.आर.4, दिनांक 16/01/2010 नुसार भूसंपादन अधिनियम 1894 मध्ये प्रकल्पासाठी लागणारी खाजगी जमीन अधिनियमातील तरतुदीनुसारच खरेदी करावी, असे कोणतेही बंधन नाही. प्रशासकीय विभागांनी त्यांच्या प्रकल्पासाठी लागणारी खाजगी जमीन खाजगी व्यवहारातून / वाटाघाटीने खरेदी करण्याचा प्रयत्न करावा. तसेच भूसंपादन संस्थेने त्यांना सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक खाजगी जमीन जमीनधारकाशी वाटाघाटी करून संपादन करण्याचा प्रयत्न केल्याची खातरजमा करून व त्यामध्ये भूसंपादन संस्थेस अपयश आले असल्याची खात्री करूनच भूसंपादनाची पुढील कार्यवाही करण्यात यावी. परंतु, विभागाने उपरोक्तप्रमाणे कोणतीच कार्यवाही केलेली नाही. परिणामी प्रत्यक्षात जमीन संपादन न करताच काम सुरु करण्यात आले आहे व त्यात शासन निधी गुंतून पडला आहे. त्यानंतर संबधीत शेतकऱ्यांनी न्यायालयात धाव घेवून वाढीव मावेजासाठी मागणी केलेली आहे व न्यायालयाचे आदेशानुसार वाढीव मावेजाचे प्रदान करण्यात आलेले आहेत. याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

3) भूसंपादन अधिनियम 1894 शासन निर्णयानुसार तडजोडीने अथवा वाटाघाटीने जमीन संपादनासाठी काय प्रयत्न करण्यात आले होते. भुसंपादन कधी केले? कोणत्या प्रयोजनासाठी केले? आणि कामाची स्थिती काय आहे? प्रस्ताव सादर करतेवेळी किती शेतकऱ्यांनी नाहरकत प्रमाणपत्र दिले होते. याबाबतचे संचिका व अनुषंगिक अभिलेखे दर्शविणेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 15, दिनांक 15/06/2017 अन्वये मागणी करूनही उपलब्ध केले नाही व अर्धसमासपत्र अनुत्तरीत ठेवण्यात आले.

**3.415 मालगुजारी तलाव दुरुस्ती पोचमकुटा (चिकना), तालुका धर्माबाद कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 4,73,956/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे संचिकेची तपासणी केली निविदा प्रसिध्दी कोणत्या वर्तमानपत्रात दिलेली आहे. याबाबतचे प्रत संचिकेत नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2006/प्र.क्र.366/वित-9, दिनांक 31/12/2009 अन्वये जिल्हा स्तरावरील एक ब वर्ग दैनिक मराठी / हिंदी व एक ब वर्ग मराठी साप्ताहीक मध्ये ई-निविदा प्रसिध्दी करणे आवश्यक असताना वरीलप्रमाणे कोणत्या वर्तमानपत्रामध्ये निविदा प्रसिध्दी दिलेली आहे? याबाबत जाहिरात दिल्याचे वर्तमानपत्राची प्रत संचिकेत नसल्यामुळे तपासणी करता आले नाही. त्यामुळे निविदा स्पर्धात्मक झाल्याचे स्पष्ट होत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 4 खालील परिशिष्ट-2 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित-9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तरावर प्रशासकीय, तांत्रिक व निविदा मंजुरीचे केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल आगामी सर्वसाधारण सभेत सादर करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

3) सदर कामाची संचिकेची तपासणी केली असता जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जलयुक्त शिवार नांदेड यांनी पाझर तलाव दुरुस्ती कामास रक्कम रूपये 9,39,791/- एवढ्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिलेली असताना कार्यकारी अभियंता (लघुपाटबांधारे) यांनी रक्कम रूपये 5,59,970/- अंदाजपत्रकीय रक्कमेस तांत्रिक मंजुरी दिलेली आहे. अंदाजपत्रकाची तपासणी केली असता तांत्रिक मान्यता रूपये 5,59,970 + 3,27,728 (add royalty horting

casing) + 6,060 (1 टक्के insu.) असे एकूण 9,39,791/- दर्शविलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा सहिंता 1968 चे नियम 109 अन्वये अंदाजपत्रकातील तरतूद संपूर्ण कामासाठी असेल. कामाचा खर्च दर अनुसूचीमध्ये दिलेल्या दरानुसार हिशोब करून काढण्यात येईल. परंतु, कार्यकारी अभियंता / उपअभियंता यांनी तांत्रिक मान्यता देताना संपूर्ण रक्कमेचा अंदाजपत्रक तयार न करता विमा व गौण खनीजाची रक्कम स्वतंत्र दर्शवून कमी रक्कमेस तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे, जे की नियमबाह्य आहे.

4) अंदाजपत्रकाची तपासणी केली असता कार्यकारी अभियंता (लघुपाटबांधारे), जिल्हा परिषद नांदेड यांची निरीक्षण टिपणी नुसार झाडे झुडपे तोडणे, सीओटी, केसिंग झोन, पिचिंग, सांडवा विंग व वाल दुरुस्तीचे काम प्रस्तावित केलेले असताना उपभियंता (उपविभाग उमरी) यांची संयुक्त पाहणी अहवाल मध्ये झाडे झुडपे तोडणे, गार्ज भरणे (फुटल्यामुळे), बंड दुरुस्तीचे दर्शवून अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता (लघुपाटबांधारे) यांची निरीक्षण टिपणी व उपभियंता यांचे संयुक्त पाहणी अहवाल मध्ये तफावत आहे. त्यामुळे अंदाजपत्रक योग्य असल्याची सत्यता पटत नाही.

5) करारनामा नुसार कामाची मुदत सहा महिने असतानाही काम प्रगतीतवर आहे. निधी असुन ही काम अपुर्ण राहण्याची कारणे काय? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/1009/प्र.क्र.309/ख(3), दिनांक 11/02/2010 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खनिजातून स्वामित्व धनाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. तथापि, सदर कामावर खोदकामातून निघालेल्या मातीचे वापर केलेले असून वापर केलेल्या मातीचे परिमाण मोजमाप पुस्तिकेत नोंदवून गौणखनिज येणारी रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. परंतु, मोजमाप मुल्यांकन नोंदविणारे शाखा अभियंता यांनी गौनखनीजाची रक्कम मोजमाप पुस्तिकेत न दर्शविल्यामुळे रक्कम रूपये 2,97,934/- गौनखनीज शासन खाती भरणा केलेली नाही. परिणामी शासनाचे नुकसान झालेले आहे. तरी गौण खनिज कमी कपात रुक्कम रूपये 2,97,934/- संबंधीताकडून वसूल करून शासन खाती भरणा करावी.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा सहिंता 1968 चे नियम 190 (3) अन्वये कामपुर्णत्वाचे प्रमाणपत्र नमुना 65 मध्ये देणे आवश्यक असताना विहीत नमुन्यात नाही.

**3.416 वैधानिक विकास मंडळ अंतर्गत नाला सरळीकरण व खोलीकरण करणे उपविभाग हदगाव कामातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रूपये 5,81,485/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 4 खालील परिशिष्ट-2 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमांक झेडपीए-2012/ प्र.क्र.680/वित-9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तरावर प्रशासकीय, तांत्रिक व निविदा मंजुरीचे केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल आगामी सर्वसाधारण सभेत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

2) नाला सरळीकरण व खोलीकरण, पेवा तालुका हदगाव कामाची संचिकेची तपासणी केली असता कामाची मुदत (3) महिने असुन कामाची मुदत दिनांक 01/05/2015 रोजी संपलेली आहे. कंत्राटदारांचे मुदतवाढ मिळणे बाबतचे अर्ज दिनांक 03/02/2016 रोजीचे असताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रतिदिन रूपये 1/- प्रमाणे दंड आकारून दिनांक 01/09/2015 ते 28/02/2016 पर्यंत मुदतवाढ मंजुर केलेली आहे. मुदतवाढ मिळणेबाबतचे सकारण अर्ज नसताना मुदतवाढ मंजुरीची केलेली कार्यवाही नियमबाह्य आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 148 अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी ह्यांना बहाल स्वेच्छाधिकार हे करारनाम्यातच लेखी स्वरूपात अंतर्भुत केला पाहीजे. परंतु, असे न करता प्रतिदिन रूपये 1/- प्रमाणे दंड रूपये 159/- वसुल करून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदतवाढ मंजुर केलेली आहे. विहीत कालावधीत काम

पुर्ण न झाल्याने शासनाचा निधी अडकुन पडला व विलंबाने लाभ मिळाला, ही बाब मुदतवाढ देताना विचारात घेतली नाही. केवळ नियमाचा आधार घेवुन केलेली कार्यवाही नियमबाह्य ठरते.

3) कामाची तपासणी केली असता मंजूर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता (स्थानिक स्तर) यांची असून त्याच अंदाजपत्रकानुसार काम केल्याचे मोजमाप मुल्यांकन नोंदविलेले आहे. जिल्हा परिषद स्तरावरील लघुपाटबांधारे ची कामे करण्याकरिता कार्यकारी अभियंता (लघुपाटबांधारे) जिल्हा परिषद नांदेड व सर्व तांत्रिक यंत्रणा असताना कामाची क्षेत्रीय तपासणी करून त्यानुसार अंदाजपत्रकास मंजुरी घेवून काम करणे अभिप्रेत होते. परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच जिल्हा परिषद स्तरावरील नालासरळीकरण व खोलीकरण कामाचे इतर अंदाजपत्रकात अतिरिक्त वाहतूक अंतर दिलेले नाही. परंतु, कार्यकारी अभियंता (स्थानिकस्तर) यांचेस्तरावर मंजूर अंदाजपत्रकात अतिरिक्त वाहतूक अंतर (Extra) 0.50 कि.मी दर्शवून दर पुर्थ:करणात जादा दर दिलेले आहे. त्यामुळे रूपये 1,04,851/- जादा प्रदान झालेले आहे. सदर रक्कम वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

4) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जलयुक्त शिवार यांचे प्रशासकीय आदेश मधील अट क्रमांक 22 नुसार प्राप्त तरतूद पैकी अखर्चित शासन खाती भरणा करणेबाबत सूचित केलेले आहे. दोन कामाची प्राप्त तरतूद रूपये 3.19 लक्ष व 3.18 लक्ष असे एकूण 6.37 लक्ष प्राप्त असून खर्च रूपये 2,98,808/- व रूपये 2,82,677/- असे एकूण रूपये 5,81,485/- शिल्लक अखर्चित रक्कम रूपये 55,515/- शासन खाती भरणा करून पूर्तता दर्शवावी.

5) कामाची संचिका उपलब्ध केली. परंतु, मोजमाप पुस्तिका क्रमांक 394, अर्धसमास पत्र क्रमांक 04, दिनांक 12/06/2017 अन्वये लेखी व मौखिक मागणी करूनही उपलब्ध केली नाही. त्यामुळे मंजूर अंदाजपत्रकानुसार काम झाल्याचे खातरजमा करता आली नाही. तसेच मुल्यांकनाशिवाय देयक सादर करून गैरव्यवहार होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र. 472/वित्त-9/(33), दिनांक 09/02/2009 नुसार ग्रामपंचायतीने गावठाणातीलच विकास कामे करावीत, असे स्पष्ट केलेले असताना दोन कामे गावठाणा बाहेरील कामे ग्रामपंचायतीस मंजूर करून शासन नियमाचे विसंगत कार्यवाही केलेली आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, कार्यकारी अभियंता यांनी अशी सर्वच कामाची तपासणी केलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/ प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार एका कामासाठी एकच मोजमापवही ठेवण्यात यावी, असे निर्देश असताना वेगवेगळया कामाचे मुल्यांकन एकाच मोजमाप वहीत नोंदविलेले आहे.

**3.417 सिमेंट बंधारा बांधकाम रिठा क्रमांक 1 व 2 तालुका भोकर कामातील गंभीर अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रूपये 9,09,911/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 4 खालील परिशिष्ट-2 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/ प्र.क्र.680/वित-9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तरावर प्रशासकीय, तांत्रिक व निविदा मंजुरीचे केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल आगामी सर्वसाधारण सभेत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

2) नियोजनानुसार जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती जिल्हा परिषद नांदेड ठराव क्रमांक 265, दिनांक 10/07/2013 अन्वये काम समंदरवाडी तालुका भोकर चे कामास नियोजन समितीची मान्यता असताना अनुक्रमांक 1 वरील सिमेंट बंधारा बांधकाम रिठा क्रमांक 2 चे काम केलेले आहे. काम बदलास समितीची मान्यता नसताना केलेले

प्रदान नियमबाह्य आहे. याबाबत समितीची मान्यता दर्शवावी अन्यथा रक्कम रूपये 4,65,121/- वसूल करून शासन खाती भरणा करावी.

3) सिमेंट बंधारा बांधकाम रिठा क्रमांक 1 व 2 कामाची तपासणी केली असता संचिकेतील कामाचे फोटो वरील दोन्ही कामाचे स्थळ एकाच ठिकाणचे असून सिमेंट बंधारा क्रमांक 1 कामाचे नामफलक उजव्या बाजूस व सिमेंट बंधारा क्रमांक 2 कामाचे नामफलक डाव्या बाजूस, असे एकाच ठिकाणचे आहे. त्यामुळे एकच काम केलेले असताना दोन कामे दर्शवून रक्कम आहरण करून शासन निधीचा गैरव्यवहार केल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत प्रशासकीय व क्षेत्रीय तपासणी करून एका कामाची चौकशीअंती रक्कम वसूल करून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट साहित्य 1099/ प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकाम साहित्य कामावर वापरण्यापुर्वी साहीत्याचे वारंवारीतेने शासकीय प्रयोग शाळेकडून चाचणी करून घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे योग्य गुणवत्तेची खात्री होत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, कार्यकारी अभियंता यांनी अशी सर्वच कामाची तपासणी केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/ प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार एका कामासाठी एकच मोजमापवही ठेवण्यात यावी, असे निदेश असताना वेगवेगळया कामाचे मुल्यांकन एकाच मोजमाप वहीत नोंदविलेले आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 190 (3) अन्वये कामपुर्णत्वाचे प्रमाणपत्र नमुना 65 मध्ये देणे आवश्यक असताना विहीत नमुन्यात नाही.

8) सदर देयकाची तपासणी केली असता देयकातुन विक्रीकर, आयकर, रॉयल्टी, विमा व उपकरच्या रक्कमा कपात केलेल्या आहेत. परंतु, सदर रक्कमा संबंधीत लेखाशिर्षाखाली भरणा केल्याचे दर्शविले नाही.

**3.418 जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधकाम खर्चातील अनियमितताबाबत**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद सन 2015-2016 या वित्तीय वर्षात पाझर तलाव कामे योजना अंतर्गत 03 पाझर तलाव कामावर रक्कम रूपये 9,70,043/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर.2009/प्र.क्र.180/ पंरा.8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक तातडीने बसविण्यात यावेत, असे असतांना त्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये तरतूद रक्कम रुपये 10,080/- ची तरतूद केलेली आहे व ती रक्कम ठेकेदारांस प्रदानही करणेत आलेली आहे. परंतु, कामाचे ठिकाणी फलक बसविण्यात आल्याबाबत कोणतीच नोंद पहावयास मिळाली नाही. त्यामुळे तीनही कामांचे फलकाची रक्कम रुपये 30,240/- वसुल करुन चलनाव्दारे शासन खाती जमा करुन अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 197 नुसार नमुना क्रमांक 69 पूर्ण कामाची नोदंवही ठेवून त्यामध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु, सदर नोंदवही लेखापरिक्षणास दर्शविली नाही.

3) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 21/12/2000 मधील तरतुदीनुसार संबधीत शाखा अभियंता, उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे कामाची तपासणी केव्हा करण्यात आली? याबाबत पडताळणी करता आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक

संकीर्ण.2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष-बां.सा., दिनांक 18/11/2009 नुसार कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी व परिक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणण्यात येईल असे पहावे, तसेच उपरोक्त साहित्य कामावर आल्याचा पुरावा नोंदविणे, तसेच जमेची तारीखवार नोंद घेणे व त्यानंतर वापराची तारीखवार नोंद घेणे इत्यादी बाबी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पाळाव्यात, असे नमुद करण्यात आलेले आहे. उपरोक्त कामावर ठेकेदाराने साहित्य वापरले आहे. परंतु, त्याबाबत जमेच्या व वापराच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

5) काम सुरु करण्यापुर्वी जोड कालवा रस्ता तयार करतेवेळी नकाशाप्रमाणे बांधहद्दीच्या खुणा कायम केल्या होत्या काय? काम सुरु करतेवेळी आजुबाजुच्या शेतकऱ्यांची संमती घेतली होती काय? याबाबत कोणत्याच प्रकारची नोंद ठेवण्यात आलेली नाही.

6) ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांकलपायो/2008/प्र.क्र.153/जल-1, दिनांक 30/06/2008 नुसार कोणत्याही परिस्थितीत अपुर्ण कामे पुर्ण केल्याशिवाय नविन कामे सुरु करु नयेत, अशा स्पष्ट सुचना असतांना विभागाकडील बरीच कामे अपुर्ण असतांना ती पुर्ण करुन घेण्याविषयी कोणतीही उपाययोजना न आखता नविन काम हाती घेऊन त्यावर खर्च करण्यात आलेला आहे.

**3.419 सिमेंट नाला बंधारा, नायगांव, तालुका कळंब कामाच्या खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सिमेंट नाला बंधारा, नायगांव, तालुकाकळंब कामावर जिल्हा परिषदेने प्रमाणक क्रमांक 222, दिनांक 22/3/2016 अन्वये रक्कम रूपये 8,10,291/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता, 1968 चे नियम 148 प्रमाणे बांधकामाच्या प्रारंभाचा व पूर्ण करण्याचा दिनांक करारनाम्यात विहीत करणे आवश्यक असून कंत्राटदाराने विहीत वेळेत काम पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर बांधकामाची मुदत दिनांक 07/02/2016 पर्यंत असताना काम दिनांक 04/05/2016 पर्यंत पुर्ण झाले आहे. सदर कामास मुदतवाढ घेतली किंवा कसे, याबाबत संचिकेत अभिलेखे उपलबध नाहीत. सदरील कामाच्या देयकाची रक्कम विनादंड मंजुर करुन प्रदान केलेली आहे. तरी सदर कामासाठी मुदत दिनांकापासुन 2 महिन्यापेक्षा जादा कालावधी लागलेला आहे. तरी नियमाप्रमाणे 1.5 टक्के दंडाची रक्कम रुपये 12,155/- वसुल करणे आवश्यक होते

2) काम सुरु करण्यापुर्वी जोड कालवा रस्ता तयार करतेवेळी नकाशाप्रमाणे बांधहद्दीच्या खुणा कायम केल्या होत्या काय? काम सुरु करतेवेळी आजुबाजुच्या शेतकऱ्यांची संमती घेतली होती काय? याबाबत कोणत्याच प्रकारची नोंद ठेवण्यात आलेली नाही.

3) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 21/12/2000 मधील तरतुदीनुसार संबधीत शाखा अभियंता, उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे कामाची तपासणी केव्हा करण्यात आली? याबाबत पडताळणी करता आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 197 नुसार नमुना क्रमांक 69 पूर्ण कामाची नोदंवही ठेऊन त्यामध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु, सदर नोंदवही लेखापरिक्षणास दर्शविली नाही.

**3.420 कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा काटी (पंखे शेत) उर्वरीत कामाबाबत ब-1 निविदा खंड 3(क) खाली रद्द केलेल्या कामाचा वाढीव खर्च वसुल न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** प्रमाणक क्रमांक 29 दिनांक 08/02/2016 रुपये 10,80,540/- प्रथम व अंतीम देयक आदित्य कन्स्ट्रक्शन, कळंब यांना प्रदान केले आहे. कंत्राटदार सिध्देश्वर ट्रेडर्स, लातुर यांनी काम अर्धवट ठेवल्यामुळे जिल्हा परिषदेने कार्यकंत्राटाचा ठेका रद्द करुन नव्याने निविदा मागवुन कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा काटी (पंखे शेत) हे काम पुर्ण करुन घेतले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सिध्देश्वर ट्रेडर्स, लातुर यांना कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा काटी(पंखे शेत) हे काम 15.99 टक्के कमी दराने देण्यात आले होते व सदर कामाची मुदत दिनांक 23/05/2012 होती. कंत्राटदारास दिनांक 31/03/2013 पर्यंत मुदतवाढ देवुनही कंत्राटदाराने काम अपुर्ण ठेवल्यामुळे जिल्हा परिषदेने सदर कामाचे कार्यकंत्राट ब-1 निविदेच्या अटी व शर्ती खंड 3(क) खाली दिनांक 20/12/2013 ला रद्द केले. तथापि, सदर कंत्राटदाराची नोंदणी रद्द केल्याची कागदपत्रे संचिकेत उपलब्ध नाहीत.

2) सिध्देश्वर ट्रेडर्स, लातुर यांनी विहीत कालावधीत काम पुर्ण न केल्यामुळे अंतीम सुधारीत अंदाजपत्रक व प्रत्यक्ष कामामध्ये दर सुची बदलामुळे रूपये 1,97,054/- व मुळ काम निवीदा 15.99 टक्के कमी दराची असल्यामुळे रुपये 2,92,137/- असा एकुण रुपये 4,89,191/- वाढीव खर्च करुन सदरचे अपुर्ण काम पुर्ण करावे लागले. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) ब-1 निविदेच्या अटी व शर्ती खंड 3(क) खाली ठेका रद्द केल्यामुळे वाढीव खर्चाची रक्कम रुपये 4,89,191/- मधुन सुरक्षा ठेव रूपये 81,955/- वजा जाता रक्कम रूपये 4,07,236/- मुळ कंत्राटदार सिध्देश्वर ट्रेडर्स, लातुर यांचेकडुन वसुलीची कार्यवाही झालेली नाही.

4) जप्त करण्यात आलेली सुरक्षा ठेव रक्कम रूपये 81,955/- शासन खाती जमा केलेली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.421 मौ कोदळी, तालुका उदगीर पाझर तलाव दुरुस्ती कामातील अनियमीततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,92,096/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर बांधकामात महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौण खनिज/108/ 1009/प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 नुसार रुपये 70.68 प्रती घमी दराने रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असतांना सदरील कामाच्या मोजमाप पुस्तीकेत गौणखनिज रुपये 1,28,115/- कपात न करता रुपये 64,057/- ची कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर कामाच्या देयकातून रुपये 64,058/- ही रक्कम कमी कपात करण्यात आलेली आहे. सदर रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

2) जिल्हाधीकारी कार्यालय लातूर यांचे पत्र क्रमांक 2016/गौखवि/जिखप/आर, दिनांक 22/11/2016 नुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठाणकरीता अंशदान दिनांक 12/01/2015 पासून संकलीत करणेबाबत सूचना दिलेली आहे. त्यानुसार गौण खनिजावर रॉयल्टी व्यतीरीक्त रॉयल्टीच्या 10 टक्के दराने जिल्हा खनिज प्रतिष्ठाण अंशदान यांच्या खात्यावर जमा करण्या बाबतचया सूचीत केलेले असतांना सदरील कामाची रॉयल्टीची रक्कम रुपये 1,28,115/- च्या 10 टक्के रुपये 12,811/- कपात करणे आवश्यक असतांना तशी कपात करून खनिज प्रतिष्ठाणकडे भरणा करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन लघुपाटबंधारे विभागाच्या 1983 च्या नियम पुस्तीकेतील पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8.73 चे उपपरीच्छेदानुसार 10 टक्के संकोच घट रुपये 18,658/- वजा करणे आवश्यक असतांना तशी वजावाट करण्यात आलेली नाही. सदर रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 (6) नुसार उपरीलेखन करता येत नाही तरी सुध्दा मोजमाप पुस्तीकेत उपरी लेखन केलेले आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे 148 (2) नियमानुसार गुत्तेदाराने काम पुर्ण होण्या 15 दिवस मुदत संपण्यापुर्वी मुदतवाढीचा अर्ज देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. गुत्तेदाराने दिनांक 01/02/2016 ला मुदतवाढीचे पत्र दिलेबाबत असे उपअभियंता यांनी नमूद केलेले आहे. विहीतमुदतीत काम पुर्ण केलेले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-1099/प्र.क्र. 54/8, दिनांक 20/05/1999 मधील परी.(ब) नुसार सर्व प्रकारच्या नवीन व दुरुस्तीच्या कामाच्या ठिकाणी नामफलक बसविणे आवश्यक असतांना सदरील कामाच्या अंदाजपत्रकात सदर नामफलकाबाबत तरतूद केली नाही व खर्च ही

केलेला नाही. शासन नियमाप्रमाणे कोणतेही काम अंतीम करण्यापुर्वी नामफलक बसविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. नामफलक न बसविता काम कसे केले याबाबत खुलासा करून पुर्तता दर्शवावी.

7) कामाचे आदेश जावक क्रमांक जिपला/लपापापु/कार्या-9/सी-आर/कावी-484/15, दिनांक 22/05/2015 अन्वये कामाचे आदेश देण्यात आलेले आहे सदर कामाची मुदत 1 महिना देण्यात आली होती म्हणजेच काम दिनांक 22/06/2015 रोजी पुर्ण होणे आवश्यक असतांना सदर दिनांकापर्यत काम पुर्ण झालेले नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 148 नुसार काम विहीत मुदतीत पुर्ण न झाल्यामुळे सदर कामास दंडात्मक कार्यवाही करुन मुदतवाढ देणे आवश्यक आहे. परंतु सदर संचिकेत तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 7, दिनांक 29/07/2017 अन्वये मागणीकरुन देखील अभीलेखे उपलब्ध न केल्याने कार्यवाही योग्य असल्याबाबत खात्री करता आली नाही.

8) सदरील कामाची निवीदा 12.21 कमी दराची असतांना गुत्तेदारास कमी दराने काम कसे परवडते याबाबत विचारणा करणे आवश्यक होते, परंतु तशी कर्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.422 मौजे नळगीर तालुका उदगीर पाझर तलाव दुरुस्ती कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** लघुपाटबंधारे विभाग जिल्हा परिषद लातूर सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात निवड महिन्यातील उपरोक्त कामाच्या संचिकेची तपासणी केली. सदरील कामावर एकूण रक्कम रुपये 15,33,907/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012 /प्र.क्र.680 / वित्त-9, दिनांक 19/03/2012 मधील टीप 4 नुसार जिल्हा परिषदेतील प्रत्येक विभागांनी कामाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करावयास पाहिजे. परंतु, अशी कार्यवाही झालेचे दिसून आले नाही.

2) मोजमाप पुस्तिकेत गौण खनिज रक्कम रूपये 6,67,531/- कपात करणे आवश्यक असतांना रक्कम रूपये 3,67,531/- ची कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर कामाच्या देयकातून रक्कम रूपये 3,00,000/- कमी कपात करण्यात केलेली रक्कम वसूल करुन शासन खाती भरण्यात यावी.

3) जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांचे पत्र क्रमांक 2016/गौखवि/जिखप/आर दिनांक 22/11/2016 नुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठानकरीता अंशदान दिनांक 12/01/2015 पासून संकलीत करणेबाबत सूचना दिलेली आहे. त्या नुसार गौण खनिजावर रॉयल्टी व्यतीरीक्त रॉयल्टीच्या 10 टक्के दराने जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंशदान यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत सुचना केलेले असतांना सदरील कामाची रॉयल्टीची रक्कम रूपये 6,67,531/- च्या 10 टक्के 66,753/- कपात करून खनिज प्रतिष्ठानकडे भरणा करण्यात आलेली नाही.

4) तांत्रिक मंजूरी सहायक अधिक्षक अभियंता क्रमांक 770, दिनांक 15/02/2013 रूपये 30,98,500/- असतांना सदरील कामास अध्यक्ष जलयुक्त शिवार अभियान तथा जिल्हा अधिकारी, लातूर जावक क्रमांक तंत्र/जलयुक्त/ प्रशासकीय मंजूरी /2839/2015, दिनांक 24/04/2015 रुपये 30,98,500/- प्रदान केली आहे. म्हणजेच अंदाजपत्रक 2013 व प्रशासकीय मान्यता 2015 मध्ये विलंबाने दिल्याचे दिसून येते. सदर काम दुरुस्तीचे असल्याने दरम्यानच्या कालावधीमध्ये सदरील काम दुसऱ्या योजनेमधून केले नसल्याचे लेख्याधारे खात्री पटवावी.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/44/33 दिनांक 22/12/2000 नुसार मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणाऱ्या अभियंता यांनी मोजमापाच्या नोंदी घेतल्यानंतर मोजमाप पुस्तिकेत दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही झालेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-1099/प्र.क्र.54/8, दिनांक 20/05/1999 मधील परिच्छेद (ब) नुसार सर्व प्रकारच्या नवीन व दुरुस्तीच्या कामाच्या ठिकाणी नाम फलक बसविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) कामाचे आदेश क्रमांक 769, दिनांक 12/08/2015 अन्वये कामाचे आदेश देण्यात आलेले आहे. सदर कामाची मुदत दिनांक 30/01/2016 देण्यात आली होती. म्हणजेच काम दिनांक 30/01/2016 रोजी पुर्ण होणे आवश्यक असतांना सदर दिनांकापर्यंत काम पुर्ण झालेले नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 8, दिनांक 29/07/2017 अन्वये मागणी करुन देखील अभिलेखे उपलब्ध न दर्शविल्याने कार्यवाही योग्य असल्याबाबत खात्री करता आली नाही.

8) सदरील काम विहीत मुदतीत पुर्ण न झाल्याने प्रथम देयकान्वये करण्यात आलेली अदाईगीची रक्कम अनावश्यकरीत्या खर्च झाल्याचे दिसून येते. विहीत मुदतीत काम जर झाले असते, तर गरजु शेतक-यांना सदरील कामाचा सिंचनाचा फायदा झाला असता.

9) सदरील कामाची निवीदा 10.21 कमी दराची असतांना गुत्तेदारास कमी दराने काम कसे परवडते? याबाबत विचारणा करणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.423 मौजे हकनकवाडी कोल्हापूरी बंधारा दुरुस्ती क्रमांक 1 कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रूपये 19,44,309/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर संचिकेत ग्रामपंचायतीचे PAN CARD ची छायांकित प्रत आढळून आली नाही. त्यामुळे आयकर अधिनियम 1961 देयकाची एकुण रक्कम रुपये 19,44,309/- तून आयकराची रक्कम 20 टक्के प्रमाणे रुपये 3,88,862/- कपात करणे आवश्यक असतांना देयकातून कपात झालेली नाही. आयकराची रक्कम रुपये 3,88,862/- शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र शासन, राजपत्र विक्रीकर आयुक्त, मुंबई यांची अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार मुल्यवर्धीतकर अधिनियमा खाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडून 2 टक्के प्रमाणे मुल्यवर्धित कर वसूली करावा व मुल्यवर्धीत अधिनियमा खाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून 5 टक्के करावयास पाहीजे सदरील कामातून रक्कम रुपये 97,215/- पैकी रुपये 957/- वसूल करण्यात आलेले आहे. रुपये 96,258/- वसूल करून शासनखाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड पीए/2000/44/33, दिनांक 22/12/2000 नुसार मोजमाप पुस्तीकेत नोंद घेणा-या अभियंता यांनी मोजमाप घेतल्यानंतर दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार अंतीम मोजमाप घेउन रक्कम प्रदान केल्यानंतर मोजमापावर लाल शाईने कर्ण रेषा मारणे अवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम 1099/प्र.क्र.54, दिनांक 20/05/1999 नुसार सर्व प्रकारच्या नवीन आणि दुरुस्तीच्या परि.8 ब मधील कामाच्या ठिकाणी लोखंडी आकाराच्या फलकावर कामाचा तपशील आईल पेंटने लिहणे सक्तीचे बसविणे आवश्यक आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकात फलक बसविलण्याची तरतूद करण्यात आलेली नाही व खर्च ही करण्यात आलेला नाही. नामफलका शिवाय कामाच्या देयकाची रक्कम अदा झालेली आहे. याबाबत शासन निर्णयातील तरतुदी नुसार कार्यवाही झालेली नाही.

**3.424 मौजे इस्लामपूर तालुका उदगीर पाझर तलाव दुरुस्ती कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात निवड महिन्यातील उपरोक्त कामाच्या संचिकेची तपासणी केली असता, सदर कामावर एकूण रक्कम रूपये 2,46,911/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/ वित्त9, दिनांक 19/03/2012 नुसार जिल्हा परिषदेतील प्रत्येक विभागांनी टिप-4 नुसार कामाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करावयास पाहिजे. परंतु, अशी कार्यवाही झालेचे दिसून आले नाही.

2) सदर बांधकामात महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौण खनीज / 108/ 1009/प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 नुसार रुपये 70.68 प्रति घ.मी. दराने रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असतांना सदरील कामाच्या मोजमाप पुस्तिकेत गौण खनिज रक्कम रूपये 93,649/- कपात न करता नियमबाहयपणे रक्कम रूपये 46,825/- ची कपात करण्यात आलेली आहे. रक्कम रूपये 46,824/- कमी कपात करण्यात आलेली आहे. सदर रक्कम वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

3) जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांचे पत्र क्रमांक 2016/गौखवि/जिखप/आर, दिनांक 22/11/2016 नुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठानकरीता अंशदान दिनांक 12/01/2015 पासून संकलीत करणेबाबत सूचना दिलेली आहे. त्यानुसार गौण खनिजावर रॉयल्टी व्यतीरीक्त रॉयल्टीच्या 10 टक्के दराने जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंशदान यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत सूचीत केलेले असतांना सदरील कामाची रॉयल्टीची रक्कम रूपये 93,649/- च्या 10 टक्के 9,364/- कपात करून खनिज प्रतिष्ठानकडे भरणा करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/44/33, दिनांक 22/12/2000 नुसार मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणाऱ्या अभियंता यांनी मोजमापाच्या नोंदी घेतल्यानंतर मोजमाप पुस्तिकेत दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही झालेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-1099/प्र.क्र. 54/8 दिनांक 20/05/1999 मधील परिच्छेद (ब) नुसार सर्व प्रकारच्या नवीन व दुरुस्तीच्या कामाच्या ठिकाणी नाम फलक बसविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6) सदरील कामाच्या विलंबाबात गुत्त्दाराने दिनांक 21/09/2015 रोजी दिलेल्या पत्रामध्ये शेतक-यांनी पेरणी केली असल्याने साहित्य वाहतूक करण्यास अडचण अल्याचे नमूद केलेले आहे. दिनांक 11/01/2016 अन्वये अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रुपये 10/- दंड आकरून दिनांक 02/07/2015 ते 30/09/2015 पर्यत मुदतवाढ मंजूर केली आहे.

7) सदरील काम दिनांक 25/09/2015 ला पुर्ण असतांना मुल्यांकन रक्कम रूपये 5,29,269/- करुन निवीदा रक्कम रूपये 4,93,822/- असून काम 7.51 टक्के कमी दराचे मंजूर असल्याने व Third party inspection नसल्याने कामाचे देयकातून रक्कम रूपये 2,09,825/- रक्कम राखून ठेवण्यात आलेली आहे. सदर कामाचे Third party inspection केव्हा झाले? उर्वरीत रक्कम संबधीतांस केव्हा परत करण्यात आली? फक्त् inspection या बाबीसाठी इतकी मोठी रक्कम कोणत्या प्राधिकाराने ठेवण्यात आली? याबाबत संचीकेत अभीलेखे उपलब्ध् नाहीत.

8) सदरील कामाच्या उणीवा बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 6 दिनांक 29/06/2017 अन्वये मागणी करुन त्याबाबत माहिती उपलब्ध करण्यात आलेली नाही.